"महादजी शिंदे यांचे पेशवे, निजाम, राजपूत व इंग्रज संबंध- एक चिकित्सक अभ्यास"

सामाजिक शास्त्र विभागातील इतिहास विषयातील पीएच. डी (पदवी) साठी

सादर केलेला

शोधप्रबंध

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधक

प्राचार्य सुरेंद्र वामनराव खाडे

(एम. ए. इतिहास, बी. एड)

नॅशनल कला व विज्ञान महाविद्यालय, जालना

मार्गदर्शक

डॉ. अनिल कठारे

एम. ए. (सुवर्णपदक), एम. फिल, पीएच. डी.

प्राध्यापक व संचालक,

पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र,

श्री शिवाजी कॉलेज, कंधार, जि. नांदेड

०१ फेब्रुवारी २०११

* अनुक्रमणिका *

प्रकरण पहिले

पार्श्वभूमी

प्रकरण पहिले

पार्श्वभूमी

मराठ्यांच्या इतिहासात महादजी शिंदे यांचे स्थान अत्यंत महत्वाचे ठरते, पेशवे काळात त्यांनी मराठा साम्राज्याच्या विस्ताराच्या दृष्टीने केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरते. इ.स. १७६१ मध्ये झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या लढाईत अफगाणिस्तानचा राजा अहमदशहा अब्दालीच्या सैन्याने मराठा सैन्याचा पार धुव्वा उडविला. या लढाईत मराठा सरदार महादजी शिंदे याचाही सहभाग होता. अनेक मराठा सरदार या लढाईत ठार झाले. परंतु महादजी शिंदे मात्र जखमी होऊन जिवंत राहिले. पानिपतच्या लढाईतील मराठ्यांच्या पराभवामुळे मराठा साम्राज्याचे अस्तित्व नाम मात्र राहिले होते. तसेच राजकिय क्षेत्रात मराठ्यांची नाचक्की झाली होती. पानिपतच्या लढाईनंतर ज्या मराठा सरदारांनी मराठा साम्राज्य सावरून धरण्याचे आणि मराठा साम्राज्याचा विस्तार करण्याचे कार्य केले त्यामध्ये मराठा सरदार महादजी शिंदे यांचे नाव विशेष उल्लेखनीय ठरते. त्यांनी उत्तर भारतात मराठा सरदार म्हणून केलेली कामगिरी महत्वाची ठरते. त्यांनी पानिपतच्या लढाईतील पराभवाचा वचपा काढून मराठा साम्राज्य टिकवून धरण्याचे कार्य केले.

इ. स. १७६१ पासून इ. स. १७९४ पर्यंत त्यांनी मराठा साम्राज्याचा विस्तार व विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची कामगिरी बजावली. या काळात त्यांचे पुण्याचे पेशवे, हैदराबादचे राजपूत व इंग्रज याच्याशी असलेल्या संबंधाचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात केला आहे.

विषय निवडीचा उद्देश व त्याचे महत्वः

महादजी शिंदे हे कर्तबगार मराठा सरदार होते. मराठा साम्राज्य पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतर सावरून धरण्याचे कार्य महादजी शिंदे, मल्हारराव होळकर आणि रघुजी भोसले या मराठा सरदारांनी केले. महादजी शिंदे यांनी मोगल साम्राज्यावर आपला अंकुश निर्माण केला होता. काही काळ ते मोगल बादशहाचे वजीर होते. त्यांनी मोगल साम्राज्याला टिकवून धरले.

त्यांनी मनात आणले असते तर मोगल साम्राज्याचे विलीनीकरण मराठा साम्राज्यात करता आले असते. परंतु त्यांनी तसे न करता बादशहालाच आपल्या नियंत्रणात ठेऊन मोगल राज्यावर सत्ता गाजविली. उत्तर भारतात स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या महादजी शिंदेची कर्तबगारी मराठा साम्राज्याच्या विस्ताराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची ठरते. इ. स. १७६१ ते इ. स. १७९४ हा महादजी शिंदे यांच्या कर्तबगारीचा काळ होता. या कालखंडात त्यांनी पुण्याचे पेशवे, हैद्राबादचे निजाम, राजपुत व इंग्रज यांच्याशी कधी चांगले तर कधी विरोधी संबंध प्रस्थापित करून त्यांच्यावर आपला धाक निर्माण केला. या संबंधावर प्रकाश टाकने आणि त्याचा संशोधनासाठी ''महादजी शिंदे यांचे पेशवे, निजाम, राजपूत व इंग्रज संबंध- एक चिकित्सक अभ्यास'' या विषयाची निवड करण्यात आली. या संशोधनामुळे महादजी शिंदेच्या कारकीर्दीतील महत्वाच्या घटनांवर प्रकाश पडतो. हेच या संशोधनाचे महत्व आहे.

संशोधनाची आवश्यकता:

मराठ्यांच्या इतिहासाचे शिवकाळ आणि पेशवे काळ या दोन कालखंडात विभाजन करण्यात येते. इ. स. १७३१ ते इ. स. १८१८ हा पेशवेकाळ आहे. या काळात अनेक मराठा सरदार होते. या मराठा सरदारांच्या कर्तबागारीवरच मराठा साम्राज्य अवलंबून होते. मराठा सरदार हेच मराठा राज्याचे प्रमुख आधार होते. मल्हारराव होळकर, जाणोजी भोसले, जयाप्पा शिंदे आणि महादजी शिंदे हे सरदारांत महादजी शिंदे हे कर्तबगार सरदार होते. दिल्लीचा मोगल सम्राटच त्यांच्या नियंत्रणात राज्य करीत होता. यावरून महादजी शिंदे यांच्या व्यक्तीमत्वाची व कर्तबगारीची कल्पना येते. महादजी शिंदे आणि पुण्याचे पेशवे, हैदराबादचे निजाम, राजपूत आणि इंग्रज यांच्यात या काळात बरेच संघर्ष, ताणतणाव आणि कधी-कधी सलोख्याचे संबंध राहिले. या संबंधावर प्रकाश टाकण्यासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन होण्याची आवश्यकता आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. ग्वाल्हेर येथील शिंदे घराण्याचा थोडक्यात आढावा घेणे.

२. महादजी शिंदेच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेणे.

३. महादजी शिंदे यांनी मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी केलेल्या कामगिरीचा आढावा घेणे.

४. महादजी शिंदेच्या उत्तरेतील कामगिरीवर प्रकाश टाकणे.

५. महादजी शिंदे आणि पेशवे यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

६. महादजी शिंदे आणि निजाम यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

७. महादजी शिंदे आणि राजपूत यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

८. महादजी शिंदे आणि इंग्रज यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

गृहितके:

१. मराठ्यांच्या इतिहासात ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरते.

२. मराठ्यांच्या इतिहासात मराठा सरदार म्हणून महादजी शिंदे यांनी केलेली कामगिरी महत्वाची ठरते.

३. महादजी शिंदे यांनी १८ व्या शतकात स्वःकर्तबगारीने स्वतःचे युग निर्माण केले.

४. महादजी शिंदे यांनी पुण्याच्या पेशव्याशी चांगले संबंध प्रस्थापित करून कठीण परिस्थितीत सुद्धा पेशव्यांना मदत केली.

५. महादजी शिंदे यांनी हैदराबादच्या निजामवर धाक बसवून त्यांच्या आक्रमणाला पायबंद घालण्याचा सतत प्रयत्न केला.

६. महादजी शिंदे यांनी राजपुतांचा वेळोवेळी बंदोबस्त करून त्यांच्याकडून खंडणी

वसुल केली.

७. महादजी शिंदे यांनी इंग्रजांच्या विरोधामध्ये मराठा सरदाराची एक फळी उभारून पहिल्या इंग्रज–मराठा युद्धात इंग्रजांचा पराभव केला.

संशोधन पद्धती व संदर्भ साधने:

''महादजी शिंदे यांचे पेशवे, निजाम, राजपूत व इंग्रज संबंध–एक चिकित्सक अभ्यास'' या विषयाच्या संशोधनासाठी संदर्भ संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. संशोधनासाठी अप्रकाशित कागदपत्रे आणि विविध प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे. नटनागर शोध संस्था, सितामाय पेशवे दप्तर पुणे, पुराभिलेखागार कार्यालय, मुंबई, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे येथील प्रकाशित, अप्रकाशित कागदपत्रे आणि संदर्भग्रंथाचा उपयोग संशोधनासाठी केला आहे. संदर्भ ग्रंथाची सर्वसमावेशक यादी शोधप्रबंधात शेवटी दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी राज्यापूर्वी संपूर्ण भारतात म्हणजे इ. स. १२०० ते १५२६ आणि इ. स. १५२६ ते इ. स. १६५० पर्यंत मुसलमानी सत्ताधीशांच्या वर्चस्वाचा काळ होता. इतर प्रदेशाप्रमाणेच इ. स. १५२६ ते १६५० पर्यंत महाराष्ट्राचा प्रदेशही मुसलमानी राजवटी खाली होता संपूर्ण दक्षिण हिंदुस्थानात विजापुरला आदिलशाही, गोवाळकोंड्याला कुतूबशाही, अहमदनगरला निजामशाही, बिदरला बरीदशाही वऱ्हाड मध्ये इमादशाही इत्यादी मुसलमानी राजवटींनी प्रतिगामी धोरण अवलंबिले होते व हिंदु लोकांवर अनन्वित अत्याचार केले महाराष्ट्रात अनेक कर्तबगार सरदार असून त्यांनी मुसलमानी राजवटीची सुभेदारी व जहागीरदारी पत्कारून स्वराज्याच्या स्थापनेचा विचार सोडून दिलेला होता. दक्षिणेत विजयनगरचे हिंदू राज्य होते. इ. स. १५६५ मध्ये तालीकोटच्या किंवा राक्षण तागडीच्या लढाईत, दक्षिणेतील सर्व मुसलमानी शाह्या उदाः

निजामशाही, आदिलशाही, कुतूबशाही, इत्यादी मुसलमानी सत्ता किंवा राजघराणे एकत्र येऊन त्यांनी तालीकोटच्या लढाईत विजयनगरच्या साम्राज्याचा पाडाव केला, त्यामुळे हिंदू राज्याचे स्वप्न भंग पावले. या घटनेप्रमाणे देवगिरीच्या यादवाची सत्ता दिल्लीचा मुसलमान सत्ताधीश अल्लाउद्दीन खिलजी यांनी देवगिरीवर स्वारी करून यादवांचे राज्य इ.स. १३१८ मध्ये नष्ट केले व दक्षिणेवर प्रभुत्व स्थापण्यासाठी पुढील योजना आखून दक्षिण ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. हे करीत असतांना हिंदूवर अनन्वित अत्याचार, अन्याय, जाळपोळ, लुटालूट, जुलूम करीत त्यांनी सत्ता स्थापन केली. मराठ्यांच्या इतिहासाचे मार्ग जाणून घ्यावयाचे असेल, तर मराठ्यांच्या उदयापूर्वी म्हणजे शिवपूर्व कालीन महाराष्ट्राची विशेषत्वाने ओळख होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र ही शिवाजीची जन्म व कर्मभूमी होय. स्वतःच्या अलौकिक कर्तुत्वाने हिंदवी स्वराज्याची स्थापना करून हिंदूचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. हे एक अलौकिक कर्तृत्वाने हिंदवी स्वराज्याची स्थापना करून हिंदूचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. हे एक अलौकिक व्यक्तीमत्व होते. शिवाजी महाराज पूर्वी महाराष्ट्राची किंवा भारताची अवस्था अत्यंत दयनीय होती. कारण भारतावर यावनांनी आक्रमण करून येथील हिंदूंची अत्यंत वाईट अवस्था केली होती, एवढेच नव्हे तर हा धर्मच नष्ट होतो की काय अशी परिस्थिती झाली होती. येथील जनजीवन पार बिगडून गेले होते ते उध्वस्त झाले होते आणि यवनाची सत्ता भारतात प्रस्थापित झाली होती.

इ. स. ७११ ते ७१२ पासून भारतावर मुसलमानी आक्रमणास सुरवात झाली त्यानंतर अनेक यावनी आक्रमणे झाली. त्यामधून पुढे इ.स. १२०६ ते १५२६ पर्यंत भारतावर सुलतानाचे अधिपत्य स्थापन झाले. पुढे सुलतानाचा पराभव करून इ. स. १५२६ मध्ये मोगलांचे राज्य स्थापन झाले. मोगलांचे ३०० वर्ष होते. विशेषतः राजपूतांनी स्वतःच्या अतुलनीय पराक्रमाने या यावनी आक्रमणाला रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु या बाबतीत त्यांना

यादवीमुळे यश आले नाही. शेवटी राजपूत व मोगल सत्ताधीश यांच्यात तडजोड होऊन मोगलांचे राजपूतांनी मांडलिकत्व स्विकारले अशा परिस्थितीमध्ये भारतीय धर्म व संस्कृती विनाशाच्या किंवा शेवटच्या टप्प्यांवर येऊन पोहोचली होती. शिवपूर्वकाळात देशातील परिस्थिती अत्यंत दयनीय व अनाकलनीय होती. अशा परिस्थितीमध्ये शिवाजी महाराजांचा उदय झाला नसता तर काय झाले असते? याची कल्पनाही करवत नाही. म्हणूनच इतिहासकार असे म्हणतात की, मराठ्यांचा इतिहास हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पर्व आहे. पंडित नेहरूंच्या मते, भारताचा इतिहास हा मराठ्यांचा इतिहासाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही. तो एक मैलाचा दगड आहे. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील या सर्वशाह्यातील सुमारे ७२ सुलतानानी सतत ३ शतके महाराष्ट्र आपल्या अत्याचारांनी भरडून काढला, संपूर्ण महाराष्ट्र हवालदिल झाला होता.

यादवांचा अस्त ते मराठ्यांचा उदय या काळातील दक्षिणेतील यावनी सत्तेच्या स्वरूपाचे वर्णन, किंवा वैशिष्ट्ये खालील प्रमाणे करता येईल. कत्तली, जाळपोळ, मूर्ती भजंन, अन्याय, अत्याचार, जुलूम, विश्वासघात व स्त्रियांचे अपहरण वर्णन करता येईल हे चित्र बदलण्यासाठी युग पुरूषच जन्मावा लागतो. त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म स्वराज्यात झाला व त्याने सर्व परिस्थिती बदलून हिंदूचे राज्य निर्माण करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. मराठ्यांच्या सत्तेच्या उदयात शिवजीचा वाटा सिंहाचा होता. याविषयी सर्वच इतिहासकारात एकमत आहे. छत्रपती शिवाजीच्या जन्मापूर्वीचा महाराष्ट्र हा इतरत्र विखरलेल्या माळेतील मण्याप्रमाणे होता. शिवाजी महाराजाने एखाद्या कुशल माळ्या प्रमाणे हे मणी एका सूत्रात गुंफून स्वराज्याचे तोरण उभारले. त्यांनी आपला अंगाच्या गुणामुळे सर्व सामान्यांना एकत्रित करून स्वतंत्र संपन्न आणि स्वाभिमानी जीवनाची हमी देणारे स्वराज्य निर्माण केले. हे राज्य व्हावे ही श्री ची इच्छा या सन्यस्त भूमिकेतून त्यांनी या कार्याकडे पाहिले. समर्थ रामदासांनी

शिवाजी महाराजाला श्रीमान योगी म्हटले आहे. म्हणून अनेक इतिहासकारांनी शिवाजी महाराजांच्या बाबतीत खालील प्रमाणे मते मांडली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज इतिहासकाराला जेवढा समजला त्यापेक्षा तो कितीतरी पटीने मोठे आहेत. समर्थ रामदासाच्या मते, झाले बहु होतील ही बहु, आहेतही बहु, परंतु यासम हाच म्हटले आहे. तर काही इतिहासकारांनी म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रातील सह्याद्रिला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे.[१] जे स्वप्न शिवाजी महाराजांच्या रूपाने पूर्ण झाले. असे हे असामान्य नेतृत्व महाराष्ट्राला लाभल्यानेच महाराष्ट्रात मराठ्यांच्या सत्तेचा उदय झाला

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ. स. १६४५ मध्ये स्वराज्याची स्थापना करून मोगल व विजापुरकर शाही विरूद्ध प्रमुख लढा दिला. इ. स. १६६५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडच्या किल्ल्यात मोगल सरदार मिर्झा राजा जयसिंगाने त्यांचा पराभव केला.

इ. स. १६६६ नंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी मोलगांशी शांततेचा तह केला. या तहान्वये छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रतिनिधी म्हणून राजपुत्र संभाजीला मोगलांनी ४००० ची मनसबदारी दिली होती. इ. स. १६६८ नंतर ते दौलताबादला राहू लागले, परंतु तेथेही बादशहाकडून राजपुत्र संभाजीला धोका निर्माण झाल्यानंतर त्यांना गुप्तपणे पळून जावे लागले.

राजपुत्र संभाजीला राज्यकारभाराचा अनुभव मिळावा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना २६ जानेवारी १६७१ युवराज म्हणून घोषित केले.[२] त्यांच्यावरसुद्धा काही मनसबदारांद्वारे जबाबदारी सोपविल्याचे दिसून येते. इ. स. १६७४ मध्ये रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला या समारंभामध्ये संभाजींना युवराज पदाचा मान दिला होता. तो पित्यानंतर वारस म्हणून गादीवर येणार असे गृहीत धरून त्यांना इतर जहागीरदार व सरंजामदाराद्वारे नजराने दिले गेले होते.

पुढे ४ फेब्रुवारी १६७५ रोजी त्यावी विधीवत मुंज केली. इ. स. १६८९ मध्ये छत्रपती संभाजीस कैद केल्यानंतर मोगांचे सम्राट औरंगजेब याने संगमेश्वर ता. मावळ जि. पुणे येथे अत्यंत क्रूरपणे शिरच्छेद केला होता.

येसूबाई पासून संभाजीला एक मुलगा व दोन मुली झाल्या. त्याला अनेक दिवस मुलगा झाला नाही. शेवटी १८ मे १६८२ ला छत्रपती शाहू किंवा छत्रपती शिवाजी दुसरा नावाचा मुलगा झाला.[३] तोच इतिहासात छत्रपती शाहू म्हणून प्रसिद्ध आहे.

छत्रपती राजारामाच्या कालखंडापासून मराठ्यांच्या स्वराज्याचे छत्रपती पद नामधारी बनले. इ. स. १६८९-१७०० पर्यंत छत्रपती राजारामाच्या काळाळ छत्रपतीपद नामधारी बनून मराठे जहागिरदर व वतनदारांनी स्वराज्याची दुरावस्थत्त केली. छत्रपती राजाराम हे एक मोठे दृष्टे राजपुरूष होते. त्यमूळे त्यांनी स्वराज्याचा गाडा आपल्या मंत्र्याशी वेळोवेळी महाराजांच्या शिस्तीप्रमाणे सल्ला मसलत करून व योग्य वेळी स्वतःचे मत चालवून निर्णय घेतले. लोकांची कदर केली जात होती. छत्रपती राजारामाने लोकांना जवळ केले. त्यांना स्वराज्याच्या हितासाठी संघटीत केले व कामास लावले. स्वराज्याची सारी जनता आपल्या पाठीशी उभी केली. त्यामुळे औरंगजेबासारख्या खतरनाक शत्रूचा मुकाबला करू शकले. आपल्या वेतनाविषयक धोरणाने त्यांनी औरंगजेबाचे धोरण पूर्ण अपयशी केले. औरंगजेबाच्या धोरणाचा राजारामांनी फज्ञा उडविला. इ. स. १६८९-१७०७ या काळात स्वराज्य मोगालंशी लढण्यस खंबीर पायावर उभे राहिले की पुढील काळातही इ. स. १७००-१७०७ पर्यंत स्वराज्याचा विजय मोगलांच्या विरोधात होऊ शकला. छत्रपती राजारामाचा कालखंड मराठ्यांच्या इतिहासात निर्णायक कालखंड समजला जातो. छत्रपती राजारामाजी कारकीर्द अत्यंत महत्वाची समजली जाते. स्वराज्यात सतत प्रेरणा, स्फूर्ती देणारी ठरेल अशी होती.[४] मराठ्यांच्या इतिहासातील महापुरूषातच त्यांची गणना करावी लागेल.

छत्रपती संभाजी जिवंत असून काही साध्य झाले नसते परंतु त्यांच्या वधाने सर्व स्वराज्यातच औरंगजेबाच्या विरोधात खवळून जागे झाले. लोकामध्ये असा प्रचारच झाला की, जगायचे तर शिवाजी महाराजासारखे प्रेरणेने आणि मरायचे तर संभाजी सारखे स्वाभिमानाने असा, वाक्प्रचारच त्यावेळी झाला या पिता पुत्राच्या स्फूर्तीने स्वराज्य पूर्णपणे मोगलांच्या विरोधात खवळून उठला की शेवटी मोगलांना पराजय पत्करावा लागला. आणि मराठ्यांना यश आले. [५] मराठ्यांचा इतिहास हा भारताच्या इतिहासात सदासर्वदा वैभवशाली कालखंड समजला जातो, प्रेरणादायक, स्फूर्तीदायक समजला जातो.

मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यांत जी अनेक विद्वान, वीर महापुरूष झाले ते छत्रपती शिवाजी महाराजपासून शाहू पर्यंत त्यांनीच पडत्या काळात मराठी साम्राज्य सावरले गेले. या लढ्यामध्ये शिवाजी महाराज व संभाजीनंतर मराठी राज्यात घोर अंधार निर्माण झाला होता. या काळांत राजधानी, खजिना, सैन्य, अष्टप्रधान मंडळ, नियोजन इत्यादी काहीही नव्हते. या सर्व परिस्थितीमधून महान मंडळींनी मार्ग काढून मराठी साम्राज्ये सावरले गेले, एवढेच नव्हे तर औरंगजेबासारख्या महान शत्रूला यश येऊ दिले नाही. शेवटी त्याचा दक्षिणेतच मृत्यू झाला. (इ.स.१७०७)

छत्रपती राजारामांच्या काळात स्वराज्याची परिस्थिती अस्थिर होती. औरंगजेबासारखा शत्रू स्वराज्याला नष्ट करण्याकरीता आला होता. मराठ्यांच्या छत्रपती संभाजीचा वध त्याने केला. स्वराज्य हे नष्ट होईल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये छत्रपती राजारामाने स्वराज्याचे नेतृत्व केले. स्वराज्य टिकविण्यासाठी, रक्षणासाठी त्याने अनेक पराक्रम व मुत्सद्दी लोक घेऊन कार्य केले. [६] अशा परिस्थितीमध्ये छत्रपतीपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे मराठ्यांची युद्धपद्धती होय. मराठ्यांचा

गनिमी कावा मोगलांना कधीच जमला नाही. मराठे, जेंव्हा हल्ला करून निसटून जात त्यावेळी त्यांचा पराभव झाल्याचे मोगल सेनानी बादशहाला कळवित असत. गनिमी कावा म्हणजे काय तर हालचालींची गुप्तता पाळने, शत्रूची माहिती मिळविणे, अचानक हल्ला करणे नुकसान करणे, लुटणे, पाठलाग करणे, राखीव फौज ठेवणे, त्यांना कठिण ठिकाणी गाठणे, रसद तोडणे छावणी शेजारी आसपासचे पाणी विषारी करणे, प्रदेश वैराण करणे इत्यादी गोष्टी मराठ्यांच्या गनिमी काव्यांत मोडतात. अशा शेकडो गनिमी लढाया मराठ्यांनी मोगलांच्या विरोधात केल्या. व त्यांची तारांबळ उडवून दिली. गनिमी काव्यासाठी लागणाऱ्या गोष्टी मराठ्यांकडे होत्या व मोगलांकडे त्या नव्हत्या. [७] गनिमी कावा फक्त दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेशातच खेळता येतो.

या स्वातंत्र्यलढ्याचे मराठ्यांच्या इतिहासावर काही दूरगामी परिणामही झाले. मराठी राज्यात मोगलांच्या आक्रमणामुळे भयानक परिस्थिती निर्माण झाली. एक प्रकारे संकटच आले. तेंव्हा या परिस्थितीतून स्वराज्याच्या रक्षणासाठी काही घोषणा कराव्या लागल्या.

सरंजाम शाहीस सुरूवात, स्वतंत्र राज्याची निर्मितीः

(इ.स. १७०७-१७९५):

या स्वातंत्र युद्धाचा मराठ्यांच्या इतिहासावर झालेल वाईट परिणाम म्हणजे सरंजामशाहीचे पुनरूज्जीवन होय कारण संभाजीच्या वधानंतर स्वराज्यात प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली होती. या परिस्थितीवर मात करण्यासाठी सरंजामशाहीचे व वतनदारी पद्धतीचे पुनरूज्जीवन करणे राजाराम महाराजांना अपरिहार्य वाटले. त्यावेळी छत्रपती राजारामजवळ काहीच नव्हते मग अशा परिस्थितीमध्ये मोगलांशी प्रतिकार कसा करावा? शत्रुशी लढा कसा द्यावा ? असा प्रश्न होता मोगलांकडून मराठ्यांना प्रचंड देणग्या, पदव्या, वतने, सरंजाम इत्यादी सर्व काही मिळत होते. हे मराठी माणसाच्या लक्षात आले. यामुळे छत्रपती राजराम महाराजाला त्याशिवाय

पर्यायच राहिला नाही. छत्रपती राजारामाच्या काळात सुरू झालेली ही पद्धती महाराणी ताराबाईलाही आवरता आली नाही. ती आवरणे ही शक्य नव्हते. सरंजामशाहीचे पुनरूज्जीवन झाल्यामुळे मराठेशाहीची घटनाच बदलून गेली.[८] याच सरंजामशाहीत भावी साम्राज्याचे बिजही होते आणि भावी विनाशांचा दारूगोळा ही होता.

माळवा प्रांतात मोगलांच्या समृद्ध प्रदेशात मराठे सरदार राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, उदाजी पवार ह्यांना ग्वाल्हेर, इन्दौर, धार, देवास इत्यादी प्रदेशाचा सरदेशमुख व चौथाई मिळालेली होती. इ. स. १७३० मध्ये पेशवे बाजीराव पहिले ह्यांच्या कालखंडात राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर व उदाजी पवार इत्यादी सरदारांनी माळव्याचा सुभेदार सवाई जयसिंगाचा पराभव करून इन्दौर, ग्वालेर, धार, देवास इत्यादी प्रदेश काबजी करून मराठ्यांना त्या प्रदेशाची सरंजामी सनदा देण्यात आल्या होत्या. पेशवा बाजीराव पेशव्यास ह्या प्रदेशाची सरदेशमुखी बहाल करण्यात आली होती व मराठा सरदारांना चौथाईच्या उत्पन्नाचा प्रदेश बहाल करण्यात आला होता. राणोजी शिंदे ह्यांना ग्वाल्हेर, भींड, मुरेना, ह्या प्रदेशाची सरंजामी सत्ता प्राप्त केलेली होती.[९] इ. स. १७३०-१७४५ पर्यतची राणोजी शिंदेची कारकीर्द मराठ्यांच्या इतिहासात महत्वाची मानली जाते.

पेशवा नानासाहेब व ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याची कामगिरी :

(इ.स. १७५६ ते १७६०)

उत्तर हिंदुस्थानातील स्वाऱ्यात मराठ्यास एकामागून एक जय मिळत गेले. जयपूरचा राजा माधोसिंग याजकडे व गंगापारचा सादुल्लाखान रोहिला याजकडे मराठ्यांनी खंडण्या करार केल्या. तसेच, वजीर सफदरजंगाकडे लावणीच्या खर्चाचे दहा लक्ष रूपये करार केला. या खंडणीच्या वाटणीबाबत शिंदे, होळकर व पवार या त्रिवर्ग सरदारात असा शिरस्ता होता की, समाईक खर्च वजा होऊन बाकी जी रहाते त्याचा चौथा हिस्सा सरकारास देऊन शिल्लक

हिश्यातून वाटणी घेण्याचा शिरस्ता असे.

मराठे सरदार पेशव्याच्या सांगण्यावरून १७५२ च्या पावसाळ्यात दक्षिणेत आले त्याचा परिणाम असा झाला की, रोहिल्यास पुन्हा तयारी करण्यास वेळ मिळून पुन्हा ते शिरजोर झाले. तसेच दिल्लीतील व उत्तरेतील राजकारणास निराळीच कलाटणी मिळाली. यावेळी दिल्लीचा मोगल बादशहा अहमदशहा हा निर्बुद्ध, आळशी आणि चंचल वृत्तीचा असल्यामुळे दरबारातील अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे वर्चस्व नव्हते.

सुरजमल कुंभेरीच्या किल्ल्यात येऊन राहीला होता. त्यास मराठ्यांनी वेढा दिला (२० जानेवारी १७५४) व मोर्चे लाविले. किल्ला वाळूच्या मैदानात, त्यामुळे सुरूंग काम देईनात. मराठे इरेला पेटले. गोळागोळी सुरू झाली. त्यात जाटांकडील गोळी मल्हाररावाचा एकुलता एक मुलगा खंडेराव यास लागून तो मरण पावला. मल्हाररावास याचा राग येऊन त्याने घोर प्रतिज्ञा केली की, सुरजमलचा शिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरच जन्मास आल्याचे सार्थक. नाहीतर प्राण त्याग करीन. मल्हाररावाच्या या नवीन इर्षेमुळे वेढा जोराने पुढे चालू झाला जाट घाबरून गेला. जाटाची थोरली पत्नी राणी किशोरी हिच्या सल्ल्यावरून सुरजमलने जयाप्पा शिंदेची मदत मागितली. जयाप्पाने जाटाचा बचाव करण्यचे वचन दिले. [१०] शिंद्यांच्या मध्यस्तीने जाटांशी एप्रिल अखेर तह ठरला आणि तीस लाख रूपये मराठ्यांनी खंडणी घेऊन हा वेढा मे मध्ये उठविला.

जयप्पा शिंदेची कामगिरी व दुर्दैवी खून (इ.स. १७५५):

जाटांच्या राजकारणात लढाईचा खर्च मराठ्यांच्या डोक्यावर जास्त बसला. शिवाय जयाप्पाने जाटाला वाचविले ही गोष्ट होळकरास पसंत पडली नाही. पुढे त्याची अशी फजिती झाली. मरावाडची जबाबदारी शिंद्यांनी स्वतंत्रपणे अंगावर घेतली. राघोबादादाने जयाप्पा शिंदे यास दिनांक २३ जून १७५४ राजी जोधपूरला जाण्यास अनुमती दिली. त्याप्रमाणे ३० जून

ला मारवाडला दाखल झाले. जोधपुरात रामसिंगास गादीवर बसवून त्याचा प्रतिस्पर्धी विजेसिंग याचा पराभव करावा ही कामगिरी त्याजवर सोपविली होती. शिवाय आजमेर हस्तगत करावयाचे होते.

मारवाडचा (जोधपूर) राणा अभयसिंग दिनांक २१ जून १७४९ रोजी मृत्यू झाला आणि त्याचा मुलगा रामसिंग गादीवर बसला. पण अभयसिंगाचा भाऊ बख्तसिंग याने बादशाही फौजेचे साहाय्य मिळवून रामसिंगास घालवून दिले आणि दिनांक ८ जुलै १७५१ रोजी जोधपूरचे राज्य मिळविले. तेंव्हा रामसिंग स्वरक्षणार्थ जयपुरास पळाला. पुढे बख्तसिंग दिनांक २३ सप्टेंबर १७५२ रोजी मृत्यू झाल्यानंतर बख्तसिंगाचा मुलगा बिजेसिंग गादीवर आला. रामसिंग दिनांक १७ डिसेंबर १७५३ रोजी राघोबादादास भेटून त्यांने जयपुरची गादी मिळविण्यासाठी मराठ्यांची मदत मागितली. [११] तेंव्हा राघोबाने मारवाडवर जयाप्पा शिंद्यास ४० हजार सैन्यानिशी पाठविले.

जयाप्पाने सांबेरच्या मार्गे कुच करून अजमीरच्या उत्तरेचा किशनगड किल्ला ऑगस्ट १७५४ मध्ये काबीज केला व विजयसिंग मेडल्याच्या बंदिस्त किल्ल्यात जाऊन बसला होता. त्यावर रामसिंगाची फौज बरोबर घेऊन जयाप्पा चालून गेला. दोन्ही सैन्यांची गाठ पडून दिनांक १५ सप्टेंबर १७५४ मेडल्यावर तुंबळ रणसंग्राम झाला. मराठ्यांनी शत्रूची फौज लुटली. विजयसिंग मेडते सोडून नागोरला पळून गेला. मेडते काबीज करून मराठी फौजांनी नागोरकडे कुच केले. विजयसिंगाचे सरदार पळून गेले. तरी विजयसिंग दमला नाही. मारवाडांतील ही मराठी मोहिम फारच लांबली. २१ फेब्रुवारी १७५५ रोजी मराठ्यांनी अजमेरचा किल्ला सर केला. एकीकडे रामसिंगाने झालोरला गुप्त ठिकाणी लपविलेला विजेसिंगाचा द्रव्य संचय आणि ते ठाणे अचानक हल्ला करून सर केले. रामसिंगाचा सरदार जगन्नाथ पुरोहित आणि शिंद्यांचा सरदार संताजी साबळे यांनी जोधपुरास वेढा घातला. विजेसिंगास ही सारी परिस्थिती अवघड

झाली तो कासावीस होऊन गेला. त्याच्या फौजेस अन्नपाणीही दुर्मीळ झाले. अशा प्रकारे विजेसिंगाचे लोकांवर कठीण प्रसंग गुदरल्यामुळे त्याने जयाप्पा शिंद्याबरोबर तहाचे बोलणे सुरू केले. शिंद्यांनी ५० लाख रूपये दंड मागितला. विजेसिंगाचा वकील गोड थापा मारून शिंद्यास झुलवून लागला.

पेशव्यांशी शिंद्यास लिहिले होते की, एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन राठोडांशी लढण्याच्या इर्षेत न पडता आपले हित साधावे. शिवाय मल्हाररावास मायेत घेऊन तह करून मोकळे व्हावे असाही निरोप पाठविला होता. पण शिंद्यांनी आपल्या मनसब्यात होळकरास घेतले नाही. तहाच्या वाटाघाटी नागोरच्या बाहेर ताऊस सरोवरावर जयाप्पाची छावणी होती तिथे चालू असता दिनांक २५ जुलै १७५५ ला जयाप्पा स्नान करून उठत असताच त्याचा खुन विजेसिंगाने करविला. जयाप्पा चौरंगावरून एकदम खाली कोसळले. जिकडे तिकडे आरोळी पडली. तहाच्या वाटाघाटीस आलेले विजेसिंगाचे वकील विजयभारती व जगनेश्वर, राजासिंग चव्हाण आदींना जागच्या जागीच मराठ्यांनी कंठस्नान घातले आणि त्या दगाबाज अवलादीची पाळेमुळे खणून काढण्यासाठी मराठ्यांनी छावणीतील प्रत्येक राजपूत हुडकून काढून ठार केला. नागोर, जालोर व जोधपूर येथील पूर्वी दिलेले वेढे मराठ्यांनी तसेच कायम ठेविले आणि शहर न सोडता राजपूत कापून काढावे हा विचार केला जयाप्पा शिंदेचा या युद्धात मृत्यू झाला. तरी त्याचा मुलगा जनकोजी शिंदे राजपुतांना धूळ चारण्यास खंबीर होता. जयाप्पाच्या सुतकाचे तेरा दिवस संपायच्या आतच मराठे राजपूतांच्या पारिपत्यासाठी बाहेर पडले. राजपुत सैनिकांनी मराठ्यांपुढे अधिक लढा दिला नाही.[१२] सर्वही पादाक्रांत होतील असा जोर दत्ताजी व जनकोजी यांनी दाखविला होता.

अडचणीच्या प्रसंगात दत्ताजी शिंदे फार धूर्ततेने वागला. विजेसिंगाने माधोसिंगाच्या मदतीने मराठ्यांविरूद्ध केलेल्या उठावास तो पुरा पडला. झालोरहून चालून आलेल्या संताजी

बावळ्याने प्रथम राठोडास गाळले आणि बेजरब मारा करून त्याच मोड करून गोदवजच्या किल्ल्यात कोंडले. अनिरूद्ध खंगोरात यांच्या नेतृत्वाखाली विजेसिंगाचे मदतीस येणाऱ्या फौजेस दत्ताजीने गाठले. दत्ताजीच्या मदतीस यावेळी अंताजी माणकेश्वराची फौजही दौडत येत होती. मराठ्यांनी दिनांक १५-१६ ऑक्टोंबर १७५५ ला अनिरूद्धसिंगाच्या फौजेस गाठून त्याला सडकून पोच दिला. सात आठशे राजपुत लोक जागचे जागी ठार केले. खुद्द खासा अनिरूद्धसिंग पराभव पावल्यावर दिडवाण्याच्या रोखेने पळू लागला. तेव्हा मराठ्यांनी त्याच्या मार्गातील विहिरी बुजविल्या. जाग जागची तळी रोखून धरीली त्यामुळे अनिरूद्धसिंगाच्या फौजेतील पुष्कळ जनावरे व सैन्य पाण्यावाचून मेले. अनिरूद्धसिंग दिडवाण्यास पोहोचल्यावर मराठ्यांनी त्यास फारच हैराण केले तेंव्हा त्याचा नाईलाज होऊन त्याने तहाची वाटाघाट १७५६ चे जानेवारीत चालू ठेविली. नागोरचा वेढा मराठ्यांनी इरेला पडून अधिक संघर्ष केला.

तारीख ६ डिसेंबरास दत्ताजीने संस्थान इंद्रगड, सरकार, रणथंबो, सुभा अजमेर येथील मुलूखावर खंडणी वसुल केली. पुढे दत्ताजी शिंदे आणि त्यांच्या समागमे पवार प्रचंड मराठा फौजेनिशी दिल्लीकडे कुच करून गेले, आणि दिनांक २६ डिसेंबर १७५८ रोजी नजफगडला पोहचले.

पेशव्यास रघुनाथरावाकडून उत्तरेतील घडामोडींची हकीकत सप्टेंबर १७५८ मध्ये कळाली होती. विशेषतः मल्हाररावाने नजीबास जीवदान दिल्याचे समजताच पेशव्याने मल्हाररावास आपल्या भेटीस पुण्यास बोलाविले. पण मल्हरराव आजारी होऊन अंथरूणात होता. त्यास बरे वाटल्यावर तो डिसेंबरात पेशव्यांच्या भेटीस आला. पेशव्याने मल्हाररावास उत्तरेत शिंद्यांच्या मदतीस जाण्याचा हुकूम दिला. मल्हारराव जानेवारी १७५९ त उत्तरेत जाण्यास निघाला. [१३] पण एक वर्ष त्याने राजपुतांकडून खंडण्या घेण्यात घालविले, आणि जानेवारी १७६० मध्ये तो दिल्लीस पोहोचला.

दत्ताजी शिंदे उत्तरेकडील कामगिरी (१७५९-६०)

दत्ताजी शिंदे यांनी वजीर गाजीउद्दीनाकडे थकबाकीच्या वसुलीकरीता तगादा लावला. त्याकरिता दिल्लीचे आपसात एक महिना काढून वजिरास त्रस्त केले होते आणि वजिरापासून किती रक्कम घ्यावयाची तो करार करून फेब्रुवारी १७५९ मध्ये त्यांनी पंजाबकडे मोर्चा वळविला. इ. स. १७५९ च्या एप्रिल महिन्यात मराठे सतलज नदीचे पूर्व तटावर पोहचले, आणि काझीवाडा येथे तीन आठवडे मुक्काम करून राहिले. पंजाबचा सुभेदार आदीनाबेग मृत्यू पावला होता, त्याचा मुलगा या ठिकाणी मराठ्यास भेटला. त्याने बापाने कबुल केलेल्या खंडणीपैकी काही रक्कम मराठ्यास दिली. मराठ्यांनी पंजाब प्रांताचा सर्व कारभार अपले ताब्यात घेण्यासाठी फौज लाहोरास ठेवली व ते मे महिन्याचे सुमारास दिल्लीस परत आले. पुढे मराठे नानासाहेब पेशवे यांनी सांगितलेली कामगिरी करण्याच्या उद्योगास लागले.

लाहोरास असता दत्ताजीने इ. स. १७५९ च्या मार्च मध्ये पेशव्यास लिहिले की, गाजीउद्दीनखानास वजिराचे पदावरून दूर करून सुजाउदौल्यास बादशहाची वजिरी व नजीबखानास मीरबक्षीगिरी मिळवून देण्यात मदत करावी. कारण ह्या मदतीबद्दल ते दोघे अनुक्रम ५० लाख व ३० लाख रूपये नजर मराठ्यास देण्यास तयार आहेत. ह्या राजकारणासंबंधी पेशव्याने सरदारास समजाविले की, रोख जास्त पैसे देईल तिकडे जा, त्याची बाजू घ्या, त्याला अधिकारावर ठेवा व कोणत्याही प्रकारे उत्तरेकडील सुवर्ण नदी पुण्यातील रूक्ष वाळवंट सुपीक करण्यासाठी वाहू द्या एवढीच पेशव्यांची इच्छा व आज्ञा. त्याच्या सिद्धीसाठी दत्ताजीसारख्या राजनिष्ठ नोकरला नको ती गोष्ट करण्याची पाळी आली. त्याने प्रथम नजिबास मजबरोबर येण्यास सांगितले व नंतर आपण अयोध्येपासून बंगालपर्यंत प्रदेश जिंकला जाऊ असे सांगितले. या गोष्टीस गाजीउद्दीनाची संमती नव्हती, कारण दत्ताजीने त्यापासून प्रयाग, काशी व पटणा या तीन शहरांची सनद मागितली होती व एकंदर स्वारीत जे द्रव्य मिळेल त्यातील

रूपयातील दहा आणे मराठ्यांचे सहा आणे वजिरांचे म्हणजे पातशाहीचे, अशी आणेवारी ठरविली होती. गाजीउद्दीन दुबळा होता. तरी मोगली राज्याच्या वजीर म्हणून काहीही सोडावयास तयार नव्हता. याच वेळी त्याने नानासाहेब पेशव्याला किंवा त्यांच्या सरदारांना गुंडाळून ठेऊन आपल्या अधिकारात इंग्रजांना सुरतेचा किल्ला व शिद्दीच्या जागी मोगली साम्राज्याची आरमारी मुख्य सत्ता, नजराणा घेऊन सुपूर्त केली होती. दिल्लीच पातशाही मराठ्यांनी जिंकली होती. असे जे म्हणतात, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. पराभव केलेल्या शत्रूचे परराष्ट्रीय राजकारणसुद्धा मराठ्यांनी कधी स्वतःच्या ताब्यात आणले नाही. याच गाजीउद्दीनाने ज्या बंगाल प्रातांची चौथाई भोसल्याने मिळविली होती, त्या बंगाल प्रांताची सुभेदारी नजराणा हबकून इंग्रजाचे बाहुले झालेल्या मिरजाफरला दिली व याबाबत मराठ्यांच्या हितसंबंधाचा विचारही मनात आणला नाही.'[१४] दिल्लीच्या बादशाहीचा आता कारभार तसाच ठेवून मराठे सरदार व वजीर गाजीउद्दीनखान सर्व मराठे फौजेनिशी अब्दालीवर चाल करून गेले.

शूर दत्ताजी वेढा उठवितो (इ.स. १७५९):

अफगाणिस्तानचा बादशहा अहमदशहा अब्दाली पंजाबला आला ही खबर आल्यावर दिल्ली व आग्रा ही शहरे भितीने गडबडून गेली. वजीर आदी करून सर्व लोक आपले कबिले सुरक्षिततेसाठी जाटांच्या मुलूखात पाठवून सुरक्षित झाले, अब्दालीचे सैन्य पंजाबात उतरल्यावर साबाजी शिंदे व त्यांच्या सैन्याने शत्रुचा मुकाबला केला, परंतु त्याचा पराभव होऊन तो दत्ताजीच्या छावणीकडे आला आणि दत्ताजीस तारीख ८ नोव्हेंबर १७५९ रोजी भेटला. दत्ताजीने वजीर गाजीउद्दीनखान, अहमदखान बंगश, सूरजमल जाट व मल्हारराव होळकर यांना ताबडतोब मदतीस येण्यास पत्रे रवाना केली आणि तारीख ९ नोव्हेबर रोजी १७५९ रोजी वाटाघाटी करून शत्रूचा कसा पराभव करावा? या विषयी योजना ठरविली. वजीर

गाजीउद्दीनखानाने १६ नोव्हेंबर १७५९ मध्ये शुक्रतालकडे मराठ्यांच्या मदतीस जाण्यासाठी बादशहाचा निरोप घेतला. परंतु अब्दालीने मराठ्यांना पंजाबातून काढून, तो प्रांत काबीज केला. ही बातमी त्यास कळताच त्याने अलमगीर बादशहास २९ नोव्हेंबर १७५९ रोजी ठार मारले आणि दुसऱ्या दिवशी इन्तिजामउद्दोलाचीही तीच गत केली. बादशहा आलमगीर दुसरा याचा खून झाला. ही वार्ता अब्दालीस समजताच बंडखोर व राजद्रोही वजीरगाजीउद्दीनखान याचा पारिपत्य करण्यासाठी अब्दालीने दिल्लीवर चालून येण्याचे ठरविले, मुलतान येथे ठाण्याचे बंदोबस्तासाठी जी सहा हजार मराठे फौज ठेविली होती त्या लोकांवर अब्दालीने हल्ला करून पाचशे सैनिकाबरोबरच सर्व फौज ठार झाली. हे जीव वाचवून आलेले पाचशे सैनिक देखील उघडे बोडके अशा परिस्थितीत दत्ताजीच्या छावणीस २३ नोव्हेंबर १७५९ रोजी झाले. '[१५] तेंव्हा दत्ताजीस शुक्रतालचा वेढा उठविणे भाग पडले.

अफगाण फौजेला त्यांच्या बदुंकाच्या माऱ्यामुळे मराठ्यांच्या भाल्याचे व तलवारींचा काही निभाव लागत नव्हता. अब्दालीच्या सैनिकांनी त्याच्यावर हमला करून त्याच्या डोळ्यात धनुष्यबाणाचा तिर लागून तो ठार झाला. तेंव्हा मराठे पळू लागले. नजीबाने जोराचा हल्ला चढविला. '[१६] जनकोजी सामोरा गेला तेंव्हा चार घटका युद्ध होऊन जनकोजीच्या दंडास गोळी लागली. जनकोजीस रणांगणातून उचलून घेऊन मराठे दिल्लीकडे धावले.

जनकोजी शिंदेची कामगिरी (इ.स. १७६०-१७६१):-

मराठे तारीख १० जानेवारीस दुपारपासून पळत पाठीमागे वीस कोस आले, तोपर्यंत पठाणांनी पाठलाग केला. नंतर गुरूवारची रात्र व शुक्रवारचा दिवस वाट चालून मांडण म्हणून जाटांची जागा होती तेथे आले. तेथे रात्र काढून पुढे तीन दिवस लांबलांब मजली करीत दिनांक १४ रोजी कोटपुतळीजवळ आले. तेथे मल्हारजी होळकर यांची भेट झाली. दोन दिवस विचार करून दोघांनी आपली कुटुंबे व जड सामान उज्जैनीकडे गोविंदपंत बुंदेलेबरोबर रवाना केले.

तेंव्हा गनिमी काव्याने लढून अफगाणांचा दाणा वैरण तोडण्याचा बेत केला. '[१७] जनकोजी वयाने लहान, मल्हारराव यावेळी ७५ वर्षाचे. तेंव्हा मल्हाररावास मराठी फौजेने आपला सर्वाधिकारी माणून त्यांनी २४ जानेवारीस १७६० त दिल्लीकडे कूच केले.

मराठ्यांच्या स्वराज्य विस्ताराच्या धोरणात पेशवा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्या उत्तर भारतातील कामगिरीत विशेषतः राजपूतांचा पाडाव, रोहिलाखंडातील सूरजमल जटावच्या पाडावात शिंदे घराण्यातील सरदारांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. जयाप्पा शिंदेची उत्तरेकडील कामगिरी महत्वाची असून त्याने राजपुत संस्थानिकांचा केलेला पराभव मराठ्यांच्या इतिहासात जयाप्पा शिंदे, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे यांची पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील कामगिरी अविस्मरणीय आहे. जनकोजी शिंदे आपल्या ७००० फौजेसह मराठा सरसेनापती सदाशिवराव भाऊ व पेशवा बाळाजी उर्फ नानासाहेब यांच्या बरोबर मोठ्या पराक्रमाने लढून पानिपतच्या तिसऱ्या युद्धात दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी शहीद झाले.


महादजी शिंदे इ.स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धात अहमदशहा अब्दालीच्या विरूद्ध लढतांना जखमी झाले, सुदैवाने जखमी अवस्थेतून त्यांना एकांत स्थळी नेण्यात आले.'[१८] महादजी शिंदे यांच इ. स. १७६१ च्या पानिपतच्या युद्धानंतरची कामगिरी अतिशय महत्वाची असून मराठा साम्राज्य विस्ताराच्या धोरणात त्यांनी केलेली कामगिरी मराठ्यांच्या इतिहासात मोलाची व महत्वाची कामगिरी मानली जाते.

महादजीबाबांबद्दल इतिहासकार जदुनाथ सरकार म्हणतात 'दिल्ली सल्तनतवर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करून पानिपतच्या पराभवाचा डाग धुवून काढण्याचे काम एकट्या महादजीबाबानेच केले. त्यांना पुणे दरबाराकडून मदत मिळाली नाहीच. उलट विरोधच झाला. नाना फडणीसांनी जर खुल्या मनाने मदत केली असती तर महादजीबाबाने जी मराठी सत्ता उत्तर हिंदुस्थानावर प्रस्थापित केली ती चार वर्षे अगोदर झाली असती.''

महादजी शिंदे यांची कामगिरी (इ.स. १७६१-१७९४)

राणोजी शिंदे यास पहिल्या बायकोपासून तीन व खांडाराणी चिमाबाई जिच्यापासून दोन मिळून पाच पुत्र होते. पैकी जयाप्पा, जोत्याजी, दत्ताजी व तुकोजी हे पानिपतपूर्वी खपले, जयाप्पाचा मुलगा जनकोजी इ. स. १७६१ च्या पानिपतच्या युद्धात मारला गेला. तेंव्हा पानिपत नंतर महादजी व तुकोजीची असलेली मुले केदारजी, खलोजी व आनंदाराव एवढेच तीन मुले शिल्लक राहिलेली होती. पेशवा माधवरावानंतर पेशवाईचा कारभार रघुनाथदादाचे हाती आला. त्यांनी तुकोजीचा मुलगा केदारजी यास सरदारकीची वस्त्रे दिली आणि त्याच्यापासून नजराणा घेतला. यामुळे केदारजी शिंद्यांच्या दौलतीचे अधिकार नारो शंकरामार्फत पाठवून इ. स. १७६८ मध्ये त्यास उत्तर हिंदुस्थानचे स्वारीस जाण्याचा हुकूम दिला. केदारजी पुढे १७७७ मध्ये मृत्यू पावला व त्यानंतर महादजी शिंद्यास दौलतीचे निर्विवाद वारसदार मानले गेले.

महादजीचा जन्मकाळ उपलब्ध झाला नाही. पारसनींना त्यांच्या चित्राखाली जन्माचा इ. स. १७३० छापला आहे. त्यांचे वय अहिल्याबाईशी समान असल्याचा एक उल्लेख आढळला आहे, त्यावरून अंदाजाने इ. स. १७२७ ची तारीख गृहित धरली जाते.[१९] ग्वाल्हेरमध्ये एक कुंडली मिळाली त्यात दाखविलेले ग्रह योग्य वाटत नाहीत परंतु तरीही सवंत् १७८९ माघ शु .१३ इ. घ. १२ प.० (ता. १७-१-१७३३) ही कुंडली ग्राह्य मानली जाते.



हे ग्रह उत्तर हिंदुस्थानच्या कालगणनेस अनुसरून तर नसतील परंतु त्याचा शोध व्हावा व तिथी व घडी नक्की व्हावी, म्हणून कुंडली दिली आहे. ती प्रत्यक्ष पुराव्याने आता अग्राह्य ठरतात. महादजीच्या वयासंबंधाने किनने अनेक विरोधी विधाने केली आहेत.

महादजी शिंद्यास बरीच मुले व मुली झाल्या परंतु ती मुले व मुली जगली नाहीत. पुत्र असावा अशी त्यास मोठी उत्सुकता असून त्यासाठीच त्याने अनेक बायका केल्या. मुले जगत नाही म्हणून त्यास अत्यंत वैताग वाटे. मोठी होऊन नांदणारी त्याची एकच मुलगी लाडोजी देशमुखास दिलेली बाळाबाई तेवढी होय. महादजीच्या दोन नातजावयांचा उल्लेख येतो. ते या बाळाबाईचे जावई असावे असे वाटते. एक अ ानंदराव जाधव दौलतराबादचे, लखुजी जाधवरावाच्या वंशापैकी याच्या उत्पन्नाच्या काही भानगडी होत्या, त्या संबंधाने महादजीने नानास अनेक शिफारसपत्रे लिहिलेली आढळतात. दुसरा नातजावई यशवंतराव दाभाडे तळेगावचा यास दौलतरावाने बाळाबाईची मुलगी देऊन लग्न केले आणि त्यास ३० सप्टेंबर १७९७ रोजी सातारकर छत्रपतींचे९ सेनापतिपद पेशवा बाजीराव दुसऱ्याकडून दिले गेले. लाडोजी देशमुख दिल्लीस बादशहाच्या बंदोबस्तात होता. तो ता. ९ एप्रिल १७९७ रोजी मरण पावला आणि महादजीच्या पश्चात् बाळसाबाईच्या घरात भाऊबंदकीचे तंटे सुरू झाले. त्यांच्या निरसनासाठी बाळसाबाईने नानास पितृतुल्य भावनेने लिहिलेली पत्रे उपलब्ध आहेत.

लाडोजी बिन सिधोजी देशमुख सितोळे नरसिंहराव याचे लग्न बाळाबाईशी इ. स. १७७६ झाले. त्याला सिधोजी व लक्ष्मणराव असे दोन मुलगे होते पैकी सिधोजी दौलतरावाबरोबर खर्ड्याच्या मोहिमेत होता. लाडोजी उत्तरेत बादशहाजवळ असता इ. स. १७८६ पुण्याजवळ त्याच्या गावी कब्जा होऊन त्यात लाडोजीच्या धाकट्या भावास पेशव्यांनी सजा केली. *त्यासंबंधाने महादजी म्हणाला लाडेजी सितोळे आमचे आप्त ते नानांचेही आप्तच त्यांचे बंधु, वय लहान, पोक्त बुद्धि नाही, ऐसे असता, त्यास नेऊन उन्हांत उभे करून पायांचे आंगळे*

धरून, डोक्यावर दगड द्यावयास उभे केले. बेअब्रु केली, त्यात आमचाच बदफैली झाली असे नाही तर नानांचा आणि आमचा भाऊपणा कमी होऊ.'[२०] *गुन्हा केला तर गुन्हेगारी घ्यावी,* तरी हे बेअब्रू धनीपणास उचित आहे की काय! बहिरजी ताकपीर म्हणून आणखी एक नांव महादजीच्या जावयाचे कागदात येते, त्याचा प्रपंच मोठा बनला आहे.

महादजीच्या कर्तृत्वाचे फलितः

नाना फडणीसांनी पेशव्यांच्या नावे दिलेल्या हुकूमान्वये महदजी शिंदे उत्तर हिंदुस्थानात गेले. बादशहाकडून सर्वाधिकार स्वीकारून आपल्या तंत्राने राजकारण बांधू लागले. महादजीबाबांच्या कामात कशी खीळ पडेल हे नाना फडणीस पाहू लागले. वास्तविक मराठेशाहीचे सर्वाधिकारी नानाच होते. नानांचा व महादजींचा स्नेह होता. दक्षिणेत येण्यासाठी महादजी नानांची परवानगी राष्ट्रीय बाणा बाळगून उत्तरेतील राजकारण शिंद्यावर सोपवावयास हवे होते. त्यांच्या मदतस पाठविलेले तुकोजी व अलिबहाद्दर यांना अंतस्थ रितीने महादजीचे हुकूम मानू नकाः माझेकडे लिहून पाठविल्यावर पुण्याहून तुम्हास जे लिहून येईल त्याप्रमाणे वागा असा दोघा सरदारास सांगावयास नको होते. त्यांच्या ह्या वागण्यात क्षुद्र वृत्ती दिसते हे राष्ट्रपुरूषाचे वागणे नव्हे म्हणून लेखणी बहाद्दरांनी नानास केवढेही मोठे केले तरी नानात शिवाजी महाराज, बाजीराव किंबहूना नानासाहेब पेशवे यांच्या राष्ट्रीय विचारसरणीचा लवलेशही दिसत नाही. इ. स १७८९ –९० मध्ये मोगल बादशहा दुसऱ्याकडून महादजीबाबांना वकील–ई–मुतालिक ह्या नात्याने इंग्रजाकडे बंगालच्या दिवाणीचे पैसे मागितले. इंग्रजांनी ही मागणी धुडकावून लावली. महादजीबाबास इंग्रजांचा एवढा राग आला की, त्यांनी इंग्रजांविरूद्ध सार्वत्रिक उठाव करण्याचे राजकारण बांधले. नानानी जर उत्तरेत त्यांच्या मदतीस दोन सरदार त्यांचे ऐकणारे पाठविले असते तर उत्तरेतील कामगिरी व राजपुतांना काबूत आणणे व इस्माईल बेगचा बंदोबस्त करणे ह्या गोष्टी त्यांनी २–४ वर्षात उरकल्या असत्या. पण नानांना इतिहास माहिती असूनही त्यावर

त्यांच्या स्वार्थाने कुरघोडी केली. खरा शत्रू इंग्रज आहे, टिपू नव्हे हे टिपूने स्पष्ट सांगूनही नानांनी इंग्रजांचा पाडाव करण्यासाठी काहीच हालचाल केली नव्हती. ते राष्ट्रपुरूष असते तर त्यांनी राष्ट्राचा विचार केला असता. मराठ्यांची सत्ता म्हणजे ऐतद्देशीयांची, आपल्या राष्ट्राची सत्ता ती अबाधित राखण्यासाठी शत्रूस शिरजोर होऊ न देणे, हे राष्ट्रपुरूषचे काम नानांनी केले नाही. महादजी पराक्रमी होते. उत्तरेत पेशव्यांच्या नावेच ते मराठी सत्तेचा विस्तार करीत होते. नानांच्या क्षुद्र राजकारणास कंटाळून उत्तरेतील कामगिरी अलिबहाद्दरावर सोपवून आपणास दक्षिणेत पेशव्यांचे चरणापाशी येण्याचे हुकून द्यावे असे महादजींनी इ. स. १७९० पासून नानांना विनंती करीत होते. परंतु उत्तरेतून महादजीबाबा दक्षिणेत पुण्यास आल्यास ह्या पराक्रम व मुत्सद्दी वीरांचे पेशवे ऐकतील आणि आपले कारभारी पद महादजींना मिळेल ह्या स्वार्थी धास्तीसने नाना फडणीसांनी महादजींना उत्तरेत दोन न ऐकणारे सरदार पाठवून गुंतवून ठेवले होते. महदजीबाबांच्या हे लक्षात आले.[२१] तरी त्यानी आपले राष्ट्रासंबंधीचे कर्तव्य केले. मराठी सत्ता दृढ करण्यासाठी त्यांनी अफगाण बादशहा व शीख यांजशी समझोता करून सतलज नदी ही आपल्या राज्याची महादजींनी सरहद्द ठरविली.

महादजीबाबांनी हिंदुस्थानच्या राजकारणाचा विचार करतांना अफगाणच्या हद्दीपर्यंत ते बंगालच्या टोकापर्यंतच्या सर्व भूभागाचा विचार केला होता असे दिसते. त्यांनी अफगाण, शीख व मराठे या त्रिवर्गाचा एक समझोता घडवून आणला होता. सतलजपर्यंत मराठ्यांची सत्ता चालावी, सतलजपासून लाहोरपर्यंत शिखांचा अधिकार मान्य करावा आणि लाहोरपासून अटकेपर्यंत अफगाणांची हुकूमत चालावी असे अफगाण बादशहा तिमूरशहा यांनी महादजीबाबांपाशी मान्य केले होते. अफगाण व मराठे यांनी एकमेकांस संकटकाळी मदत करावी. अफगाण बादशहांनी महादजीबाबास त्यांच्या गरजेच्या वेळी दह हजार घोडेस्वार पाठवून मदत करावी. ह्या अटी प्रत्यक्षात आणण्याचा पाळी आली नाही. पण महादजी शिंद्यांनी

जे धोरण पत्करले होते ते नवीन होते. पेशव्यांच्या वाढत्या वजनाचे ते द्योतक होते.

महादजी शिंदे यांनी इंग्रजांना ओळखले होते. इंग्रजांचे कावे व धोरण इ.स. १७६५ पासून इंग्रजांशी मल्हाररावाचा पहिला सामना झाला तेंव्हापासून महादजीबाबा ओळखून होते. मागेपुढे आपला प्राणांतिक सामना इंग्रजांशीच होणार याबद्दल कोणासही संशय उरला नव्हता, म्हणून महादजींनी गनिमी काव्याची लढण्याची पद्धत सोडून कवायृती फौज तयार केली होती. डी बॉयनसारख्या कसलेल्या सर्वोत्तम फ्रेंच सेनानीकडे त्याचे अधिपत्य दिले. ह्या कवाईयती फौजेच्या जोरावर महादजींनी उत्तर हिंदुस्थानात आपला अंमल बसविला. पण नाना फडणीसांनी त्यांच्या पाठीमागे ज्या भानगडी लावल्या त्यामुळे त्यांचा जीव हैराण झाला होता. पुण्याचा कारभार स्वतः करावयाचा किंवा त्याची नवीन घडी बसवावयाची हा महादजीबाबांचा पुण्यास येण्याचा मुख्य हेतू होता. इंग्रजांचे पारडे आता जड होत चालले. नानासुद्धा त्यांच्या कक्षेत गेले त्यांच्या ह्या चढाईस प्रतिकार करावा, त्यांचा डाव हाणून पाडावा हा इरादा सारखा मनांत बाळगून शिंदे नर्मदा नदी उतरून आले होते. शिंद्यांबरोबर त्यांची फौज होती. फेब्रुवारी १७९२ मध्ये पाटीलबाबा गोदावरीवर आले. १७९२ मार्चला ते तुळजापुरला आले. [२२] ते तेथे कुलस्वामिनी अंबाबाईचे दर्शन घेऊन मे महिन्यापर्यंत तेथेच राहिले होते.

महादजीबाबांचे दक्षिणेत येणे आणि ब्रिटिशांनी टिपूबरोबरचे युद्ध, तह करून समाप्तीस आणणे ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्या. टिपूबरोबर तह केल्याने इंग्रजी सत्तेचे पारडे जड झाले होते. उत्तरेत नर्मदेपासून सतलजपर्यंत महादजीबाबांनी मराठी सत्ता प्रस्थापित केली होती. पण दक्षिणेत व कर्नाटकांत इंग्रजी सत्तेने डोके वर काढले होते. हिंदुपदपातशाही स्थापन करण्याचे थोरले शिवाजी महाराजांचे धोरण बाजीराव पेशव्यांनी उचलून धरले होते. बाजीरावांचे शिष्योतम शिंदे-होळकर यांनी दिल्ली पातशाही मराठ्यांच्या इ. स. १७८४ मध्ये ताब्यात घेऊन शिवाजी महाराजांची इच्छा अंशतः पुरी केली होती. उत्तरेत मराठ्यांना शत्रू राहिला नाही. पण

दक्षिणेत मात्र इंग्रजांनी आपली सत्ता दृढ केली. आतापर्यंत हिंदुस्थानावर उत्तरेकडून मुसलमान, मोगल स्वराज्य करून आले त्यांना उत्तरेतील राजपुतांनी तोंड दिले. पाचशे वर्ष येथील राजपुत राजे मोगलांना विरोध केला होता परंतु त्यांचया अंतर्गत यादवी युद्धामुळे त्यांना पराभव पत्कारावा लागला.

महादजी शिंदे यांनी पुण्यातील मराठे मुत्सद्दी यांच्याशी बोलणी करून त्यांची एकजूट करून त्यांना इंग्रजांचा धोका टाळण्यासाठी इंग्रजांविरूद्ध लढाईस उद्युक्त करणे हा हेतू महादजीबाबांचा दक्षिणेत येण्याचा होता.

महादजीच्या कर्तबगारीचा आढावाः

महादजीच्या कर्तबगारीसंबंधाने अनेक समकालीन व्यक्तींचे अभिप्राय भरपूर येऊन गेले असल्यामुळे, त्यांची आणखी चर्चा करण्याची आवश्यकता नाही.[२३] शिवाय प्रत्येक प्रकरणावर ज्या त्या ठिकाणी साधकबाधक मुद्दे सांगण्यात आले आहेत तेच विशेष महत्वाचे समजले पाहिजेत. तथापि मराठेशाहीत छत्रपती शिवाजी व पेशवा बाजीराव पहिला या दोन पुरूषाखालोखाल महादजींचे कर्तृत्व प्रसिद्ध झाले असून त्याजवर अनेकांनी मार्मीक अभिप्राय व्यक्त केले आहेत. आबाजी नाईक बानवळे म्हणून एक इभ्रतीचा सावकार महादजींच्या स्वारीत उत्तरेंत होता, तो इ.स. १७९० मध्ये पुण्यात येत असता इंदुरास थांबला आणि अहिल्याबाईस भेटून शांतपणे दिल्लीकडील घडामोडींची हकीकत त्याने कळविली, त्यात त्याने अलीबहादर व तुकोजी यांची अंतर्गत कलहाची माहिती व फितुरीची माहिती नाना फडणीसास दिलेली होती. तुकोजींचे सामर्थ्य म्हणावे तर अलीबहादर जवळ आहेत तोवर उगाच भ्रम आहे. नारो गणेशकडे दोष नसतां अब्रू घेतली. पंधरा लक्ष त्याजपासून घेतले तेच आजपावेतो भक्षिले पुढे काहीच तजवीज नाही. अलीबहादर वेगळे झाले तर तुकोजींची स्थिती राहणार नाही. पाटीलबाबांची तारीफ उत्तरेतील मोगल सरदारांनी बरीच केली होती. दिल्ली, मथुरा मेवाड येथील सर्व बंदोबस्त केला.

तसेच जोधपूर येथे योग्य बंदोबस्त केला. या घटनांचा अभिप्राय बहुमोल समजला जाते.

किननें महादजींची योग्यता वर्णिली आहे त्यात सांगितल्याप्रमाणे इंग्रजांच्या कुत्सित भेदनीतिचा भाव व्यक्त होतो. तो लिहितो लंगडेपणामुळे व्यायाम कमी होऊन उत्तरोत्तर महादजींचे शरीर फार स्थूल होऊन त्याची पहिली ठेवण बिघडली. कवाइती कंपू उभारून त्यात त्याने पुष्कळ परकी लोक नोकरीत भरल्यामुळे, पूर्वीचा साधा बाणा आवडणारे लहान मोठे लोक त्यांचा द्वेष करू लागले. तसेच त्यांचे अर्धे आयुष्य बादशाही व मुसलमान यांच्या सहवासात गेल्यामुळे दक्षिणेतील शुद्ध हिंदु त्यास धर्मभ्रष्टतेबद्दल नांवे ठेवू लागले. त्याचा गुरू मुसलमान, मुख्य सल्लागार राणेखान तोही मुसलमान अशा अनेक कारणांनी दक्षिणेतील समाजात त्याजबद्दल प्रेम उत्पन्न झाले नाही. नाना फडणीसाच्या विरोधामुळे बरेचसे ब्राह्मण त्याचे द्वेषी बनले तत कवाइती कंपूच्या दडपणाने तर उलट जास्तच भर पडली महादजीचा बाप व बंधू यांच्या अंगी हुशारी व पराक्रम काहीच कमी नव्हते. परंतु महादजीस अनियंत्रित क्षेत्र मिळाले तसे त्यास पूर्वजांस मिळाले नाही. म्हणूनच सिंद्यांच्या घराण्यांत व अखिल मराठाशाहीत महादजीला एवढी प्रतिष्ठा आली, नजीबुद्दौला गाजीउद्दीन, गुलाम कादिर यांच्यासारख्या व्यक्तींचे उपद्व्याप मनांत आणले, म्हणजे महादजीने हिंदी राजकारणात पंचवीस वर्ष पावेतो जो राष्ट्रोपयोगी उद्योग केला तो अत्यंत बहुमोलाचा मानावा लागेल. क्रौर्य, कपट, दुष्टावे व स्वार्थ यांचेच साम्राज्य चहूंकडे बोकाळले असतां, महादजींने आपल्या शहाणपणाने त्यांचा नायनाट करून शांतता प्रस्थापित केली, हचि त्यांचे महत्कृत्य समजले पाहिजे.'[२४] मोगल बादशहाचे किंवा मुसलमानी धर्माचे प्रोत्साहन केल्याबद्दल दक्षिणेच्या समस्त हिंदुंनी त्याचे अभिनंदनच केले, द्वेष कोणीच केला नाही, छत्रपती शिवाजी महाराजांचा दंडकही तसाच होता.

मॅलेसन सांगतो, ''महादजीच्या मृत्यूने मराठ्यांचा एक उत्कृष्ट योद्धा व मुत्सद्दी नाहीसा झाला. मराठ्यांचे राज्य स्थिर करून इंग्रजांचा प्रतिकार करावा हे दोन त्याचे मुख्य उद्देश होते

ते त्यांने आपल्या हयातीत पूर्ण करून दाखविले. जास्त जगता असता तर हिंदुस्थानातील सत्ताधीशांचे ऐक्य करून त्याने इंग्रजांशी निकराचा सामना केला असता यात संशय नाही. ''

सर जदुनाथ सरकारांचा अभिप्राय अर्धशतकाच्या भरपूर अभ्यासाने बनलेला अत्यंत मार्मीक आहे, ''उत्तर हिंदच्या राजकारणात महादजी सिंद्याचे प्रचंड सामर्थ्य प्रखरपणे झळकतांना दिसते. या कामांत त्याला अनेक भीषण संकटे अनुभवावी लागली. स्वतःची हिंमत व परमेश्वरावर हवाला ठेवून त्याने उद्योग केले आणि यश मिळविले. अत्यंत व्यवहारचातुर्य वापरून त्याने लायक माणसे हाताशी ठेवली आणि मोठमोठी कामे धुर्ततेने पूर्ण केली. तिसऱ्या पानिपतचे अपयश धुऊन त्याने मोगल बादशहाची सर्व व्यवस्था लावून दिली होती. या कामी पुणेकरांनकडून त्याला पाठबळ मिळण्याऐवजी थोडा बहुत त्रास झाला. पेशव्याकरिता त्याने मोठामोठे मानमरातब मिळविले ते पुण्यास पोहचण्यास सात वर्ष लागली. उत्तर कालीन मराठशाहीत हा एकच एक अलौकिक पुरूष इतर सर्वावर छाप बसविणारा आढळतो. अमुक एका पक्षास न मिळता त्याने सदैव सत्याचा व न्यायाचाच पुरस्कार केला. एकंदरीत महादजीची योग्यता अलौकीक मानण्याजोगी आहे. त्याचा पत्रसंभार इंग्रजी मराठी वगैरे प्रचंड असून तो अलीकडेच प्रसिद्ध झाला, जेणेकरून अभ्यासाची मोठी सोय झाली.'[२५] कोटा दप्तरांत अद्यापि त्याचे पुष्कळ कागदपत्र अप्रकाशित आहेत.''

भगवत भक्तिचा उमाळा महादजीच्या अंतःकरणात सदैव उमाळा असे. भजन पूजनात सांसारिक विवंचना तो पार विसरून जाई. किंबहुना संकटकाळात हाच त्याचा एकमेव आधार होता. श्रावणमासांत तो भागवताचे पारायण करी आणि स्वतः भक्तीपद पदे रचून ती फावल्या वेळात गात असे. साधुपुरूषांवर त्याची निस्सीम श्रद्धा असून, त्यात हिंदु-मुस्लिम भेद बिलकूल नव्हता. त्याचा मुख्य गुरू बीडचा मनसूरशहा म्हणून असून त्याच्याच कृपेने आपणास ऐश्वर्य प्राप्त होते अशी त्याची श्रद्धा होती. उज्जनीचा एक साधुपुरूष दत्तनाथ म्हणून होता

त्याजवरही महादजीची तशीच निस्सीम भक्ती होती. दत्तनाथ कैक वर्ष महादजीबरोबर स्थलांतरीत असे. कवी, ज्योतिषी सत्पुरूष कोठेही आढळले तर तो त्यांचा सत्कार करून त्यांचा आशीर्वाद घेई.

बीड येथे राहणारा मनसूरशहा नावाचा एक साधू महादजीचा गुरू होता. त्याच्याच आशीर्वादाने आपण भाग्यास चढलो अशी महादजीची कायम भक्तिभावना होती. तो पानिपतच्या तिसऱ्या युद्धात असतां त्याची बायको अन्नपूर्णाबाई, बीडचे सरदार निंबाळकरांची मुलगी माहेरी होती. दत्ताजी वगैरे युद्धात गारद झाल्याचे ऐकून अन्नपूर्णाबाई अत्यंत दुःखी झाली आणि मनसूरशहाचे भजनी लागली. तुझा नवरा सुखरूप येऊन तुला भेटेल असा त्या साधूने तिला आशीर्वाद दिला होता. त्याप्रमाणे महादजी मोठ्या शिकस्तीने बचावून परत आला, तेंव्हा तिची भक्ती या साधूवर बसली. पुढे महादजी उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीस गेला, तेंव्हा आपली कामगिरी फत्ते व्हावी म्हणून बीड येथे मनसूरशहाच्या दर्शनास गेले होते. साधूने त्यास भाकरीचा तुकडा प्रसाद म्हणून दिला. तो घेऊन गेल्यावर महादजींनी ग्वाल्हेरचा किल्ला जिंकला होता. तेंव्हापासून या साधूवर त्यांची निष्ठा पूर्ण बसली. तद्नंतर ते नेहमी या साधूची भक्तिभावाने पूजा करू लागले. आणि संकटी त्यांचा धावा करीत असत. त्यांनी त्या साधून ग्वाल्हेर येथे कायम राहण्यास बोलाविले पण तो गेला नाही मात्र त्याने हबीबशहा म्हणून आपला एक शिष्य पाठविला. या हबीबशहास महादजीने ग्वाल्हेर येथे सालिना ५० हजारांची जहागीर दिली होती. ती अद्यापि थोड्या बहुत फरकाने सिंदेशाहीत चालू आहे. गादीवरील इसमाचा मृत्यू झाल्यावर त्याचा शिष्य पुढे गादीवर बसतो. या गादीस श्रीसाहेब अशी संज्ञा असून प्रत्येक सरकारी कागदावर आरंभी हीच अक्षरें लिहिलेली आहेत. चंद्र १५ रजब ता. १९ ऑगस्ट इ. स. १७७७ रोजी या साधुचा मृत्यू झाला म्हणून त्या रोजी ग्वाल्हेरमध्ये या साधुची जत्रा म्हणजे उरूस भरतो त्यावेळी मोठा भंडार व दानधर्म होतो. या गुरूच्या स्थानामुळेच बीड

शहर आपल्या कब्जात असावे अशी महादजींची इच्छा असून पुण्यास आल्यावर त्याने निजामकडे त्याची मागणी केली, परंतु बीड शहर त्यांच्या ताब्यात मिळाले नाही.

महादजीच्या अंगी कोणताही दुराचार असल्याचा उल्लेख नाही एवढेच नव्हे तर उगाच खोटा प्रवाद सुद्धा कधी ऐकण्यात आलेला नाही. गलिच्छतेचे माहेर घर जें उत्तर हिंदुस्थान त्या ठिकाणी उणेंपुरे आयुष्य खर्च करणारा व विदुर नामभिधान पावलेला महादजी धन, सत्ता, लौकिक व ऐश्वर्य यांच्या परमाधीस पोहचूनही अंतर्बाह्य वर्तनाने निर्मळ राहिला ही प्रसिद्धी अपूर्व मानली जाते. शत्रूंनाही त्याने आदराने व औदार्याने वागविले आणि विभिन्न जातीचे गुणी लोक पदरी नांदवून त्यांच्याकडून राज्याचे कामे करवून घेतली. तुळजापूरास भोप्याच्या मुलीवर नजर जाताच त्याने तिला योग्य मार्गाने जवळ केले. मनसूरशहा किंवा दत्तनाथ ह्यांच्या योग्यतेचे पुरूष तत्कालीन ब्राह्मण मुत्सद्याचे सुद्धा गुरू नव्हते. महादजीजवळ आप्पाजी रामासारख्या कोंकणस्थ ब्राम्हण, आबा चिटणीसासारखे देशस्थ ब्राम्हण, जीवबादादा किंवा लखबादादासारखे निधड्या छातीचे सारस्वत वीर, अंबूजी इंगळे वगैरे शेकडो नामांकित मराठे सरदार, राणेखनाबाई सारखे पराक्रमी सरदार या सर्वांना सांभाळून नेणारे चतुर मुसलमान, किंवा डी बॉयनसारखे अनन्यसामान्य फ्रेंच परदेशस्थ सेनानायक अशा सर्व नानाविध पुरूषांचे प्रेम व आदर जो पुरूष अर्ध शतकापर्यंत संपादू शकला त्याची योग्यता केवढी असली पाहिजे एवढ्या बादशाहीचा कारभार करून त्याने एकाही मुसलमानास दुखविले नाही. हिंदु-मुसलमानांचे हल्लीच्या सारखे दंगे त्यावेळी झाले नाहीत.[२६] उलट मुसलमानी राज्यांतच हिंदुचा कसा पुरस्कार होत असे हे वरील उदाहरणात व्यक्त होते.

महादजी स्वभावतः उदार व परोपकारी होता लोकांची दुःस्थिती पाहून त्यास कळवळा येई, आणि सढळ हाताने त्यास तो मदत करी नोकरांनी चांगली कामगिरी केली तर त्याचा मोबदला दिल्याशिवाय तो कधी राहत नसे, किंवा अशी कामगिरी तो कधी विसरत नसे म्हणून

हाताखालचे इसम त्याच्या भजनी असत. त्यांजकडून फंदफितूर कधी झाला नाही. महादजीच्या मृत्यूनंतर सुद्धा लोकांकडून त्याच्या इच्छांस सदैव मान देण्यात येई. डी. बॉयनच्या अडचणी वाचल्या म्हणजे असे वाटते की, महादजीला जे एवढे यश प्राप्त झाले, ते केवळ नोकरीची कदर करण्याच्या त्याच्या उदार स्वभावामुळे झाले. त्यांचे नोकर किंवा वकील कधी दैन्यग्रस्त नसत. एकनिष्ठ सेवेचा बदला धन्याकडून मिळाल्याशिवाय राहणार नाही अशी सर्वांस खात्री असे. युद्धात भ्याडपणा दाखविणारांची मात्र तो कधीही गय करीत नसे. व्यवहारांत तो विनोदी व थट्टेखेर होता. वर्ण निःसीम काळा असूनही चेहऱ्यावर बुद्धीची व औदार्याची स्पष्टता दिसत होती, हे इटाल्लियन चित्रकाराने शेवटी शेवटी काढलेल्या त्याच्या सुप्रसिद्ध तसबिरीत व्यक्त होते. विशिष्ट प्रसंगी थाटमाट किंवा भपका करण्यात तो कमी नव्हता, तरी सामान्यतः त्याचे वर्तन साधे असून तत्कालीन मराठी बाणा महादजीच्या ठिकाणी मूर्तिमंत होत असे म्हणता येईल. लेखनांत व हिशेबात तो कुशल होता व या बाबतीत तो कधी फसला जात नसे. उर्दू व पर्शियन या भाषा व्यवहारापुरत्या त्या अवगत असून संस्कृतही बरेच समजत होते. भागवतासारखे ग्रंथ तो स्वतः किंवा पंडितापांशी वाचित असावा. भजनपूजन वगैरे करून त्याचे नियमित चालत असे. तो कधी अतिप्रसग करीत नसे.'[२७] नाना, होळकर, अलीबहादर, इंग्रज वगैरेंशी प्रसंगानुसार त्याचे नेहमीच शत्रुत्व आले असता विकोपास न जाता थोडे पडते घेऊन तो निभावून नेत असे. आततायीपणा कधीही त्याच्या अंगी नव्हता.

साधकबाधक गोष्टींचा विचार मनात आणि असतांना हिंदुपद पातशाही सिद्धीस पोहचविण्याचा मराठेशाहीच्या आद्यचालकांचा प्रधान हेतू कोणी सफल केला, अशी पृच्छा केल्यास महादजीनेच पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे अपयश धुऊन काढले आणि अटकेपावेतो नेलेल्या झेंड्याचे सार्थक केले. नवे मंदिर न बांधता जुन्याच मंदिराचा जीर्णोद्धार करावा व त्यात स्वार्थ व परमार्थ दोन्ही गोष्टी साधता येईल ही शाहूची आज्ञा महादजीने पुरी केली.

महाजदजीच्या आयुष्यक्रमाचे चार भाग पडतात. पानिपतापर्यंतचा पहिला क्रम असून पानिपतनंतरचा दुसरा भाग शिकावू वृत्तीचा व उत्तरेतील कामगिरी यांची माहिती मिळविण्यात गेला. तिसरा भाग इंग्रज मराठ्यांच्या युद्धाचा इ. स. १७७४-८३ पर्यंतचा. या भागांत त्याने नाना फडणीसास साह्य करून इंग्रजांपासून मराठी राज्याचा बचाव केला. चौथा भाग शेवटच्या दहा वर्षाचा, उत्तर हिंदुस्थान पादाक्रान्त करण्यात खर्च झाला. या शेवटच्या भागात लढाया, कारस्थाने, राज्यव्यवस्था व फौजेची उभारणीची महत्वाची कामे केली. राजपूत, रोहिले, शीख, जाठ व अफगाण इत्यादींची कारस्थाने आणि तुकोजी, अलीबहादर, नाना फडणीस वगैरेंचे हर्षामर्ष हे सर्व प्रकार मनात आणले व समस्त संबंधित व्यक्तीच्या हकीकती लक्षात घेतल्या म्हणजे महादजीचा व्याप केवढा होता ते लक्षात येईल. दक्षिणेंत जांब या गावावर महादर्जीचे अत्यंत प्रेम असून तेथे त्याने पुष्कळ बांधकाम करून त्यास राजधानीचे स्वरूप आणिले होते.'[२८] किल्ले साहेबगड, दरर्गाह, जांबगांव असा या ठिकाणच उल्लेख आहे.

मराठेशाहीत नामांकित वैद्यास वेतने देऊन त्या कलेचा सन्मान करण्याचा प्रघात विशेष होता. सुखदेव मिश्र नावाचा एक विद्वान व कुशल वैद्य मूळचा जयपुरचा, पुढे झाशीस काही दिवस होता. तर तो काशीस जाऊन वास्तव्य करी. त्यास पेशव्यांकडून सालीना नऊशे रूपयांची नेमणूक होती.'[२९] महादजीचा त्याच्यावर विशेष लोभ असून महादजी शिंदेच्या पत्नीस या वैद्याने औषध देऊन बरे केले होते.

महादजीचा कवाईतील लष्करांत सुमारे दोनशे युरोपियन अंमलदार होते त्यांची नावासहीत माहिती ग्वाल्हेर गॅझेटियरमध्ये दिलेली आहे. त्यावरून अनेक जाती जमातीतील योग्य माणसांचा उपयोग करून घेण्यात महादजी किती दक्ष होता हे दिसून येते. पुष्कळ युरोपियनांस तो मुद्दाम बोलावून आणि कानपूर येथे इंग्रजांचा कंपू होता. त्याचा मुख्य कर्नल बिरस्कूट इ. स. १७८८-८९ पाटीलबाबांच्या भेटीस मथुरेस आला होता. त्याने दिल्ली आग्रा येथील स्थलांचे नकाशे

काढून नेले होते. इ. स. १७९३ हा गृहस्थ अलीबहादरास ब्रह्मावर्तास जातांना भेटला होता. तसाच ज्याचे नकाशे हल्ली उपयोगी पडतात तो रेनेल फिरंगी दिल्लीस मुक्काम करून होता. तो त्या ठिकाणाहून सारधी या ठिकाणी गेला होता.[३०] (ता.२० मार्च १७९४) या सर्वांशी महादजीचा परिचय असून त्यांच्या माहितीचा त्याने उपयोग करून घेतला होता.

नाना फडणीस व महादजी शिंदे यांनी किती राज्य ताब्यात घेतले त्याचा अंदाज एकंदर वसूलीवरून केला जातो. कमावले त्याचा एकंदर वसुल किती होता. त्या वसुलाच्या उत्तरेत व दक्षिणेत निरनिराळ्या सरदारांच्या वाटण्या कशा व किती होत्या हे समजण्यात खालील महत्वाची माहिती नमूद केली आहे.

इ. स. १७७८-७९ हिंदुस्थानात मराठी अंमलाचा प्रांतवार वसूल अंदाजी २ कोटी ४२ लक्ष रूपये होता असा दाखल आहे. परंतु इ. स. १७९५ फक्त राजपूत राजांकडची खंडणी पावणे सात लाख होती. इ. स. १७८५ त महादजीजवळ निरनिराळ्या ठिकाणी मोहिमशीर असलेली फौज १ लक्ष ५७ हजार होती, तिचा तपशील: ७३,००० स्वार: ६२,००० पायदळ पलटणे: ८१,००० गोसावी व बैरागी: ४,००० सैनिक .

महादजी शिंदे स्वतंत्र होऊ पाहत होता असा त्याजवर मोठा आक्षेप आहे. हा आक्षेप मुख्यतः तत्कालीन इंग्रज लेखकांनी प्रस्तुत केला आणि तो पुढील लेखकांनी तसाच उचलला. महादजीने बादशाहीच्या आश्रयास होता ही गोष्ट इंग्रजांचे अंतःकरणात झोंबली आणि मॅलेटसारख्यांनी पुण्यास बसून इतर मराठे सरदारांच्या बुद्धीत भेद केला. मराठ्यांची सार्वभौमसत्ता इंग्रज बळावूं लागले, त्यांस निर्बंध लादून मराठ्यांचे राज्य कायम टिकवावे हाच महादजीचा मुख्य हेतू होता.

महादजीच्या तैनातील शेकडो एतद्देशीय लष्करी अधिकारी होते, शिवाय २०० युरोपियन सैन्याधिकरी होते. सैन्याच्या तोफा, शस्त्रास्त्रे, सर्व लवाजमा आधुनिक पाश्चिमात्य पद्धतीने

सजविलेला होता. '[३१]

महादजीबाबांकडे खालील मुलूख होता:

गोहदच्या राण्याकडून ३२ लाख

मिर्झाशफीखानकडून ३३ लाख

अफासियाबखानाकडून ४० लाख

जहांगिरखान वगैरेकडून ४ लाख

नारायणदासकडून ३ लाख

महमदबेग हमदानीकडून ६ लाख

रणजिंतसिंग जाटातर्फे शिखांकडून १२ लाख

जयानगरच्या राण्याकडून ८५ लाख

पतियाळा प्रशासनाकडून ६ लाख

बादशहाची जमीन ३ लाख

दतिया आणि भदावरकडून ८ लाख

प्रतापसिंग मचेडीकरकडून ४ लाख

गुलाम कादीरखानकडून ६० लाख

एकंदर रूपये २९६ लाख

रूपये २ कोटी ९६ लाख एकंदर.

वरील रकमाच्या ऐवजाशिवाय २ कोटी ८५ लक्ष उत्पन्नाचा मुलूख त्यांनी मिळविलेला होता.

बादशहाकडील मुलूख, नजफखान आणि गुलाम

कादीर यांच्या मुलूखासह २ कोटी २५ लाख

गोहदच्या घराण्याकडील मुलूख ४२ लाख

भदावर, कचबा घर व भांडर १८ लाख

एकंदर रूपये २ कोटी ८५ लाख

महादजींना सर्व मराठे एकत्र आणून इंग्रजांशी झुंज द्यावयाची होती. पण इंग्रजांनी पुणे दरबारापासून महादजींना दूर करण्याचे तंत्र योजिले होते.[३२]

यावेळी महादजीबाबांनी पूर्वीची गनिमी पद्धत सोडून कवाईती पलटणे तयार केली. डी बॉयला नोकरीत घेऊन कवाईती सैन्याच्या बळावर त्यांनी उत्तर हिंदुस्थान आपल्या ताब्यात ठेवला होता.

महादजी शिंदे यांच्या स्वभावाविषयी सदाशिव दिनकर याने घेतलेला आढावा (इ.स. १७६१-१७९४):-

महादजी शिंदे यांच्या गुणदोषाचे विवेचन आज आपण नवीन करण्यापेक्षा तत्कालीन लेखांतच चांगले मिळते. असे नाना प्रकारचे लेख मागे पुष्कळ येऊन गेले आहेत. तरी सदाशिव दिनक म्हणून जो नानाने आपल्या भरवशाचा गृहस्थ इ. स. १७७९ पासून दहा वर्षे महादजीजवळ ठेविला होता, तो नुसता बांका लेखकच नव्हता, तर युक्तीनें कामे करून राज्याचे हित साधण्यात चतुर होता. त्याचे लेख हृदयस्पर्शी असून त्यांत महादजींचे स्वभावचित्र सुंदर उमटले आहे.

महादजीचा स्वभाव खुनशी व रागीट होता, एकदा कोणावर त्याने दंश धरिला, म्हणजे तो कधी विसरत नसे. एका सदाशिव दिनकर त्यास पुरा पडला. महादजीच्या रागलोभास न जुमानता सदाशिव दिनकराने पेशवे सरकारची इभ्रत महादजीजवळ कायम ठेविली. अनेकदा महादजीने त्याजवर दांतओठ चावले, पण त्यास जास्त कठोरपणे वागविण्याची महादजीस छाती झाली नाही. मात्र त्याच्या कठोर सेवेबद्दल महाजदीकडून किंवा खुद्द नानाकडून सदाशिव

दिनकरांचा गौरवही झाला नाही. आणि हालअपेष्टांतच त्यास मृत्यू आला असावा. याच्या लेखांतले काही उतारे पुढे देण्यात येत आहेत.'[33] सदाशिव दिनकरांपुढे महादजीसारख्या जहांबाज पुरूषासही कसे हात टेकावे लागले, हे त्यात निदर्शनास येईल.

पुण्याची पत्रे महादजीस दाखविणें व त्याचे जबाब घेणे ही कामे किती बिकट असत त्याचे वर्णन सदाशिव दिनकर लिहितो, टिपूशी इंग्रजांचा परभारें तहानामा झाला त्या संबंधी पाटीलबाबांचे म्हणणे नारो शिवदेवांनी पुण्यास लिहून पाठविले नाही, त्यावरून नारोपंतावर व मजवर बाबांची मर्जी नाखूष जाली. ते पत्रे पहावयास सांगितल्याप्रमाणे लिहितो. बोलण्याचे प्रसंग होतात तेंव्हा मजकडून प्रत्युत्तर काही होत असते नसते ते आपाजीराम पाहतातच. तेही बाबांचा निरोप घेऊन देशात गेले. बाबूराव भास्कर मेहेंदळे यासही आज्ञेप्रमाणे घेऊन गेले. हल्ली आपली आज्ञा कीं, कच्चे पक्के मजकूर तुम्हास लिहितो, परंतु बाबांस दाखवावयाचे तेच दाखवित जावे.

कित्येक व्यक्ती पूर्णपणे ओळखण्यास कठीण असतात, त्यापैकी महादजी होय. केंव्हा लहरी, केंव्हा क्रूर, केंव्हा अत्यंत उदार व अघळपघळ, तर केव्हा त्रासलेला व वक्रगामी, अशा त्याच्या स्वभावाच्या व वर्तनाच्या नाना तऱ्हा असत. त्याजकडून अमूल एक गोष्ट हटकून करून घेऊ अशी कोणासही खात्री नसे. कोणाच्याही एकाच्या तंत्राने तो चालत नसे. हेस्टिंग्जने सुद्धा त्याजपुढे हात टेकले. एखादे वेळी क्षुल्लक गोष्टीस नसतें महत्व देऊन तो प्रकरण माजवी, तर कित्येक महत्वाच्या बाबतीत मुद्दाम टाळी. पुष्कळदा वेळ पडेल तशी पाठ फिरविण्यात, किंवा शब्दांचे कीस काढून वितंडवाद वाढविण्यात तो कमाल करी, परंतु मनातली अढी सोडीत नसे. पैसा हातचा सुटत नसे, तरी पण नाना प्रकारच्या लोकांस आपल्या भजनी ठेवून त्यांजपासून त्याने कामे घेतली. त्याच्या सहायक मंडळीत निदान पन्नास तरी नावे अशी सापडतात की, ते त्याचे हुकूम उठविण्यात मोठी धन्यता मानीत. राणेखान, अबूजी इंगळे, खंडेराव हरि, बाळाराव गोविंद, रामजी पाटील वगैरे किती एकनिष्ठ सेवक त्याजपाशीं तत्पर असल्यामुळेच त्याची

एवढी बडेजाव झाली. भिन्न प्रकृतींच्या माणसांस सांभाळून कामे घेणे हे महादजीचे चातुर्य फारच थोड्यात दिसून येते. एकदा नोकरीत घेतलेले इसम त्याने सहसा बदलले नाहीत, किंवा आपणास चरितार्थाची अडचण आहे अशी त्याच्या माणसांची तक्रारही कोठे नमूद नाही. तथापि थोल्या माधवराव पेशव्यांची तडफ, सत्यनिष्ठा किंवा स्पष्टवक्तेपणा हे गुण महादजींत नव्हते. पुष्कळदा त्याची दृष्टी आकुंचित व स्वार्थी दिसे. मनातले कधी बाहेर स्पष्ट दिसत नसे. पुष्कळदा अशा धरसोडीच्या वर्तनाने काम करणाऱ्यांची त्रेधा उडे. पण त्याच्या मनांतला निश्चय बाहेर पडत नसे.'[३४] एकंदरीत अस्सल मराठ्यांचे प्रखर पाणी महादजीच्या ठिकणी भरपूर होते.

महादजी खालील उद्धार केवळ त्यांची ब्रीद वाक्ये असून त्याच्या कार्यानिष्ठेची साक्ष पटवितात. *आम्ही जे करीतों, ते श्रीमंतानिमित्तच करितो. आमच्या वडिलांची तरी बिशाद काय होती! प्रथम राणोजी बाबांस खिजमदगारी सांगितली. नंतर कृपा करून पागा दिली, तेथून वाढवीत या पदवीस आणिलें, की आम्ही बादशहाची स्थापना केली. आता आम्ही बादशाही पदाचा इच्छा का करावी? द्रव्यसंचय व लौकिकाचा धरावा तर श्रीमंतांचे कृपेकरून आम्हास उणें काय आहे! लौकिक तो आहेच. पैका म्हणावा तर मुलूख उजाड यात मिळणे काय! खर्च चालण्याचेच संकट, आणि संचय तरी किमर्थ करणे. आमचे जन्माचे सार्थक श्रीमंताचे कृपेकरून जाले. अवशिष्ट कालही जाईल. द्रव्यसंचयाचा हव्यास कोणानिमित्त करावा? पोटीपाठींही कोणी नाही. जे करणे ते श्रीमंताची सेवा करावी या बुद्धीनेंच करतो. श्रीमंतांचे भोक्तृत्व तितके आमचे उर्वरित. आम्ही इंद्रसेनाचे भरवशावर इष्टिनाचे प्रामाणिकतेचे लिहित गेलो. त्यांनी मात्रागमन केले. आम्हास कलंग लाविला. ही गोष्टी जाली ती कुबुद्धीने जाली नाही. मनसबा एकट्याच्याने होत नसतो. आम्ही हिंमत सोडिली नाही. यावत्प्राण स्वामिसेवेस अंतर करावयाचे नाही, वलयांकित पृथ्वीचे राज्य, साऱ्यांचे एकमत असल्यास साधेल, सर्वांनी स्वामिसेवेचे पोटी*

आपले कल्याण समजून श्रम करावें. आपापले दोष उघड जाले ते झांकून तमाशबीन होऊं लागतील तर फलकी पुढें पावतील. आम्ही निष्कपट व निष्ठा राखीत असलो तर धन्याचा प्रतापच यश देईल

नानांशी महादजीची स्पर्धा नेहमीच चालू होती '[३५] आणि कधी म्हणजे खुल्या दिलाने नानाने सांगितलेली कामगिरी त्याने उचलली असे झाले नाही. तथापि नानाचे शहाणपण तो पूर्णपणे ओळखून होता आणि त्याच्याशी विरोध करितांना एकंदर राज्याचे ज्यात नुकसान होईल असे वर्तन महादजीने कधी केले नाही. प्रसंगानुसार तसे वर्तन घडून पुढें विपरित परिणाम दिसल्यावर ता प्रकार हलकेच आपला आपण सुधारून घेई. ज्या काही घडामोडी बाहेर होत, त्यापासून शक्य तितका आपला फायदा तो साधून घेत असे रघुनाथराव इंग्रजांस मिळून राज्य बुडवितो, याबद्दल खात्री झाल्यावरही त्यास आपले अनुसंधानी ठेवून त्याच्या योगाने नानास किंवा इतरासं आपले धाकात ठेवण्याची संधी महादजी वाया जाऊ देत नसे. कोल्हापूर प्रकरण, मोराबा, राघोबा, हैदर, वगैरेंची मोठमोठी कारस्थाने बनली. त्यात त्याने मराठी राज्याचे सामुदायिक हितच संभाविले तरी पण प्रत्येक वेळी आपला शहर म्हणून काही तरी त्याने ठेवून दिलाच. उलट पक्षीं नाना मात्र महादजीस चुचकारून वागवीत असे. '[३६] चुका निदर्शनास आणल्याने महादजी जेव्हा जेव्हा चिडे, तेव्हा पुनः तिखट गोड शब्दांनी नाना त्याची समजूत घालीत असे.

नाना फडणीसाचा जन्म ता. १२ फेब्रुवारी १७४० चा आहे. म्हणजे महादजीपेक्षा तो दहा पंधरा वर्षानी तरी लहान होता. तथापि कागदात त्याला महादजीने वडील माणसांसारखा मान दिलेला दिसतो. महादजी पुण्यास आल्यावर नववे दिवशी नाना त्याच्या भेटीस गेला असता त्याच्यासमोर बैठकीवर बसण्याचा सुद्धा महादजीने संकोच केला. पानिपतावरून संकटाने जगून आलेले हे दोन भाग्यशाली पुरूष. '[३७] त्यांनीच पुढील मराठशाहीचा बरावाईट इतिहास

बनविला हे काही खोटे नाही. राज्यशकटाची ती दोन चाकेच होती.

प्रतिस्पर्ध्यांना कठोर शासन करून नाहींसे करणे, किंवा गोडीगुलाबीच्या नरमाईने आपल्या बाजूस वळविणे, या दोन मार्गांपैकी मुत्सद्देगिरीत पहिला मार्ग योग्य होय. संकटाची वेळ निभावून गेली, तरी राष्ट्रात त्याच्याबद्दल आदराची उच्च भावना उत्पन्न झाली नाही. जुने व नवे सर्वच सरदार व कामगार नानाबद्दल सदैव साशंक असत. अलीबहादराची आई पुण्यास होती तिला नानाची मर्जी राखण्यास किती अडचण पडे त्याचे तिने आपल्या मुलास लिहिलेले ध्यानात आणल्यास नानाची राजनीती कळून येते. विरोधी लोकांस सरसकट भरडून काढण्याचा नानाचा उपक्रम महादजीस पसंत नव्हता. आंग्रे, सावंतवाडीकर, पंतसचिव इत्यादीकांचा पूर्वीचा बोजा कायम राखावा, त्यास उद्योगास क्षेत्र द्यावे, त्यांच्या जहागिरी शाबूद राखाव्या, असा महादजीचा कल होता. तो नानास पसंत नसल्यामुळे, या बाबतींत उभयतांचा पुष्कळदा मतभेद असे.

नानास सोडून आपण स्वतंत्र पंथ काढावा, की पेशव्यास चिटकून राहावे, या संबंधान अनेक वेळा महादजीला संशय पडे. पण पूर्ण विचारांती पेशव्यांचीच मध्यवर्ती सत्ता उचलून धरली. कारभारात लष्करी सत्तेस प्रमुखपण असावे, अशी त्याची इच्छा होती. आपणा मराठे शाहींतून फुटून स्वतंत्र व्हावे असे त्यास वाटत नव्हते. वाडवडिलांची कृति त्यांच्या डोळ्यापुढे सदैव जागृती होती, आणि पेशव्यांशी नम्रभाव धरण्यात त्यास अभिमान वाटे. पुण्यास वकीली मुतलकीच्या दरबारात तो सवाई माधवरावाच्या मागे जोडे घेऊन उभा राहिला, हें त्याचे वर्तन दांभिकपणाचे असे पुणेकरांस वाटले,[३८] पण पेशव्यांनी आपणास लौकिकास चढविले, आपण त्यांचे जोडे उचलणारे चारक, ही महादजीच्या अंतःकरणातील भावना वारंवार बोलण्यात व लेखांक उतरलेली आहे, ती खोटी कां मानावी!

महादजीचे साह्यकर्ते:

महादजीच्या कार्याचा व्यापच एवढा मोठा होता की, त्यास जीवास जीव देणारे शेकडों साह्यकर्ते निर्माण करावे लागले. राणेखानभाई त्याचा जावई साहेबखान टोका, अंबूजी इंगळे व त्याचे कनिष्ठ बंधू विठूजी व बाळाजी इंगळे वगैरे, खंडेराव हरि व त्यांचा मुलगा, बाळोजी व भागीरथ शिंदे, रवळोजी व धारराव सिंदे, देवजी गोळी, हैबरतराव फाळके, लालाजी बल्लाळ कोटेकर पंडित (हा पत्रव्यवहार लिहिणारा वकिल होता.) रायाजी पाटील, राणेखान, बाळाराव गोविंद व त्याचा आप्त बाळाजी जनार्दन जांबगांवकर, रामजी पाटील जाधव, लाडोजी देशमुख शितोळे, जावई बहिरजी ताकपीर, बळवंतराव धोंडदेव, आबा चिटणीस व बंधू गोपाळराव व कृष्णोबा, शिवाजी विठ्ठल विंचुरकर, माधवराव गंगाधर चंद्रचुड, जिवाजी बल्लाळ बक्षी व बंधू शिवबानाना आणि मुलगे, नारायण जिवाजी व यशवंत जिवाजी, तसेच जीबादादाचे तिघे चुलत बंधू जगनाथ राम उर्फ जगोबा बापू व बाळाजीराम आणि राघोराम, सदाशिव मल्हार उर्फ भाऊ दिवाण आणि बंधु राघो मल्हार व बापूजी मल्हार, बाळाजी अनंत पिंगे उर्फ भाऊ बाळोबा तात्या पागनीस, लक्ष्मण अनंत लाड उर्फ लखबादादा, तसेच अनुपगीर व उमरावगीर गोसावी, इत्यादी अनेक नावे महादजीच्या मंडळीत येतात, त्यांच्या हकीकती इतिहासोपयोगी बनल्या आहेत.

या यादीतील सारस्व्त वीर व मुत्सद्दी यांचा पराक्रम विशेष आहे. महादजीच्या हस्तकांची नुसती नावनिशी व संख्या मनात आणिली तरी पेशव्यांच्या सरदारांप्रमाणेच महादजीचा व्याप केवढा होता हे दिसून येते.'[३९] त्याच्या फौजेतील युरोपियन अंमलदाराची यादीच दोनशेंची होती. अडीचशे हिंदी सरदारांची नांवनिशी नोंद दिलेली आहे.

बल्लाळराव गोविंद हा पुष्कळ दिवस महादजीचा कारभारी व सल्लागार असून मोठ्या नेकीने काम करणारा हुशार असा गणला जात असे. त्यास प्रचारात रावजी असे म्हणत. प्रथम त्याचा वडील बंधु चिमणाजी गोविंद यास पेशव्यांनी पाटण (राजपूताना) येथे कमावीसदार

नेमिले, त्याचवेळी लालाजी बल्लाळ यास कोट्यास नेमिले. रायाजी पाटील सिंदे हा महादजीचा अत्यंत विश्वासतला शूर योद्धा असून त्याच्याच पागेंत रामजी पाटील जाधव हा आरंभी बारगीर आणि पुढे महादजीच्या तर्फे पुण्यास वकील होता.

इंग्रजांचे मांडलिक होऊन राहणे गायकवाड किंवा भोसले यांस पत्करले तो प्रकार महादजीने स्विकारला नाही.[४०] मोरोबाच्या कारस्थानाच्या वेळी, किंवा गुजरातच्या मोहिमेत, अथवा शेवटच्या माळव्यांतील मोहिमेंत महादजीने इंग्रजांची सार्वभौत सत्ता पतकरण्याचा सहज शब्द टाकला असता तर तो इंग्रजांनी मोठ्या आदराने झेलला असता. इतकेच नव्हे तर तसे प्रयत्न हेस्टिग्जने पुष्कळ करून पाहिले होते. केवळ काशीचा राजा महादजीच्या आश्रयास आला त्यास काढून द्याल तरच तहाची वाटाघाटी करण्यासाठी आम्ही तुमचे भेटीस येतो, असे हेस्टिंग्जचा वकील ॲण्डरसन इ. स. १७८१ महादजीस बोलू लागला. त्याबरोबर महादजीने बाणेदार उत्तर दिले की, चेतसिंग आमचे आश्रयास आलेला आहे त्यास आम्ही केव्हाही काढून देणार नाही.तुम्हास भेटीस येणे नसेल तर खुशाल परत जा हा महादजीचा जबाब व नागपूरच्या हद्दीतून गॉडर्ड बऱ्हाणपुराकडे येऊ लागला, त्या वेळी भोसल्यांनी केलेला त्याचा बडेजाव यांचा विरोध मनात आणावा म्हणजे महादजीची भावना व्यक्त होते. इंग्रजांचे सार्वभौमत्वच त्यास पत्कारावयाचे असते, तर डी. बॉयनसारखा लठ्ठ पगाराचा फ्रेंच सेनापती नोकरीत घेऊन पाश्चात्य पद्धतीवर नवीन कंपू ठेवण्याची किंवा राजपुतांवर चढाई करून आपले प्राण धोक्यात घालण्याची महादजीस काय जरूर होती?

तारीख ३ मार्च १७९३ ला पेशव्यांचे दुसरे लग्न व पुढे १२ मार्च रोजी रंगाचा समारंभ झाल्यावर नाना महादजींचा समेट झाला त्यानंतर जूनपासून महादजीला ज्वर येऊ लागला.[४१] लाखेरीचे वर्तमान नुकतेच आलेले त्या भरात त्याला दुखणे झाले. अठराव्या शतकाचे चरम दशक महाराष्ट्राला मृत्यूचे म्हणता येईल. त्यातल्या त्या इ.स. १७९४-९५ ही दोन वर्षे व

१७९४ च्या उन्हाळ्याचे तीन महिने घातकच ठरली. ता. १२ फेब्रुवारीला महादजी, एक महिन्यानें १२ मार्चला आनंदीबाई, त्यानंतर १५ एप्रिल १७९४ रोजी कवी मोरोपंत आणि शेवटी ता. २० जून १७९४ रोजी हरिपंत फडके इतक्या महाराष्ट्रातील भिन्न पेशाच्या सुप्रसिद्ध व्यक्ती दिवंगत झाल्या. ह्यापैकी मृत्यू अनपेक्षित रित्या लोकांचे श्रवणांत आला म्हणजे त्या संबंधाने तर्क–कुतर्क चालू व्हावे यात नवल नाही.

नाना फडणीस व महादजी शिंदेचा विरोध जगजाहीर असल्याने नानानेंच कपटाने त्याला मारले असा जो प्रवाद एक प्रवाद तारीखी मुजफर्रीत नमूद आहे, तो असा की, महादजीला रस्त्यात मारेकऱ्यांनी गाठून जखमा केल्या. त्यांच्या योगाने तो दुसरेच दिवशी मरण पावला. परंतु ही कल्पना साफ खोटी असून महादजी महिना दोन महिने तापाने आजारी असून, त्यातच त्याचा वानवडीच्या छावणीत ११ फेब्रुवारी १७९४ रोजी त्याचा मृत्यू झाला हे त्यांच्याच चिटणीसांनी लिहिलेल्या अनेक पत्रांनी आता निर्विवाद सत्य आहे. ता. ५ जून १७९३ च्या पटवर्धनांच्या पत्रात मजकू आहे की, महादजी शिंदे यास आज आठ दिवस ज्वर येत होता. यावरून पुढे जवळ जवळ आठ महिने महादजी थोडथोडा आजारीच होता असे म्हणावे लागते. म्हणजे १७९३ च्या जूनपासून एक दोन महिन्यांत ज्वराची बाधा चालू असता अनेक प्रकरणे त्याने जोराने धसास लावली. मात्र तो अगदीच अंथरूणास खिळून नव्हता, आणि आपला आजार विकोपास जाईल अशी खुद्द त्यास सुद्धा अखेरपर्यंत कल्पना नव्हती.

शेवटचे एक दोन दिवस अत्यावस्था झाले होते. तेंव्हा कोणतीच सारवा सारव त्यांना करता आली नाही. जगन्नाथ विश्वनाथाचे खुलासेवार पत्र ता. १५ फेब्रुवारी १७९४ चे उपलब्ध आहे औषधोपचार करावा असे ठरले असतांना त्यांना कोणतीच औषध लागू होत नव्हती. बुधवार त्रयोदशी सायंकाळी सवाई माधवराव पेशवे व नाना फडणीस महादजी शिंद्यांच्या समाजाचारास आले होते. परंतु दुर्दैवाने १२ फेब्रुवारी १७९४ रोजी महादजी शिंदे यांचे

पुण्यातील वानवाडी येथे आकस्मित मृत्यू झाला.

मृत्यूसमयी महादजींचे वय ६७ वर्षांचे, अहिल्याबाईच्या बरोबरीचे होते. त्यांचे सर्वच आयुष्य श्रम, साहस व काळजी यात गेले. विश्रांती कधीच यास मिळाली नाही. परंतु दमदार मनुष्यास आपला अंत समीप आला असे वार्धक्यात सुद्धा वाटत नाही, आणि शेवटच्या दोन तीन महिन्यात कामकाज व शिकार वगैरे व्यवसाय सारखे चालू राहिल्याने त्यांचे शरीर साफ खचले. तथापि दगदगीच्या मानाने तो इतका जगला हेंच पुष्कळ असे म्हटले पाहिजे. महादजीचा मृत्यू अव्वल रात्री आठांचे सुमारे झाला, ती बातमी त्याच दिवशी इंग्रज अधिकारी मॅलेटने कलकत्यास गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवालिसला लिहून कळविली होती.

महादजी शिंदेचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे वारसदार दौलतराव शिंदे यांनी वानवाडी या ठिकाणी छत्री बांधली तिच्या खर्चास पेशव्यांनी ता. ५ सप्टेंबर १७९५ रोजी १ एकर जमीन छत्री बांधण्यास दान केली. ही छत्री अलीकडे माधवराव सिंद्यानी वाढवून टोलेजंग केली, त्यामुळे पुण्यातील ऐतिहासिक स्मारकांत तिला उच्च स्थान प्राप्त झाले आहे.

पाटीलबाबांच्या मृत्यूची बातमी हांहां म्हणता सर्व देशभर पसरली. दिल्ली येथे दवेराव हिंगणे होता, त्यास नाना, तात्या, तुकोजी होळकर, दौलतराव वगैरेंची पत्रे जाऊन, ती शिंद्यांच्या ठिकठिकाणच्या सरदारांस दूरपर्यंत पोचली. ता. ४ मार्च १७९४ रोजी जिवाजी बल्लाळ पुष्करजवळ होता तो हिंगण्यास लिहितो : दौलतराव यांची पत्रें पुण्याहून आली की, महाराज कैलासवासी जाले ते ऐकोन दुःखार्णवी पडलों, ते कोठवर लिहावे. प्रस्तुत धणी प्रतापी गेले. आम्ही सेवक लोक मागे राहिलो. पूर्व जन्माचा दोष पदरी, याजकरीता भोगणें सुटत नाही. परंतु महाराज एकटे गेले. आम्ही चार लोक सलतनत ठेवून गेले. त्यांचे मागे अवसान सोडले तर पुरूषधर्मास ठिक नाही आणि लोकही म्हणतील मागे काहीच दम धरला नाही. याकरिता चित्ताचे ठायीं विवेक करून सर्व लोकांनी महादजी शिंदेच्या मृत्यूची खात्री करून त्यांच्या मृत्यूची माहिती दिल्लीच्या शहानिजामउद्दीन यास, मेवाडमध्ये अंबाजी इंगळे व इतर सर्व मराठे

सरदारांना पाठविलेली होती. या सर्व महत्वाच्या कागदपत्रावरून महादजींचा मराठ्यांच्या राज्यकारभारात फार मोठा दरारा होता असे दिसून येते.

महादजीच्या पत्नीची नांवे खालीलप्रमाणे होती.

१)	अन्नपूर्णाबाई	–	बीडचे निंबाळकरांची मुलगी – मुलगी झाली यमुना
२)	भवानीबाई	–	सिधोजी घाटगेची मुलगी
३)	पार्वतीबाई	–	नरसिंग घाटगेची बहीण – मुलगी बाळाबाई सितोळे लाडोजी देशमुख यास दिली.
४)	भगवानीबाई	–	संगमनेरकर देशमुखांकडील
५)	गंगाबाई	–	पालवेकर जाधवांकडील
६)	राधाबाई	–	पदमसिंग राऊळाची बहीण
७)	भागीरथीबाई	–	कर्डेकरांची कन्या
८)	यमुनाबाई	–	रामसिंग राऊळ दंवडाईकर यांची बहीण
९)	लक्ष्मीबाई	–	तुळजापूरकर भोपे कदम यांजकडील मृ. सागर येथे छावणीत.

वरील नांवनिशी बिनचूक असली तरी माहेरच्या कुटूंबाच्या नावात तफावत असण्याचा संभव आहे. शिवाय किशोरबाई वगैरे कित्येक रक्षा असल्याचा उल्लेख आढळतो.

या बायकांपैकी क्रमांक चौथ्या बायकोचे लग्न ता. २३ डिसेंबर १७७७ रोजी झाल्याचा उल्लेख आहे. इतिहासकार खरे वा. वा. यांनी इतिहास लेख संग्रहात लेखांक १९५३ मध्ये दिलेला आहे. महादजीच्या हयातीत शेवटच्या तीन शिवाय बाकी सर्व बायकांचा मृत्यू झाला होता. पुढे दौलतरावांशी ज्यांचा तंटा झाला त्या शेवटच्या तीन होत. त्यापैकी धाकटी बायको दौलतरावाच्या लक्षात होती ती भागीरथीबाई असावी. ती नगर येथे कैदेत असता इ. स. १७९९ ऑगस्टात वारली. लक्ष्मीबाईच्या लग्नासंबंधी खालील उल्लेख ब्रॉउटननें केला आहे. इ. स.

१७९२ च्या एप्रिल च्या एप्रिलमध्ये महादजी तुळजापुरास गेला असता तेथील मंदिरासमोर बारा वर्ष वयाची एक सुंदर, परंतु गरीब स्थितीत वाढलेली व आईबाप नसलेली मुलगी त्याच्या दृष्टीस पडली. लगेच त्याने तिच्या चुलत्यास दहा हजारांची जहागिरी देऊन दुसरे दिवशी तिच्याशी लग्न लाविलें होते. नंतर ती महादजी बरोबर असतांना त्यांचा मृत्यू झाल्यानंतर काही वर्षांनी वाकडे पाऊल पडू नये म्हणून अब्रू वाचविण्यासाठी दतिया येथे तिने विष प्राशन करून जीव दिला असा उल्लेख आढळतो.

आमचे जन्माचे सार्थक श्रीमंताचे कृपेकरून झाले. जे कोणी ते श्रीमंताची सेवा करावी या बुद्धीनेच करतो असे महादजीचे उद्‌गार आहेत. नाना फडणीस वयाने त्यांच्यापेक्षा १५ वर्षे लहान तरीपण ते पेशव्यांचे कारभारी म्हणून त्यांजबरोबर बैठकीवर बसण्याचा सुद्धा संकोच करीत असत.

महादजीबाबांबद्दल इतिहासकार जदुनाथ सरकार म्हणतात, दिल्ली सलतनवर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करून पानिपतच्या पराभवाचा कलंक धुवून काढण्याचे काम एकट्या महादजीबाबानींच केले. त्यांना पुणे दरबाराकडून मदत मिळाली नाहीच, उलट विरोध झाला. नाना फडणीसांनी जर खुल्या मनाने मदत केली असती तर जानेवारी १७८९ मध्ये महादजीबाबांनी जी मराठी सत्ता उत्तर हिंदुस्थानावर प्रस्थापित केली होती ती चार वर्षे अगोदर झाली असती. हिंदुपदपातशाहीचे मराठ्यांचे स्वप्न खरे करून दाखविण्यात एकुलते एक महादजी शिंदे दिसतात. त्यांच्या मरणोत्तर, इतिहासकार मॉलिसिन म्हणतो, महादजीबाबांच्या मृत्यूने मराठ्यांना आपला अतिशूर लढवय्या आणि दूरदर्शी मुत्सद्दी गमावला. त्यांच्या जीवनात त्यांना दोन उद्देश प्रिय होते, एक राज्य स्थापिणे. दुसरे साम्राज्याकरीता इंग्रजांशी लढत देणे. ह्या दोन्ही गोष्टीत ते यशस्वी झाले. जे राज्य स्थापिले ते आतापर्यंत (मॉलिसनच्या काळापर्यन्त) राहिले. त्यांच्या तालमीत तयार झालेले सैन्य त्यांच्या पश्चात आठ वर्षांनी लेक व लेलस्ली यांनी केले. ह्याचे

कारण महादजीबाबांचे त्यांना मार्गदर्शन होऊ शकले नाही. ते जर जिवंत राहिले असते तर एकाच झेंड्याखाली टिपू सुलतानाची फ्रेंच सैन्य तुकडी, घोडेस्वार, निजामाचे सैन्य, राजपुतांचे सैन्य, सर्व एकत्र आणले असते तसेच नागपूर, बडोदे, पुणे, इंदुर या मराठी सरदारांच्या राजधान्यातून सैन्य एकत्र आणले असते. अशा रितीने सर्व सैन्यानिशी इंग्रजांशी झुंज दिली असती. व त्याच्या निकाल कदाचित निराळा लागला असता.

मराठ्यांची सार्वभौम सत्ता आपण आपल्या हातात घ्यावी म्हणजे मराठशाहीचा मुख्य चालक आपण व्हावे, अर्थात् नाना फडणीसाच्या हातून राज्याचा कारभार काढून तो आपण घ्यावा अशी महादजीची महत्वाकांक्षा असती तर ते त्याला शक्य होते. पण तरूण पेशव्यास हाताशी घेऊन व लष्करी सुधारून हा इंग्रजांस दूर ठेवण्याचा त्याचा इरादा सिद्ध झाला नाही. मृत्यूनेच तो बंद पडला. बाल पेशव्यांसंबंधी त्याला अत्यंत निष्ठा व काळजी वाटत होती. त्याला दूर सारून आपण पेशवा व्हावे, किंवा छत्रपती व्हावे अशी स्वार्थी राज्यविघात कल्पना महादजीच्या प्रचंड पत्रव्यवहारात कोठेही नजरेस येत नाही हा एक प्रकारचा दिवाणी व लष्करी सत्तेचा झगडा होता. राज्याची जबाबदारी घ्यावयाची आणि संकटे सोसावयाची तर कारभारात आपण सहकार्य द्यावे अशी त्याची मागणी होती. सर्व सत्ता आपणच चालवावी असे त्यांचे म्हणणे नव्हते. कारभाऱ्यांनी आपला विचार घ्यावा, थोडेबहुत आपल्या तंत्राने चालावे, मोहिमांचे व देवीघेवींचे तपशील आपल्या मार्फत ठरवावे, अशा सहकार्याची महादजीची अपेक्षा होती. कारभाऱ्यास भिती वाटे ती इतकीच की, महादजीस प्रमुखपणा मिळाल्यावर आपली स्थिती काय होईल? पण हा प्रश्न एकट्या व्यक्तीचा नाही. कारणास लेखणीपेक्षा तोफांचा पाठिंबा जास्त उपयोगी आहे हे उघड आहे. भोसले, होळकर, गायकवाड वगैरे मराठ्यांचे प्रमुख सरदार राज्यघात करतात.'[४२] त्यांस नानाकडून आळा बसत हाच नानावर महादजीचा मोठा आक्षेप होता.

इंग्रज अधिकारी फॉरेस्ट म्हणतो, ''महादजीचे इंग्रजांवर बिलकूल प्रेम नव्हते याचे कारण हिंदुस्थानातील मराठ्यांनी सार्वभौम सत्ता टिकाऊ धरण्यासाठीच महादजीची धडपड चालू होती आणि ती सत्ता आपल्या हाती घ्यावी अशी इंग्रजांचीही इच्छा आहे असे महादजीस दिसतांच इंग्रजांसंबंधाने त्याचा पहिला आदर पुढे सर्व थंड पडला यावरून मराठी राज्य बुडत चालले ते टिकविण्याचाच महादजीचा मुख्य उद्योग होता.'[४३] टिपुवरील युद्धाचं पुणेकरांनी इंग्रजांचे साहय्य केले. हा प्रकार महादजीस अत्यंत गैर वाटला.''

उत्तर हिंदुस्थानात असतां इंग्रज, निजाम, अफगाण व शीख राजे यांच्याशी बादशहाच्या तर्फेने स्वतंत्र कारस्थाने करणे महादजीस भाग पडले त्यामुळेही त्याच्याबद्दल पुणेकरांच्या मनात वैमनस्य आले पण प्रत्येकी वेळी पुण्याची परवानगी आणून कारभार करावयाचा असता तर त्याच्या हातून कोणताच उद्योग सफल झाला नसता. इ. स. १७७९ नानाने हैदराशी गुप्त कारस्थान केले तेंव्हा महादजीची निभावणी पत्रे आल्याशिवाय हैदर पुढे पाऊल टाकीना असे प्रसंग काही थोडे आले नाहीत. नानालाही हे समजत होते. पण आपला अधिकार टिकविण्यासाठी त्यास महादजीशी विरोधक करावा लागला. वास्तविक इ. स. १७९३ मध्ये महादजी पुण्यास आला. तेंव्हा महिना पंधरा दिवसात त्याच्या अडचणी भागवून त्यास नानांने परत रवाना केले पाहिजे होते किंवा स्वतः पेशव्यास घेऊन नाना उत्तरेत जाता तर होळकर अलतर लोक यांच्या तक्रारीही समक्ष मिटविता आल्या असत्या. पेशव्यास सुद्धा नानाचा धाक नको होता म्हणून तो महादजीबरोबर जाता तर कारभारास निराळे वळण लागले असते असे आपणास निदर्शनास येते.

''महादजीने स्वपराक्रमाने हिंदुस्थानच्या इतिहासात महत्वपूर्ण स्थान पटकाविले होतें'. मराठ्यांच्या राज्याची सेवा त्याने प्रामाणिकपणे केली. उत्तरेचे राजकारण करतांना त्याच्या डोळ्यासमोर सतत मराठी राज्याचे हित-सबंध राखणे हाच प्रमुख हेतू असे. उत्तरेत त्याने राजपुतांचा बंदोबस्त केला. बादशहाला साह्य करून त्याची घडी नीट बसविली. कवायती

फौजेची व पाश्चिमात्य पद्धतीने लष्करी व्यवस्था स्वीकारून त्याचे किती महत्व आहे हे महादजीने विशद केले व आपला भावी शत्रू इंग्रजच आहे हे त्याने ओळखले. त्यानुसार आपल्या लष्करी धोरणात बदल करणे आवश्यक आहे हे महादजी जाणून होते. स्वामीनिष्ठा हा महादजीचा एक मोठा गुण होता. त्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. शिंदे घराण्यावर पेशव्यांनी केलेल्या उपकाराची जाणीव त्याने सतत मनी बाळगली एका पत्राच्या आधारे महादजी म्हणतो, *''आम्ही जे करितों ते श्रीमंतानिमित्त करितो. आमच्या वडिलांची तरी बिशाद काय होती! प्रथम राणोजी बाबास खिजमती गारी सांगितली नंतर कृपा करून पागा दिली, तेथून वाढवित वाढवित या पदवीस आणिले की आम्ही बादशाहीची स्थापना केली. आता आम्ही बादशाही पदाची इच्छा का करावी? द्रव्य-संचय व लौकीकांची अभिलाषा धरावी तर श्रीमंताच्या कृपेकरून आम्हास उणे काय आहे. लौकीक तो आहेच पैका म्हणाव तर मुलूक यात मिळणे काय खर्च चालवण्याचे संकट आणि संचय तरी किमर्थ करणे, आमचे जन्माचे सार्थक श्रीमंताच्या कृपेकरून जाले. अवशिष्ट कालही जाईल. द्रव्यसंचयाचा हव्यास कोणानिमित्त करावा? पोटीपाठीही कोणी नाही जे करणे ते श्रीमंताची सेवा करावी या बुद्धीनेच करतो श्रीमंतांचे भोक्तृत्व तितके आमचे उर्वरित''* या पत्रात महादजीच्या कार्याची भूमिका उत्तम प्रकारे स्पष्ट होते. नाना आणि महादजी यांच्यामध्ये स्पर्धा अगदी स्वभाविकच होती दोघेही कर्तबगार आणि मातब्बर होते. महादजी तलवारीचा धनी त्याचा दरारा मोठा होता. लेखणीवर नानाची हुकमत असल्यामुळे प्रशासन आणि राजनीती या बाबींवर नानाची चांगलीच पकड होती आणि दोघांचीही मराठी राज्याच्या विपन्न अवस्थेत देशाला गरज होती.

मॅलेसन सांगतो, ''महादजीच्या मृत्यून मराठ्यांचा एक उत्कृष्ट योद्धा व मुत्सद्दी नाहीसा झाला. मराठ्यांचे राज्य स्थिर करून इंग्रजांचा प्रतिकार करावा हे दोन त्याचे मुख्य उद्देश होते. ते त्याने आपल्या हयातीत पूर्ण करून दाखविले. जास्त जगला असता तर हिंदुस्थानातील

सत्ताधीशांचे ऐक्य करून त्याने इंग्रजांशी निकराचा सामना केला असता यात संशय नाही.

''महादजी आणि नाना यांची नेहमीच स्पर्धा असे नानाने सांगितलेले काम बाबा पाटील नेहमी उचलून धरत असे व नानाचे शहाणपण महादजी ओळखून होते. एकंदरीत राज्याचे नुकसान होणार नाही असे वर्तन महादजीने कधी केले नाही. महादजीच्या मृत्यूने मराठी राज्याची फार मोठी हानी झाली होती. उत्तर हिंदुस्थानातील कारभार कसा सांभाळायचा हा नानापुढे पेच होता. जागोजागीच्या सुभेदारांना पत्रे लिहून नानाने कळविले होते. *''हिम्मत धरून प्रसंग राखवयाचा समय हाच आहे दिल्लीचा बंदोबस्त व पातशाही स्वाधीन आदि करून रावाखा''* या नानाच्या उद्‌गारावरून महादजीची थोरवी स्पष्ट होते. छत्रपती शिवाजी, थोरले बाजीराव यांच्या धोरणाचा पाठपुरावा करणारा सुभेदार महादजी शिंदे हा शेवटचा मराठेशाहीचा अध्वर्यू होता. असेच म्हणावे लागेल. *''महादजी शिंदे न्यायाचा भोक्ता, सत्यासाठी जीव धोक्यात घालणारा होता.''*

संदर्भ सूची

१) खरे ग. ह. व अ. रा. कुलकर्णी (संपा) मराठ्यांचा इतिहास, खंड १, पुणे कॉन्टीनेटल प्रकाशन १९८४, पृ. ३९

२) सेतू माधवराव पगडी महाराष्ट्र आणि मराठे जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे १९६३ पृ.७०

३) ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी पुर्वोक्त पृ. ३१७

४) कित्ता पृ. ३१७

५) कित्ता पृ. २६१

६) कित्ता पृ. १६५

७) आठवले सदाशिव पुर्वोक्त पृ. ११३

८) पुर्वोक्त पृ. १२४

९) डॉ.कमल गोखले छत्रपती संभाजी पुणे, कॉन्टीनेटल प्रकाशन १९८४, पृ. ३७५

१०) कित्ता पृ. ३०२

११) गुजर मा.वि. (संपा) संस्थान देवान घराण्याचा इतिहास, ग्वाल्हेर १९५० लेखांक १२६

१२) फाळके शिंन्देशाही मुत्सद्यांचा पत्रव्यवहार खंड ३, ग्वाल्हेर १९२९, लेखांक १५२

१३) कित्ता लेखांक १५९

१४) सरदेसाई गो. स. पेशवे दप्तर खंड २१, मुंबई सरकार, मुंबई १९३३, सरदेसाई लेखांक ७३

१५) डॉ. खोबरेकर वि.गो. (संपा) मराठ्यांचा इतिहास, खंड २, मुबई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रथमः १९८८, पृ. २४०

१६) पुर्वोक्त लेखांक १७५

१७) सरदेसाई गो. स. कित्ता लेख १८९

१८) कित्ता पृ.१९०

१९) कित्ता पृ. ३२०

२०) राजवाडे वि.का. (संपा) मराठ्यांच्या इतिहासाची साधने (महादजी शिंदे जीव वाचवून पानिपत संग्रामातून आले) खंड क्र.१, वाई १८९८, लेखांक ३८५

२१) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड ७, मुंबई सरकार, मुंबई १९३१,पृ. ३९९

२२) मुजूमदार संपादक दी मराठा सुप्रीमसी, कलकत्ता १९५०, पृ. ४०५

२३) खरे वा. वा. संपादक ऐतिहासिक लेख संग्रह खंड १, पुणे १९३३ लेखांक ३४२४

२४) कित्ता पृ. ४५७४

२५) कित्ता पृ. ४०४

२६) मॅलेसन हिस्ट्री पेपर्स रिलेटेड टू इस्ट इंडिया कंपनी,कलकत्ता १९२९, पृ. ४९७, ५००

२७) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड ७, मुंबई सरकार, मुंबई १९३३, पृ. ४०५

२८) कित्ता पृ. ४०३

२९) कित्ता पृ. ४०५

३०) सरदेसाई गो. स. संपादक ऐतिहासिक टिपणे खंड ३, मुंबई सरकार, मुंबई १९३३, पृ. ३५

३१) पारसणीस द. बा. बायजाबाईचे चरित्र, मुंबई १९४५ पृ. १३

३२) डॉ.खोबरेकर वि. गो. पुर्वोक्त पृ. ४९८

३३) कित्ता पृ. ४९९

३४) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड ७, नवीन आवृत्ती, मुंबई १९९३, पान नं. ४२३

३५) मॉलेसन दी नेटिव्ह स्टेट ऑफ इंडिया (इंग्रजी) कलकत्ता १९०१ पान नं. ४२३

३६) फाळके (संपा) शिंदे शाहीच्या इतिहासाची साधने ग्वालीयर १९०१, खंड १२, पान नं. ४४५

३७) कित्ता पृ. ४७२

३८) राजाध्यक्ष शिंदे शाहीचा खरा इतिहास ग्वालीयर १९२१, खंड ३, पान नं. ३७५

३९) कित्ता पृ. ३८०

४०) पुर्वोक्त पृ. ४०८

४१) कित्ता पृ. ४०९

४२) कित्ता पृ. ४०७

४३) अप्रकाशित गुलगुले दप्तर महादजी सिन्धीया खण्ड १, २, ३, ४, ५, ६

४४) शिंदेशाहीच्या इतिहासाची साधने संपादक आनंदरावभाऊ फाळके खण्ड १,२,३,४,५,६
मुद्रांक य. ता. माणगांवकर, आलीजाह दरबार प्रेस, लष्कर, ग्वाल्हेर १९३०

प्रकरण दुसरे

“महादजी शिंदे-पेशवे संबंध”

प्रकरण दुसरे

"महादजी शिंदे-पेशवे संबंध"

छत्रपती राजारामाच्या कारकीर्दीपर्यंत अष्टप्रधानाच्या नियुक्त्या वंश परंपरेने गुणवत्तेच्या आधारे केल्या जात होत्या. छत्रपती शाहूच्या काळात अष्टप्रधानाच्या नेमणुका एकाच घराण्यात होऊ लागल्या बाळाजी विश्वनाथ हा भट घराण्यातील पहिला पेशवा होता हे घराणे कोकाणातील चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणांचे असून श्रीवर्धन हे त्यांचे मूळ गांव होते. या घराण्याला सुरूवातीला धनाजी जाधवने आश्रय दिला पुढे बाळाजी हा आमच्या गुणामुळे, कर्तृत्वाने, कर्तबगारीने छत्रपती शाहूच्या विश्वासाला पात्र ठरला. लवकरच त्याला पेशवेपद मिळाले छत्रपती शाहू नामधारी बनून सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती केंद्रीत झाली. पेशव्याकडे सत्तेचे हस्तांतर कसे झाले हे लोकांना समजलेच नाही. शेवटी पेशवे हेच मराठेशाहीचे सर्वेसर्वा झाले. प्रामुख्याने पेशव्यांचा उत्कर्ष छत्रपती शाहूंच्या काळात कसा झाला याचे अनेक कारणे इतिहासकार सांगतात. त्याचे अनेक घटक कारणीभूत झाले. इतिहासकाराच्या मते १८ व्या शतकातील परिस्थिती ही कर्तबगार व महत्वकांक्षी व्यक्तींना अनुकूल ठरली. प्रामुख्याने छत्रपती शाहू पुढील अडचणी, दुर्बलता, शाहू छत्रपती झाला त्यावेळी स्वराज्यातील राजकीय परिस्थिती मराठे सरदारांचा स्वार्थ, ताराबाईची महत्वाकांक्षा भोसले घराण्यातील गृहयुद्ध, यादवी, अष्टप्रधान मंडळाची द्रौर्बल्यता, हैद्राबादच्या निजामाचे धूर्त राजकारण, पेशव्यांची व्यक्तीगत योग्यता इत्यादी कारणाने पेशव्यांच्या उदयाची कारणे मांडली जातात.

महादजी शिंदे व पेशवा माधवराव (इ.स. १७६१-१७७२)

पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेबाच्या २३ जून १७६१ रोजी मृत्यू झाल्यानंतर

पेशवाईची वस्त्रे माधवरावांस, रघुनाथराव दादाच्या साह्याने २० जूलै १७६१ रोजी देऊन पेशवे पदावर विराजमान झाले. रघुनाथराव दादासाहेबाच्या मतांत पेशवे माधवराव आपल्या नियंत्रणात ठेऊन, राज्यकारभार करावा असे होते, त्यामुळे राज्य कारभारांत एकसूत्रीपणांत बिघाड होता. हा पुण्यातील गृहकलह, हैद्राबादचा नवाब निजाम अली व म्हसूरचा नवाब हैदरअलीस कळताच इ. स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा झालेला पराभव ऐकताच, त्यांना आनंद झाला. त्यांनी इ. स. १७६१ पूर्वी आपला गेलेला प्रदेश परत मिळविण्यासाठी, मराठ्यांवर चाल करून आपला गेलेला प्रदेश परत मिळविण्याचा प्रयत्न केला रायचूर दोआबातील पंच महालाचा प्रदेश फत्तेसिंग भोसल्याकडे होता.[१] २० नोव्हेंबर १७६० रोजी त्याचा मृत्यू झाल्यानंतर हा प्रदेश निजाम अलीने आपल्याकडे घेतला. थोरले माधवराव पेशव्याने रघुनाथराव दादास, २५ हजार फौजेसह, परशुराम पटवर्धन बरोबर मदतीस पाठविले. खुद्द निजामअली गारद्यासह तोफखाना बरोबर घेऊन सोलापूरच्या दिशेने चाल करून पुण्यास निघाला. हे कळताच रघुनाथराव दादा व पेशवा माधवराव जय्यत तोफखाना घेऊन पुण्याकडे निघाले. १) शहागडच्या मैदानावर उभय पक्षाचे सैन्य एकमेकांजवळ आले. औरंगाबादला पोहचेपर्यंत मारामारी चालू होती. पुण्याजवळ १२ मैलाजवळ मोगलांची फौज आल्याचे कळताच पुण्यातील सावकार व व्यापाऱ्यांनी संपत्तीसह सिंहगडावर इतक्यात रामचंद्र जाधव व अलीखान हे दोघेही मराठ्यांस येऊन मिळाले. २) शेवटी पुढील भांडणात आपल्यास हैद्राबादच्या निजामअलीची मदत मिळेल ह्या दृष्ट हेतूने रघुनाथराव दादा ह्यांनी युद्ध न करता निजामाकडून ४० लाखाचा मुलूख घेऊन तह केला.

पेशवे माधवराव आणि इंग्रज संबंधः

पानिपतच्या पराभवामुळे मराठ्यांच्या राज्यात चोहोकडे दंगलखोर संस्थानिक व प्रबल होऊन तंटेबखेडे करू लागले.[२] त्यात इंग्रजांनीही उपद्रव देण्यास सुरूवात केली होती.

इंग्रजांनी पेशव्यांशी संगनमत करून मराठ्यांचा नौदल सेनापती आंग्यांचा इ. स. १७५६ मध्ये पराभव केला होता. इंग्रज मराठा तहाच्या वाटाघाटीत इंग्रजांनी पेशव्यास फसविले होते.

इ. स. १७६१ च्या व्यापारी करान्वये इंग्रजांनी पेशवा माधवरावांकडून खूप सवलती घेतल्या होत्या. मराठ्यांचा वकील बाजी गंगाधर याने इंग्रजांशी तह केला. तहाप्रमाणे इंग्रजांची दोन हजार सैनिक व १५ तोफांची मदत पेशव्यांस करावी. पेशव्याने १ लाख रूपये इंग्रजांस द्यावे. पुण्यात इंग्रजीची फौज आश्रयास आल्यास दीड लाख उत्पन्नाचा प्रदेश इंग्रजास द्यावा. वाटाघाटी चालू असतांनाच बंगालच्या इंग्रजांनी मराठ्याविरूद्ध सलाबत जंग व निजामअलीस मदत देण्याचे आश्वासन दिले. पेशवे माधवराव यांना इंग्रजांच्या ह्या कुटील कारस्थानाबद्दल आश्चर्य वाटले.

महादजी शिंदे व राक्षस भुवनची लढाई (जून १७६४) :-

मराठ्यांनी निजामाचा पाडाव करण्यासाठी राक्षसभुवनाच्या लढाईत (माजलगांव मराठवाडा) निकराचा लढा दिला. परंतु ऐनवेळी पावसाळा सुरू झाला. त्यामुळे सैनिक कंटाळून गेले होते. इतक्यांत हैदरअलीने मराठ्यांचा प्रदेश काबीज केला होता. त्यामुळे नाईलाजाने माधवराव पेशव्याने, निजामअलीशी उदगीरचा तह करावा लागला. या तहान्वये ब्याँऐशी लाख उत्पन्नाचा प्रदेश मराठ्यांना द्यावा असे ठरले. ह्या लढाईत [३] महादजी शिंदेची कामगिरी महत्वाची असून, निजामअलीच्या फौजेचा उद्‌गीर, औरंगाबादच्या लढाई, त्याचा सैन्याचा पराभव केला ही बाब उल्लेखनीय आहे. तह होत असतानांच १८ सप्टेंबर १७६४ रोजी निजामअलीने गद्दार सरदार सलाबतजंगास ठार केले. तसेच ऑगस्ट १७६४ मध्ये मुरादखानास फितुरीच्या आरोपावरून अटकेत ठेवले व नंतर त्यास ठार केले.[४] महादजी शिंदे मुळेच राक्षस भुवनाच्या विजयाने पेशवा माधवरावाचा दक्षिणेत व उत्तर भारतात जाब बसला.

महादजी शिंदेची हैदरअलीविरूद्ध पहिली, दुसरी, तिसरी व चौथी स्वारी (इ.स.

१७६४-१७७२):-

मराठ्यांच्या तिसऱ्या पानिपतच्या पराभवामुळे त्यांच्या शत्रूंनी मराठ्यांच्या प्रदेशात आक्रमणास सुरूवात केली. त्यात म्हैसूरचा नबाब, हैदरअली प्रमुख होता. माधवरावास पेशवेपद प्राप्त झाल्यानंतर पहिली तीन वर्षे घरगुती कलह मिटल्यानंतर हैद्राबादच्या निजामअलीचा बंदोबस्त करण्यात गेली होती.[५] हैदरअलीच्या राज्याच्या सीमा थेट कृष्णा नदीपर्यंत भिडल्या होत्या. त्यामुळे थोरले माधवराव पेशव्यांस हैदरचा पाडाव करणे आवश्यक वाटले.

पेशवे माधवराव व हैदरच्या सैन्याची सावनूरची पहिली लढाई झाली. (इ.स. १७६४) ह्या लढाईत हैदरचे एक हजार सैनिक ठार झाले आणि तितकेच जखमी झाले. त्यावेळी हैदरअलीने सावनूरच्या घनदाट अरण्याचा आश्रयम घेतला. माधवराव पेशव्याने त्यास निरोप पाठविला की, तुझ्या शौर्याच्या कैक गोष्टी आम्ही पुण्यात ऐकल्या आहेत. त्या जर खऱ्या असतील तर तू भागूबाई सारखा रानांत दवडू न राहता मैदानात येऊन आमच्याशी लढ. त्यातच तुझे शौर्य आणि मर्दूमकी आहे आणि असे केले नाहीस तर तुझ्या पराक्रमाच्या, ऐश्वर्याच्या गोष्टी कपोल कल्पित आहेत.

असे मी समजेन आणि पुण्यांत जाण्याअगोदर तुझ्या आठवणीत आनंदाने भेट घेईल.

हैदरने आपल्याकडून लढण्यासाठी सैन्य उभे करण्याची शिकस्त केली.[६] मराठ्यांनी चोहोकडून हल्ला केला आणि हैदरच्या पुष्कळ सैन्याची कत्तल केली. हैदरअली आपल्या पंचवीसे स्वार व दहा हजार पायदळ सैन्यासह बिदमुरास पळून गेला. या लढाईत पेशव्याच्या पराक्रमाचा व कर्तृत्वाचा हैदरवर असा पगडा आला की, त्याने पेशवा हजर असलेल्या स्वारीस पुनः समोरासमोर झगड्याचे धाडस केले नाही.

अशा रीतीने इ. स. १७६५ ची दुसरी लढाई इ. स. १७७० ची मोतीवालाची ४ थी लढाई

इ. स. १७७० ची मोतीतलावाची ४ थी लढाई व इ. स. १७७१ च्या श्रीरंग पट्टची लढाई चौथ्या लढाईत पेशवा माधवरावाने हैदरअलीच्या सर्वच लढायांत पराभव करून आपला पराक्रम व कौशल्य सिद्ध केले होते.

महादजी शिंदे यांची मीरबक्षीपदी नियुक्ती (इ.स. १७६१-१७७२):

मराठ्यांचा पानिपतचा पराभव झाल्यानंतर उत्तर हिंदुस्थानातील यमूना व चंबळ यांच्या दक्षिणेतील रोहिले, जाट, बुंदेले आणि राजपूत राजे यांनी मराठ्यांना पदोपदी दक्षिणेस हाकलून लावण्याचा कट रचला होता.[७] जयपूरचा राजा माधोसिंग याने मराठ्यांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी उत्तर हिंदुस्थानातील सर्व संबंधीत राजांची एकजूट करण्याचा प्रयत्न केला. राजपूत राजांनी व शेखावतांनी मराठ्यांना खंडणी देण्याची बंद करून मराठ्यांचा अंमल उठविण्याचे ठरविले.

जाटांचा बंदोबस्त करण्यासाठी रघुनाथराव दादा फौजेसह दक्षिणेत गोहदच्या राणाचा पराभव करण्यासाठी गोहदच्या किल्ल्याला वेढा दिल. गोहदच्या राणाने शरण येण्यास नापसंत व्यक्त केली. शेवटी महादजी शिंदे यांनी इ. स. १७६६ गोहदच्या राणाशी मध्यस्थी करून १५ लाख रूपये खंडणी वसूल केली.[८] इ. स. १७६९ मध्ये थोरले माधवराव पेशव्याने उत्तरेकडे स्वारी करण्यासाठी रामचंद्र गणेश, तुकोजी होळकर, महादजी शिंदे यांना पाठविले. वरील तीन मराठेत सरदारांनी आपआपली कामगिरी पूर्ण केली. रामचंद्र गणेश यांनी बुंदेलखंडातील जमीनदारांकडून खंडण्या वसूल केल्या तर महादजी शिंदे यांनी उदयपूरच्या संस्थानाकडून खंडणी वसूल केली.

पेशवा माधवरावाच्या इच्छेप्रमाणे मराठ्यांनी दिल्लीत जाऊन दिल्लीचा ताबा घ्यावा असा उद्देश होता. इ. स. १७७० मध्ये महादजी शिंद्यांनी दिल्लीचा बादशहा महंमदशहा दुसरा, त्याचा दिवाण नजीबखान, रोहिला, नबाब उद्दौला व अहमदखान बंगरा इत्यादीचा पराभव

करून मोगल बादशहा शाहआलम दुसऱ्यांस दिल्लीच्या गादीवर बसविले. महादजी शिंदे बादशहाने मीर-बक्षी व दिवाण हे दोन्ही पद २४ डिसेंबर १७७० रोजी बहाल केली. परंतु महादजी शिंदे यांनी *मीर-बक्षी* हे पद स्वतःकडे न ठेवता महादजी शिंदे यांची मीरबक्षी पदी निवड करण्यात आली.[९] थोरले माधवरावाचा भाऊ नारायणरावास बहाल करून पुण्याच्या पेशव्यांच्या नावाने दिल्लीचा राज्यकारभार सांभाळला कराराप्रमाणे मोगल बादशहाने १० लाख रूपये खर्चास द्यावे. दिल्लीच्या कारभारात मराठे जे धोरण ठरवतील त्यास बादशहाने मान्यता द्यावी. बादशहाच्या शत्रूचे मराठ्यानी पारिपत्य करावे व पुढील मोहिमा दोघांनी मिळून समान लूट व खंडणी घ्यावी असे ठरले.

अशा रितीने माधवराव पेशव्याने इ. स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धांतील अपयश धुवून काढून त्यांचे सरदार तुकाजे होळकर,[१०] महादजी शिंदे, रामचंद्र गणेश, परशुराम पटवर्धन प्रस्थापित केले तसेच जाट, राजपूत शेखावत, बुंदेले, नजीबखान रोहिला यांचा बंदोबस्त केला.

पेशवे सवाई माधवराव व महादजी शिंदे संबंध (इ. स. १७७२-१७९५):-

मराठी राज्याचा राज्यकारभार पुण्याहून चालत होता. नानासाहेब पेशवे, थोरले माधवराव पेशवे ह्यांची मुत्सद्देगिरी शहाणपणा व पराक्रम या अद्वितीय गुणांमुळे त्यांनी मराठा राज्याची विस्कटलेली घडी सुधारलेली होती.[११] पेशवे माधवरावाच्या मृत्यूनंतर (१८ नोव्हेंबर १७७२) त्यांचे अल्पवयीन बंधू नारायणराव यास १७७२ रोजी पेशवेपद देण्यात आले. पेशवे नारायणराव वृत्तीने तापट असल्यामुळे सर्वच मराठे सरदार त्यांच्या रोषांस पात्र झाले. त्यांच्या विरूद्ध कट होऊन त्यांचे चुलते रघुनाथराव दादाच्या मदतीने गारद्यांच्या मध्यस्तीने खून झाला. त्यामुळे रघुनाथराव दादाच्या विरूद्ध पुण्यांतील बारभाई, मंडळाची स्थापना होऊन रघुनाथरावाऐवजी नाना फडणीसाकडे मुख्य कारभाराची सूत्रे देण्यात येऊन रघुनाथरावास कैद करण्यात आले.

रघुनाथरावाने मोठ्या कुशलतेने आपली सुटका करून पेशव्याच्या अनुपस्थितीत रघुनाथरावाने पेशव्याविरूद्ध कारस्थाने सुरू केली. यावेळी महादजी शिंदे उत्तर हिंदुस्थानात मोगल बादशहा अहमदशहा दुसरा दिल्लीच्या गादीवर बसविण्यास व्यस्त असल्यामुळे त्यांचे पुण्यातील गृहकलहाकडे दुर्लक्ष झाले होते. नारायणरावाच्या खूनाच्या तपासणीसाठी मुख्य न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांच्याकडे सोपविली होती. रघुनाथरावास दादानी त्यांचा मुलगा अमृतरावांस साताऱ्याचा छत्रपतीकडे पाठवून पेशवाईची वस्त्रे आपल्या मुलाच्या नावाने आणली होती. तसेच आपल्या नावाचा, पेशवाईचा शिक्का तयार केला होता.'[१२] त्याने राज्यकारभार पाहण्यास सुरूवात केली होती.

२८ एप्रिल १७७४ रोजी पेशवा माधवरावांची पत्नी गंगाबाईस पूत्ररत्न झाले. तेंव्हा पुण्यातील बारभाई मंडळींनी १ सप्टेंबर १७७४ रोजी केवळ त्याच्या ४० व्या जन्मदिवसापासूनच त्याला पेशवाईची वस्त्रे दिली. त्यामुळे रघुनाथराव दादा बारभाईंच्या कुटिल कारस्थानाने अस्वस्थ झाला. त्याने इन्दौरला जाऊन तुकोजीराव होळकरांकडे आश्रय घेण्याचे ठरविले होते. यावेळी महादजी शिंदे उज्जैनला होते तेही इन्दौरला तुकोजी होळकरांस येऊन मिळाले होते. रघुनाथरावांचा शिंदे–होळकरांवर विश्वास नव्हता. रघुनाथराव दादाने यावेळी हैदरअली, सुजाउद्दौला, रोहिले व इंग्रज या सर्वांबरोबर राजकारणे सुरू केली होती. रघुनाथराव दादा आपली फौज घेऊन बऱ्हापूरवरून नर्मदा नदी ओलांडून इन्दौरला जात असतांनाच महादजी शिंदे व तुकोजीराव होळकरांनी त्यास इन्दौरास येण्यास मनाई केली होती.

पुण्यातील बारभाईशी बोलणी करून हरिपंत फडके रघुनाथरावाच्या सैन्याचा पाठलाग करीत असतांना '[१३] महादजी शिंदे व तुकोजीराव होळकर ह्यांनी समजूत घातली की, रघुनाथराव दादा बरोबर करार झाला. तहान्वये दादास फौजेच्या खर्चाकरीता सात लाख रूपये द्यावे असे ठरले. हरिपंत फडके यांनी तात्काळ ७५ लाख रूपये दिले. परंतु काहीतरी कुरापत

काढून दादासाहेबांनी भोपाळकडे जाण्यास निघाले. परंतु महादजी शिंदे यांनी त्यास पुण्यास जाण्यास सांगितले.

महादजी शिंदे व तुकोजीराव होळकरांनी दादास दर साल १० लाख रूपये उत्पन्नाचा प्रदेश व मध्यम प्रतीचे दोन किल्ले द्यावे व त्यावर '[१४] शिंदे होळकरांची देखरेख असावी असे सांगितले.

पुण्यातील बारभाई मंडळीनी ही मागणी तात्काळ मान्य केली. शिंदे होळकरांनी दादास पुणे कराराची अंमलबजावणी करण्यास सांगितले. परंतु दादांनी त्यास नकार दिला.

हरिपंत फडके व परशुराम पटवर्धन हे आपल्या फौजसह रघुनाथराव दादाचा पाठलाग करीत होते. हे कळताच रघुनाथराव दादाने इंग्रजांकडे जाण्याचा बेत जाहीर केला.

महादजींनी इंग्रजावर दहशत बसवली

हेस्टिंग्सचा कारवया पाहून नाना फडणविसानेही तितक्याच निकराने त्या हाणून पाडल्या आणि खुद्द इंग्लडपर्यंत हेस्टिंग्सची नाचक्की उडवून दिली. चेतसिंग व अयोध्येच्या बेगमा यांच्यावर जे अत्याचार हेस्टिंग्सने केले ते इतिहासांत महशूर आहेत. ४/२/१७८१ रोजी खालील महत्वाचे पत्र नानाने चेतसिंगास लिहिले इंग्रज बेईमान, छिद्रान्वेषी, बंगला वगैरे ज्या दौलतीत त्यांचा पाय शिरला तेथील अहवाल काय झाला व इमान देऊन स्नेह कसा राखतात हे महशूर आहे. दक्षिणेत सुद्धा याच प्रकारचे त्यांचे कपट वाढवित चालले. खुषकीत टोपीकरांची चाल वाईट, सबब यांस पोख्त सजा करून काढून लावावे. हीच नेक सल्ला जाणून इंग्रजांच्या तंबीचा नक्षा सरकारांत मुक्रर झाला. त्याचप्रमाणे सरकारांतून लढाई सुरू आहे.'[१५] भोसले बंगल्याचे सरहद्दीवर जाऊन पोहचले. हैदरखान यांनी चेनापट्टण, आर्कट वगैरे कुल ठिकाणे गबजात आणली. निजामअलीखाँ बहादूर यांच्याही फौजा शिकाकोल राजमेंद्रीकडे जाणार असा चौकडून ताण बसला आहे.

इ. स. १७८०-८१ त इंग्रज-मराठ्यांचे युद्ध निकरावर आले. हेस्टिंग्स एका बाजूस तर महादजीनाना दुसऱ्या बाजूस आपापली बाजू शिकस्तीने सांभाळीत होते. लाहर व ग्वालेर या ठिकाणावर चढाई करण्याचा पॉफकमचा उद्देश हेस्टिंग्सला कळताच, या दुर्घट कामांत त्यास खर्चित अपयश येईल असे वाटून मेजर जेकब कॅमक यास हेस्टिंग्सने उत्तरेकडून घाईघाईने इ. स. १७८० तच पॉफमचे जोडीस गोहदकर राण्याचे बचावास पाठविले. तो काल्पी सिप्री घेऊन दाखल झाला. '[१६] इंग्रज सिप्री, कोलारस पर्यंत चालून आल्याचे कळताच महादजी जानेवारीत आपण स्वतः उज्जनीहून पूर्वेस सारंगापुरावरून भेलशाकडे गेला; आणि इंग्रजास मार्ग रेटींग ग्वाल्हेरच्या व गोहदच्या दरम्यान नेट धरून बसला.

कर्नल कॅमक फेब्रुवारीत भेलशापर्यंत पुढे आला होता. कॅमक येताच भोपाळकर नवाबाने त्याशी बोलणे लाविले, की आम्ही तुम्हास तीन लक्ष रूपये देतो, भोसले सिंद्याकडून घेऊन आम्हास द्यावे. कॅमकने ही गोष्ट मान्य करून सिरोजपावेतो चाल केली. त्याबरोबर महादजीने फेब्रुवारी अखेरीस कॅमकशी गाठ घेतली; आणि त्यास घेरून सात दिवस तोफांचा सडकून मार दिला. ता. ७ मार्च रोजी कॅमक मागे हटून महत्पुरास गेला, आणि अयोध्येहून ताबडतोब त्याने जास्त मदत मागविली. महादजी त्याचे मागोमाग होताच झटापट थांबली नव्हती. २४ मार्च रोजी रात्री कॅमकने एकदम महादजीवर छापा घातला, आणि पुष्कळ लोक कापून काढले. तोफा, तीन हत्ती, मुख्य निशाण व घोडे हस्तगत केले. यामुळे महादजीला इंग्रजांची थोडीबहुत दहशत बसली. दरम्यान हेस्टिंग्सने ले. कर्नल म्यूर यास आणखी फौज देवून रवाना केले. तो ४ एप्रिल रोजी कॅमकला येऊन मिळाला. त्यानी लगोलग ग्वाल्हेरचा किल्ला गोहदकर राण्याचे ताब्यात दिला. तेव्हा राणा खूष होऊन त्याने अनेक राजपुत राजास महादजीविरूद्ध उठण्याची भर दिली.

कर्नल म्यूर येऊन कॅमक यास सामील होताच इंग्रज भारी झाले तेव्हा गनिमी काव्याने

लढून महादजीने पावसाळा येईपर्यंत निभावणी केली ता. १३/३/१७८१ रोजी पटवर्धनांचा कारकून पुण्याहून लिहितो, भूपाळवाल्यांनी तीन लाख रूपये कबूल करून घेऊन द्यावे या अर्थे इंग्रज आणिले आहेत म्हणून लिहिले, ऐशास शिंदळीचे इंग्रज आहेत तरी किती! जेथें तेथे तेच उद्‌भवतात हे काय आहे न कळे. शिंदे त्यांचे परिपत्य करतील तेव्हा खूळ मोडेल यावरून इंग्रजांसंबंधाने सामान्य मराठ्यांचे केवढे अज्ञान होते हे दिसून येते.

ग्वाल्हेर हातची जाऊन महादजीवर एकामागून एक इंग्रज सेनापति चढाई करून येऊ लागले, तेव्हा त्याने दक्षिणेत फौज घेऊन यावे म्हणून जो नानाचा आग्रह चालू होता, तो अर्थात बंद पडला. सदाशिव दिनकर नानास लिहितो, पातशहा व नजफखान यांनी इंग्रजांचा वकील काढून दिला. मोहिमेचे तूर्तदेत आहेत. शिप्रीस इंग्रज पलटणे आली. त्याजवर अंबूज इंगळे पाठविले. सिरोजेंतही इंग्रजांचा दाब पडला. महेश्वरीहून अहिल्याबाईंची अंबूजी इंगळे याचा बाप त्रिंबकजी इंगळे यास दीड हजार फौजेनिशी रवाना केले. मागाहून सदाशिव मल्हार बक्षी बाबांनी रवाना केले. बळवंतराव धोंडदेवही अंबूजीस सामील होण्याकरीता भेलशापुढे गेले. (फे. १७८१) महादजी २१/१/१७८१ रोजी लिहितो, अंतर्वेतून कुमक नामे इंग्रज सरदार पलटणे घेऊन ग्वालेर प्रातांत आला. त्याचे परिपत्यास फौज रवाना झाली आहे. बंगलपावेतो इंग्रजांस हाकून लावावे असा करत आहे. इंग्रजांशी सलूख करू नये. चहूंकडून तंबीच करावी. भोसले मोगलांनी कराराप्रमाणे मसलती कराव्या हे उचित होते. पण हा कलपर्यंत घडत नाही. इंग्रज सिरोंज भेलसे घेऊन भोपाळकरास सामील करून नर्मदा उतरणार हे बातमी ऐकतांच पाटिलबाबांनी लांब लांब मजलीने येऊन सिरांजवार गांठ घातली. दहा अकरा दिवस तोफांची गोळागोळी होऊन इंग्रज पळाला, (ता. ८/३/१७८१) ता. २८ एप्रिल रोजी कलकत्यास खबर आली की महादजींनी कॅम्मकचे पारिपत्य केले. ते चाळीस कोस मागे सरून सिप्रीवर आले. सिंद्याची चहूकडून घेरून रसद बंद केली. खबर ऐकून बडेसाहेब फिकीरमंद झाले. पंधरा

दिवस दरबार केला नाही. पाटीलबाबा चालून येतातसे ऐकून इंग्रजाने सुंरजेजवळ मुक्काम केला. महादजीने इंग्रजांची रसद तोडली.

ता. १/७/१७८१ रोजी सिप्रीनजीक एक शेवटची निकराची लढाई होऊन म्यूर पराभव पावला. गोहदकर राणा कर्नल म्यूर सुद्धा भारी जमाव घेऊन सिप्रीस आले. तेथून हजार बैल रसदेचे घेवून मागील प्रहर रात्री शेसईहून कोलारसास आले. राणेखातभाई, व इंगळ्यांची फौज व सदाशिव मल्हार ऐसे बातमी ठेवून एके बाजूने गोसावी बैरागी व दुसरे बाजूने फौजा, या अन्वये लगट करून इंग्रजांकडील ८० माणूस ठार व सवाशे जखमी केले तीस बंदुका व चाळीस बैल रसदेचे आणिले. पांच तुरूप स्वार ठार पडले. इकडीलही शंभर सवाशे माणूस ठार व जखमी मिळोन जाले. महंत दर्यागीर मातबर माणूस गोळ्या लागोन ठार जाला. मुडदा उचलू देईनात. त्यावर गोसाव्यांनी बेलशक चालून जाऊन दहापांच इंग्रजांस मारून प्रेत उचलून आणिले. पाटिलबाबांनी महंताची स्तुती फार केली. पाटीलबाबांचे मेहुणे तुळजा जाधव ठार झाले. अशा प्रकारे इंग्रज अगदी रडकुंडीस आले. तळेगांवचे स्मरण त्यात आहे. अंबुजी इंगळ्याबरोबर बळवंतराव धोंडदेव यांचे लोकांनी लढाईत फार चांगले काम केले. त्याने नेहमी आघाडीस राहून विलक्षण झड घातली. जुलई महिन्यांत उभयतांच्या छावण्या झाल्या. इंग्रजांची छावणी सिप्री कोलारसचे दरम्यान शेसईवर आणि महादजीची तेथून ईशान्येस बुढा पाहडावर म्हणजे काळी सिंध नदीवर रणोद व नारोद गांव आहेत त्या ठिकाणी झाली. ही सर्व ठिकाणे झोशीचे पश्चिमेस ५० मैलांचे आत आहेत[१७] याच प्रदेशात फौजांचे तळ असता म्यूर व महादजीचा सलूख जमला तो सालवाईचा प्रकार पुढे कळेल.

या वेळची युद्धपरिस्थिती २३/७/१७८१ चे पत्रांत नानास महादजी लिहितो, हल्ली इंग्रजांचे छातीवर छावणी सडे फौजेसह उगती केली. अलीकडे दहाबारा लढाया जाल्या, तरी लढाईत इंग्रजांवरील जरब बरीच बसत गेली. त्यांचे जे मुडदे पडले व जखमी जहाले. ते

लढाईतून टाकून मुक्कामावर माघारी गेले. आजपावेतो त्याजकडील पंधारा सोळाशें पायदळ, गोरे चाळीस पन्नास, तुरूपस्वार पन्नास साठ व चार पांच पलटणांचे सरदार ठार पडले. कंपेश दोन पलटणें कमी झाली. लोक बेजार झाले आहेत. कित्येक बंदुका टाकून पळून अंतर्वेदीत जातात. त्यांची रसद मारावयास सदाशिव मल्हार, गंगाधर गोविंद, शिवराम हरि झांशीकर वगैरे लाहरकडे पाठविले आहेत. सिकंदराकडे अंबूजची फौज गेली आहे. आम्ही चार पांच महिने सडे फौजेनिशी इंग्रजांचे लगत आहो. छावणीस मोर्गे न जाता, बरसातीत इंग्रजांचे भोंवते दक्षणी राहिले, तेव्हा बाजत बरसात इंग्रजांचे परिपत्य करतील. हे इकडील राजे रजवाडे वगैरे सर्वांस समजले. त्यावरून रंजफखान वगैरेंचे वकील आहेत.'[१८] नबाब भोसले यांचा सरकारांशी स्नेह असता त्यांनी भलताच प्रकार केला. विना बंगाला मारल्याशिवाय इंग्रजांची मलसत ठरली, तेव्हाच आम्ही सर्वांस सांगितले की, भोसल्यांचा व इंग्रजांचा दांडा भेंडा (-शेजारस्नेह) आहे. त्यांच्यानें इंग्रजांची मलसत होणार नाहीं. पुणेंकर व हैदरखान दोघांवरच मसलत पडेल. अद्यापि श्रीमंतांचे पायांशी आमची निष्ठा आहे, तर इंग्रजी पलटणांचे परिपत्य करून बंगल्यात ताण बसवावा हेच उमेद आहे. मसलत आम्हावरच आहे. यावर प्राण, मेहनत करणें आम्हांकडे, होणे जाणे श्रीमंतांचा प्रताप हैदरखानास वरचेवर पत्रे जाऊन कायम राखावा. माळव्यात इंग्रजांचे पाऊल मागे पडलें म्हणजे बंगाल्यापर्यंत मोकळे दगाबाज आहेत. सलोख्याचा संदर्भ लावतील त्याजवर जाऊ नये.

महादजी-इंग्रज हार्टले संघर्ष

रामचंद्र गणेश हा जुना सेनापती नानाने त्यास मुद्दाम घाईघाईने वसईत मदत घेऊन घाटांतून रवाना केले. हा परीभारे वसईत जाणार अशी बातमी आलयावरून इंग्रज ता. ८ डिसेंबर रोजी त्यास अडविण्यास टिटवाल्याचे वाटेने आला.'[१९] त्याच्याशी योगिणीच्या जवळ रामचंद्र गणेश व मुसा नारन यांनी ता. १०/१० डिसेंबर रोजी असा निकराच सामना केला की

हार्टलेची गाळण उडाली. हार्टले व रामचंद्र गणेश यांची वज्रयोगिणीची लढाई परमेश्वरील घटनेत गणता येईल. हार्टलेने मुख्य पाया कल्याण येथे ठेवून घाटांतून येणाऱ्या मराठी फौजेस वसईस जाऊ द्यावयाचे नाही असा संकल्प केला होता. आतापर्यंतच्या लढण्यात त्याचे पुष्कळ लोक जायां होऊन सहाशे जखमी बरोबर होते. खंडाळ्याहून खाली डोंगराच्या पायथ्याशीं खोपवली गांव असून तेथून उल्हास नदीच्या काठाने म्हणजे जवळजवळ हल्लींच्या आगगाडीच्या वाटेनेंच कर्जत, वांगणी करून बदलापुरास रस्ता येतो, तेथून वसईकडे जावयाचे म्हणजे मुख्य वाट कल्याणवरून जलमार्गाने होड्यांतून आहे.[२०] कल्याण हातचे गेल्यामुळे हा मार्ग मराठ्यांस बंद झाला. मुंबई कल्याणचा साष्टीचा सर्व प्रदेश खाड्या व खाजणें यांच्या योगाने पायी चालण्यास अशक्य आहे. कल्याणची खाडी बसइवर जाते, परंतु दहावीस हजार फौज होड्यातून लगोलग खाली नेणे शक्य नसू. कल्याण हातांत नसल्यामुळे जलमार्गाने वसईवर कुमक बिलकुल नेता येईना. म्हणून कल्याणच्या पूर्वबाजून बदलापुरावरून थेट उत्तरेस माहुली किल्ल्याचा आश्रय घेऊन तेथून पश्चिमेस वज्रेश्वरीच्या डोंगरावरून खाली कामणला येऊन तेथून वसईस जावयाचे. नगरकडून माहुलीवर वसईस जाण्याचा हल्ली सुद्धा हा मार्ग प्रचारांत आहे. वज्रेश्वरी उर्फ वज्रयोगिणीचे टेकाड सुप्रसिद्ध असून त्याचा आश्रय लढाऊ फौजांस चांगलाच होतो. त्यावरील देवीला वज्राबाई असे म्हणतात. रामचंद्र गणेशराव मुसा नारन माहुलीवरून वज्रयोगिणीकडे मोठ्या फौजेनिशी चाललेले ऐकून हार्टले त्यास अडविण्याच्या इराद्याने कल्याणहून ८ डिसेंबरला निघून टिटवाळ्यावरून दुगाड येथे आडवा आला. दुगाड हे वज्रेश्वरीच्या दक्षिण पायथ्याशी मोठे गांव आहे.[२१] जीव गेला तरी बेहत्तर, पण वसईत कुमक नेल्याशिवाय राहवयाचे नाही अशा निकराने रामचंद्र गणेशाने ता. १० रोजी हार्टलेवर हल्ला केला. त्यात त्या दिवशी १८ इंग्रज पडले पुनः ता. ११ रोजी तसाच हल्ला केला शंभर लोक पडून हार्टलेंचे फारच नुकसान झाले. तथापि तोफांच्या सामर्थ्याने एवढ्या मोठ्या फौजेशी दोन

दिवस चांगली टक्कर दिल्याबद्दल त्याने आपल्या लोकांची मोठी वाहवा केली पुनः ता. १२ रोजी आपणावर जर मराठ्यांचा हल्ला आला तर निभाव कठीण असे वाटून हार्टलेने आपल्या बचावाची सिद्धता ता. ११ च्या रात्री केली ती अशी की, त्याच्या तळाच्या दोन बाजूस दोन लहान टेकड्या होत्या. त्यावर एक लहानसा मातीचा उंच बांध करून त्यावर एक लहान तोफ ठेवून दिली. जेणेकरून कोणीकडूनही हल्ला आला तरी या तोफेने थोडाबहुत बचात व्हावा. ता. १२ रोजी सकाळी रामचंद्र गणेश हार्टलेच्या उजवीकडील टेकडी काबीज करण्याकरिता एक हजार स्वारांची तुकडी व मुसा नारनची आरबी पायदळाची एक तुकडी घेऊन गेला. त्या दिवशी सकाळी धुके इतके दाट पसरले होते की समोर कोणास काही दिसत नव्हते.'[२२] या धुक्याचा फायदा घेऊन रामचंद्र गणेश व नारन नऊ वाजण्याच्या सुमारास हार्टलेच्या तोफेनजिक येऊन दाखल होताच तोंच श्रीकृष्णाने सुदर्शन काढून घेतले त्याप्रमाणे दाट धुक्याचा तो विस्तृत पडदा वज्रयोगिणीने निमिषमात्रांत दूर सारिला, त्याबरोबर एकदम चक्क ऊन पडून इंग्रजी तोफेपुढे मराठे आयते सापडले; परंतु बिलकूल न डगमगता ते तसेच पुढे ती तोफ हस्तगत करण्यास धावले. इतक्यात तोफ सुटली तिचा गोळा लागून काही स्वार व खुद्द रामचंद्र गणेश एकदम ठार झाले आणि नारन जखमी झाला हे पाहून मराठे साफ कचरले; आणि रामचंद्र गणेशाचा मुर्दा व नारन यांस सोडवून घेऊन परत तळावर गेले. आदल्याच दिवशी म्हणजे ११ तारखेस वसई इंग्रजांचे हातात पडून पाच चार दिवसांत गाडर्डला हार्टलेची बातमी कळली नव्हती, म्हणून वसईचा ताबा घेऊन तो लगोलग वज्रेश्वरीस गेला; जवळच दुगाड येथे ता. १४ रोजी त्याची भेट झाली. मराठ्यांचा तळ माहुलीस होता. ता. १८ रोजी आर्नाला किल्ला इंग्रजांचे ताब्यात आला. तेव्हा मोहिमेचे पुढील स्वरूप साफ बदलले. काही अल्प काळात इंग्रज हावभरी होऊन पुण्यावर चाल करून येऊ लागले हार्टले मात्र लवकरच परत स्वदेशी गेला.'[२३] रामचंद्र गणेशाचे भरले म्हणावे, आणि रामचंद्र गणेश बळी पडला, वसई पुढे मराठ्यांचे हाती परत आली हा भाग

वेगळा, परंतु राष्ट्राचा खरा जोम संकटातलाच बरोबर अजमावता येतो, हे तत्व खरे असेल तर, रामचंद्र गणेशाच्या मृत्यूनेंच जो प्रचंड आवेश पुढे हरिपंत, परशुरामभाऊ व तुकोजी होळकर, पानशे, रास्ते वगैरे सर्वांच्या अंगी तत्काळ प्रगट झाला, तेणेकरून गॉडर्डसारखा जहांबाज सेनापती जेरीस येऊन नामुश्कीने वाटेल तसा तह जमवून बचावाच्या उद्योगास लागला. या दृष्टीने वज्रेश्वरीची ही चकमक मराठ्यांच्या इतिहासांत विशेष स्मरणीय मानिली पाहिजे.'[२४] रामचंद्र गणेशाने जगून जी कामगिरी केली नसती, ती वास्तविक त्याच्या मृत्यूने सिद्ध झाली.

रघुनाथराव दादा महादजी यांच्या कबजात :– हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकाऱ्यांनी मराठ्यांशी तह केला, तरी दादानें तो मान्य न करिता अगदी शेवटचा इलाज म्हणून त्याने आणखी एक पत्र ता. १८/१/१७८३ रोजी इंग्रजास, बादशहास पाठविले त्या पत्राचे मराठी रूपान्तर खाली देतो. दादास तर त्याचा उपयोग झाला नाहीच, परंतू मराठ्यांस जिंकण्याच्या तयाने दाखविलेल्या युक्त्यांचा हिंदुस्थानातील इंग्रज अधिकाऱ्यांनी पुढे कसा उपयोग करून घेतला, हे त्या पत्रावरून समजून येईल.

आपल्या ताब्यातील मुलुखापैकी या भागांत सुरक्षितपणे राहता येईल असे जाणून, सात वर्षापूर्वी मी सुरतेस आपल्या बादशाही छत्राचा आश्रय घेतला. इंग्रजांची फौज लढाई देण्यास लायक आहे हे मला कबूल आहे. पण मराठ्यांच्या सैन्याची व शत्रूला नामोहरम करण्याच्या मराठ्यांच्या युक्त्यांची इंग्रजी फौजेला माहिती नसल्याने, इंग्रजी फौजेत तितका कमीपणा आहे. जरूर त्या युद्ध विषयक सूचना मी इंग्रजी फौजेस दिल्या होत्या. पण इंग्रजी सेनापतींनी माझ्या सूचनांकडेस अगदीस दुर्लक्ष केले. इंग्रज सेनापतीचे हे उद्दाम वर्तन विचारात न घेता बादशाहींनी माझ्या मदतीसाठी भरपूर दारूगोळ्यासह तोफखाना आणि दहा हजार पायदळ माझ्या हुकमतींत आणि सेनापतीने माझ्या सल्याने चालावे अशी त्यास ताकीद द्यावी. याशिवाय जो खर्च होईल त्याची व्यवस्था पाहण्यास दोन चार विश्वासू माणसेही पाठवावीत. या

माणसांचा खर्चही मी देईन. नंतर मी आपले घोडदळ सिद्ध करून ताबडतोब थोडक्या खर्चात लढाईची तयारी करीन. बादशहाच्या फौजेचा आजपर्यंत आणि यापुढीलही होईल तो खर्च मी देईन. मात्र रकमेसाठी विशेष तगादा न लावितां जरूर तो अवधि आणि फुरसत मला मिळावी.

इकडे तह पुरा होतांच इंग्रजांनी दादास सुरतेहून निघून जाण्यास सांगितले, आणि नाना महादजींनी त्याची पुढील व्यवस्था लाविली. दादा हस्तगत होण्यापूर्वी तह कायम झाल्यास, फिरून तो काय खूळ उठवील याचा नेम नव्हता. शिवाय महादजीचे ताब्यात दादा गेल्यास ते दोघे पूनः शिरजोर होऊन पूणेकरांस नमवितील, सबब प्रथम दादास इंग्रजांकडून आपल्या कबजांत घ्यावे या संबंधाने नानाने महादजीस अट्टाहासपूर्वक वारंवार कळविले. परंतू शेवटी दादाने आपण होऊनच हरिपंताचे स्वाधीन होण्याचे ठरविले तेव्हा स. १७८३ च्या जून महिन्यांत ही ब्याद मिटली.

महादजीचे इंग्रजांना पत्र

दादासाहेबांस आपल्याजवळ आणावे, त्यास सुरतवाल्यांनी अटकाव करू नये, म्हणून पाटीलबावांनी इष्टिनास पत्रे लिहिली होती, त्यास इष्टिनाने सुरतवाल्यास हुकूम पाठविला की दादासाहेबांस पाटीलबावांकडे सुखरूप येऊन देणे ती पत्रे व पाटीलबावांनी आपला कारकून केसो अनंत यास दादासाहेबांकडे पाठविले. शिवाय पूर्वी अंतस्थ बोलणे चालले होते, की वसुली दहा लक्ष रूपयांचा सरंजाम अगर नक्त घेउन दादांनी स्नानसंध्या करून गंगातीरी बसावे, बाजीरावांस पुण्यास श्रीमंत माधवरावांजवळ पाठवावे. पाटीलबावांनी आज्ञा केली, की दादासाहेब देशी जात असल्यास उत्तम आहे. लवकर जाणे होय ते करावे, नाही तर राजकारणें लागली आहेत. रामजी पाटलाचेंही बोलणे की दादा देशी आल्यास पाटीलबावांस संतोष आहे. यास्तव हरिपंत, होळकर, रास्ते व पांडुरंगराव यांस पाठवावयाचे केले.

(ता.१६/६/१७८३)

स. १७८३ च्या फेब्रुवारीत सालबाईचा तह पुरा झाल्यावर दादासाहेबांकडून शिष्य पुण्यास येऊन करारांत आलें की, हरिपंत, तुकोजी होळकर, रास्ते व पांडुरंगराव पटवर्धन यांस कोंडाई बारीस पाठवून द्यावे, म्हणजे आपण येऊन दाखल होतो. हे वर्तमान वाचून पाटीलबावा संतोषी जाले. परंतु अंतर्यामी काय दुःख जाले असेल ईश्वर जाणे, तह झाल्यापासून चार महिन्यांचे आंत दादाने आपला राहण्याचा निश्चय करावा असे ठरले होते. त्याचप्रमाणेस. १७८३ च्या मार्च अखेरीस इंग्रज खर्चास देत होते, ते आंता देत नाहीत, त्यामुळे दादासाहेबांची राजकारणे चोहोंकडे चालू लागली. टिपू, नबाब, भोसले वगैरेकडे कारकून रवाना केले. इंग्रजांनी स्वाधीन करावे असे करारांतच आहे. पाटीलबावाचे स्वाधीन झाल्यास ते सरकारात देतील, परंतु इंग्रजांची अटक नाही, पाच सात कोस जातात येतात असे आहे. मध्येच निघोन गेले तर इंग्रज म्हणतील आम्ही काय करावे; आणि तह तर जाला, मुद्दा हातचा गेला असे होईल, असे सुरतेचे पत्र नानास २५/४/८३ चे आले. दादासंबंधाने नाना महादजींचा पत्रव्यवहार तिखट झाला, पण त्यास आता त्राण राहिले नव्हते, आणि बरीच उपरतिही झाली. एक लेखक सांगतो, नाना व हरिपंत यांचे गुण अखंड वर्णन करितात. आमचे दौलतींत असले कारभारी होते, म्हणून त्यांनी राज्य रक्षिलें. '[२५] उभयतांचे नांव निघाले की त्यास बरेच म्हणतात. सखारामपंत, अबाजी महादेव व चिंतो विठ्ठल यांस दोष ठेवतात.

सालबाईचा तह पुरा झाल्यावर सुरतेस दादासाहेबांना इंग्रजांनी खर्चास देण्याचे नाकारले, आणि पुणे दरबारांशी कसा तरी समेट करून आपले राज्यात जाऊन राहण्याचा सल्ला दिला, तेव्हा निरूपायाने इंग्रजास सोडून जाणे दादास भाग पडले. महादजी शिंदे त्यास बोलावीत होता, परंतु एकदा तिकडे गेल्यावर मुलाबाळांचा सुद्धा पुण्याकडील पेशवाईचा संदर्भ तुटेल, अशा अनेक कारणांस्तव गोदातीरीं राहण्याचे त्याने ठरविले. नानानेंही त्यास तशी पत्रे लिहून आश्वासन दिले. त्यावरच विसंबून न राहता हरिपंत, तुकोजी होळकर व परशुराम भाऊ

यांजपासून पृथक् पृथक् इमानपत्रे व बेलभंडार घेऊन दादा सुरत सोडून निघाला.

महादजीचे दिल्ली दरबारातील प्रमुख अधिकारी

उत्तर हिंदुस्थानातल्या दीर्घकालीन वास्तव्यामुळे महादजी पुण्याला परत जाण्याकरिता अतिशय उत्सुक बनला होता. नाना फडणीस आणि महादजी यांच्यात अनेक कारणांवरून मतभेद निर्माण झाले होते. काही मतभेद धोरणावरून निर्माण झाले होते. महादजीने प्रत्येक वेळी नाना फडणीसाशी दीर्घ पत्रव्यवहार केला होता. परंतु असे अनेक प्रश्न होते की जे पत्रव्यवहारामुळे सुटण्यासारखे नव्हते. याशिवाय तुकोजी होळकर, अलिबहादूर आणि महादजी यांच्यात उत्तर हिंदुस्थानात गंभीर मतभेद निर्माण झाले आणि याबाबतीत आपली बाजू मांडणे आवश्यक आहे असे महादजीस वाटत होते. या सर्व कारणांकरिता पुण्याला येऊन नानाची आणि पेशव्यांची प्रत्यक्ष भेट घेण्याची इच्छा महादजीने प्रकट केली. महादजी पुण्यास येणार तो कोणत्या कारणाकरीता याबद्दल अनेक तर्क-वितर्क व्यक्त करण्यात येऊ लागले. माहदजीला इंग्राजांच्या विरूद्ध आघाडी निर्माण करावयाची आहे असे बोलले जाऊ लागले. काही लोकांनी महादजी निजामाला शासन करण्याकरिता दक्षिण हिंदुस्थानात येत आहे असे मत व्यक्त केले तर नाना फडणीसाच्या मनात महादजीला पुण्याची गादी हिसकावून घ्यावयाची आहे असा विकल्प निर्माण झाला. महादजी फौज घेऊन पुण्याला येणार आणि पुण्याचा कारभार आपल्या हाती घेणार अशा प्रकारच्या अफवा सर्वत्र निर्माण झाल्या. महादजीने उत्तर हिंदुस्थानात स्वतंत्र राज्य निर्माण केले. दिल्लीच्या मोगल बादशहाचा एक प्रमुख कारभारी म्हणून त्याने अमाप द्रव्य संपादन केले. या द्रव्यामध्ये मराठा सरकारला यथायोग्य हिस्सा मिळाला पाहिजे असे नाना फडणीसाला आणि अन्य मराठा सरदारांना वाटत होत. महादजींची भूमिका या प्रश्नावर अगदी वेगळी होती. आपल्या उत्तर हिंदुस्थानातल्या सर्व स्वाऱ्यांमध्ये आपल्या खिशातूनच फार मोठा खर्च करावा लागला तो खर्च पुण्याच्या मराठा सरकारने द्यावा असे

महादजीला वाटत होते. हे स्पष्टीकरण देण्याकरिता पुण्याला प्रत्यक्ष येणे आवश्यक होते. पुण्याला कष्टाने अलिबहादूरास साडेतीन लाख रूपये कर्जाऊ म्हणून दिले. हे कर्ज मिळाल्यानंतर अलिबहादूरच्या जीवनाची एकूण शोकांतिकाच झाली. याला कारणीभूत तो स्वतःच होता. महादजी शिंद्यांना विरोध करण्याचे धोरण त्याने स्विकारले नसते तर त्याच्यावर ही परिस्थिती आली नसती. बुंदेलखंडात त्याने अनेक वर्षेपर्यंत पैसा आणि मुलूख हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या प्रयत्नात त्याला यश लाभले नाही. शेवटी बांदा या लहान ठिकाणी त्याने एक जहागीर मिळविण्यात यश मिळविले. १८०२ मध्ये त्याने कालिंजर किल्ल्याला वेढा दिला आणि त्या मोहिमेतच तो ठार मारल्या गेला.

महादजीच्या आगमनाचे तर्क-वितर्क

रामचंद्र शहीराचा खर्ड्याच्या लढाईवर रचलेला एक जुना पोवाडा आहे त्याच्या आरंभी, हिंदुस्थान गुजरात सोडून शिंदा दक्खनेत आला! हुकूम केला बादशहाने त्याला हे ध्रुपद आहे, त्यावरून महादजीच्या पुण्यास येण्याची गर्जना दक्षिणेंत कशी उठली, याची कल्पना होते; आणि अद्यपि प्रसंगानुरोधाने त्याचे प्रतिबिंब इकडे पडत असले जणू काय महादजींचे येणे म्हणजे एक निरंतरचे गूढच आहे. परंतु येथपावेतो घडलेल्या व्यवहारांचे जे वर्णन दिले आहे, त्यावरून हे गुढ निरसन पावले असेलच या संबंधात लोकांच्या समजाचा एक मोठा विरोध व्यक्त होतो. पुणे ही मराठेशाहीची राजधानी, त्या ठिकाणी सर्व लहान मोठ्या सरदारांनी सालोसाल अगर सवडीप्रमाणे येऊन मालकापुढे आपल्या कामाची झडती द्यावी, आणि पुढील उपक्रम ठरवून घ्यावे, असा प्रधात पूर्वापार रूढ झालेला होता. महादजीस पुणे सोडून बारा वर्षे झाली, एवढ्या अवधीत बाल पेशवा मोठा होऊन कामकाज पाहण्यालायक झाला, तेव्हा महादजी म्हणे, मीच काय असा अपराध केला की, एवढ्या अवधींत मला धन्याच्या पायांचे दर्शन घडू नये.'[२६] महादजी पुण्यास आला नाही तर तो तिकडे स्वतंत्र होऊ पाहत आहे, आणि

आला तर तो सर्वास गुंडाळून ठेवून आपणच सर्व सत्ता बळकावणार असा हा दुहेरी पेच त्यावेळी लोक चर्चेत उपस्थित झाला होता. या पेचाचे निरसन सहज होणारे असून, कोणी काही निदान ठरविले तरी त्याबद्दल एवढे मोठे गूढ वाटण्याचे आता कारण नाही. उत्तरेंतील अव्यवस्थेने व भांडाभांडीने महादजीस अगदी जीव नकोसा झाला होता, नाना महादजी या दोन भिन्न वृत्तींच्या व्यक्ती प्रत्येक व्यवहार दोहोंकडे ताणू लागल्याने सर्वत्र अनवस्था प्रसंग प्राप्त झाला. त्याचा निकाल लावण्यासाठी तो पुण्यास आला. मात्र हा त्याचा हेतू फारसा सफल झाला नाही. आणि कारभारातील अनवस्था वाढत जाऊन बाजीरावाच्या वेळेस तिचा कळस झाला, हा प्रकार स्पष्ट आहे.

तारीख १२ जून स. १७९२ पासून ता. १२ फेब्रुवारी १७९४ पर्यंत वीस महिने महादजीचा पुणें येथील मुक्कामाचा कार्यभाग सांगावयाचा. तीन वर्षापूर्वी अलीबहादरास सर्व व्यवस्था सोपून महजादजीचा विचार दक्षिणेत जाण्याचा होता. तो नानास कळला. तेव्हा नानाने अलीबहादरास लिहिले, तुम्ही ही जोखीम अंगावर घेऊ नये. त्यानंतर उत्तरेतील भानगडी आपल्याच्याने उरकत नाहीत, तुमचा कारभार तुम्ही सांभाळा, असे खुद्द पेशव्यास कळविण्यासाठी महादजीने पुण्यास येण्याचा विचार नानास पुष्कळदा कळविला. त्यावर नानाने लिहिले की, तुमच्याशिवाय दुसऱ्याचे हातून तिकडची व्यवस्था उरकणार नाही; इतकेंही असून तुम्ही आग्रहाने याल, तर या दौलतेवर ईश्वराचा क्षोभ झाला असेंच समजावे लागेल. इतके लिहिल्यावरही स. १७९२ च्या फेब्रुवारीत महादजी उज्जैन सोडून निघल्याची व पुढे बऱ्हाणपुरास दाखल झाल्याची बातमी नानास पोंचली.

टिपूशी तह ठरवीत होते. कॅप्टन लिटलची तीन पायदळ पलटणे, व तोफखाना साह्यास असल्यामुळे परशुरामभाऊने बेदनूपर्यंतचा प्रदेश कसा हां हां म्हणता जिंकिला, त्याची हकीकत नानास कळून त्यानें भाऊ व हरिपंत यांस लिहिलें की, लिटलची पलटणे परत पाठवू नयेत

कॉर्नवालिसला सांगून ती लगोलग पुण्यास पाठवावीं आपण त्यांचा खर्च देऊ ही पलटणे आपल्याजवळ हुकमी असल्याने मोठा उपयोग आहे हे पत्र आल्यावर हरिपंताने कॉर्नवालिसकडे पलटणे मागितली. ती मुंबईस जायचींच होती, तर काही दिवस पुण्यास राहून मग पुढे जातील. असे त्याने सुचविले. फौजेच्या अशा मागण्या कॉर्नवालिसकडे अनेक राजवाड्यांकडून येऊ लागल्या होत्या.[२७] तेव्हा कोणास हो म्हणावे व कोणास नाही म्हणावे, याची पंचाईत पडून, शिवाय त्यामुळे निष्कारण वैर उपस्थित होणार.

महादजी शिंदे व सवाई माधवराव

पेशव्याबद्दल निष्ठा व्यक्त करणें महादजीला आवश्यक वाटत होते. (१) उत्तर हिंदुस्थानात आपण संपत्ती गोळा केलेली नाही हे सिद्ध करण्याकरिता (२) उत्तर हिंदुस्थानांतील स्वाऱ्यात जो खर्च आला तो खर्च पुण्याच्या मराठा सरकारने द्यावा याची मागणी करण्याकरिता (३) अलिबहादूर आणि तुकोजी होळकर यांच्यातील भांडणे मिटवावीत याची विनंती करण्याकरिता महादजीने पुण्याला येण्याचा निर्णय घेतला. महादजी-शिंदे यांच्या मनात मराठा साम्राज्याचे खरे हित व्हावे हीच एक भावना सतत तेवत होती, त्यामुळे सहाजिकच आपल्या आगमनाबाबत अशा प्रकारचा संशय निर्माण व्हावा याचे महादजी शिंदे यांना फार दुःख झाले. वास्तविक मराठा सरदारांनी पुण्याला येणें ही एक नेहमीचीच गोष्ट होती. परंतु त्याबद्दल एवढे मोठे वादळ निर्माण होणे ही एक आश्चर्यकारक बाब होती. परंतु ह्यावेळी अजिबात विचलित न होता महादजीने ठरविल्याप्रमाणे दिल्लीवरून पुण्याकडे कूच केले. (फेब्रुवारी १७९२) आपल्याबद्दल संशय नको म्हणून महादजीने आपले बरेचसे सैन्य बऱ्हाणपूरवरून उत्तरेस परत पाठविले. दक्षिणेतल्या घडामोडी आपल्याला कळाव्यात म्हणून महादजीने बाळाराव गोविंद याची नेमणूक केली होती तो आता टोके या ठिकाणी महादजींस भेटण्यास आला त्याने पुण्यामध्ये महादजीविरूद्ध कसे प्रतिकूल वातावरण निर्माण झाले आहे याची सविस्तर माहिती दिली. बीड या ठिकाणी

महादजीने आपल्या मुसलमान गुरूची भेट घेतली. तिथून तो तुळजापूर या ठिकाणी महादजीने आपल्या कुलस्वामिनी देवीची पूजा केल्यानंतर त्याने जामगांव या ठिकाणी आपला मुक्काम ठेवला. अशा रितीने पुण्याला येतानांच त्याने जाणूनबुजून चार महिने लावले. या कालावधीत वेगवेगळ्या सरदारांना भेटून त्याने आपल्याबद्दलचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. अशा रितीने तो पुण्याला १२ जून १७९२ रोजी येऊन पोहोचला. वाटेत येतांना त्याने रघुजी भोसले, निजाम अली, पुण्याचा ब्रिटिश वकील जनरल मॅलेट यांच्या गाठीभेटी घेतल्या. आणि त्यांच्याशी त्याने प्रचलित राजकारणावर दीर्घकाळ चर्चा केली.

महादजी शिंदेची नानास समज व पुण्यातील परिस्थिती

आपल्या आगमनामुळे नाना फडणीस इतका अस्वस्थ होईल याची महादजी शिंद्यांना अजिबात कल्पना नव्हती. महादजी आपल्या हातून सत्ता हिसकावून घेणार अशीच भिती नाना फडणीसाला वाटत होती. घाबरलेल्या नानाने कॉर्नवॉलिसने पुण्याला काही ब्रिटिश सैन्य पाठवून द्यावे अशीही विनंती करून ठेवली होती. महादजीने यादवी युद्ध भडकविल्यास ब्रिटिश सैन्याची मदत असावी हाच यामागील नानाचा हेतू होता. नाना फडणीसांने आपला पाडाव करण्याकरीता म्हणून इंग्रजांची मदत बोलवावी याचे महादजीला अतिशय दुःख झाले. म्हणून महादजीने नाना फडणीसांची खास भेट घेवून इंग्रजांची मदत घेण्यात सध्या मराठा राज्याला किती धोका आहे. हे मुद्दामहून नानास समजावून सांगितले. पुण्यातील मुत्सद्यांना ब्रिटिशांची कुटनीती कळत नव्हती हाच याचा अर्थ होता.

इंग्रजांचा स्वभाव ओळखून आणि इंग्रजांची दूरवची उद्दिष्टे जाणून महादजी सिद्यांना मराठा सरकार सामर्थ्यशाली बनवावयाचे होते. या दृष्टीने १८ वर्षाच्या नवीन पेशव्याला सवाईमाधवरावाला कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले जात आहे या मध्ये महादजीला आस्था वाटणे सहाजिकच होते. दुर्दैवाने नाना फडणीसाने ह्या बाबतीत महादजीस विशेष सहकार्य

दिले नाही. त्यामुळे महादजीच्या वास्तव्याचा मराठा सरकारला खऱ्या अर्थाने फायदा घेता आला नाही. पुण्याच्या राज्यकारभारावर नाना फडणीसाच्या स्वभावाचा सखोल परिणाम झालेला होता. कोणत्याही परिस्थितीत नाना आपल्या हातून सत्ता जावू देण्यास तयार नव्हता. या करिता नानाने सवाई माधवरावावर आपली पकड पक्की ठेवलेली होती. परंतु त्याच्या जाचक शिस्तीचा सवाई माधवरावावर विपरित परिणाम होत होता. या मुळे सवाई माधवराव आणि नाना फडणीस यांच्यात एक प्रकारे शित युद्धाला प्रारंभ झाला. सप्टेंबर १७९१ मध्ये वाशोराम कोतवालाचे प्रकरण निर्माण झाले. त्यात सवई माधवरावाने ज्या वेळी स्वतः लक्ष घातले त्यावेळीच सवाई माधवराव आपल्या त्रंताने चालणार नाही. यांची नाना फडणीसाला खात्री पटली.

महाराजाधिराज महादजी शिंदे व पुण्यातील पेशवाई पुढील पेच

अशा रितीने मुक्काम करीत करीत जून महिन्यात महादजी शिंदे पुण्यात येवून पोहचला वानवडीला त्यसाने आपले वास्तव्य ठेवले. वानवडी पासून इंग्रजांची लष्करी छावणी जवळच होती. १३ जून रोजी पेशव्याने शिंद्यांचे समारंभपूर्वक स्वागत केले आणि गणेशखिंडीला दोघांच्या स्नेहपूर्ण वातावरणात भेटी घडवून आल्या.[२८] सवाई माधवरावाने यापूर्वी महादजी शिंद्यांची कधीच भेट घेतलेली नव्हती किंवा त्याला कधीच पाहिलेही नव्हते. १७७९ मध्ये तळेगावला इंग्रजांनी शरणागती घेतली त्यावेळी सवाई माधवराव उपस्थित होता. परंतु त्यावेळी तो पाच वर्षाचा असल्याने महादजीची भेट त्याला आठवणे शक्य नव्हते. परंतु आता वयाच्या अठराव्या वर्षी त्याची आणि महादजींची भेट घडून आली. ही भेट पेशव्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरली. महादजी शिंद्यांनी दुसरे दिवशी स्वतः जाऊन पेशव्यांची भेट घेतली. यावेळी सवाई माधवराव महादजींच्या व्यक्तिमत्वामुळे एवढा प्रभावित झाला की त्याने आपल्या गळ्यातील कंठ्याचा हार महादजीस भेट म्हणून दिला. यानंतर दिनांक १४ ला सुद्धा महादजी पेशव्यांच्या

भेटीस पुन्हा आला त्यावेळी मोगल बादशहाकडून आणलेली महाराजाधिराज ही पदवी त्याने पेशव्यास देऊन स्वतःस राजाधिराज असे म्हणवून घेतले. सर्व मराठ्यांचे प्रमुख छत्रपती असतांना पंतप्रधान महाराजाधिराज कसा होईल आणि त्या पंधप्रधानाचा एक सरदार राजाधिराज असे स्वतःस कसे म्हणवून घेऊ शकेल अशा नाना प्रकारच्या शंका नाना फडणीसाने निर्माण केल्या. त्यावेळी महादजीने छत्रपती कडून अशा पदव्या घेण्यासंबंधीची परवानगी ताबडतोब मिळविली आणि नाना फडणीसांवर एक प्रकारे मात केली.

नानाच्या मनात महादजीच्या निष्ठेबद्दल प्रारंभीपासूनच शंका होती. महादजीची या बाबतीत परीक्षा घेतलीच पाहिजे असे नानाचे मत होते. सवाई माधवरावाच्या उपस्थितीत मराठ्यांचा मोठा दरबार भरविल्यास आणि त्या दरबारात प्रत्येक मराठा सरदाराला एकनिष्ठतेची शपथ घ्यावयास लावल्यास महादजीची परिक्षा आपोआपच होऊन जाईल असे नानास वाटत होते. कारण महादजीच्या मनात नवीन पेशव्याबद्दल निष्ठा नसल्यास तो शपथ घेण्याकरीता मागेपुढे पहिल असे नानास वाटत होते. परंतु प्रत्यक्षात नानाचे सर्व अंदाज चुकले. दरबारात प्रवेश केल्यानंतर महादजी शिंद्यांनी सर्व अधिकाऱ्यांच्या सर्वात मागील रांगेत उभे राहाणे पसंत केले. सवाई माधवराव दरबारात आल्यानंतर त्याने सवाई माधवरावाच्या पायातील पादत्राणे काढून आपल्या शीरावर धारण केली. महादजीच्या ह्या कृत्यामुळे दरबारातील सर्व वातावरण बदलून गेले. महादजीने जाहीरपणे नवीन पेशव्यांबाबत निष्ठा आणि आदर व्यक्त केल्यामुळे आनंदाची एकच लाट निर्माण झाली.

दुसरे दिवशी महादजीने समारंभपूर्वक दिल्लीच्या मोगल बादशहाने पाठविलेली सर्व पत्रे सवाई माधवरावाच्या स्वाधीन केली. यानंतर एकमेकांना मोठमोठे नजराणे आणि बक्षीसे देण्यात आली. अशा रितीने महादजीने आपल्या निष्कपट वर्तनाने सर्वांसच जिंकून घेतले.

या समारंभानंतर महादजी आणि सवाई माधवराव यांच्यात वारंवार भेटीगाठी होऊ

लागल्या. यावेळी महादजीने पेशव्याला कूटनीतीने आणि लढाईचे शिक्षण देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पेशवा आणि महादजी यांच्यात पूर्ण सामंजस्य निर्माण झाले. महादजीचे राजकारण, इंग्रजांची कुटनीती महादजीची निष्ठा इत्यादी गोष्टी समजावून घेण्यात पेशव्यांना हा काळ फलदायी ठरला. याचवेळी नाना फडणीस आणि महादजी यांच्यात खऱ्या अर्थाने एकोपा निर्माण झाला असता तर मराठ्यांचा इतिहास निश्चित वेगळा झाला असता. परंतु तसे व्हावयाचे नव्हते.

महादजी आणि निरनिराळे मंत्री यांच्यातील वैमनस्य

सवाई माधवराव आणि महादजी शिंदे यांच्यातील संघटन दिवसेंदिवस दृढ होत आहे याची कल्पना नाना फडणीसास आली. सत्ता- लोलुप नानाला ही गोष्ट आवडली नाही. अस्वस्थ नानाने राजकारणातून निवृत्त होऊन बनारसला जाण्याची इच्छा दर्शविली. महादजी आणि नाना फडणीस यांच्यात पहिल्या दोन महिन्यात जे प्रेम आणि सौहार्द निर्माण झाले होते ते आता हळूहळू ओसरत गेले. याचे कारण म्हणजे महादजी शिंदे यांनी पुणे दरबारचा कारभार सुधारण्याचा प्रयत्न केला आणि त्यामुळे नाना फडणीसास तो राज्यकारभारातील हस्तक्षेप वाटू लागला. महादजीने राज्यकारभार आपल्याकडे सोपवून द्यावा आणि त्यात कोणतीही ढवळाढवळ करू नये असे नानाचे पक्के मत होते. तर महादजीला नाना आणि त्याच्या साहाय्यानी निरनिराळ्या लोकांवर जे अन्याय केले होते ते उघड्या डोळ्यांनी पाहवत नव्हते. म्हणूनच महादजीने पुण्याला कारभार सुधारण्याचा प्रयत्न केला. नानो अरेरावी राज्यकारभार करावा ही गोष्ट महादजीस सर्वस्वी अमान्य होती. या सर्व प्रकरणांमध्ये सचिवाचे जे प्रकरण निर्माण झाले ते अत्यंत महत्वाचे समजले पाहिजे. जूलै १७९१ मध्ये रघुनाथ शंकराजी याचे नि धन झाल्यानंतर त्याचा मुलगा शंकराजी सचिव म्हणून गादीवर आला परंतु शंकराजीच्या सावत्र आईने शंकराजीवर त्याला आपला कारभार नीट पाहता येत नाही असे अनेक खोटेनाटे

आरोप केले. या भांडणात सावत्र आईचा विजय झाला आणि नाना फडणींसाकडून बाजी मोरेश्वर या कारभाऱ्याची नेमणूक करण्यात तिने यश मिळविले. या सर्व प्रकरणात बाजी मोरेश्वराने शंकराजीला नाना प्रकारचा उपद्रव दिला. बाजी मोरेश्वराच्या अत्याचाराविरूद्ध अनेकदा हरिपंत फडक्यांनी नाना फडणीसाकडे तक्रार केली आणि बाजी मोरेश्वर यास पुण्यास परत बोलवावे अशी मागणी केली. परंतु नाना फडणीसाने या सर्व मागण्याकडे जाणून–बुजून दुर्लक्ष केले. महादजी पुण्याला आल्यानंतर त्याला चौकशी करविली. या चौकशीत बाजी मोरेश्वराने शंकराजीच्या खुनाचा कट केलेला आहे हे उघड झाले आणि म्हणून नाना फडणीसास बाजी मोरेश्वरास तुरूंगात टाकणे भाग पडले. अशा रितीने अनेक प्रकरणात स्वतः लक्ष घालून महादजीने अनेकांवरील अन्याय दूर केले. परंतु त्यामुळे दरबारातील तंत्री, नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांच्यातील संबंध मात्र दिवसेंदिवस बिघडत गेले. महादजीने त्याची पर्वा केली नाही.

पुण्याच्या प्रस्तुतच्या परिस्थितीत ही पलटण तेथे पाठविणे कॉर्नवालिसने बिलकूल मंजूर केले नाही. ॲबरक्रांबीला त्यांची अत्यंत जरूर आहे असे सांगून, ती त्याने परभारेंच लगोलग मलबारातंतू मुंबईस पाठविली.[२१] पुण्यास ती जाती तर कदाचित् महादजीच्या विरूद्ध त्यास लढावे लागून अनिष्ठ परिणाम घडून येण्याचा संभव होता, असा कॉर्नवालिसच्या लिहिण्यात मतलब आहे.

महादर्जीनी इंग्रजांचा डाव उधळला

पुण्याचा कारभार दुरूस्त करावयाचा म्हणजे त्याची नवीन घडी बसवावयाची हा महादजीचा पुण्यास येण्याचा मुख्य हेतू होता. इंग्रजांचे पारडे जर होत चालले, मराठ्यांची सार्वभौम सत्ता ते हिसकावून घेऊ लागले, पाहिजे त्या सत्ताधिशास ते धमकावू लागले, अशाने मराठ्यांचे राज्य आता लयास जाणार, याचा बंदोबस्त प्रथम झाला पाहिजे. नाना तर सस्वी त्यांच्या

कक्षेत गेला, यास उपाय म्हणजे आपण एकजूट उत्पन्न करून इंग्रजांचा प्रतिकार करावा, हा इरादा सारखा मनात बाळगून महादजी नर्मदानदी उतरला. टिप, नागपूरकर भोसले व निजाम असे एकत्र झाल्यास इंग्रजांचा डाव हाणून पाडता येईल, पूर्वी नाना फडणीसाने हाच डाव एकदा खेळविला होता. हल्ली तोच डाव महादजीने मनात आणिला. त्यासाठी इकडे येतांना प्रथम तो स्वतःच नागपुरास जाणार होता. परंतु शिंद्यांची स्वारी आपल्या मुलखात न यावी म्हणून रघूजी भोसल्याने आपला वकील व्यंकटराव काशी यास नर्मदेवर महादजीच्या भेटीस पाठविले, आणि त्यास कळविले की, आम्ही काळी आपल्या बाहेर नाही, आपण जाऊन पेशव्यांची समजूत घाला म्हणजे सर्व गोष्टी सिद्ध होतील ही गोष्ट महादजीस पटून तो नागपुरास न जाता पुण्यास आला. निजामाशी त्याने बाळाराव गोविंदाच्या मार्फत संधान ठेविलेंच होते.'[३०] या उपक्रमाची जाणीव कॉनवालीस व मॅलेट यांस भरपूर असून त्यांच्या इंग्रजी लेखात या विषयाचे उठलेले प्रतिबिंब राजकारणाच्या दृष्टीने आपण लक्षात ठेवले पाहिजे.

स. १७९२ च्या उन्हाळ्यात महादजी शिंदे लढाऊ फौजेनिशी दक्षिणेंत येऊन थडकला, तेव्हा एकंदर महाराष्ट्रात लोकांची मोठी चलबिचल उडाली. लहानमोठे सरदार चपापून गेले आणि आता पुढे काय प्रकार घडतो यासंबंधाने ते निरनिराळे तर्क-वितर्क करू लागले. महादजीच्या बरोबर उलटणे असल्याने दक्षिणेत गडबड उडाली व नानाने फौज जमविण्याचे सुरू केले. पाटीलबावांनी आजपर्यंत पुणे दरबारांशी संबंध न ठेवितां हिंदुस्थानात मुलूख आणि दौलत संपादन केली आणि प्रचंड फौज उभारली, यामुळे ते आता जोरावर व गर्विष्ठ होऊन पुणे येथे आपले वर्चस्व स्थापन करण्यात येत आहेत, असा त्या वेळी इकडे समज होऊन, आता मराठी राज्यांत कोणत्या उलाढाली होतात, हे पाहण्याकडे लोकांचे डोळे लागले. पुण्याचे ब्राम्हण मुत्सद्दी हिंदुस्थानच्या या प्रचंड व्याघ्राच्या तडाक्यांतून आपला कसा बचाव करतात, याविषयी प्रत्येक दरबारांत वाघाघाटी होऊ लागल्या. यासंबंधात खरे लिहितात, पूर्वी ज्याप्रमाणे

पेशव्यांनी छत्रपतीस हीनबल करून आपले वर्चस्व स्थापिले, त्याचप्रमाणे आता पेशव्यांसही स्वस्थ घरी बसवून मराठी राज्याचा सर्व अधिकार आपल्या हातात घ्यावयाचे सिंद्याच्या मनांत आहे असे नानास वाटे.'[३१] मराठी राष्ट्राची सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती असावी हे नानांच्या राजनीतीचे मुख्य तत्व होते, त्यास शिंदे आड येतील तर होळकर, भोसले, पटवर्धन, रास्ते वगैरेंचा एकोपा करून व निजामलीशीं सख्य करून सिंद्यांचा नक्ष मोडावा, असा नानाचा बेत होता. पुढे शिंदे फौज घेऊन निघाले असे ऐकून नानांनी इंग्रजांची लिटलची तीन पटणे टिपूचे युद्धांत होती ती पुण्यास आपल्या मदतीस मागितली ती त्यांनी दिली नाहीत, पण आपल्या फौजेचा संशय घेऊन इंग्रजाचे सैन्य हे आणणार असे ऐकताच, महादजीने आपल्या सारी फौज बरोबर पुण्यास न आणतां, अगदी थोडे लोक आणिले. सिंदे पुण्यास कां आले याविषयी लोक निरनिराळे तर्क करीत होते. कोणी म्हणत, यांच्या मनात निजामअलीचे राज्य घ्यावेसे आहे, कोणी म्हणत होळकर व अली बहादर यांस पेशव्यांनी दक्षिणेंत परत आणण्याची खटपट करण्याकरिता ते आले. इंग्रजास वाटले, आपले पुण्याच्या दरबारी वजन पडत चालले आहे ते नाहीसें करण्याचा अभिप्राय आहे. नागपूरकर भोसल्यांचा बखरकार म्हणतो की, नाना फडणीसास पेशवाईचे कारभारातून काढण्यासाठी मशीरूमुल्काने खटपट करून महादजीस पुण्यास आणिले.'[३१] दक्षिणेतील ही गडबड ऐकून लष्करी जोरावर पुण्याची सत्ता बळकावण्याचा महादजीचा उद्देश नसल्यामुळे त्याने बऱ्हाणपुरावरूनच पुष्कळशी पलटणे आणखी परत पाठविली.

महादजीस बीड परगणा निजामाकडून बहाल

महादजीनने हिंदुस्थानातून येतांना निजामापासून दहा लाखांचा बीड परगणा घेण्याविषयी बादशहाचा हुकूम बरोबर आणिला होता, परंतु नानाने महादजीस कळविले की, हल्ली हरिपंत श्रीरंगपट्टणवर मोहीमशीर आहेत, ते येन दाखल होईपर्यंत आपण निजामावर चालून जाण्याचे करू नये. प्रथम पुण्यास यावे,'[३२] आपली आमची भेट झाल्यावर पुढील विचार ठरवूं महादजीची

बीड परगण्याची इच्छा अतृप्त राहिली, ती खर्ड्याच्या तहांत नानानें पुरी करून घेतली.

गेल्या आठ दहा वर्षातील व्यवहारांची जी चर्चा मागे झाली आहे, तिजवरून महादजी पुण्यास कां आला या संबंधाने संशय बाळगण्याचे कारण राहत नाही. मध्यवर्ती राज्यकारभार व्यवस्थित चालत नाही, तर पुण्यास येऊन धन्यास जाब विचारणार, हे त्याचे उद्गार अनेकवार प्रगट झाले आहेत. अलीबहादर व तुकोजी होळकर उघड उघड राज्यनाश करितात, तर यांस आळा घालणारा कोणी आहे की नाही आपला धनी तरूण पेशवा आता धनीपणा गाजविणार, की राज्याची अधोगती होत चाललेली स्वस्थ पाहत बसणार, याची परीक्षा पाहण्यासाठी महादजी पुण्यास आला.

ता. १ ऑक्टोंबर १७९० रोजी तो रामजी पाटलास लिहितो अलीबहादरांनी गोसावी यास आपले जवळ ठेवून घेतला येबिशीचे वर्तमान जाहलें ते दोन चार वेळ बाळाजीपंत नानास लिहून पाठविले. त्यांची उत्तरे आली त्यावरून आम्ही गोसावी प्रकरणी नानास लिहिणे अगर अलीबहादरांसी बोलणेंच सोडून दिले. त्याजवर होळकर मध्ये जाबसालांत येऊन अलीबहादरांस दरमहा सत्याहत्तर हजार खर्चास देण्याचे ठरविले. कार्तिकाचे महिन्यांत येक रोजमऱ्याचा ऐवज द्यावा, व अलीबहादरांनी गोसावी अरूणचे किल्ल्यांत पाठवून द्यावा आणि आपण जयपुरचे मसलीवर जावे. या प्रमाणे करार होऊन सावकाराकडून त्यास ऐवज देविला. पण गोसाव्यास अरूणेस लावून देणे व जयपुराकडे जाणे हे रूपये घेतल्यावर त्यांचे गावीच नाही. स्वस्थ बसले. आम्ही कार्तिक वद्य पक्षी सूर्यपर्वास गंगास्नानास गेलो तेथे वर्तमान आलें की, सहारणपुराकडे गुलाम कादिराची आई व भाऊ भंभोखान व सीख ऐसे एक होऊन हंगामा केला. त्यास त्याचे तोंडावर बाळोजी इंगळे होते त्यांचे कुमकेस चार हजार फौज पाठवावयाविसी अलीबहादरास सांगोन पाठविले असतां फौज पाठविली नाही. रूपये घ्यावे, पण फौज पाठवूं नये असे यांचे ध्यान पाहिलें, तेंव्हा खर्चासही आम्हांकडून पावलें नाही.[३३] त्याजवर माघमासीं (फेब्रु. १७९०)

अलीबहादरांनी दादा जोशी यास बाबाराव गोविंदाकडे पाठवून बोलणे लाविलें की, गोसाव्याकरितां काकांचे (महादजीचे) *चितांत संशय येऊ आम्हाविशी राग आहे. त्यास आम्हांकडून सर्व प्रकारे चुक घडली, ती माफ करावी, गोसाव्यास आम्ही स्वाधीन करतो. तो स्वाधीन केल्यावर आम्हावरील लोभ करावा. आजपर्यंत जें जाहले ते जाहलें. या उपरी काकांसी दुसरा विचार कदापी करणार नाही, येविशीं खातरजमा शपथपूर्वक करीन, पुढे सांगतील ती चाकरी करीन, खर्चाचा बंदोबस्त करून द्यावा हे बाबारावांनी येऊन आम्हास सांगितले त्यास तुम्हांसी बोलतात याप्रमाणे पक्केपणे अंमलात येऊन पुढे सुरळीत वर्तणून करितासें जात्यास इकडून दुसरा विचार होणार नाही. याप्रमाणे त्यास आम्ही सांगितल्यावर अलीबहादर प्रातःकाळी एकटेच येऊन बाबारावाचे विद्यमाने सदरहूप्रमाणे बोलून श्रीमंताचे पायांची शपथ केली. आम्हापासून खातरजमा केली. आम्हास व तुम्हास दैव श्रीमंतांचे पाय, यांची शपथ तुम्ही मागितली. त्यावरून आम्ही खातरजमा केली, त्याप्रमाणे तुम्हांकडून वर्तणुकेत आल्यास आम्हांकडून दुसरी गोष्ट होणार नाही. इकडून तीच शपथ असे. याप्रमाणे परस्परे शपथपुरस्सर बोलण्यात आले. गोसावी यास महिन्या दोन महिन्यात आपले स्वाधीन करतां. प्रत्यक्ष धरून द्यावा तरी लौकिकात ठिक दिसत नाही. तो आमचे डेऱ्यात आहे, त्यास तेथून युक्तीने लांडे लटकें बोलून काढून दुसरे जांगा ठेवितो. आंतून त्यास विश्वास पडावयाकरितां खातरजमा व बंदोबस्त त्यास न समजे असा करून ठेवितों. आम्हांकडील लोकांस सांगून जाईन. कोणी बोलणार नाहीत. आपण आपले लोक पाठवून गोसाव्यास घेऊन जावा. चित्तास येईल ते करावे. या बोलीस दोन महिण्यांचा कारभार, त्यास आठ महिने होऊन गेले. श्रीमंताचे पायांची शपथ केली असतां हा प्रकार, तेंव्हा यांचा विश्वास तो काय? इस्माल्या व जोधपुरवाले एकत्र आले. त्यांजवर कंपू रवाना केला, त्या समयी फौज पाठवावी म्हणोन अलीबहादरांस सांगितले. खर्चास दोन लाख मागू लागले.*[३४] *त्यास बोलल्याप्रमाणे गोसावी स्वाधीन झाल्यावर मग*

खर्चास देऊ, ते जाहल्याशिवाय खर्चास मिळणार नाही, असे बोलण्यांत पहिलेंच आले आहे त्याप्रमाणे तुम्हांकडून अंमलात यावे, म्हणजे खर्चास पावेल. तथापि मसलत रूबकार त्या अर्थी तूर्त एक रोजमरा सत्याहत्तर हजार देवितों. फौज पाठवावी. ते दोन लाख मांगों लागले. निदान लाख द्यावयाचे कबूल केले, तरी फौज न पाठविली. बळवंतराव सदाशिव यास दोन हजार देऊन रवाना केले, पैकी हजार बाराशें लढाई सुरू असतां जाऊन पोंचले लांब मजला करून आले, सबब मुक्कामावर लावून दिले. तिसरे प्रहरीं लढाई जाली. लढाईचे पुर्वी, स्पष्टपणे चौघांत बोलण्यास कोणाची हरकत. पुण्यात हा प्रकार लोकचर्चेत घरोघर कळूं लागला. अगोदरच महादजी बलवान् सरदार, त्यातून त्यास फौजेचा पाठिंबा, मग तक्रारींस काय तोटा! भराभर वाटेल तितक्या फिर्यादी महादजीकडे येऊ लागल्या. तुकडोजी होळकरास मुद्दाम तुम्ही माझ्याविरूद्ध उठविलेत, असा स्पष्ट आरोप महादजीनें कारभाऱ्यांवर केला, तेंव्हा त्याचा इनकार करतां करतां कारभाऱ्यास पुरेवाट झाली. कॉम्प्टन म्हणतो, डी बॉयनला पदरीं बाळगून महादजीनें कवाईती कंपी बनविले, त्यास तोड म्हणून नानानें तुकोजीला तशी पलटणें बनविण्याची सूचना केली. त्यावरून त्याने ड्यूड्रनेकला आणून तही योजना अंमलात आणिली. अर्थात् या गोष्टीनें महादजीला चीड आली तसे बिलकूल नाही. सर्व मराठी फौजा अशा तयार होतील तर त्या महादजीला इष्टच होत्या. महादजीला चीड येण्याचे मुख्य कारण असें की, तिकडे होळकरांची कवाईती पलटणें तयसार होत असतां, त्याचवेळी इकडे पुण्यास महादजी विरूद्ध चंड गुप्त कारस्थाने कारभाऱ्यांची सुरू झाली, ती अनावर होण्यापूर्वीच नाहीशी करावी, अशा हेतूनें महादजी फौज घेऊन पुण्यास आला. हिंदुस्थानातला त्याचा उद्योग त्यावेळी पुरा झाला नव्हता. तरी ते काम अर्धवट टाकून त्यास पुण्यास येणे भाग पडले. कारण मराठीशाहींत प्रमुखपणा मिळण्याची महादजीस मोठी हांव असून, उत्तरेंत मिळविलेले पुढारपण पुण्याच्या कारभारातही संपादावें याकरिता तो दक्षिणेंत आला आणि तेथे आल्यावर कारभाऱ्यांच्या

कारस्थानांस होळकरांचा पाठिंबा आहे असे दिसून आल्यावर महादजीच्या अंगाचा तीळपापड झाला. हीच त्याची वृत्ती पुण्याच्या वाटाघाटीत त्याने अंगी बाणली होती.

पूणे दरबारात महादजींचा सत्कार

बाळाजी गोविंद ता. ८ फेब्रु. १७९२ रोजी नगराहून लिहितो, *यजमानसाहेबांनी स्वारी दरमजल देशास आली सबब आम्ही पेडगावींहून निघून टोक्यास आलों. श्रीमंतांनी शु. नवमीस उतरतीरी उतारा लाविला होता, तेथे आम्ही भेटीचा लाभ घेतला. उतरून दक्षिणतीरास आलों. भेट जाल्यापासून दो वर्षांचे वियोगाची बोलणी आजपर्यंत होतच आहेत.*[३५] *मातुःश्री बाईसाहेब दशमीस प्रसुत होऊन पुत्र जाला, पण पेडगांवींहून पत्र आले की, त्यांस देवाज्ञा जाली. अनुचित गोष्ट.*

फेब्रुवारीचे आरंभी महादजीस गोदावरीवर पैठणजवळ आला. तेथे बाळाजी गोविंद व इतर मंडळी भेटली. त्यांजकडून आपल्या आगमनानें अस्वस्थता माजल्यांचे वर्तमान कळून त्यास मोठा अचंबा वाटला. त्यावेळी टिपूवरील युद्ध मिटलें नव्हते. हरिपंत व परशुरामभाऊ श्रीरंगपट्टणावर होते. अर्थात् पुणयास नानाचा थरकाप उडाला व लोक कसे घाबरून गेले हे ऐकून सिंद्याने आपला पहिला थेट, पुण्यास येण्याचा रोख साफ बदलला. वास्तविक नानानें आपण होऊन किंवा हस्तकांस पाठवून महादजीस सत्कारानें लगेच पुण्यास आणलें असते तर पुढील अनेक भानगडी आपोआप मिटून राजकारणास निराळे वळण लागले असते. पण नानानें एवढे औदार्य दाखविले नाही, उलट पुण्यास आपली फौज जमविण्याची घाई केली, तेंव्हा हरिपंत वगैरे दाखल झाल्यावरच मग आपण पुण्यास जावें असा विचार महादजीने ठरवून चांगले चार महिने त्याने उगाच बाहेर काढिले.

बीड येथे महादजीचा गुरू मन्सुरशहा म्हणून होता, त्याची भेट महादजीनें एक आठवडाभर स्वस्थपणें घेतली. जवळच वाशी येथे जाऊन त्याने आपल्या बहिणीचा सत्कार घेतला.[३६] ही

बहीण कल्याणराव कावडे याची स्त्री. तेथून तो तुळजापुरास देवीच्या दर्शनास गेला. वाटेत पार नांदूर येथे त्याची स्त्री मृत्यू पावली. (१६एप्रिल). बरेच दिवस आजारी होती म्हणून दोन आठवडे गुंता पडला. ता. १२ मे रोजी तुळजापुरास पावले. भोपे पुजारी याची कन्या पसंत करून तिच्याशी लग्न केले. समारंभ आटपल्यावर जांबगावास आले. तेथे काही दिवस मुक्काम करून जूनचे १२ तारखेस महादजी पुण्यास पोंचला. त्यापूर्वीच हरिपंत फडके तेथे आला होता. आपल्यामुळे कोणासही उपसर्ग होऊ नये किंवा गैरसमज पसरू नये अशी शक्य ती काळजी महादजीने घेतले.

नाना फडणीस गोविंदराव काळ्यास लिहितो, पाटीलबाबा जांबगावाहून पुण्यानजीक खडकीच्या पुलावर येऊन मुक्काम केला.[३७] *नवमीसह दशमीचे सायंकाळचे पांच घटका दिवस राहतां श्रीमंमतांचे दर्शन घ्यावयाचा मुहूर्त निश्चयांत आला. इकडून श्रीमंत गणेशखिंडीपावेतों सामोरे गेले. तिकडून पाटीलबाबा सरदारांसह आले. इकडील मुत्सद्दी व सरदार मंडळीच्या व त्यांच्या भेटी जाल्या. नंतर पाटीलबबा ये१न श्रीमंतांचे पायांवर डोई ठेवन भेटले. श्रीमंतांनी आपले गळ्यातील मोत्यांची माळ पाटीलबाबांचे गळ्यात घातली. येणेप्रमाणे समारंभाने भेट बहुत चांगली जाली.*

यानंतर आषाढ शु. ३ शुक्रवार (२२ जून) रोजी वकीलमुतकीचा दरबार झाला. त्यापुर्वी ता. १४ जून रोजी सिंदे सरकारवाड्यांत येऊन मीरबक्षीगिरीचा बहुमान घेऊन आलो आहे, तो घ्यावा म्हणून विनंती केली. त्यावरून घेण्याचा निश्चय करून गारपिरावर डेरे देऊन जागा तयार करून सातारचे महाराजांस विनंतीपत्र लिहून तेथून आज्ञा आलियावर बहुमान घेतले. थोरल्या डेऱ्यांत बैठक करून मसनंद घालून त्याजवर पोषाख व मोर्चेल ठेविले. अगोदर सिंदे तेथे जाऊन तयारी केल्यानंतर श्रीमंतांची स्वारी प्रहर दिवस सायंकाळचा रहतांना निघाने तेथे गेले. समागमें सरदार व मुत्सद्दी झाडून गेले. सर्वास चोपदार बोलावूं पाठवून नेलें. तेथे गेल्यावर

स्वारी अंबारीतून उतरून आंत गेली. समागमें मुत्सद्दी व कारभारी गेले. श्रीमंत एक घटकाभर उभेच होते. प्रथम पातशाही फर्मान मस्तकी वंदून मुनशीजवळ दिला. त्यांनी भर दरबारांत वाचला. सर्वांनी श्रवण केला. त्यात मतलग की, गुलाब कादिराने बेअदबी केली त्याचा सिंदे यांनी बंदोबस्त केला, याकरिता हे पद पुस्तदरपुस्त दिले असे, नंतर श्रीमंत बिचव्यांत जाऊन पोषाख करून बाहेर आले. सिंदे व ह रिपंत एकेक मोर्चेल वारीत होते. नंतर मसनदीजवळ कुर्निसात करून अंतरावर बसले. नंतर बादशाही फर्मान दोन, एक बहुमानाचें व दुसरे गोवधबंदीचे अशी पारसनीसांनी वाचली, त्यांत महाराजाधिराज राव पंडित प्रधान सवाई माधवराव बहादुर येणेप्रमाणे किताब व बहुमान दिला. श्रीमंतांनी १०१ मोहोर पातशहास नजर ठेविली. पाटीलबाबांनी श्रीमंतास ५१ मोहोरा नजर डेऱ्यांतच केली. तोफाबंदुकांच्या सिलका जाल्या. त्याजवर नालकींत बसून स्वारी थोरल्या रस्त्याने दोन घटका रात्रीस वाड्यांत आली. समागमें शिंदे आले. चार घटकापर्यंत कुरनिशा व मुबारिकीच्या नजरा जाल्या. प्रथम नानांनी, तात्यांनी केल्या. मराठे मंडळी मात्र कोणी नजरा करावयास आले नाहीत. नजरा जाल्यानंतर मग पातशहांनी श्रीमंतांस पद दिले, त्याच्या मुतलकीची वस्त्रे व राजे महाराज माधवराव शिंदे मदारूलमहा हा किताब श्रीमंतांनी सिंद्यास दिला. नालकी सिंद्यांनी दुसरी आणिली होती, ती दिली. तींत बसून आपल्या डेऱ्यास गेले. येणेंप्रमाणे समारंभ चांगला झाला. हे वर्तमान वाचून गोविंदराव काळ्यांने संतोषाने पत्रोत्तर लिहिले, त्यात तो नानास म्हणतो आपण व पाटीलबाबांनी आदब बजाविली, आपले व पाटीलबाबांचे कारकिर्दीत या गोष्टी भारी जाल्या. किर्तीचे ध्वज जाले हे आपल्यास व पाटीलबाबांस मुबारक असो.'[३८] यावेळी परशुरामभाऊ तासगांवास आजारी होता. पण त्याने ही आपली खुशी परम आनंदाने व्यक्त केली. समारंभ बहुत चांगला झाला या मोठ्या गोष्टी आहेत. आजपावेतो राज्यांत कोठेंही व्यंग पडले नाही. पुढे दिवसेंदिवस श्रीमंतही थोर झाले. पाटीबाबांनी निष्ठेस योग्य ते केलें. दुसऱ्यांकडून व्हावयाचेश नाही.

पाटीलांप्रमाणे निष्ठा कोणाचीही पाहिली नाही. वर्णन कोठवर ल्याहावी. श्रीमंतांचा प्रताप थत्तेर! महादजीचा हा बडेजाव नानाला मात्र आवडला नाही. इतर सर्वांना मोठी खुषी झाली.

महादजी शिंदे मानमरातब बादशहाकडून प्रधानपंताकरितां घेऊन पुण्यास आल्यावर आषाढ शु. ३ स. (ता. २२ जून १७९२) फरमान रूजू करण्याचा निश्चय केला. ते समयीं बाळाजी जनार्दन व हरिपंत फडके यांनी त्यांस बहुत प्रकारे सांगितले की, तेथेंन आणलें हे सर्व महाराजांकडे पाठवावें, आपण महाराजांचे सेवक प्रधान, पातशाही वजिरीचें मोर्चेल धरणें, महाराज म्हणवणे यांत अमर्यादा होते. तथापि सिंदे यांनी आग्रह धरिला. महाराजांस पत्रे लिहिलीं आणि तेथून उत्तर आणविलें ते माधवराव पंडित प्रधानांचे नांवचे इ. सं. पे. द. पृ. ७४ वर नमूद आहे की, स्वामी तुम्हांवर कृपाळू होऊन हुजरून करार करून देऊनं हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी पदांची खिलत व मरातब तुम्ही घेणे (ता. २१ जून १७९२). एतदनुसार गारपीर येथे डेरे देऊन त्यांत पातशाही मसनद करून त्याजवर सर्व बहुमान ठेवून सर्वांनी नजरा करून उभे राहून फर्मान वाचलें. वस्त्रें बहुमान घेऊन नालकींत बसोन पुण्यात चिराकदान करून वाड्यांत आले. सिंदे व हरिपंत यांनी प्रधानांवर मोर्चेले धरली. वाड्यांत आल्यावर नालकी, पालखी, वस्त्रें, शिक्के व मरातब आणले होते ते सिंदे यास देऊन बहुमान केला. नजरा करोन नालकींत बसोन डेऱ्यास गेले. बहुमानांची यादी सुप्रसिद्ध आहे. यानंतर पुनः एकदा सिंदे यांचे आग्रहावरून प्रधानपंत नालकीत बसोन पर्वतीस गेले. उपरांत दसऱ्यास मात्र या मरतबांची पूजा करावी ऐसें करून ठेवून दिले. सिंद्याचा मुक्काम पुण्यास असतां श्रावणांत ता. ९ ऑगस्ट १७९२ रोजी त्यांने आपल्या डेऱ्यांत पेशव्यास मेजवानी केली व त्यानंतर ता. १२ ऑगस्ट १७९२ व ३० ऑगस्ट १७९३ रोजी गोकुळअष्टमीचे उत्सवानिमित्त व १३ मार्च १७९३ रोजी रंगानिमित्त पेशवा सिंद्याच्या भेटीस गेल्याचा उल्लेख रोजनिशींत आहे.

महादजीची पेशव्यावर छाप

महादजी पुण्यास आला तेंव्हा पेशव्याच्या वयास एकोणीस वर्ष पुरी झाली होती. या वयाच्या मानाने त्याची राज्यकारभाराची लायकी तितक्याच वयाच्या बाजीराव नानासाहेबाइतकी किंवा थोरल्या माधवरावाइतकी तर नव्हतीच आणि अपघातानें अकाली मृत्यू झाला नसता तर तो विशेष कर्तृत्ववान निघाला असता असे म्हणण्यास आधार नाही. त्याचा स्वभाव हट्टी, एकलकोंडा बनत चालला होता.[३९] अंगी जबाबदारीची जाणीव उत्पन्न होत असल्याचा पुरावा नाही. महादजी येण्यापूर्वीच घाशीराम कोतवालांचे प्रकरण उद्भवून त्यांत ब्राम्हणांच्या आग्रहास्तव पेशव्यांने लक्ष घालून कोतवालास गुन्हेगारीची शिक्षा फर्माविली. पण एवढ्यावरून नाना फडणीसाच्या कारभारातले दोष त्यास उमजू लागले होते असे म्हणवत नाही. थोरल्या माधवरावाने तर अल्पवयांत स्वतःचे तेज चांगलेच प्रगट केले होते. घाशीरामाचा शेवट ता. ३१ ऑगस्ट १७९१ ला घडला आणि त्यानंतर दहा महिन्यांनी महादजी पुण्यास येऊन पेशव्याला त्याचा समागम घडू लागला. त्यापुढील वर्ष दोन वर्षात महादजीने पेशव्याला आपल्या पदाची व जबाबदरीची जाणीव उत्पन्न करण्यात पराकाष्ठा केली. अलीबहाद्दर, होळकर इत्यादींची प्रकरणे महादजीने भर दरबारांत धडाडीने मांडून त्यास न्याय मागितला. भीडमुर्वत बिलकूल ठेविली नाही. सचिवांचे प्रकरण चव्हाठ्यावर आणून पेशव्याला भावी कारभारातला उत्कृष्ट धडा शिकविला. पण स्वतः कारभारांत झटून लक्ष घालण्याची वृत्ती पेशव्यांने स्वीकारली नाही. ता. ११ मे १७९२ ची म्हणजे महादजी पुण्यास आला त्यापूर्वी एक महिन्याची पुढील नोंद उपलब्ध आहे. श्रीमंतांनी वैशाख व ५ शुक्रवारी माजघरावरील नव्या दिवाणखान्यात बसावयास मुहूर्त प्रारंभ केला. ते दिवशी थोरल्या महालांच्या झडत्यांवर आपण मखलासी करू लागले. संगमनेर येथील झडतीवर मखलासी केली. जवळ महादजीपंत गुरूर्जींनी असावे, रोज पाहत जावी, असा पाठ घातला. मुहूर्त केला ते समयीं बाळ जोशी मालगुंडकर यांस चारेश यपयांचा गाव इनाम दिला. वास्तविक कारभाराचा हा आरंभ पूर्व परिपाठानुसार यापूर्वीच कैक वर्षे

व्हावयास पाहिजे होता. आतां महादजी येऊन जाब विचारील या धास्तीने तो या वेळी केला कीं काय असा संयश येतो. यापूर्वी महादजी पेशव्यांची भेट स. १७७९ त झाली तेंव्हा तो अवघा पांच वर्षांचा होता. पटवर्धन मंळी, तुकोजी होळकर इत्यादींचा समागम त्यास पुष्कळ घडला. पहिले समारंभ आटोपतांच महादजीनें पेशव्याला नवीन दिशा दाखविण्याची सुरूवात केली. पूर्वीपासूनच मर्जी खूप ठेवण्यास तो झटत होता. नातू लिहितात, महादजीचा पुण्यास येण्याचा हेतु येथील दरबारात आपले वर्चस्व स्थापन करण्याचा होता ही गोष्टा नानादि ब्राम्हण मुत्सद्यांचे लक्षात आली होती. पाटीलबाबांचे मनांतून तरूण व होतकरू पेशव्यास नानाच्या कडक सासुरवासापासून सोडवून मोकळा करावा व त्याचे मन आपलेविषयी अनुकूल करावे असे होते. म्हणून त्यांनी दरबारात वरचेवर जाणे येणे ठेवून पेशव्यांशी मोकळ्या मनानें गोष्टी सांगाव्या, नजरा द्याव्या, समारंभ करावे, आणि त्यांच्या मनोरंजनार्थ मेंढ्यांच्या टकरा, मल्लांच्या कुस्त्या, हरणाच्या शिकारी वगैरे वारंवार करून, त्या जात्या तरतरीत व वयपरत्वे स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या पेशव्यांचे मन ह्या करमणुकींकडे सहज वळविलें. त्यांचे मन पाटीलबाबांकडे विशेष लागलेले पाहून नानासारख्या संशयी पुरूषाचे मनांत सिद्यांबद्दल स्पर्धा उत्पन्न झाली. तरी पेशव्याकडून नानाची अमर्यादा झाली नाही व त्याची नानाबद्दलची कृतज्ञताबुद्धी ढळली नाही. कारभार आपल्याकडे देण्याबद्दल महादजींने पेशव्याकडे गोष्ट काढिली, पण त्यांनी तिकडे फारसें लक्ष दिलें नाही. परंतु पाटीलबाबा व पेशवे यांच्या स्नेहाचे लक्षण जास्त दिसू लागताच नानाच्या मनांत विकल्प येऊन त्याने पेशव्यांवर सक्त देखरेख सुरू केले व उघडे दरबार कमी केले.

महादजीने पेशव्यास शिकारीचा नाद आहे हे ऐकून हिंदुस्थानांतून दोन उत्कृष्ट गेंडे त्याजकरितां पाठविले अशा दुसऱ्या चिजा तो वारंवार पेशव्यास पाठवित असे.[४०] पुण्यास आल्यावर महादजींचे व त्यांचे संघटण लगोलग वाढले. शिकारीच्या नादाने महादजी त्यास

वारंवार स्वतः शिकारीस नेऊ लागला. दररोज दोघांची भाषणे व खलबतं होऊन महादजीने पूर्वेतिहासाची व प्रस्तुतच्या घडामोडींची माहिती पेशव्यास स्वतः करून दिली. महादजी आल्याबरोबर बादशहाने दिलेल्या पदव्या स्विकारण्याचा जो अपूर्व समारंभ पुण्यास झाला, त्याने व पुढील सालच्या रंगाच्या समारंभाने महादजींच्या कर्तबगारीचा ठसा पेशव्याच्या मनावर उमटला, आणि अगदी कारभारापेक्षा लष्करी जोराची जाणीव त्याच्या मनांत उत्पन्न झाली.

आजपर्यंतच्या पेशव्यांनी धनीपणाने वागून राज्याचा विस्तार केला ही मुख्य गोष्ट सवाई माधवरावास पटवून, त्यांच्या अंगी धनीपणा उत्पन्न करण्याचे बिकट काम महादजीनें केले. नारायणरावांच्या मृत्युपासून वीस वर्ष धनीपणा गाजविणारा पुरूष पेशव्यांच्या घरांत नसल्यामुळें कशी बेबंदशाही माजली, हे त्याने माधवरावास समजून दिले, घासीरामाचा बोजवारा, बाजी मोरेश्वर व सचिवांचे प्रकरण, इत्यादी कामांत नानाचे वर्चस्व ढासळले, पेशवा उघड उघड महादजींच्या तंत्राने वागू लागला. त्यामुळे नाना वगैरे करभाऱ्यांची मने अत्यंत अस्वस्थ झाली. त्यांनी काशीयात्रेस निघून जाण्याचा घाट घातला. परंतु महादजीनेंच नानाची समजूत घालून त्यास राहवून घेतले. नानाचे गुण महादजी ओळखून होता. त्याने कारभार सोडवासा असे महादजींचे म्हणणें नव्हते. फक्त सगळा करभार एकतंत्री न राहतां अनेकांच्या सल्ल्यांने उघड चर्चा होऊन चालावा. सर्वांची दाद लागावी, यजमानानें सर्वास समतेनें वागवावें, हीच महादजीची मागणी होती. दुर्दैवाने महादजी मरण पावला आणि त्याच्या पाठोपाठ हा तरूण पेशवाही दिवंगत झाला. तेणें करून मराठशाहीचे नष्टचर्य पूर्णपणे ओढवले. शिवाय पहिले औपचारिक समारंभ आटोपतांच महादजींने भर दरबारांत पेशव्यांमुळे आपली गाऱ्हाणी कारभाऱ्यांविरूद्ध मांडण्यास सुरूवात केली. जोरानें वादास तोंड लागले.

नबाब बाहेर निघाल्याने वर्तमान आल्यावर १६ एप्रिल १७९३ रोजी सिंदे श्रीमंतांकडे आले, खलबत जाले, नाना, तात्या, आपा बळवंत, रामजी पाटील, आबा चिटणीस येणेंप्रमाणे

होते. श्रीमंतांनी सिद्यांस विचारिलें, नबाब चालून येतात याचा विचार काय? त्यांनी उत्तर केले, मी सेवेंत हजर आहे, तो पावेतो स्वामींनी चिंता करू नये. यातील आशय श्रीमंतांपाशी आपण कारभार करावा. परंतु बोलणी निष्ठेंची होतात, त्यात दिक्कतीचा प्रकार नाही. हरिपंत त्तात्यास नानांनीं सिद्यांचे डेऱ्यास पाठविलें होते. बोलणे निखालस जाले. कोणेविशीं दिक्कत नाही असे होऊन समाधानानें माघारे आले (एप्रिल १७९३). उभयंता कारभारीयांचे व सिद्यांचे मनांत संशय आला होता, त्यात बोलणी होऊन निखालसता जाली. पुन्हा नाना व तात्या पाटीलबाबांचे मुक्कामी गेले होते. चार घटका खलबत होऊन खातरजमा जाली, यावरून स. १७९३ च्या १३ मार्च रोजी चैत्र शु. १ स. जो मोठा रंगाचा समारंभ सिंद्यानी केला त्या सुमारास सर्वांचि चित्तशुद्धि होऊन मुख्य भांडाभांडी मिटली असावी असे दिसते.

हरिपंत एकटाच एक दिवशी अवचित महादजीच्या भेटीस गेला, आणि पेशव्यांने आपल्याकडून नाना व सिंदे माझे उजवे डावे हात असें सांगून समजूत केली, म्हणून जे भरपूर उल्लेख ठिकठिकाणी आहेत, ते अक्षरशः खरे आहेत, आणि खुद्द पेशवा व हरिपंत या दोघांनी पुढाकार घेऊन भांडण तोडले, असे त्या वेळच्या कागदांतून निष्पन्न होते. महदजीची पेशव्यावर अढळ निष्ठा असून त्यास दुखविण्याजोगे कृत्य त्यासने काही एक केले नाही.'[४१] वरील उतारे पटवर्धनी दप्तरांतले असल्याने मधून मधून सिद्यांच्या वर्तनावर टीका आहे ती त्या बातमीदार लेखकाची असावी. सिद्यांच्या निष्ठेसंबंधाने आक्षेप घेण्याजोगा एकही उल्लेख पटवर्धनी कागदांत किंवा इतरत्र उपलब्ध नाही. हीच महादजीच्या निःस्वार्थ वर्तनाणी खूण होय. त्याचा कटाक्ष मुख्यतः नानाच्या कारभारावर होता. परंतु नानासारखा जागरूक व उरकदार कारभारी दुसरा मिळणें शक्य नाही हेही महादजी पूर्णपणे समजून होता. वर समेट झाला त्यांचे तात्पर्य एवढेंच दिसते की, राज्याच्या हिताच्या गोष्टी उभयंतांनी एकविचारें कराव्या. आषाढ व १ शके १७१५ ता. २४ जुलई १७९३ च्या गोविंदराव काळ्याचा लेख आहे. पाटीलबाबा सरकारवाड्यात दोन

वेळ व एक वेळ नानाचे येथे आले होते. तीन खलबते जाली. श्रीमंतांचे दैव थोर. नाना, तात्या, पाटीलबाबा तिघेही थोर समंजस, तिघांसही दौलतीची काळजी आहे, इत्यादि मजकूर लिहिलता तो कळला ईश्वराजवळ हेंच मागणे की, त्रिवर्गाची ऐक्यता असावी. त्यांतच दौलतीची शाबुदी, सन १७९३ च्या जूनपासून महादजीस ताप येऊ लागल्याचा उल्लेख असल्यानें, तदुत्तर त्याच्या हातून महत्वाचे काम झाले नाही.

महादजी पुण्यास आला त्या व पुढील साली दक्षिणेंत मोठा दुष्काळ पडला. प्रथम हैदराबादकडे आपत्ति सुरू होऊन पुढें ती पुण्याकडे आली. त्यांत महादजी बरीच मोठी फौज घेऊन पुण्यास येऊन बसल्याने दुष्काळांत भर पडली. स. १७९३ च्या उन्हाळ्यांत नदींचे पाणी नासून पुण्यास महामारीचा उपद्रव झाला. सारांश, त्या वेळी दैवी मानवी आपत्ति महाराष्ट्रावर कोसळून पुढील जिवनाशकाल सुचवूं लागल्या. पेशव्यांची बायको रमाबाई इला बहुत दिवस समाधान नव्हतें. तीन चार महिने ताप येत होता, परंतु कळूंच दिलें नाही. पुढें नानास कळल्यावर उपाय होऊ लागले. गुण न येतां माघ व ४ ता. ३१ जानेवारी १७९३ रोजी माहेरी थत्ते यांचे घरी देवाज्ञा जाली. लगेच एक महिन्याने फाल्गुन व ५, ३ मार्च रोजी दुसरे लग्न जालें. नांव यशोदाबाई, जियदुर्गचे गोखले यांजकडील, समारंभ फार चांगला जाला. इंद्रसंपत्तिवाचून अन्य उपमा द्यावी से नाही.'[४२] नाना व सिंदे दोघांनी लग्नात चांगला पुढाकार घेतला, या लग्नाचेच समयीं त्यांची चित्तशुद्धी चालू जाली.

त्याच वेळी निजामअलीनें पेशव्याबद्दल प्रेम दाखवून आपण पुण्यास लग्नास येणार पत्रे पाठविली. त्यापूर्वीच लग्न होऊन गेलेंले असल्यामुळे निजामानें पेशव्यास लिहिले, तुम्ही आणखी एक बायको करा, मी लग्नास येतो, असा देखावा चालविला. विठ्ठलराव गोर्की (घोटके?) म्हणून पुण्यास पोर्तुगीझांचा वकील होता, त्याने ता. २४ एप्रिल १७९३ चे पत्रांत गोव्यास हकिकत लिहून कळविली त्यांतील गाषवारा, पेशव्यांची बायको मरण पावल्याचे

वर्तमान ऐकूण निजामअलीने पुण्यास असे लिहून पाठविलें की, पहिल्या लग्नास आम्ही स्वतः हजर रहावे अशी फार इच्छा होती, पण कित्येक विघ्ने उत्पन्न झाल्यामुळे आम्हांस येता आले नाही, पुत्रास पाठविलें. पण ते येऊन दाखल होण्यापूर्वीच लग्नसोहळा उरकून गेला. तरी आता पुनः लग्न होई, त्यास आम्ही अवश्य येणार, आम्हींच येऊन लग्न लावूं, हे पत्र दाखल झाले त्यापूर्वी तीन दिवस दुसरे लग्नही होऊन गेले होते. यास्तव पेशव्योंने तसा जबाब पाठविला. तेंव्हा निजामलींने पुनः असे कळविले की, आमची एवढी इच्छा अपुरी राहिली, तर त्यासाठी आता तिसरे लग्न पंढरपुरास करा, आम्ही तेथे येऊन लग्नाची सिद्धता करितो. आम्ही आता वृद्ध झालों, एकवार आपणास डोळ्यांनी पाहवें असा फार हेतु आहे, हे पत्र पुढे पाठवून आपण स. १७९३ च्या एप्रिलांत निजामली हैद्राबाद सोडून फौजेसह निगाला आणि बेदरास आला. निजामास मागणीस पेशव्यांने जबाब पाठविला की, लग्न होऊन गेले, आता पुन्हा तिसरी बायको करण्याची आमची इच्छा नाही.'[४३] शिवाय हल्ली दुष्काळामुळे मुलखांत अतिशय महर्गता असून आपण फौजबंद आल्यास उगाच हाल होतील, तरी तूर्त आमचे भेटीस येण्याचा बेत रहित करावा. असे लिहून पेशव्यांने डेरेदाखल होऊन आपल्या फौजा जमविण्याची तयार चालविली. एव्हांपासूनच उभयतांची मने एकमेंकावर बरीच चिडून गेली होती असा तर्क यावरून होतो. पण महादजीचं ह्यातीत हा प्रसंग हातघाईवर आला नाही. महादजीच्या ह्यातीत पुण्याकडे वाकड्यां नजरेने पाहण्याची कोणाची छाती नव्हती.

शिंदे, होळकर वैमनस्य व लाखेरीत होळकरांचा संहार

शिंदे होळकरांचे वैमनस्य हेंच मराठ्यांच्या राज्यनाशाचे मुख्य कारण असून ते सारखें वाढतच चालले होते. महादजीला उत्तरेच्या कारभारांत विरोध होऊन त्याला संताप आला. पुण्यात नाना फडणीसांने त्याचा इलाज केला नाही. महादजी पुणयास आला, मागे तुकोजी उत्तरेत राहिला. तेथे इरादा केला की, सिंद्याचा पाडाव करण्याचा हा समय आहे. अशा

समयाची तयारी तुकोजी, अहिल्याबाई वगैरेंनी वर्ष दोन वर्षसारखी चालविली असून पुण्यास येतांना महादजीने आपल्या सर्व हस्तकांस या धोक्याची सूचना निक्षून दिली होती. मुख्य कारभार त्याने गोपाळराव भाऊला सोपवला. आणि इतर सरदारांस त्याची साथ करण्याची ताकीद दिली. जीवबा बक्षीच्या ताब्यात फौजेची व्यवस्था असून, अंबूजी इंगळे यास ग्वालेरीस ठेविलें. आप्पा खंडेरावकडे दिल्लीची व बादशहाची व्यवस्था सांगितली. लखबादादा आग्र्याच्या बंदोबस्तास असून, तेथे महादजीच्या विरूद्ध उलाढाली करणारा मुख्य इसम इस्माईल बेग यास कैदेत ठेवलेले होते. त्यास डोळ्यांत तेल घालून जपणें हे लखबादादांचे मुख्य काम होते. कवाईती कंपूंवर सर्व सत्ता डी बॉयनची असून त्याजवर हुकूमत गोपाळरावभाऊची होती. गोपाळराव सुद्धा डी बॉयनला आवर्जूनच वागे.'[४४] अडीअडणीस शेवटी उपयोग डी बॉयनच्या तोफांचाच होता.

होळकरांचा संसार बहुनाइतकी व वृद्ध तरूण मंडळी व्यसनग्रस्त. त्यास आवरण्याचे सामर्थ्य अहिल्याबाईच्या धर्मनिष्ठेंत नव्हते. तिला जाग्यावर बसल्या बाह्य परिस्थितीचें आकलन कसे व्हावे! तरूण अनिर्वाच्य मल्हारराव व्यवसानाच्या दुंधीत वल्गना करी त्या वडील मंडळीस खऱ्या वाटत. पाराशर दादाजी, बापू होशळकर, नारोगणेश हे जाणते गृहस्थ जीव तोडून सांगत की, सिंद्याचे वाटेस जाऊ नये, त्यांच्याशी गोडीने वागण्यातच होळकरांचा निभाव आहे. पण हा हितकर विचार मल्हाररावासारख्यास कसा रूचावा! तुकोजी व मल्हारराव यांनी निश्चय केला की आतां महादजी जाग्यावर नाही तों आपण एकवार त्याच्या फौजेचा गर्व उतरवून दाखवूं. महादजीच्या फौजा ठिकठिकाणी दूर अंतरावर विभागलेल्या होत्या. त्यांस वेगवेगळ्या गांठून सडकणें सुलभ आहे असें त्यांनी ठरविलें आणि ते तशा संधीची वाट पाहता राहिले. हा डाव सारखा वर्षभर चालला. महदजीचे सर्व सरदार होळकराचे हे बेत पूर्ण ओळखून होते आणि स्वतः सावध राहून होळकरांची युद्धाची ईर्षा तृप्त करावी अशी त्यांनीही आपली तयारी ठेविली.

मल्हाररावानें अहिल्याबाईची समजूत पाडून तिची संमति मिळविली. तिने ही शक्य ते साहित्य देण्यास हरकत घेतली नाही. एकवार महादजीचा दिमाख हलका करावा अशी तिलाही उत्कंठा होतीच.

ऑगस्ट–सप्टेंबरात महादजी पुण्यांत कारभाऱ्यांच्या उखळ बेऱ्या मोठ्या तावाने काढीत असतां, इकडे उत्तरेंत तुकोजीने अलबारचे आसमंतातं शिद्यांचे मुलखावर हात मारण्यास सुरूवात केली. गोपाळराव रघुनाथ ताबडतोब बंदोबस्तांस आला. उभय फौजांचा सामना सवाई मधुपूर नजीक बनास नदीचे दक्षिणेस सुरवली येथे झाला. चार घटका पर्यंत मातबर लढाई आश्विन व. ८ सोमवारी ८ ऑक्टोंबर १७९२ रोजी होऊन होळकराचा पराभव झाला व तो पळून लाखेरीस गेला. होळकराकडील तोफा नऊ घोडी उंटे चारेश नागरे निशाणें वगैरे लूट सिद्यांचे लोकांनी आणली. त्यांच्यात गोपाळराव होळकरावर नजर ठेवीत राहिला आणि त्याने वर्तमान महादजीस कळवून पुढील उपक्रमाची परवानगी विचारली दरम्यान उभयंतात तहाच्या वाटाघाटी सारख्या चालू राहिल्या.[४५] गोपाळराव लिहितो, ''होळकरांचा आपला खलश तोडावा या विशीं पुण्यास श्रीमंतांचे उभयंता कारभारी (नाना व तात्या) मध्यस्थीस पडोन त्यांची पत्रें होळकरांस पटवून आली. परंतु यांचा आग्रह विना लढाई ऐकायचे नाही असाच पडल्यावरून महादजींची पत्रें मुकाबला करावा म्हणोन आली त्यावरून जयपूर प्रांतातून कूच करून आलो. तो परस्परे ऐय व्हावे अशी पत्रें होळकरांकडून आल्यावरून भानगड पडली आहे असा हा उभय सरदारांचा सामना स. १७९३ च्या मे महिन्यांत चालू असतां पाराजीपंताने तुकोजीस गळ घातली की लढाईनें आपला निभाव लागणार नाही. सल्ला करावा इक्यांत इंदुराहून मल्हारराव होळकर नव्या उमेदीनें वडीलांजवळ आले. त्यांनी वृद्धांचा निषेध केला की, हिंदुस्थानांत अब्रू गेली ती मिळवावी या करितां आठ नऊ महने लाखो रूपयांच्या पेंचात येऊन फौज बंदी केली. लढाई करून नक्ष राखावा तें एकीकडे ठेवून सलूख केला यांत थोडी अब्रु

राहिली होती तेही गेली. तर तुमचा सलूख तुम्हांपाशी असो. मी एक लढाई कोणांचेही न ऐकतां करणार असे बोलोन कूच करून चालोन गेले. त्यावरून मुख्यासहीं भरवंसा पटून पाराजीपंतांवर इतराजी केली, सलुखाचा जाबसाल आम्हांस कबूल नाही असें कळविले. पाराजीपंत कष्टी हेऊन घरी बसले. संग्राम टळणे अशक्य झाले. ८ मे रोजी लाखेरीजवळ लढाईस तोंड लागले. तीन चार दिवस सामना होऊन १ जून रोजी शेवटच्या संग्रामात होळकराचा निकला लागला.''

लाखोरीचा संग्राम घटला. खिंड ताब्यात घेण्यासाठी डी बॉयननें चाल केली. त्याच्या तोफा बैल ओढून वर आणीत असतां होळकराकडील ड्यूड्रनेकचे गोळे येऊन डी बॉयनचा दारूखाना पेटला, त्याबरोबर होळकर फौजेंने त्याजवर चाल केली. पण जवळच्या झाडींत डी बॉयनने आपली पायदळ पलटणें व लहान तोफखाना लपवून ठेवला होता, त्यांनी एकदम बाहेर येऊन होळकरावर असा काही मारा केला कीं, त्याची गाळण उडून ते पळत सुटले. त्याचबरोबर सिंद्याच्या फौजने होळकराचा विध्वंस उडवला.'[४६] ड्यूड्रनेकनें आपली शिकस्त केली. त्याचे बहुतेक लोक कापले गेले. त्याच्या ३८ तोफा डी. बॉयननें घेतल्या. डी बॉयनची कल्पकता आणि जीवबा बक्षींचे प्रसंगावधान यामुळेच या लाखेरीच्या लढाईत सिंद्याचा विजय झाला. मल्हारराव गोळी लागून पळत असतां एक तलावांत पडलेला सापडला. तुकोजी दूर अंतरावर असल्यामुळे पकडला गेला नाही. लढाईचें विपरीत वर्तमान ऐकून त्यास परकष्टेचें दुःख झाले. त्या आवेशात त्यांने सिंद्याचे उज्ञनी नगर लुटून जाळून खाक केले. अहिल्याबाईला काय कष्ट वाटले असतील त्याची कल्पनाच केली पाहिजे. उत्तरकालीन इतिहासांत या लाखेरीच्या संग्रामाला मोठे महत्व आहे.

महादजी शिंदे यांची मैत्री व मराठ्यांच्या इतिहासातील नाट्य

महादजीचे पुण्यास आगमन, त्याचे दरबार व नचरंग, चहूंकडे बसलेला त्याचा दरारा, पुण्याचे कारभाऱ्यांचा थरकाप, लाखेरीवर त्याच्या लष्करानें मिळविलेला विजय हे सर्व प्रकार

मराठ्याचे शत्रुमित्र देशभर चिंतातुर उत्कंठेने पाहत होते. पुढच्या क्षणी काय घडते याचीचच प्रत्येकाला धास्ती. मराठी राज्य जगणार की मरणार हा सर्वांच्या डोळ्यांपुढचा मुख्य प्रश्न. अशा या वातावरणात स. १७९३ चा पावसाळा पुण्यास काय निर्णय घेऊन लागला त्याचा आता शोध घ्यावयाचा आहे.

महादजीच्या हालचालीकडे सगळ्या हिंदुस्थानचे लक्ष कसें लागले होते हे इंग्रजांच्या लेखांत पहावयास मिळते. ता. १० डिसेंबर १७९२ रोजी कॉर्नवालीसने इंग्लडास पत्र पाठविलें त्या पुण्यासंबंधाने खालील मजकूर होता.[४७] पुण्याच्या राजकारणाची प्रस्तुत स्थिती आम्हास फारशी अनुकूल नाही. *''ब्राम्हणांच्या कपटास महादजीचे सामर्थ्य व अक्कल पुरी पडली. त्याने तरूण पेशव्यावर आपली छाप पूर्णपणे बसविली आहे. यामुळे नाना, हरिपंत व त्यांच्या पक्षांतील मंडळी कारभारातून आपलें अंग साफ काढून घेणार हे पाहून, पुण्याजवळ आपापल्या फौजा जमवून जो तो आपल्या बचावाच्या तजविजींत आहे. अगोदरच नानाचा स्वभाव भित्रा, तशांत सिंद्याची फौज बलवान असून, नुकताच त्याने होळकराचा पाडाव केला असल्यामुळे नानाची हिंमत खचली हातघाईवर प्रकरण आल्यास राज्यांत सिंद्यांचा वरचष्मा लगेच होईल या विषयी संशय नाही. नानाचा पक्ष कमजोर झाल्याबद्दल मला जरी फार खेद होतो, तरी ते जे दुसरे कोणी कारभारावर येतील ते तरी आमच्याशी अगदीच फटकून वागतील असे नाही, आणि आम्ही सुद्धां त्यांचे मन संभाळूनच राहू.''*

त्यानंतर ता. २५ जानेवारी १७९३ रोजी पुनः कॉर्नवालिस लिहितो, पुण्याच्या कारभाराची घालमेल अद्यापि चालूच आहे. परंतु नानानें कारभार सोडून काशीयात्रेस जाण्याचा निश्चय केला होता. तो आता रहित झाला.[४८] निजाम व गायकवाड यांजकडून पैसे उपटण्याचा सिंद्यांचा इरादा असून त्यास नाना विरोध करीत नाही. उलट बाहेयन तरी सिंद्यांचे म्हणण्यास पाठिंबा देण्याचे नानानें कबूल केले आहे. तूर्त पूणे सोडून जाण्याचा सिंद्यांच बेत दिसत नाही.

पुनः ता. १० मे १७९३ चे पत्र पुण्याशिवाय हिंदुस्थानच्या इतर कोणत्याही भागांत या वेळी कंपनीला काळजीचे कारण उरलेले नाही. पुण्याची मात्र धास्ती आहे. परंतु तेथे सुद्धा कोणाताही बनाव बनला तरी त्यांत कंपनीला नुकसान पोंचण्याचा संभव दिसत नाही.

ता. २४ एप्रिल १७९३ रोजी पोर्तुगीज वकील विठ्ठलपंत लिहितो, *काल रोजी व त्यापूर्वी हरिपंतांनी महादजी शिंद्यांचे मुक्कामावर जाऊन त्यांची भेट घेतली. आणि निरनिराळ्या प्रकरणी बोलून त्यांची समजूत घातली. हे वर्तमान ऐकून आतां निजामली पुढे चालून येईल असें दिसत नाही. ता. १ मे १७९३ चे जगन्नाथ यांचे पत्र दुसरे दिवशी पांच स्वारांनिशी हरिपंत बावांचे डेऱ्यास आले. चार घटका खलबत जाले. तसेच पाचं सहा रोज लागोपाठ येऊन प्रहर प्रहर खलबत हेऊ लागले. हांसील पाहतां, मायिक बोलणी दिसोन आली. पाटीलसाहेबांनी उत्तर केले की, तुमचे बोलण्याचा अर्थ पुढील चालीवरून कठोन येईल. एक वर्ष आम्हास येऊन जाले. अद्यापि प्रथम दिवस कोटी रूपयांचे पेचांत आलो.'*[४९] *अलीकडे तुम्ही चाल घातली ही उघडीच आहे. होळकरही सरकारचेच चाकर, पुर्वी आम्ही व ते भाऊ होतो. अलीकडे हिंदुस्थानांत आमचे कुमकेस येऊन चाकरी केली, त्यात आम्हांपासून कसर पडली की त्यांजपासून हे तुम्हीच मनास आणून जाबसाल निवडावा. धनी तर लहानच आहेत. तसा जाबसाल न निवडतां उलटे ते आमच्याशी लढण्यास उभे राहील, आणि तुम्ही तमाशा पाहतां. तात्या म्हणाले, येथून होळकरांस किती वेळां पत्रे गेली. हुजरेही गेले. सरदार आहेत, न ऐकत तर विचार करून ऐकविलें पाहिजे. एकदम कसे होत! बाबा म्हणाले, फार चांगले, सरकारचा हुकूम ऐकत नाहीत, तेंव्हा चाकर नव्हतें चिंता काय, मुलूख जप्त करावा. हे तुमच्यानें होत नसेल तर मला सांगावे. मी मुलकाची जप्ती करून पारपत्यही करितों, दुसरें अलीबहादर सरकारतर्फेचे, त्यांनी माझा शत्रु जवळ ठेविला, तो माझे हवालीं करावा. त्याचा न्याय-अन्याय निवडावा. होळकर हुकमी चाकर असल्यास बोलावून घ्यावे. तुमच्या हातून हे दोन जाबसाल*

उलगडत नाहीत, त्या पक्षीं मी सरकारचाकर आहे. मजपाशी मुतालकी सिक्के आहेत. मी मुलूक जप्त करीतों. होळकर, मोगल जो कोणी सामन्यास येईल त्यास समजोन घेतों. धन्यांचे पुण्या समर्थ अ ाहे तर इतकेंही मी करितों. या आशयार्ची बोलणी बहुज जाली. होळकरांचे व यांचे फौजेची लढाई घडून आली.''

यावरून इतका निर्णय उघड दिसतो की, होळकरास उठवून महादजीचा पाडाव करावा, आणि त्यासाठी जरूर पडल्यास निजाम-इंग्रज यांची सुद्धा मदत आणावी, असा नानाच निश्चय झाला होता.'[५०] म्हणजे महादजीनें दाखविलेले कारभारांतील दोष दुरूस्त करण्याची दिशाच कारभाऱ्यांनी घेतली नाही. महादजींने मात्र आपण होऊन माघार घेतली म्हणूनच प्रकरण हातघाईवर आले नाही.

जुन्या घराण्यांचा अभिमान महादजीस होता, तसा नानास नव्हता. सचिवासारख्या घराण्यांची नानानें दुर्दशा केली, तशीच छत्रपतीसंबंधानेंही केली. महादजीचा हा एक मोठा आक्षेप नानाच्या कारभारावर होता. पूर्वी नानासाहेब, माधवराव वगैरेंनी छत्रपतींना दाबांत ठेविलें, पण त्यांना तखलीफ होऊ दिली नाही. अलीकडे नाना फडणीसानें बाबूराव आपट्यांच्या मार्फत छत्रपतींस अगदीच संपुष्टांत आणिलें. साताऱ्यास महाराज बंदीत होते, त्यांस फिरावयास मोकळीक करणें, ते कोणीकडे जाणार? म्हणून पाटीलबाबांनी सरकारांत अर्ज केला. त्यावरून माहुली संगमास बागेस वगैरे जाण्याची माफी दिली, परंतु यामुळे खऱ्या अडचणी दूर झाल्या नाहीत, महाराजांचे खर्चाचा ऐवज परभारें महालांतून ठरविला होता, तो कशास पाहिजे? पुण्याहून नक्त खर्चास पाठवावें. राजपागा, हत्ती, घोडे, कारखाने वगैरे कशास पाहिजेत? ते सर्व इतमाम पुण्यास आणून लाख रूपयांवर खर्च आणिला. महाराजांची अमर्यादा करून चौकी पहारा ठेविला. राजमंडळाचे लोक कोणी जाऊ नयेत ऐसें केले. चाकरीच्या बायका व लेकावळे यांच्या अडीसऱ्या बंद केल्या. ते लोक उठोन गेले. राजपत्रें व कागदपत्र यांचे काही एक कारण

ठेविलें नाही, नानानें सवाई माधवरावाचा सुद्धा असाच कडक बंदोबस्त ठेविला. यामुळे तो होतकरू पेशवा जिवास सुद्धा कंटाळून गेला, तसे तत्कालीन लेखकांचे भरपूर उद्धार आहेत. अशा या एकतंत्री, खुनशी व जरबी कारभाराचा परिणाम व्हावयाचा तो झाला व त्याची स्पष्टपणे चिन्हें त्या वेळीच लोकांस चांगली दिसूं लागली होती. जगन्नाथ विश्वनाथ म्हणून महादजीजवळ लेखक होता तो ता. १० फेब्रुवारी १७९३ रोजी पुण्याहून लालाजी बल्लाळास खालील मजकूर कळवितो, तो अत्यंत महत्वाचा आहे.

नाना फडणीस प्रत्येक व्यवहार आपल्या व्यवसायानुरूप हिशोबी दृष्टीनें पाहत असे. त्यास वाटे, महादजीने दिल्लीच्या दौलत हाताखाली घातली म्हणजे द्रव्याचा झरा त्यास प्राप्त झाला. त्याच्याजवळ एकंदर फौज होती तिचा आकडा पावनेदोन लाखांचा असून त्यांत निदान वीस पंचवीस स्वतंत्र सरदार होते. एवढ्यांचा चालू खर्चच किती होतो हा सरळ हिशोब कोणासही दिसेल. दहा वर्ष महादजी या उद्योगांत गुंतला.'[५१] त्यांत सारख्या लढाया व धामधुमी चालू होत्या अशा उद्योगांचे फळ ज्या त्या वेळी मिळत नसतें. पुढे स्वस्थता झाल्यावर मग द्रव्यप्राप्ति होते. तसा योगं आता लवकर येईल, साताऱ्याप्रमाणे दिल्लीचे संस्थान निर्वेध कबजांत आले, अशा भावनेंत महादजी दक्षिणेत आला. वरील दहा वर्षात तीन मोठे दुष्काळ उत्तर हिंदुस्थानांत पडले. अडीअडणीस त्याला निजामाकडून सुद्धा वीस लाख रूपये कर्ज घ्यावें लागले. निजम, इंग्रज, तयमूरशहा व जमानशहा दुराणी, शीख सरदार व वजीर, अशा अनेकांकडे स्वतंत्र कारस्थाने यास ठेवावी लागली. रावराजा प्रतापसिंग माचेडीकर, गोसावी बंधू काशीनरेश चेतसिंग, राघवगडकर चव्हाण, इस्माईलखान हमदानी व खुद्द बादशहा व त्यांचे मंडळ या सर्व घेंडास पोसणें महादजीस भाग पडले. नानाच्या वकीलासारखे महादजीचे वकील पोटार्थी होऊन दुसऱ्याच्या दारापुढे तोंड वेंगाडीत कधी गेले नाहीत. सारांश, महादजीने पैसा कमावला असला तरी तो सढळ हाताने खर्चूनही टाकीला. खुद्द पुण्यास आल्यावर कोणी

सावकार कर्ज सुद्धा देईना अशी त्याची कुचंबना होती. या स्थितीत नानाने महादजीकडे सहा कोटी घेणे काढिले, ते त्याने कसें कबूल करावे? या संबंधाने पुष्कळ तक्रारी होऊन शेवटी जो निकल लागला तो ता. १ ऑक्टोंबर १७९३ रोजी निजामाने रेसिडेंट किन्वीस कळविला तो असा – पुण्याहून आम्हास पत्र आले की, *महादजीच्या सर्व मागण्या कारभाऱ्यांनी कबूल करून, पेशव्यांने त्याचे हिशेब पाहून त्यास पाच कोटी रूपये देण्याचे मंजूर केले. एवढी रक्कम एकदम रोख महादजीस देण्याची सवड कारभाऱ्यांची नसल्यामुळे असा ठराव झाला की, महादजीने नवीन हस्तगत केलेला सर्व प्रदेश स्वतःकडे वहिवाटीस ठेवावा. त्याचे उत्पन्नंतून वरील रकमेची फेड करून घ्यावी, आणि देणें फिटल्यावर मग पेशव्यांचा हिस्सा त्यांचे हवालीं करावा.*'[५२] *तसेच बादशाही कारभाराकरिता पेशव्यांनी आपली फौज महादजीचे ताब्यांत स्वखर्चाने नेहमी ठेवून घ्यावी अशा रितीनें हा हिशोबाचा लढा तुटला.*

एक वर्षाच्या समागमांत महादजीचा स्वभाव व त्याचे खरे उद्देश लोकांत प्रकट होऊन पूर्वीची साशंकवृत्ती मावळून गेली. महादजी त्वेषाने बोलतो तो केवळ राज्याच्या हितासाठी, त्यांत त्याचा स्वतःचा स्वर्थ असा काही नाहीं अशी पुण्याच्या प्रमुखांची व महाराष्ट्रीय जनतेची खात्री झाली. लाखेरीचें वर्तमान पुण्यास पोंचतांच पूर्वीचा नूर सर्व पलटला. खुद्द पेशव्यांनें पुढाकार घेऊन नानामहादजींस समक्ष आणून त्यांची गोडी केली आणि दोघांसही स्पष्ट बजावलें की तुम्ही दोघे राज्याचे संवर्धन केले, इतरत्रही तसेंच एकमेकांशी राज्य संभाळले पाहिजे. दोन हातांचा सहकार असेल तरच राज्य चालेल. एकाची बुद्धी व दुसऱ्याची तलवार याच दोन प्रचंड शक्ती होत. धन्यानेंच अशी समजूत काढतांबरोबर पूर्वीचा विरोध साफ विरघळून गेला. नाना महादजी एकमेकांस निःसंकोचपणे एकटे भेटूं लागले. याचा पहिला उपक्रम मुख्यतः हरिपंताने केला. तो आपण होऊन पूर्वी न कळवितां वेळी अवेळी शहसहादजीकडे जाऊन एकंदर प्रकार भागवू लागला. जशी त्याची निष्ठा नानावर तशीच महादजीवर बसली.

नानाही एकटा दुकटा महादजीकडे जाऊन बोलू लागला. महादजीनेंही नानाचा आदर असा ठेवला की मागच्या तेढीचा मागमूसही उरला नाही. नाना महादजीचे भेटीस गेले असतां त्यास तो उच्चासनावर बसवून आण सेवकाप्रमाणे त्याच्या पायांशी बसे. महादजी पंधरा वर्षांनी नानाहून वडील, पण त्यालाच त्याने वडीलकीचा मान दिला. अशा रीतीने उभयंताचे सौरस्य होऊन पूर्वीचे वादळ सर्व विसरून गेलें. हा प्रकार कधी कसा घडला. त्याचा मुद्देसूद खुलासा मिळत नाही. लाखेरीचें युद्ध १ जून स. १७९३ ला झाल्यावर एक दोन महिन्यांतच हा प्रकार घडला.

ता. २१ जूलाई स. १७९३ चे पत्र रेसिडेंट पामरचें फत्तेकडहून कॉर्नवालीस यास गेले त्यांत तो लिहितो, पुण्याहून खात्रीलायक बातमी कळते की पेशव्यांने महादजी, नाना व हरिपंत यांस समक्ष आणून त्यांची गोडी करून दिली. हिंदुस्थानांत सिद्यांचा अखत्यार कायम ठेविला, होळकरांशी त्याचा तंटा होता, त्याची तडजोड केली, आणि निजामकडे मराठ्यांचे घेणे होतें ते वसूल करण्याची आज्ञा केली. पेशव्यानें सर्वांकडून देवासमोर वरील कराराच्या शपथा घेवविल्या.

कल्याणराव आणि रघूत्तमराव हे दोन निजामाचे वकील पुण्यांत होते त्यांनी ता. २६ सप्टेंबर स. १७९३ च्या पत्रात धन्यास लिहून कळविले की, पुण्यास सिंद्यांनी आपल्या सर्व मागण्यांचा निकाल आपल्या इच्छेनुरूप करून घेतला. पेशव्यांनी त्यांची पांच कोटीची खर्चाची मागणी मंजूर करून स्वहस्ताने लिहून दिली. *हिंदुस्थानचा कारभार सर्व त्याजकडे सोपवला, त्याची मागणी येईल तेंव्हा त्याचे मदतीस पुण्याची फौज पाठविण्याचे पेशव्यानें कबूल केले.* '[५३] *हिंमतबहाद्दर गोसाव्याची सर्व व्यवस्था सिद्यांने मर्जीमाफक करावी असा ठराव झाला.*

हैद्राबादेस इंग्रज रेसिडेंट होता त्यास निजामाने १ ऑक्टोंबर स. १७९३ रोजी कळविले, पुण्याची बातमी आली कीं महादजी सिद्यांच्या सर्व मागण्या पेशव्याने मंजूर करून दिल्या. पांच कोटीचा त्याचा खर्च देण्याचे पेशव्याने मान्य केले. एकदम रोख रक्कम देण्यास सवड नाही

म्हणून जिकिंलेल्या देशाची वहिवाट त्याने करून त्याच्या उत्पन्नांतून आपली फेड करून घ्यावी आणि सर्व रक्कम फिटल्यावर प्रदेश परत पेशव्याचे कबजांत द्याा. पेशव्याच्या सरदारांनी आपल्या खर्चाने फौजा बाळगून उत्तरें महादजीची कुमक करण्याचे मान्य केले. अशा रीतीने हा कलम मिटला. खेद एवढाच की सौरस्व झाल्याकर त्या अनुरोधानें राज्याचा पुढील उद्योग करण्यास सिंदे फार काळ जगला नाही. १४ फेब्रुवारी १७९४ मध्ये त्याचा आकस्मित मृत्यू झाला.

महादजी शिंदे व पेशवे संबंध - उत्तर हिदुस्थान काबीज

महादजी शिंदे उत्कर्षाच्या शिखरावर -सालबाईच्या तहानंतर प्रथमच मराठे-इंग्रज संबंध सुधारले आणि मराठे आणि इंग्रजामध्ये प्रथमच शांता प्रस्थापित झाली. त्यामुळे मराठ्यांना आता उत्तरेच्या राजकारणाकडे लक्ष देण्याला सवड सापडली. इ. स. १७७२ मध्ये महादजी शिंद्यांनी दिल्लीचा बादशहा शहा आलम याची दिल्लीच्या गादीवर प्रतिष्ठापना केली ही गोष्ट आपण मागे पाहिले. वरकरणी मोगलांच्या हातात सत्ता ठेवावयाची परंतु खरी सत्ता मात्र कोणत्याही परिस्थितीत आपल्याच हातात राहिल अशी योजना करावयाची असे राजकारणाचे सूत्र मराठ्यांनी माधवरावाच्या काळापासून अंमलात आणले होते असे आपणास दिसून येते. खरे म्हणजे दिल्लीचे सिंहासन मराठ्यांना सहज मिळण्यासारखे होते. मराठ्यांनी मनात आणले असते तर दिल्लीला हिंदूची सत्ता केव्हाच प्रस्थापित झाली असती. परंतु मराठ्यांनी तसे केले नाही ही गोष्ट आश्चर्यकारक समजली जाते. पेशवाईतील शासक हे शिवाजी महाराजांच्या साम्राजय संस्थापनेच्या धोरणापासून विचलित झाले असा आरोप नेहमीच केला जातो. परंतु आरोप करणारे इतिहासकार हे शिवाजी महाराजांचा काळ वेगवेगळा होता ही गोष्ट विसरतात.'[५४] याशिवाय छत्रपती शाहू यांचा बराच काळ मोगलांच्या नजरकैदेत गेल्यामुळे त्यांच्याही मनामध्ये मोगल सम्राटाबद्दल प्रेम निर्माण झाले आणि मोगल साम्राज्यांअंतर्गत मराठ्यांचे स्वराज्य हि

कल्पना त्यांना योग्य वाटू लागली हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.

थोडक्यात, दिल्लीच्या बादशहाची म्हणजेच शहा आलमची सर्व सत्ता मराठ्यांच्या तलवारीवर अवलंबून होती. नारायणरावाच्या खुनामुळे महादजीला दक्षिणेच्या राजकारणाकडे जास्त लक्ष घालावे लागले आणि त्याचवेळी पहिले इंग्रज–मराठा युद्ध उद्‌भवल्यामुळे उत्तरेच्या राजकारणाकडे लक्ष देण्याला त्याला सवड सापडली नाही हे लक्षात घेतले पाहिजे. पहिल्या इंग्रज–मराठा युद्धाच्या अखेरीस महादजीच्याच मध्यस्थीमुळे इंग्रज आणि मराठ्यांचे पुणे सरकार यांच्यात सालबाईचा तह घडून आला. महादजीच्या या कामगिरीमुळे इंग्रजांनी महादजीला उत्तर हिंदुस्थानातील राजकारणात आपण यत्किंचितही लक्ष घालणार नाही असे अप्रत्यक्षपणे वचन दिले. आणि त्यामुळे महादजीला उत्तरेत पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. महादजी ज्यावेळी दक्षिणेतील निरनिराळ्या कार्यात गुंतलेले होते त्यावेळी महादजीच्या गैरहजेरीत दिल्लीचा राज्यकारभार मिर्झा नजाफ खान याने चालविला.'[५५] नजाफखानाला आणि दिल्लीच्या मोगलसम्राटाला महादजी शिंद्यांनी कायमचे दिल्लीला यावे असे वाटत होते परंतु तसे शक्य नव्हते. मिर्झा नजाफखान हा अतिशय कर्तृत्ववान सरदार त्याला ब्रिटिशांबरोबर लढण्याचा भरपूर अनुभव होता. या नजाफखानाने अनेक सरदारांची मदत घेऊन शहा आलमचा कारभार चालविला. ६ एप्रिल १७८२ रोजी या नजाफखानाचा मृत्यू झाला. आणि महादजी शिंद्यांना दिल्लीला मोगल बादशहाचा अतिशय उत्सुक बनला. दिल्लीमधील मरठ्यांच्या वकीलाला त्याने दक्षिण हिंदुस्थानात जाऊन महादजीला घेऊन यावे अशी आज्ञा केली. दिल्लीतील हिंगणे या वकीलाने मजल दरमजल करीत दक्षिण हिंदुस्थानाकडे प्रयाण केले. अशा स्थितीत दिल्लीला जावे किंवा नाही अशी शंका महादजीच्या मनात झाली. यावेळी पूर्ण सरकारची आपल्याला कोणतीही मदत मिळणार नाही असे महादजीला वाटत होते. एखादे संकट आले तर मोगल दरबाराची कितपत मदत होईल अशीही शंका महादजीला वाटत होती. आपल्या जवळ सुसज्ज सैन्य असल्याशिवाय

आणि बुंदेलखंडात आपली लष्करी छावणी निर्माण केल्याशिवाय उत्तरेत जाण्यात अर्थ नाही हे महादजीने ओळखले. गोहाडचा राजा आपल्याला उत्तरेत सर्व ठिकाणी विरोध करील हेही महादजीला माहित होते. आपल्याजवळ पैसा नाही, आधुनिक शस्त्रसामुग्री नाही अशा स्थितीत उत्तरेत कसे जावे असा प्रश्न महादजीला पडला महादजी उत्तरेत जाण्याचा निर्णय लौकर घेईना म्हणून शहा आलम अधिकच अधीर झाला. म्हणून त्याने आपला वडील मुलगा मिर्झा जबानबरत यास दक्षिणेत पाठविले. अफसियाबखान आणि मिर्झा शफी हे दोघे सरदार जबानबख्तच्या दिमतीला देण्यात आलेले होतेच जवानबख्त प्रथमतः आग्र्याला पोहोचला. आणि तिथून त्यांने आम्ही ग्वाल्हेरला भेटण्याकरीता येत आहेत असा महादजीला निरोप दिला. याच बरोबर उमरावगीर गोसावी याला मोगलांचा प्रतिनिधी म्हणून महादजीकडे पाठविण्यात आले. १७८३ च्या जून महिन्यात महादजी आग्र्याला येऊन पोहचले त्यांनी प्रथमतः अफासियाबखान यांची भेट घेतली आणि त्यानंतर जवानबख्त आणि महादजी यांच्यात भेट घडून आली या भेटीत शहाजाद्याने महादजीला दिल्लीच्या राज्यकारभाराची जबाबदारी स्विकारण्याची विनंती केली.[५६] गोहडच्या राजाचा पाडाव केल्यानंतर आणि पावसाळा संपल्यानंतर मी ही जबाबदारी स्वीकारू शकेल असे महादजीने सांगितले.

गोहादचा पाडाव (२६ फेब्रु. १७८४)

सालबाईचा तहापासूनच गोहादच्या राजाचा पराभव करण्याचा प्रयत्न महादजीने चालविलेला होता. गोहादचे राज्य बुंदलेखंडाच्या वायव्य दिशेने होते. त्यांच्या ताबयात ग्वाल्हेरचा किल्ला होता. महादजीकरीता अनेक अडचणी गोहादच्या राजाने निर्माण केलेल्या होत्या. गोहादच्या राजाला महादजीचे उत्तर हिंदुस्थानात येणे अजिबात पसंत नव्हते. महादजीने गोहाद विरूद्धच्या आपल्या मोहिमेला प्रारंभ करून २७ जुलै १७८३ रोजी अशी ग्वाल्हेरचा किल्ला जिंकून घेतला आणि गोहादच्या राज्याची अशी काही नाकेबंदी केली त्यामुळे गोहादलाही महादजीसमोर

शरणागती घ्यावी लागली. (२६ फेब्रुवारी १७८४). गोहाडचे हे जे युद्ध झाले ते युद्ध आणखी एका वैशिष्ट्याकरिता प्रसिद्ध आहे. या युद्धामुळे डी बोईन या तोफखाना तज्ज्ञाकडे महादजीचे लक्ष वेधल्या गेले. लवकरच या डी बोईनने महादजीच्या नोकरीत प्रवेश केला (१७८४) त्याच्या शिस्तीचा आणि पराक्रमाचा महादजीला बराच उपयोग झाला. डी बोईनमुळेच महादजी शिंद्यांच्या सैन्यास पाश्चिमात्य लष्करी युद्धतंत्राचे आधुनिक ज्ञान मिळू शकले.'[५७] महादजीला पलिकडे जे विजय मिळाले ते डी बोईनमुळेच मिळाले असे म्हटले पाहिजे.

इंग्रजांचा दुटप्पीपणा :

इंग्रजांनी जरी महादजी शिंद्यांना उत्तर हिंदुस्थानात पूर्ण स्वातंत्र्य दिले तरीसुद्धा इंग्रजांच्या मनात महादजीबद्दल मत्सर होता आणि म्हणूनच त्यांनी महादजींच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण केल्या. अशा स्थितीत वॉरन हेस्टिंग्जने दिल्लीच्या बादशाही दरबारात इंग्रजांचा वकील म्हणून मेजर ब्राऊन याचीने नेमणूक केली आणि तो अशाप्रकारे दिल्लीच्या दरबारात आल्यामुळे सर्वत्र मोठीच खळबळ निर्माण झाली. प्रत्यक्ष राज्याच्याही मनात इंग्रजांची मदत घ्यावी की मराठ्यांची मदत घ्यावी असा संभ्रम काही दिवसापर्यंत निर्माण झाला.

गोहाडच्या राजाने ज्याप्रमाणे महादजीच्या मार्गात अडचणी निर्माण केल्या त्याच प्रमाणे आग्र्याचा किल्लेदार मोहम्मद बेग हमदानी हाही मराठ्यांच्या विरूद्ध होता. मोगल बादशहाने मराठ्यांची इतकी खुशामत करावी ही गोष्ट हमदानीला पसंत नव्हती. दरबारातील एक सरदार मिर्झा शफि हा मराठ्यांची वाजवीपेक्षा जास्त खुशामत करतो म्हणून हमदानीने गुप्तपणे शफीचा खून घडवून आणला. या कारणांमुळे राज्यात यादवी युद्धाला प्रारंभ झाला. आफसियाबखान याने हमदानीची बंडाळी मोडून काढण्याकरिता म्हणून महादजीला उत्तर हिंदुस्थानात त्वरित येण्याविषयी विनविले. अशा परिस्थितीत महादजीने आपला विश्वासू सरदार अंबुजी इंगळे याला निवडक सैन्यानिशी दिल्लीस पाठविले. या सर्व घटनांवर इंग्रजांचे

अतिशय बारीक लक्ष होते.'[५८] विशेषतः वॉर हेस्टिंग्ज यातून इंग्रजांना कोणता फायदा मिळविता येईल का याचा विचार करीत होता. यातच महादजीचा घनिष्ठ मित्र अँडरसन हा १७८४ च्या शेवटी निवृत्त झाला. आणि त्याच्या जागी त्याचा भाऊ जेम्स याची नेमणुक झाली. परंतु अँडरसनला महादजीबद्दल जिककी सहानुभूती होती तेवढी सहानुभूती जेम्सला वाटत नव्हती. याशिवाय अनेक उच्च पदस्थ इंग्रज अधिकाऱ्यांना महादजी शिंद्यांना वॉर हेस्टिंग्जने उत्तर हिदुस्थानात येव्हडी जास्त मोकळीत द्यावी ही गोष्ट पसंत नव्हती. याशिवाय हेस्टिंग्जची मदतही लवकरच संपणार होती. त्यामुळे महादजी शिंद्यासंबंधी कोणतीही निर्णायक कृती करावे असे हेस्टिंग्जला वाटत नव्हते.'[५९] असे असुनसुद्धा त्याने लखनौला जाऊन निवृत्त अँडरमनशी या विषयावर सल्लामसलत केली. महादजीशी प्रत्यक्ष युद्ध न करता उत्तर हिंदुस्थानात इंग्रजांना जेव्हढे फायदे मिळवता येतील तेव्हढे फायदे इंग्रजांनी जरूर मिळवावेत असे अँडरसनचेही मत पडले. म्हणून वॉरन हेस्टिंग्जने आता सर्व गुप्त मार्गाचा अवलंब करून दिल्लीच्या मोगल बादशहाला आपल्या बाजूने वळवून घेण्याचा प्रयत्न चालविला. अयोध्येचा नवाब अगोदरच इंग्रजांना येऊन सामील झाला होता. बादशहाला वळवून घेण्याकरिता म्हणून हेस्टिंग्जने पाच महिनेपर्यंत लखनौलाच मुक्काम ठेवला. या पांच महिन्यात शहा अलमचा वारस जवान बख्त याला आपल्या बाजूने वळवून घेण्यात हेस्टिंग्जला यश लाभले. परंतु शहा अलमने मात्र इंग्रज आपले सैन्य कायमचे दिल्लीला ठेवीत असतील तरच आपण इंग्रजांना सामील होऊ अशी अट टाकली. परंतु इंग्रजांची महादजी शिंद्यांशी युद्ध करण्यची तयारी नसल्यामुळे इंग्रजांनीही अट मान्य केली नाही. जवान बख्तला इंग्रजांनी वार्षिक चार लाख रूपये पेन्शन मंजूर केले. आणि त्याने बनारसला राहणे पसंत केले. मोगल बादशहाचा वारस जवान बख्त हा अशा रितीने इंग्रजांना सामील झाल्यामुळे महादजींला धक्काच बसला. सालबाईच्या तहानंतर इंग्रज इतक्या लवकर आपल्याला अशा प्रकारे दुखावतील याची महादजीला कल्पना नव्हती.'[६०] नाना

फडणीसानेही यावेळी महादजीला पत्र लिहून इंग्रज किती विश्वास घातकी स्वभावाचे आहेत आणि मराठ्यांनी किती सावध राहिले पाहिजे याकडे महादजीचे आवर्जून लक्ष वेधले. महादजीही या घटनेमुळे सावध झाला आणि त्याने आपल्या सैन्याची पुर्नघटना करण्याकरिता म्हणून डी बोइन या फ्रेंच अधिकाऱ्याला बोलाविले. या पलिकडे इंग्रजांवर कोणत्याही रितीने अवलंबून राहावयाचे नाही, असे त्याने ठरविले.'[६१] वॉरन हेस्टिंग्जकडे त्याने आपला वकील पाठविला. आणि वकीलामार्फत वॉरन हेस्टिंग्जने उत्तरेच्या राजकारणात का हस्तक्षेप केला याचे स्पष्टीकरण मागितले. यावर जवान बख्तला कदाचित आपल्या वडिलांनी इंग्रजाची मदत घ्यावी असे वाटत असेल असे उत्तर देऊन हेस्टिंग्जने खरा प्रश्न टाळला. शहा आलमला महादजी शिंदे यांची मदत अतिशयच महत्वाची वाटू लागली. कारण इंग्रज आपल्याला मदत करणार नाहीत याबद्दल शहा आलम याची खात्री पटली.

महादजीचे दिल्लीकडे प्रयाण

गोहाडच्या विजयानंतर महादजीचा दिल्लीचा मार्ग मोकळा झाला. ५ ऑक्टोंबर १७८४ रोजी महादजीने ग्वाल्हेरहून आग्र्याकडे कूच केले. यावेळी बादशहाचा मुक्काम आग्रया या ठिकाणी होता बादशहातर्फे आफसियाबखान याने फत्तेपूर सिक्रीनजीक महादजीचे स्वागत केले. आफसियाबखान हा महादजीची वाजवीपेक्षा जास्त मर्जी संपादन करण्याची धडपड करीत होते. हे पाहून मोहम्मद बेग हमदानी याला अतिशय संताप आला आणि त्याने ३ नोव्हेंबरला आफसियाबखान याचा त्यांच्याच तंबूत खून घडवून आणला. बादशहा आणि त्याचे दरबारी यांना हमदानीच्या या कृत्याचा अतिशय राग आला आणि त्यांनी महादजीला खुन्यांना पकडून त्यांना योग्य शासन करण्याची विनंती केली. महादजीने हमदानीच्या पाठलागावर अंबुजी इंगळे यांना पाठविले आणि अंबुजीने हमदानीस पकडून तुरूंगात टाकले.'[६२] कालांतराने हमदानी तिथूनही निसटला व पलिकडे त्याने महादजी विरूद्ध बराच उपद्रव निर्माण केला.

१७८७ मध्ये लालसोटच्या लढाईत तो ठार मारल्या गेला.

महादजींचा बादशहामार्फत सत्कार व वकील ई–मुतालक पदवी

१४ नोव्हेंबर १७८४ या तारखेला बादशहा शहाआलम आणि महादजी यांची पहिली भेट घडून आली. यावेळी महादजीने बादशहाच्या पायावर आपले डोके ठेवले आणि १०१ सोन्याच्या मोहरा त्याने बादशहाला भेट म्हणून दिल्या. बादशहाने महादजीला मोठ्या सन्मानाने आपल्या जवळ बसवून घेतले आणि आपल्या साम्राज्याची पूर्ण देखरेख करण्याची त्याने महादजीला विनंती केली. याचवेळी बादशहाने महादजीस वकील ई–मुतालक ही सर्वोच्च पदवी बहाल केली. राज्य चालविण्याला आवश्यक असलेले सर्व अधिकार याचवेळी देण्यात आले. मीर बक्षी आणि वजीर या दोन्हीही जागांचे अधिकार वकील–इ. मुतालक ही पदवी धारण करणाऱ्या व्यक्तीला मिळतील अशी व्यवस्था करण्यात आली. असे अधिकार देतांना अधिकारपत्र पेशव्यांच्या नावाने द्यावे अशी खास विनंती महादजीने एक खास अजीत बादशहाला केली होती. परंतु बादशहाने हे अधिकारपत्र महादजीच्या नावाने दिले.[६३] महादजी जबाबदार अधिकारी असल्यामुळे पेशव्यांच्या नावाने पत्र देण्याची गरज नाही असे बादशहाने सांगितले. साहाजिकच पुण्याच्या मराठा दरबारातील ज्येष्ठ सरदार आणि स्वतः नाना फडणीस या अधिकार पत्रामुज्ळे मनातून दुखावल्या गेले. महादजीला स्वतःलाच सत्ता–लोभ आहे असे वाटून नाना आणि महादजी यांच्यातील संबंध खऱ्याखुऱ्या अर्थाने सौहार्दचे राहिले नाहीत.आणि त्यामुळे मराठा राष्ट्राचे पलिकडे बरेच नुकसान झाले.

महादजीपुढील अडचणी

महादजी मोगल साम्राज्याचा वकील–ई–मुतालक बनला खरा परंतु ही नवीन जबाबदारी म्हणजे काट्याकुट्यातील एक वाट होती. तो एक दिखाऊ मानसन्मान होता. त्यामुळे महादजीला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. वास्तविक महादजीला ही नवीन जबाबदारी स्विकारावयाची

नव्हती परंतु हिंदुस्थानातील एकुण राजकारण लक्षात घेऊन जबाबदारी स्विकारण्याला महादजीस भाग पाडले होते. दिल्लीचा वजीर म्हणून महादजीला बादशहाच्या शत्रुंनाही तोंड द्यावयाचे होते. आणि तो उत्तर हिंदुस्थानात आल्यामुळे जे दुखावल्या गेले होते त्या शत्रूंचाही त्याला समाचार घ्यावयाचा होता. शहा आलमच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन अनेक मोगल सरदारांनी बादशहांविरूद्ध बंडाळी पुकारली होती. त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. '[६४] या कठीण परिस्थितीत त्याला एकनिष्ठ अनुयायी मिळाले म्हणूनच तो या परिस्थितीतून बाहेर येऊ शकला. अंबुजी इंगळे, जिवबादादा बक्षी, लाडोजी देशमुख, रायाजी पाटील हे सत्य जिवलग अनुयायी होते. यातच डी बोईन येऊन सामील झाल्यामुळे त्याचे सैन्यही बलिष्ठ बनले.

बंडाळ्यांचा बंदोबस्त

आग्र्याचा किल्लेदार शुजाउद्दीन पठाण हा महादजीची सत्ता मानीत नव्हता म्हणून महादजीने आग्र्याला वेढा घातला आणि २६ मार्च १७८५ रोजी हा किल्ला जिंकून घेतला. रायगडचा किल्ला जहांगीरखान या रोहिल्याच्या ताब्यात होता आणि म्हणून महादजीने त्याचा पराभव केला आणि किल्ला ताब्यात घेतला. इ. स. १७८५ मध्ये महादजी शिंद्यांनी प्रथम मथुरेजवळ आपली लष्करी छावणी प्रस्थापित केली. त्यामुळे त्यांचा सर्व शत्रूंवर वचक बसला. दिल्लीच्या बादशहाच्यावतीने महादजी नियमितपणे महसूल वसूल करू लागला आणि त्यामुळे राज्याला नियमित उत्पन्न मिळू लागले. महादजीने मोगल साम्राज्याची सेवा करणाऱ्या निरनिराळ्या एकनिष्ठ सरदारांचाही उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला. अफसियाबखन याचा वध झाला. म्हणून त्याच्या कुटुंबियांना महादजीने बरीच आर्थिक मदत दिली. उमरावगीर आणि उनपगीर हे वास्तविक दिल्लीच्या बादशहाचे एकनिष्ठ सेवक परंतु त्यांनी ज्यावेळी मोगलांविरूद्ध बंडाळी पुकारली त्यामुळे महादजीला त्या बंडाळीचा कडक बंदोबस्त करावा लागला. महादजीने गोसावी बंधूंची जहागीर जप्त करण्याकरिता म्हणून केसोपंत या सरदारास पाठवले. त्यावेळी

उमरावगीरने बुंदेल-खंडात केसोपंताचा खून घडवून आणला.'[६५] म्हणून महादजीने देवजी गवळी या दुसऱ्या सरदारांस गोसावी बंधूंचा बंदोबस्त करण्याकरिता बुंदेलखंडात पाठविले. देवाजीने अतिशय चिकाटीने पाठलाग करून गोसावी बंधूंचा पूर्ण पराभव केला. (एप्रिल १७८६) पराभूत गोसावी बंधूंनी अयोध्येच्या नबाबाचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी कॉर्नवॉलिसने आयोध्येच्या नवाबाला पत्र लिहून गोसावी बंधूंना कोणत्याही रितीने संरक्षण देऊ नये आणि महादजीचा राग ओढावून घेऊ नये असे कळविले. अशा रितीने गोसावी बंधूंचा पाडाव झाला. वायव्य दिशेने याचवेळी शीखांनीही बंडाळी चालवली होती. त्या बंडाळीचा बंदोबस्त अंबुजी इंगळे यांनी केला. शीख नेत्यांनी महादजीची मथुरेला भेट घेतली आणि महादजीशी मित्रत्वाचा एक तात्पुरता करार केला. '[६६] परंतु महादजीचे खरे शत्रू राजपुत होते आणि राजपुतांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते.

जयपूरच्या दक्षिणेंला सात मैलावर महादजीने आपली छावणी प्रस्थापित केली. तिथून त्याने जयपूरच्या राजाने तीन कोटी रूपये ताबडतोब द्यावेत असा निरोप पाठवला. शेवटी बऱ्याच वाटाघाटी होऊन ही रक्कम त्रेसष्ट लाखांवर आणण्यात आली. तरीसुद्धा जयपुरचा राजा ही रक्कम देण्यास टाळाटाळ करू लागला. कारण जयपूरच्या राजाजवळ जवाहीरही नव्हते किंवा रोख रक्कम तिजोरीत नव्हती. अशा स्थितीत महादजी शिंद्यांना जयपूरचा जबरदस्तीने ताबा घ्यावा लागला. या सर्व मोहिमेत महादजीला एकही पैसा मिळू शकला नाही. बादशहा आणि महादजी यांची परिस्थिती मोठी चमत्कारिक झाली. महादजीने सैन्याच्या लहान लहान तुकड्या जयपूर शहरातील निरनिराळ्या श्रीमंत सावकारांकडे पाठवून जबरदस्तीने पैसा वसूल करण्याचा प्रयत्न केला.'[६७] परंतु या प्रयत्नामुळेही विशेष पैसा उपलब्ध झाला नाही. शेवटी महादजी आणि मोगल बादशहा यांनी जयपूरची व्यवस्था रायाजी पाटील यांजकडे सोपवून ते जून महिन्यात डीग या शहरी परत आले. नंतर महादजीने मथुरेला कूच केले तर बादशहा

दिल्लीस परत गेला.

महादजीने जयपूर राज्यात अशा रितीने आक्रमण करून जबरदस्तीने पैसा वसूल करावा याचे जयपूरच्या राज्यात अतिशय दु:ख वाटत होते. म्हणून त्याने जोधपूरचा राजा विजयसिंग या राजाशी संगनमत केले. याबरोबर त्याने लखनौला इंग्रजांना सुद्धा मदतं मागितली. परंतु यावेळी कॉर्नवालिस गव्हर्नर जनरल असल्यामुळे त्याने मदत देण्याचे नाकारले. अशा रितीने राजपुतान्यात जयपूर आणि जोधपूर या राज्यांची महादजीविरूद्ध युती निर्माण झाली. आणि त्या युतीचा बंदोबस्त करण्याकरीता महादजीला राजपुतान्यास येऊन पोहोचला. महादजीने यावेळी तह करून त्याकरीता प्रथमतः वाटाघाटी करून हा प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न केला. जयपूरच्या प्रतापसिंग राजाजवळ वीस हजार सैन्य होते.[६८] तर जोधपूरच्या राजाजवळ दहा हजाराचे सैन्य होते. जयपूरच्या राजाने वरकरणी वाटाघाटींचा मोठा धोका निर्माण केला. जयपूर, जोधपूर आणि उदयपूर राज्यांच्या शासकांनी तह अजिबात नको होता. परंतु अनेक कारस्थाने करून त्यांना महादजीला एकटे पाडावयाचे होते. महादजीच्या सैन्यात दुफळी निर्माण करावयाची होती. महादजीच्या सैन्यात हिंदुस्थानची आणि मोगल फौजेचा भरणा होता. हे सैन्य दिल्लीच्या मोगल बादशहाने महादजीबरोबर दिलेले होते. त्यांना मोगल बादशहाबद्दल निष्ठा होती. परंतु महादजीबद्दल त्यांना प्रेम दिलेले होते. त्यांना मोगल बादशहाबद्दल निष्ठा होती. परंतु महादजीबद्दल त्यांना प्रेम वाटणे शक्य नव्हते. यातील बरेचसे सैन्य मोहम्मद बेग हमदानी यांच्या नेतृत्वाखाली होते. हे सैन्य गुप्तपणे राजपुतांना जाऊन मिळाले. त्यामुळे महादजी शिंदे यांची परिस्थिती अतिशय बिकट झाली.

लालसोटची लढाई (जूलै १७८७):

महादजी शिंद्यांना या बातम्या मिळत नव्हत्या किंवा त्यांना या हालचाली कळत नव्हत्या अशातला भाग नव्हे परंतु परिस्थितीच आटोक्याबाहेर गेल्यामुळे महदजीला या परिस्थितीत

काहीच करता येईना. तरीसुद्धा अत्यंत धाडसाने महादजीने २८ जूलै रोजी राजपूत सैन्याच्या दिशेने कूच केले आणि त्यातून महादजी आणि राजपूत यांच्यात लालसोटची लढाई घडून आली. (जूलै १७८७) लालसोटची लढाई खऱ्या अर्थाने निर्णायक ठरली नाही. परंतु युद्धाचा परिणाम म्हणून महादजींना राजपुतन्यातून आपले सैन्य परत बोलविण्याची पाळी आली. लालसोटला महादजीचे सैन्य राजपूतांच्या वेढ्यात सापडले. सैन्य कसे माघारी काढून घ्यावे असा महादजीसमोर प्रश्न निर्माण झाला.[६९] महादजीची लालसोटच्या लढाईत जरी फारशी हानी झाली नाही तरी लालसोटहून माघार घेण्याचा जो प्रसंग उद्भवला त्यामुळे महादजीच्या आतापर्यंतच्या यशाला एक कलंकच लागला असे म्हणावे लागेल.

महादजीने लालसोटच्या लढाईचा वृत्तांत स्वतः नाना फडणीसाला लिहून कळविला. हमदानी ज्यावेळी मोगल बादशहाला सोडून राजपूतांना जाऊन सामील झाला, त्यावेळी राजपुतांची सैन्याची संख्या पन्नास हजारापर्यंत जाऊन पोहोचली. २८ जूलै रोजी लढाईला तोंड लागले आणि दोन्हीही पक्षांनी एकमेकांवर तोफगोळ्यांचा जबरदस्त मारा चालविला. यापैकी एक तोफगोळा हमदानीला लागला आणि तो तिथेच ठार मारल्या गेला आणि त्यामुळे राजपूत सैन्यांची डावी बाजू पूर्णपणे निकामी ठरली. राजपूतांजवळ तीन मोठ्या तोफा होत्या आणि त्यांनी महादजीच्या सैन्यात प्रचंड हानी घडवून आणली. हा तोफांचा मारा संध्याकाळपर्यंत चालू होता. त्यात आमची अतिशय हानी झाली. आमच्या सैनिकांना आणि घोड्यांना पाणी मिळेनासे झाले. तहानेने व्याकूळ झाल्यामुळे आम्हाला भयंकर हाल अपेष्टांना तोंड द्यावे लागले. दुसरे दिवशी सकाळी आम्ही राजपुतांवर हल्ला चढविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते आपल्या छावणीच्या बाहेरच आले नाहीत. अशा रितीने लालसोटच्या लढाईत मराठ्यांचा प्रत्यक्ष जरी पराभव झाला नाही तरी महादजीने मोगली सैन्य त्याला सोडून गेल्यामुळे त्याची परिस्थिती अत्यंत बिकट बनली. यातच शत्रूने महादजींचा आणि राणाखानचा खून करण्याचा प्रयत्न

केला. परंतु या प्रयत्नांमुळे त्यांना यश लाभले नाही.'[७०] महादजीचे तीन चतुर्थांश सैन्य जरी त्याला सोडून गेले तरी डी बोईनच्या नेतृत्वाखालील सैन्य अजून कायम होते. याशिवाय शिंद्यांचे स्वतःचे घोडदळ त्याच्याच ताब्यात होते. परंतु लवकरच या सैन्यात उपासमारीला प्रारंभ झाला. त्यातच त्यांनी पगाराची थकीत रक्कम ताबडतोब द्यावी अशी मागणी केली. या मागण्या पूर्ण न झाल्यामुळे हिंदुस्थानी सैन्याने बैठ्या संपाला प्रारंभ केला. महादजीने त्यांना सैन्यातून काढून टाकले. तेंव्हा ते सैन्य शत्रू पक्षाला जाऊन मिळाले महादजीच्या जीवनात हा मोठाच कठीण प्रसंग होता. सैन्याच्या या पलायनामुळे राजपुतांना अधिकच बळ प्राप्त झाले. महादजीवर केंव्हाही हल्ला होईल आणि महादजीचा पाडाव होईल अशी परिस्थिती निर्माण झाली. अशाही कठीण परिस्थितीत महादजीने आपल्या मनाचा तोल जाऊ दिला नाही. राणा खान याच्या सल्ल्यानुसार महादजीने मछेडीला आपला मुक्काम ठेवला. याचवेळी शत्रूपक्षाच्या काही हस्तकांनी महादजीच्या दारूगोळ्याच्या कोठाराला आग लावली आणि त्यामुळे एकच भडका उडाला. तिथून महादजीने डीग या ठिकाणी आपला मोर्चा वळविला.'[७१] शत्रूला आपल्या छावणीतील कोणतीही रसद किंवा कोणतीही सामुग्री मिळणार नाही अशी त्याने खबरदारी घेतली. मोहिमेमध्ये ज्या स्त्रिया आल्या होत्या त्यांची त्याने ग्वाल्हेरला सुरक्षित रवानगी केली.

अशा रितीने लालसोटच्या पराभवामुळे महादजीला उत्तर हिंदुस्थानात जी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती ती प्रतिष्ठा एकदमच खाली घरसली. मोगल बादशहा शहा आलम याच्याही प्रतिष्ठेला बराच धक्का बसला. महादजीची ही कठीण अवस्था २७ मे १७८७ ते १७ जून १७८८ म्हणजे जवळजवळ १ वर्ष पर्यंत कायम राहिली. परंतु हळूहळू महादजीने याही कठीण परिस्थितीतून स्वतःच्या हिमतीवरच मार्ग काढला. पलिकडे महादजीला मछेडीचा राजा राव राजा याने बरीच मदत केली.

महादजीने कठीण परिस्थितीतून कसा मार्ग काढला

लालसोटची लढाई ही तिसऱ्या पानिपताइतकी भयंकर ठरली नाही हे महादजीचे आणि मराठ्यांचे भाग्य समजले पाहिजे. परंतु या पराभवामुळे महादजींचे धैर्य यत्किंचितही कमी झाले नाही. या परिस्थितीतून कसा मार्ग काढता येईल याचाच विचार महादजी रात्रंदिवस करू लागला. महादजी लालसोटच्या वेढ्यात सापडलेला पाहून त्याच्या शत्रूंनी सर्वत्र उचल खाल्ली. नजीबखान रोहिल्याचा नातू पठाणराजा गुलाम कादीर याने या संधीचा फायदा घेऊन मराठ्यांना गंगेच्या दुआबातून पिटाळून लावले आणि सरळ त्याने दिल्लीकडे कूच केले. दिल्लीतील मराठा सरदार शितोळे आणि मोगल सरदार निजामुद्दीन यांचा गुलाम कादीरने पराभव केला आणि त्याने ३० जूलै १७८८ रोजी दिल्लीचा ताबा घेतला. दिल्लीचा बादशहा शहा अझानुमूलक याने महादजीकडे मदतीकरिता विनवणी केली.[७२] त्या विनंतीनुसार महादजी शिंदे यांनी अशाही कठीण परिस्थितीत अंबुजी इंगळे या सरदारास बादशहाच्या मदतीस पाठविले. परंतु मध्यंतरीच्या काळात गुलाम कादीर याने धमक्या देऊन बादशहास महादजीची मदत घेण्यापासून परावृत्त केले. गुलाम कादीरच्या धमकावणीने शहा अलम इतका भयभीत झाला की त्याने महादजीला मदतीकरीता लिहिलेले पत्र रद्द केले. अशा परिस्थितीत अंबुजी इंगळे या मरठा सरदारास दिल्ली वरून हात हालवित परत यावे लागले. (१४ नोव्हेंबर १८७८) आपल्या मदतीचा इन्कार करावा आणि अंबुजी इंगळे यांची भेटसुद्धा घेऊ नये याचे महादजीला मनस्वी दुःख वाटले. आणि तो दिल्लीच्या घडामोडींबाबत उदासीन बनला. लालसोटच्या वेढ्यातून आपले अंग कसे काढून घेता येईल यावरच त्याने आपले सर्व लक्ष केंद्रित केले. लालसोटच्या वेढ्यात महादजी अडकलेले पाहून दिल्लीत असलेल्या मराठ्यांच्या वकीलाने म्हणजे हिंगव्यांनी हे वृत्त पुण्याला नाना फडणीसास कळविले. महादजीने स्वतःसुद्धा एक विस्तृत पत्र लिहून आपली परिस्थिती नाना फडणीसास कळविली. आणि द्रव्य व सैन्याची मदत ताबडतोब पाठवावी अशी त्याने खास विनंती केली. यावेळी टिपु सुलतानविरूद्धची यशस्वी मोहिम

आटोपून मराठा सैन्य नुकतेच पुण्यास येऊन पोहोचले होते. नाना फडणीसाने संकटाचे स्वरूप ओळखून पाच लाख रूपये ताबडतोब पाठविले. आणि त्याच बरोबर तुकोजी होळकर आणि अलिबहादूर यांनी आपल्या निवडक सैन्यनिशी महादजीच्या मदतीला ताबडतोब जावे असा आदेश दिला. तुकोजी बरोबर अक्कलकोटचे शहाजी भोसले, मानाजी गायकवाड इत्यादी सरदारही महादजीच्या मदतीस जाणार होते. ८ सप्टेंबर रोजी कुच करून एक महिन्याच्या आत तयांनी महादजीच्या मदतीस जाऊन पोहोचावे अशी योजना करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात या दोघांनी उत्तरेस पोहोचण्यास जवळजवळ एक वर्ष घेतले. ६ नोव्हेंबर १७८८ या तारखेला मथुरा या ठिकाणी अलिबहादूर आणि महाजी शिंदे यांची भेट घडून आली. तर एप्रिल १७८९ मध्ये तुकोजी होळकर आणि महादजी शिंदे यांच्यात भेट घडून आली. तुकोजी-महादजी यांच्यात वैरभावना आहे आणि तुकोजी अशा संकटप्रसंगी सुद्धा वैरभावना विसरणार नाही असे नाना फडणीसाला कधीही वाटलें नाही. तुकोजीला उत्तरेतील राजकारणाची पूर्ण माहिती आहे म्हणून ाने त्याची निवड केलेली होती. थोडक्यात नाना फडणीसाची तुकोजीची निवड चुकली असेच समजावे लागेल दुसरा सरदार अलिबहादूर. उत्तरेच्या स्वारीवर त्याची केलेली निवड योग्य आहे असे सर्वांनाच वाटले. खुद्द महादजी शिंदे यांनीसुद्धा अलिबहादूरची निवड योग्य आहे असे उद्‌गार काढले.'[७३] अलिबहादूर तरूण होता आणि तो मुसलमान असल्यामुळे शहा आलम आणि अलिबहादूर यांच्यात योग्य ते सहकार्य प्रस्थापित होईल अशी मराठ्यांना आशा वाटत होती. दुर्देवाने अनुपंगीर गोसाव्याला अलिबहादूरने आश्रय दिल्यामुळे महादजीचे आणि अलिबहादूराचे संबंध बिघडले. उत्तरेत येतांना तुकोजी होळकराने महादजीशी सल्लामसलत न करता राजपूतांशी स्वतंत्र वाटाघाटी केल्या यानेही महादजी दुखावल्या गेला. राजपूत शिंद्याबद्दल ज्या तक्रारी करीत होते त्या तक्रारी खऱ्या आहेत अशी तुकोजीने भूमिका घेतली आणि म्हणून महादजी मनातून दुखवाल्या गेला. थोडक्यात, नाना फडणीसाने पाठविलेल्या

लष्करी मदतीचा आपल्याला उपयोग होईल अशी जी महादजीला आशा वाटत होती ती आशा खोटी ठरली. यातच स्वतः नाना फडणीसाने लक्ष्मण संभाजी या आपल्या वकीलास राजपूतांकडे महादजीशी सल्ला–मसलत न घेता वाटाघाटींकरिता पाठविल्यामुळे महादजी अधिकच दुखावल्या गेला. शेवटी इतर कोणाच्याही मदतीवर अवलंबून राहण्याऐवजी महादजीने स्वतःच्या हिंमतीवर मार्ग काढण्याचे ठरविले. याकरिता महादजीने पंजाबातील शिखांशी मैत्री केली. राजपूत आणि गुलाम कदीर यांनी पानिपतपूर्वीच्या मार्गाचा अवलंब करून महादजीवर मात करण्याचा प्रयत्न केला. राजपूतांनी अफगाणिस्तानचा राजा तिमुरशहा याला हिदुस्थांनावर स्वारी करण्याकरिता निमंत्रित केले. तिमुरशहाने आपल्याच राज्यात इतक्या अडचणी आहेत की त्या सोडून मी हिंदुस्थानात स्वारी करण्याकरितां येऊ शकत नाही असे कळविले. महादजी या सर्व परिस्थितीवर नजर ठेऊन होता. दिल्लीचा मोगल बादशहा आलम याने आपल्या जवळ येऊन राहावे अशी महादजीने खास विनंती केली. बादशहाला आणण्याकरिता म्हणून अंबुजी इंगळे या सरदाराला दिल्लीस पाठवण्यात आले. बादशहाने महादजीचा सल्ला ऐकला असता तर बादशहाचे कल्याणच झाले असते.'[७४] गुलाम कांदीरने पलीकडे बादशहाला जे अपमान सहन करण्यास भाग पाडले. आणि ज्या हालअपेष्टा बादशहाला सहन कराव्या लागल्या त्या सर्व गोष्टी टळल्या असत्या. दुर्देवाने शहा आलमने दिल्लीतच राहाणे पसंत केले आणि त्यामुळे पलीकडे अतिशय वाईट परिस्थितीला बादशहाला सामोरे जावे लागते.

यानंतर महादजीने चंबळच्या दक्षिणेला आपली छावणी प्रस्थापित केली. येथून सैन्याच्या हालचाली करून महादजीने हळूहळू आपली परिस्थिती सावरून धरली. शिंद्याचे जहागिरीचे गांव म्हणजे जामगांव. त्याने नवीन सैन्य भरती करविली. यातच राणा खान, रणजिंतसिंग जाट आणि मछेडीचा राव राजा यांनी आपला गेलेला मुलूख परत मिळविण्याला प्रारंभ केला. राणाखानाने भरतपूरनजीक इस्माईल बेगचा पराभव केला. महादजीच्या दृष्टीने हा विजय

महत्वाचा ठरला. कारण या विजयामुळे महादजीला सर्व परिस्थिती हळूहळू अनुकूल होऊ लागली. याचवेळी देवजी गवळी, डीबॉयन आणि रायाजी पाटील यांनी वेगाने समोर कूच करून मथुरा जिल्हा आपल्या ताब्यात घेतला आणि यमुना नदी ओलांडून त्यांनी गुलाम कादीरचा पाठलाग चालविला. वाटेत जातांना त्यांनी उमरावगीर गोसावी यास पकडले आणि तुरूंगात टाकले. आफ्यानजीक पठाणांनी मराठा सैन्याला जबरदस्त विरोध केला. परंतु याच वेळी जिवबादादा बक्षी यांचे सैन्य येऊन सामील झाल्यामुळे त्यांचा विरोध मोडून पडला. आपली जहागीर वाचविण्याकरिता गुलाम कादीरने माघत्तर घेतली आणि याचा फायदा घेऊन मराठ्यांनी बागडेहरा या ठिकाणी इस्माईल बेगचा जबरदस्त पराभव केला. (१६ जून १७७८) या सैन्याने महादजी शिंद्यांना ऐनवेळी धोका दिलेला होता. ते मागे राजपूतांना जाऊन सामील झालेले होते. हे विश्वासघत्तकी सैन्य या लढाईत पूर्णपणे ठार मारले गेले. नदी ओलांडतांना इस्माईल बेगसुद्धा पाण्यात बुडून मरण पावला. डी बोईनने सैन्याची जी रचना केलेली होती त्यामुळे महादजीला बागडेहरच्या लढाईत प्रचंड यश लाभले.[७५] या लढाईमुळे महादजीला हळूहळू सर्व परिस्थिती अनुकूल होऊ लागली. शिखांनी महादजीला प्रचंड पाठिंबा दिला. चंबळ आणि सतलज नद्यांमधील मुलूख पुन्हा महादजीच्या ताब्यात आला. अशा रितीने अडचणीत सापडलेल्या महादजीला यशाची चिन्हे मोठ्या प्रमाणात दिसू लागली. एका वर्षाच्या आतच महादजीने विपरीत परिस्थितीवर मात करावी ही गोष्ट आश्चर्यकारक होती. जामगावला त्याने जी नवीन सैन्यभरती केली त्यामुळेच महादजीला इतक्या लवकर यश मिळाले ही गोष्ट मात्र खरी. गोसावी बंधु पुन्हा महादजीला येऊन सामील झाले. १७८८ च्या जून महिन्यापर्यंत महादजीची स्थिती पुन्हा प्रबळ बनली. वास्तविक ते याच वेळी मोगल बादशहाच्या मदतीला जाऊ शकले असते परंतु संकट काळामध्ये बादशहाने महादजीला ज्या प्रकारे वागविले होते त्यामुळे महादजी दुखावल्या गेला होता. अशा स्थितीत बादशहाने स्वतःहून बोलाविल्याशिवाय बादशहाच्या

मदतीला जावयाचे नाही असे महादजीने ठरविले. या कालावधीमध्ये दिल्लीच्या बादशहाची परिस्थिती अतिशय केविलवाणी झाली होती. गुलाम कादीरने बादशहाला त्यांच्याच राजवाड्यात नजरकैदेत ठेवले होते. इतकेच नव्हे तर त्याने बादशहाला आणि राजवाड्यातील इतर राजपुत्रांना आंधळे करून टाकले.'[७६] थोडक्यात गुलाम कादीरने बादशहाचे आणि त्याच्या नातेवाईकांचे अनन्वित हाल चालविले होते.

गुलाम कादीरने मीरबक्षीचे पद आपल्याला कळावे अशी मागणी केलेली होती. मराठ्यांना आपण उत्तर हिंदुस्थानातून पूर्णपणे हाकलून देऊ असे त्याने बादशहाला सांगितले. ५ सप्टेंबर रोजी तो दोन हजार सैन्यानिशी दिल्ली शहरात आला आणि बादशहाकडे त्याने अनेक मागण्या केल्या. त्यात अमीर उल-उमरा ही पदवी आपणाला मिळावी या मागणीचा अंतर्भाव होता. काही दिवसांनी त्याने अलिगड जिंकून घेतले. १ जूलै १७८८ रोजी इस्माईल बेग हा गुलाम कादीरला सामील झाला. बादशहाची संपत्ती लुटून घेण्याचा त्यांनी बेत केला. महादजीला त्यावेळी कटाची माहिती मिळाली म्हणून त्याचे खळोजी पाटील आणि भगवंतराव शिंदे यांना निवडक सैन्यनिशी बादशहाच्या मदतीला पाठविले. परंतु बादशहाने घाबरून जाऊन त्यांना प्रतिसाद न दिल्याने हे दोघेही आपल्या सैन्यानिशी फरिदाबादच्या दिशेने निघून गेले. अशा रितीने गुलाम कादीर आणि इस्माईल बेग या दोघांनाही अत्याचार करण्याचा पूर्ण वाव मिळाला. त्यांच्या या कृष्णकारस्थानात मोहम्मदशहाच्या दोन राण्या मलिका झामानी आणि साहिबामहाल या दोघीही सामील होत्या. आपला नातू बिद-बख्त याने दिल्लीचा राजा बनावे अशी त्याची इच्छा होती. आणि त्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविले होते. गुलाम कादीरच्या अत्याचारापुढे शहा आलमचे काही चालेना आणि म्हणून त्याने गुलाम कादीरच्या सर्व मागण्या मान्य केल्या, आपला मुलगा सुलतान शुकाव्ह याला गुलाम कादीरकडे ओलीस ठेवण्यास त्याने संमती दिली. गुलाम कादीरने बादशहाच्या राजवाड्याचा ताबा घेतला आणि शहा आलमला एका मशिदीत

नजरकैदेत ठेवण्यात आले. यानंतर राजवाड्याची यथेच्छ लुट करण्यात आली. गुलाम कादीरने त्यानंतर आपला मुक्काम राजवाड्यातच ठेवला. वचन दिल्याप्रमाणे बिदर बख्तला राजपद देण्यात आले. यानंतर राज्याच्या इतर नातेवाईकांचा पद्धतशीर छळ करण्यात आला. आणि शेवटी तर शहा आलमला आंधळे बनविण्यात आले. राजवाड्याचा अन्नपुरवठा बंद करण्यात आला. राजपुत्रांना फटक्याची शिक्षा देण्यात आली. संपत्ती मिळविण्याच्या आशेने सर्व राजवाडा खणून काढण्यात आला. अशा रितीने अनेक दिवसपर्यंत मोगल बादशहा आणि त्याचे नातेवाईक यांना छळाला तोंड द्यावे लागले.'[७७] यातच राजवाड्यात मिळालेल्या लुटीची वाटणी कशी करावी यावर गुलाम कादीर आणि इस्माईल बेग यांच्यात गंभीर मतभेद निर्माण झालेले होते. लुटीची संपत्ती आपल्या एकट्यालाच मिळावी अशीच पावले गुलाम कादीरने उचलली. शेवटी दोघामधील मतभेद इतक्या पराकोटीला गेले की शेवटी संधी साधून बातम्या बाहेर येत नव्हत्या. किंबहूना अशा बातम्या बाहेर जाणार नाहीत अशीच खास व्यवस्था गुलाम कादीरने केलेली होती. परंतु बादशहाच्या छळाच्या बातम्या हळूहळू झिरपत झिरपत महादजी पर्यत जाऊन पोहोचल्या आणि त्या बातम्या ऐकताच महादजीचे अंतःकरण द्रवून गेले. मोगल बादशहावर असा प्रसंग यावा याचे त्याला मनस्वी दुःख झाले. म्हणून त्याने राणाखान आणि जिवबादादा बक्षी या दोघांना सैन्यासहित दिल्लीकडे रवाना केले. २८ सप्टेंबर रोजी मराठ्यांनी जुन्या दिल्लीवर ताबा मिळविला. याच वेळी ईस्माईल बेग आणि बेगम सुमरू हे आपल्या सैन्यासहीत जिवबादाद बक्षीस येऊन सामील झाले. सर्वांनी मिळून राजवाड्यास वेढा दिला. १० ऑक्टोंबर रोजी क्ल्यातील बारूदीस अचानक आग लागून फार मोठा स्फोट झाला आणि त्यामुळे गुलाम कादीरने लाल किल्ल्यातून पलायन केले. ११ ऑक्टोंबर रोजी विजयी मराठा सरदारांनी किल्ल्यात प्रवेश केला त्यावेळी बादशहा आणि त्याचे निकटचे नातेवाईक कित्येक दिवसाचे उपाशी आहेत असे त्यांना आढळून आले. राणोजी शिंदे, राणा खान इत्यादी मराठा

सरदारांनी बादशहाचे सांत्वन केले आणि पुन्हा दिल्लीला शहा आलमच्या राजवटीस प्रारंभ झाला. गुलाम कादीर दिल्लीतून पळून गेला. गंगेच्या खोऱ्यातून तो मिरत शहरी पोहोचला. मिरतच्या किल्ल्याला वेढा घालण्यात आला. हा वेढा सहा आठवडेपर्यंत चालू होता. शेवटी किल्ल्यात राहणे अशक्य आहे हे पाहून गुलाम कादीर किल्ल्यातून निसटला आणि त्याने शामलीजवळ एका ब्राम्हणाच्या घराचा आश्रय घेतला.[७८] या ब्राम्हणाने हे वृत्त अलिबहादूर यास कळविले. अलिबहादूरने त्वरित येऊन गुलाम कादीर यास पकडे आणि त्याला मथुरा येथे महादजींच्या छावणीत आणण्यात आले. बगुलाम कादीरला कोणती शिक्षा द्यावी असा महादजीसमोर प्रश्न निर्माण झाला. यावेळी बादशहाने गुलाम कादरीला त्याच्या पापाचे प्रायश्चित मिळालेच पाहिजे असा आग्रह धरला आणि म्हणून गुलाम कादीरला आंधळे करून त्याचा वध करण्यात आला. (४ मार्च १७८९). अशा रितीने कादीरला योग्य ते शासन झाले आणि महादजी शिंदे याचे उत्तर हिंदुस्थानात पुन्हा प्रभुत्व प्रस्थापित झाले.

महादजी शिंद्यांची उत्तरेतील कामगिरी

महादजी शिंद्यांना दिनांक २७ मे १७८७ ते १७ जून १७८८ या कालावधीत उत्तर हिंदुस्थानात अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. हा सर्व काळ त्यांना निराश्रित अवस्थेत घालवावा लागला. परंतु हिम्मत न हारता महादजीने या परिस्थितीवर मात केली आणि शहा आलमला पुन्हा दिल्लीच्या सिंहासनावर बसविले. अशा रितीने महादजीने उत्तर हिंदुस्थानातील त्याच्यावर सोपविण्यात आलेली कामगिरी पूर्ण केली. या साम्राज्याची नीट व्यवस्था लावण्याचे कार्य अजून करावयाचे होते. त्याकडे महादजीने आपले लक्ष वळविले. दुर्दैवाने या त्याच्या कार्यात नाना प्रकारच्या अडचणी आल्या. अलिबहादूरावर तर हिंदुस्थानची जबाबदारी सोपवावी आणि दक्षिण हिंदुस्थानात आपण निघून जावे असे महादजीने सुचविले.[७९] परंतु नाना फडणीसास अननुभवी अलिबहादूराकडे एवढी मोठी जबाबदारी सोपवावी ही गोष्ट अजिबात

पसंत पडली नाही. तुकोजी होळकरांपेक्षा अलिबहादूर बरा असे महादजीस वाटत होते. परंतु नानाने त्यास संमती न दिल्याने ती सर्व योजनाच मागे पडली. त्यातच अलिबहादूर, तुकोजी होळकर आणि महादजी शिंदे यांच्र्यात दिवसेंदिवस वितुष्ट येत गेले आणि म्हणून महादजीने स्वतच्याच बळावर उत्तर हिंदुस्थानची व्यवस्था लावण्याचे ठरविले.[८०] यातच इंग्रजांचा मत्सर भाव पुन्हा जागृत झाला आणि त्यांनीही महादजीस अस्वस्थ करून सोडले.

महादजी इंग्रज मतभेद उत्तर हिंदुस्थानात महादजीला जे अपूर्व यश मिळाले. त्याने इंग्रजांच्या मनात मत्सर जागृत केला. ब्राऊन, मॅलेट, कर्कपट्रिक, जेम्स ॲंडरमन इत्यादी इंग्रज अधिकारी महादजीविरूद्ध नुसते जळफळत असत. यातच दिल्लीच्या बादशहाचा प्रतिनिधी म्हणून महादजीने बंगाल प्रातांच्या दिवाणी थकीत रकमेची मागणी इंग्रजांकडे केली. यामुळे तर इंग्रजांना महादजीचा द्वेष वाटू लागला. याचवेळी नागपूरकर भोसले इंग्रजांकडे बंगालच्या चौथाईच्या रकमेची सतत मागणी करीत होते. त्याही मागणीला महादजीने पाठिंबा दिला. आणि या दोनही मागण्या ताबडतोब मान्य कराव्यात असे इंग्रजांना त्याने कळविले. इंग्रजांनी आम्ही पेशव्याना आणि तुम्हाला दिलेला सर्वाधिकार अजिबात मानीत नाही असे महादजीस स्पष्टपणे कळविले. महादजीने या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यास आम्ही ते शत्रुत्वाचे कृत्य समजू असे कळविण्यास इंग्रजांनी मागेपुढे पाहिले नाही. महादजीची या प्रश्नांवर लढण्याची तयारी नसल्याने त्याने तात्पुरते स्पष्टीकरण करून हे प्रकरण तात्पुरते मिटविले. परंतु मनातून महादजी शिंदे अतिशय दुखावल्या गेला. इंग्रजांशी जबरदस्त संघर्ष करण्याची तयारी त्याने चालविली. शीख, अफगाण, टिपू सुलतान आणि हिंदुस्थानातील अन्य सत्ता एकत्रित येऊन त्यांनी इंग्रजांविरूद्ध एक फळी उभारावी अशी त्याची कल्पना होता. दुर्दैवाने त्याच्या या प्रयत्नांना विशेष प्रतिसाद न मिळाल्याने ही योजना फलद्रूप झाली नाही.

अलिबहादूर आणि महादजी यांच्यातील वाढते वितुष्ट

वास्तविक नाना फडणीसाने तुकोजी होळकर आणि अलिबहादूर यांना महादजीला मदत करण्याकरिता पाठविले होते. परंतु महादजीला त्या दोघांची मदत तर झाली नाहीच उलट त्याच्या उपस्थितीमुळे अनेक नवीन प्रश्न महादजीसमोर निर्माण झाले महादजीचा उत्तर हिंदुस्थानातील कारभार आतापर्यंत एकदिलाने आणि एक हाती चाललेला होता.[८१] परंतु पेशव्यांनी आपले प्रतिनिधी म्हणून या दोघांना पाठविल्यामुळे आणि त्यातही होळकर–शिंदे या दोन घराण्यात पूर्वापार वैर चालत आल्याने महादजीच्या कारभारात नवीनच समस्या निर्माण झाली. अलिबहादूर हा राजकिय उलाढाली करण्यामध्ये अतिशय प्रवीण होता. महादजी अत्यंत अडचणीत असल्याने आणि दक्षिण हिंदुस्थानात त्यावेळी इतर कोणतेही मराठे सरदार उपलब्ध नसल्याने या दोघांची नानाने निवड केली आणि ती त्याची फार मोठी घोडचूक ठरली. या दोन पैकी अलिबहादूरची निवड महादजीला प्रारंभी अतिशय पसंत पडली होती. कारण अलिबहादूर खूद्द पेशवे घराण्यातला होता आणि शिवाय तो मुसलमान असल्यामुळे उत्तरेतील मुसलमान राजकारण सांभाळण्याच्या दृष्टीने त्याचा अतिशय उपयोग होईल असे महादजीस वाटत होते. परंतु हे त्याचे मत पुढे टिकले नाही. अलिबहादुरच्या सैन्याचा खर्च महादजीने द्यावा असेही नाना फडणीसाने महादजीस कळविले. परंतु दुर्दैवाने महादजी जवळ पैसा अजिबात नसल्याने तो अलिबहादूरला एक पैसाही देऊ शकला नाही. यामुळे अलिबहादूरने बुंदेलखंडात जावे आणि त्या ठिकाणी मराठ्यांविरूद्ध चाललेली बंडाळी त्याने मोडून काढावी अशा प्रकारच्या सुचना नाना फडणीसाने दिलेल्या होत्या. या सुचनांचा उपयोग करून तुकोजी होळकर आणि अलिबहादूर हे स्वतंत्रपणे आपल्या हालचाली करतील आणि महादजीच्या आज्ञेत ते राहणार नाहीत. हेच जणू नाना फडणीसाने यावरून दर्शविले होते. यामुळे मराठे एक नाही हे सर्वांना उत्तर हिंदुस्थानात कळून चुकले आणि त्यामुळे महादजीच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला. यातच महादजीने उत्तर हिंदुस्थानात जो नवीन मुलूख जिंकला त्यात आम्हाला वाटा मिळाला

पाहिजे अशी मागणी तुकोजी होळकराने केली. यामुळे महाजी आणि तुकोजी यांच्यात कटू वादविवादाला प्रारंभ झाला. त्यातच महादजी शिंदे १७८९ च्या जून-जुलै महिन्यात एकाएकी आजारी झाले आणि त्याने तर परिस्थिती अधिकच बिघडली. आपल्या शत्रुनेच आपल्यावर कसल्याशा मंत्रविद्येचा वापर केला असेच महादजीला आणि त्याच्या भोवतालच्या सर्वसामान्य लोकांना वाटू लागले. अधिक चौकशीकरिता या प्रकरणाच्या मुळाशी गोसावी बंधू आहेत असे आढळून आले. गोसावी बंधू आणि अलिबहादूर यांनी आपसात संगनमत करून महादजी विरूद्ध गुप्त कट केलेला आहे असा पुरावाही आढळून आला. यामुळे महादजीने गोसावी बंधूना पकडण्याचे आदेश जारी केले. घाबरून जाऊन गोसावी बंधुपैकी एका भावाने म्हणजे हिम्मत बहादुर अलिबहादूरचा आश्रयम घेतला. म्हणून महादजीने गोसावी बंधूंना आपल्या स्वाधीन करावे अशी मागणी अलिबहादूरकडे केली. यावर अलिबहादूरने मी पेशव्यांचा नोकर असल्यामुळे तुमची आज्ञा पाळणार नाही असे उघड उघड उत्तर दिले आणि निर्णयाकरिता हा मामला त्याने पुण्याकडे निर्दिष्ट केला. अशा रितीने अलिबहादूरने कोणाच्या आज्ञा पाळाव्यात, महादजीच्या की पेशव्यांच्या असा मोठाच गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झाला. तुकोजी होळकरांने या प्रश्नावर अलिबहादूरास पाठिंबा दिला आणि त्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली. [८२] गोसावी बंधूच्या प्रश्नात पेशव्यांची प्रतिष्ठा गुंतलेली आहे तुकोजीने याचवेळी जाहीर केले. दिल्लीवन परस्परविरोधी बातम्या येत असल्याने यातील सत्य काय हे जाणणे नाना फडणीसाला कठीण होऊन बसले. प्रथमतः जरी त्याने अलिबहादूरास पाठिंबा दिला तरी कालांतराने नानालाही खरी परिस्थिती उमगून आली आणि म्हणून त्याने अलिबहादूरने गोसावी बंधूना महादजीच्या स्वाधीन करावे असे निक्षून कळविले. याचबरोबर तुकोजी होळकराने महादजीचे नेतृत्व मान्य करावे असेही नानाने तुकोजीस कळविण्यास मागे पुढे पाहिले नाही. दुर्दैवाने या प्रकरणामध्ये महादजी आणि नाना यांच्यात जो संशय निर्माण झाला तो मात्र शेवटपर्यंत गेला नाही. कालांतराने अलिबहादूर

याने जयपूर आणि जोधपूर या राजपुत राज्यांच्या मदतीने आपल्या विरूद्ध एक गुप्त कट केलेला आहे असे महादजीस आढळून आले. १७९० मध्ये ज्यावेळी महादजीने राजपूतांविरूद्ध मोहिम उभारली त्यावेळी सुद्धा अलिबहादूर या मोहिमेत सामील होण्याला विशेष उत्सुक नव्हता. नाना फडणीसाचा पाठींबा असल्याशिवाय अलिबहादूर किंवा तुकोजी होळकर अशी कारस्थाने करू शकणार नाहीत असे महादजीस वाटत होते आणि ते त्याने नाना फडणीसासही कळविले. अलिबहादूराने दोन वर्षे पर्यंत गोसावी बंधूना पाठिंबा दिला शेवटी कंटाळून जाऊन या दोघांनाही नानाने दक्षिण हिंदुस्थानात परत बोलवावे अशी महादजीने मागणी केली. परंतु नानाने ही मागणी मान्य केली नाही.'[८३] यामुळे महादजीचे आणि मराठा राष्ट्राचे फार नुकसान झाले. उत्तर हिंदुस्थानातल्या सर्व शासकांना मराठ्यांमधील या दुहीची पूर्ण कल्पना आली. बुंदेलखंडात जाण्याऐवजी अनेक दिवसपर्यंत अलिबहादूर जयपूरनजीक घिरट्या घालत होता. त्याच्याजवळ पैसे शिल्लक नव्हते. गोसावी बंधुसुद्धा त्याला मदत करण्याच्या परिस्थितीत नव्हते. शेवटी अलिबहादूरने तुकोजी होळकरांकडे कर्जाची मागणी केली.

दिल्लीतील मोगल दरबारातील महादजी शिंदे यांची महत्वपूर्ण कामगिरी

माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीत महादजी शिंदे, तुकोजीराव होळकर, विसाजीपंत बिनीवाले वगैरे सरदारांची मदत घेऊन दिल्लीचा बादशहा शहाअलम दिल्लीस येऊन सन १७७२ मध्ये तख्तनशीन झाला. त्यानंतर नारायणराव पेशव्यांचा खून, दादासाहेबांचे राजकारण, बारभाईचे कारस्थान, दादासाहेबास हाताशी धरून इंग्रजांनी गुजरात, माळवा व कोंकण ह्या ठिकाणी मराठ्यांवर केलेला उठाव, त्यामुळे सालबाईच्या तहापर्यंत म्हणजे इ. स. १७७२ ते १७८३ पर्यंत मराठ्यास दिल्लीच्या राजकारणात लक्ष देण्यास फुरसत सापडली नाही. ह्या काळात मिर्झा नजफखान हा बादशहाचा वजीर होता. या वजिरास अयोध्येचा नबाब व इंग्रज यांचा पाठींबा होता. इंग्रज-मराठे युद्ध संपल्यावर इंग्रज प्रबळ असल्याचे एतद्देशीय सत्ताधीशास

कळून चुकले. इंग्रज हे व्यापारी निमित्ताने हिंदुस्थानात येऊन येथील एक सत्ताधीश झाले. त्याचे कारण त्यांची कवायती फौज होय. हे एतद्देशियांनी हेरले आणि आपल्या फौजा कवायती असाव्यात म्हणून त्यांनी युरोपियन साहसी सेनापती आपल्या नोकरीस ठेवले. मिर्झा नजफखानानेही हाच कित्ता गिरवला. मिर्झा नजफखान हा इराणच्या राजवशंयातील शूर उमराव होता. त्याने मराठ्यांशी मैत्री संपादन करून मोगल बादशाहीचे नष्ट झालेले वैभव पुन्हा प्राप्त करण्यासठी शीख, जाट, रोहिले वगैरे बादशहाचे शत्रुंचा मोठ्या धडाडीने पराभव केला. नजफखानास ब्रिटिशांचा सहवास लाभल्यामुळे कवायती फौजेच्या शिक्षणाकडे तो आकृष्ट झाला. ऐन उमेदीत इंग्रजी फौजांशी सामने देऊन नंतर त्याने त्याजशी हातमिळवणी करून कवायती शिक्षण आत्मसात केले होते.'[८४] त्याने आपले सर्व लक्ष बंदुकधारी सैनिक तयार करण्यासाठी वेचले. दहा हजार बंदुकधारी सैनिक युरोपियन तंत्राने तयार केलेले त्याच्या पदरी होते, तसेच वजनदार तोफाही होत्या आणि ह्यांना मदत म्हणून नामवंत घोडेस्वारांची पलटणही त्याने तयार केली होती. आपल्या सैनिकांस कवायती शिक्षण मिळावे म्हणून त्याने बादशाही सेवेत काऊंट डी मोडॅवे व रेने मॅडेक नावाचे फ्रेंच व वॉल्टर रेनहार्ट उपनांव समरू नावाचा जर्मन ह्या सेनानीस प्रवेश देऊन त्यांचा उपयोग करून घेतला. शिवाय आपल्या मर्जीतील हुशार अशा मोगल सेनानींनाही याने बादशाही सेवेत घेतले होते. त्यापैकी अफासियाबखान नावाचा सरदार त्याचा मानलेला पुत्र, मिर्झा शफी हा त्याच्या बहिणीचा मुलगा आणि महम्मद बेग हमदानी, आग्र्याचा किल्लेदार हे होत. त्यावेळी अब्दुल अहमदखान नावाचा एक सरदार बादशहाजवळ नायब वजीराचे काम करीत होता. बादशहाची अहमदखानावर पुष्कळ मर्जी होती आणि अहमदखानाचे व नजफखानाचे वाकडे होते. त्यामुळे बादशहा शहाअलम हा आपला वजीर नजफखान याच्या वर्चस्वास कंटाळला. शहाअलम बादशहा हा मराठ्यांच्या मर्जीने राहण्यास उत्सुक होता आणि वारंवार तो बोलून दाखवी की, महादजी शिंदे किंवा

हरिपंत फडके यासारखा एक फौजबंद मराठा सरदार सतत दिल्लीस रहावा आणि मराठ्यांनी बादशहास दरमहा २ लक्ष रूपये देऊन करोडीची स्थळे हस्तगत करावी. ही परिस्थिती सन १७८० मध्ये होती. परंतु यावेळी मराठे व इंग्रज यामध्ये नेकीनं युद्ध चालू असल्यामुळे मराठ्यास हे कार्य पत्करणे शक्य नव्हते. दिनांक ६ एप्रिल १७८२ रोजी नजफखान मृत्यू पावला. आणि पुढील महिन्यात सालबाईचा तह पुरा होऊन पहिले इंग्रज-मराठे युद्ध थांबले. तेंव्हा महादजी शिंदे यांनी दिल्लीच्या राजकारणाकडे लक्ष पुरवण्यास अवसर मिळाला. बादशहास सन १७७२ त दिल्लीस आणून तख्तनशीन केल्यावेळेपासून महादजी शिंद्यांच्या मनात दिल्लीचा कारभार आपल्या ताब्यात घ्यावा असे होते पण वर सांगितल्याप्रमाणे सालबाई तहापर्यंत महादजींना दिल्लीच्या राजकारणाकडे पाहण्यास फुरसत नव्हती. ह्या संधीचा फायदा मिर्झा नजफखान याने घेतला. पण मिर्झा नजफ ६ एप्रिल १७८२ मध्ये निवर्तल्यानंतर दिल्लीच्या बादशहाने महादजीस दिल्लीचा कारभार हाती घेण्याची विनंती केली. बादशहा शहाअलम महादजींना दिल्लीस आणण्यास एवढा उतावीळ झाला की, त्याने त्यावेळी दिल्ली दरबारी असलेले मराठ्यांचे वकील हिंगणे यास महादजीस दिल्लीस येण्यास आवर्जून लिहिण्यास सांगितले. त्याप्रमाणे हिंगणे यांनी पाटील बाबास लिहिले, ही वेळ अशी आहे की, इकडे येण्याने तुम्हाला किर्तीच नव्हे तर पैसाही मिळेल.

मिर्झा नजफच्या पश्चात कारभारासंबंधी वाटाघाटी करण्यासाठी मिर्झा शैफी अफरासियाब खान आणि आग्र्याचा किल्लेदार महंमदबेग हमदानी हे सर्व एकत्र आले आणि त्यांनी ठरविले की, मिर्झा शफीनं वजिरीचा कारभार करावा, परंतु महंमदबेग हमदानीचे व इतर सरदारांचे मत विरूद्ध पडले.[८५] तेंव्हा मिर्झा शफीने आपला वकील अनूपगीर गोसावी यास शिंद्यांचे छावणीस पाठविले. हे समजून घेण्यासाठी दिल्ली दरबारात मराठ्यास अनुकूल प्रतिकूल कोण कोण होते हे पाहिले पाहिजे.

नजफखान मरण पावल्यावर दिल्ली दरबारांत जी कर्तबगार मंडळी होती त्यांचे संबंध मराठ्यांशी कसे होते ते पाहू. नजफखानानंतर त्याचा दत्तक पुत्र अफरासिवखान ह्यास वजिरीची वस्त्रे मिळाली. हा मराठ्यांच्या बाजूला होता. दुसरा सरदार मिर्झा शफी हा नजीबखानाचा पुण्यात व सरदार नजब कुलीखान हे दोघेही मराठ्यास अनुकूल होते. अनूपगीर गोसावी मराठ्यांचा पक्षपाती होता. या उलट मराठ्यांचा द्वेष करणारे जे होते त्यात आग्र्याचा सुभेदार महमद बेग हमदानी, इस्माईलबक व गोहदचा जाट अग्रभागी होते. गोहदच्या जाटास हमदानी व इस्माईलबेग यांची फूस होती.[८६] आपल्यापैकी काहींचा मराठ्यास असलेला विरोध लक्षात घेऊन आपली बाजू बळकट करण्यासाठी अफरासियाबने इंग्रजांशी संधान बांधण्याचे ठरविले. त्यात इंग्रजांचा वकील मेजर ब्राऊन याची दिनांक २५ फेब्रुवारी १७८३ ला भेट घेतली.

इंग्रजांशी मैत्रीचे संबंध जोडण्यास अफासियाबखान फारच उत्सुक होता असे हेस्टिंग्स लिहितो. त्याने आपली इंग्रज बादशहाशी एकनिष्ठता दर्शवून इंग्रजांशी मैत्री करण्याचा बेत ब्राऊनकडे बोलून दाखविला. ब्राऊनची अफासियाबद्दलची खात्री झाल्यावर अफासियाबरोबर कसे वागावयाचे याच्या सूचना गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जने ब्राऊन यास दिल्या होत्या. आपणास मदत करण्यास इंग्रजी उत्सुक आहेत हेही त्याच्या ध्यानी आले. पण इतक्यात पाटील बाबांचे भेटीस आग्रयास गेला. तो पाटील बाबांच्या छावणीत चार महिने राहिला. त्याने पाटीलबाबांशी राजकारण लाविले की, पाटील बाबांचा आणि पातशहाचा घरोबा व नजफखान भाचे याचे मानस असे की, ज्याप्रमाणे पहिलेपासून दक्षिणी सरदार यांचा घरोबा आहे त्याप्रमाणे पुढे चालावे आणि पातशाही वजिरी आपले नांवे करून द्यावी. याप्रमाणे पाटीलबाबा आणि मिर्झा शफी यांचा व्यवहार चालला होता. शेवटी दोघांच्या भेटी होण्याचा निश्चय होऊन चंबळ नदीपार अटेरसमीप दिनांक ९ जुलै १७८२ रोजी पाटीलबाबा व मिर्झा शफि यांची भेट झाली.

दोघांचा पगडीबंद भाऊपणा झाला. ही गोष्ट महमदबेग हमदानीस आवडली नाही. अशा प्रकारे कारभाऱ्यात दुफळी माजली. तेंव्हा सन १७८३ च्या उन्हाळ्यात बादशहाने हिंगणे वकीलास ग्वाल्हेरास शिंद्याकडे पाठविले. हिंगणे यांनी स्वतः सर्व परिस्थिती पाटील बाबास समजावून सांगितली. आणि दिल्लीच्या कारभाराची सर्व सूत्रे विलंब न लाविता लवकरात लवकर आपले हाती घेण्यास मन वळविले. महादजीबाबा स्वतःच्या मार्गातील अडचणी जाणीत होते. ह्या कृत्यात पुणे दरबाराकडून पैसा व सैन्य यांचा पुरावठा होणे नाही कारण दरबाराला ह्यावेळी इंग्रजांशी लढल्यामुळे कर्ज झाले होते. त्यांना हेही ठाऊक होते की, आणीबाणी प्रसंगी मोगल दरबारवर विश्वासून राहण्यात अर्थ नाही. दिल्लीचा कारभार हाती घेण्याचे साहस करावयाचे म्हणजे त्याकरीता बुंदेल खंडात आपले पाय घट्ट रोविले पाहिजेत आणि स्वतःपाशी चांगल्या प्रकारची सुसज्ञ कवाइती फौज हवी. बुंदेलखंडात मराठ्यांचा अंमल बसविण्याच्या मार्गात गोहद राण्याची ब्याद अडथळा करीत होती.[८७] शिवाय कवाईती सैन्य तयसार होण्यासाठी वेळ हवा होता महादर्जींना इंग्रज वकील ॲन्डरसन आणि गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांच्या मैत्रीबद्दल भरवसा वाटू लागला. परंतु दिल्लीचा इंग्रज वकील ब्राऊन व दुसरा मुत्सद्दी मॅकफर्सन आणि कर्कपॅट्रीक हे मात्र महादजींच्या विरूद्ध असून ते दिल्लीचा कारभार इंग्रजांनी हाती घ्यावा ह्या मताचे होते.

दिल्लीचा बादशहा शहाअलम याने महादजी बाबांनी जलदीने दिल्लीस यावे म्हणून आपला मुलगा युवराज मिर्झा जवानबख्त यास अफासियाब व मिर्झा शफि या दोन उमावांच्या सोबत आग्र्यास पाठविले. तिथून शाहाजाद्याने पाटील बाबास लिहिले, आम्ही आपल्या भेटीस ग्वाल्हेरीस येत आहोत, पाटील बाबांनी त्यास उत्तर दिले की, आपण येण्याची तसदी घेऊ नये, मीच आपल्याकडे येतो त्याप्रमाणे महादजी शिंदे जन १७८३ त ग्वाल्हेरहून आग्र्यास येण्यास निघाले. बरोबर मोगालतर्फेचा उमरावगीर गोसावी, पाच हजार उत्कृष्ट फौज आणि

दहा तोफा एवढा सरंजाम होता. महादजी बाबा प्रथम अफासियाबखानास भेटले. त्यास तसेच ॲन्डरसन व काशीराजा चेतसिंग यास बरोबर घेऊन शहाजादा जवानबख्त यास भेटावयास गेले.

शाहाजाद्याने उभे राहून महादजीस शिंदेस अभिवादन केले. महादजी शिंदेंनी त्यास नजराणा पेश केला. शाहजाद्याने पाटीलबाबास व त्याजबरोबरच्या मंडळीस त्यांच्या इतमामाप्रमाणे वस्त्रे दिली. हा भेटीचा सोहळा २७ जून १७८३ पासून पाच दिवस चालला लखनौ येथील इंग्रज वकील विल्मय पामर या भेटीचा वेळी आग्र्यास हजर होता. दुसऱ्या दिवशी शाहाजाद्याने महादजीस दिल्लीस येऊन कारभार हाती घेण्याची विनंती केली. त्यावेळी पाटीलबाबा उत्तरले की, मी हा भार पावसाळ्यानंतर घेईन. अगोदर मला गोहदच्या राण्याचे पारिपत्य करू द्या. नजीबखानाचा मुलगा झबिताखान ह्याने पाटीलबाबास भेटून अभिवादन करण्याची इच्छा प्रगट केली. पाटीलबाबांनी ह्या शिंद्यांच्या शत्रूस नकार दिला. तसेच आग्र्याच्याचा किल्लेदार हमदानी याची गोहदच्या राण्यास आतून फूस होती म्हणून त्यानांही आपल्या भेटीस येऊ नये असे महादजीबाबांनी कळविले.[८८] यानंतर महादजीबाबानी जुलै महिन्यात ग्वाल्हेरचा किल्ला गोहदच्या राण्याकडून जिंकून घेतला.

पाटीलबाबांनी आग्र्यास जवानबख्ताची भेट घेतली. त्यावेळी हमदानीची भेट घेण्याचे नाकारले. हमदानीस या अपमानाबद्दल फार वाईट वाटले. म्हणून त्याने मिर्झा शफीस गुप्तपणे मारण्याचा विचार केला. प्रथम तो अफासियाबखानास भेटून आला. नंतर मिर्झा शफीच्या भेटीस गेला. हत्तीवर स्वारी असता दोघांचे हत्त जवळजवळ आले. हाताशी हात लावावा तो अमदानी आपले हत्तीवरून उडून मिर्झा शफीचे अंबरीत खवासीत जाऊन मागून मिर्झा शफीची मान दाबून धरून कट्यार मारून ठार केला, हा प्रकार दिनांक २३ सप्टेंबर १७८३ रोजी घडला. शफीचा काटा काढण्यास अफासियाबाने हमदानीस फूस दिली होती असा त्यावेळी

प्रवाद होता आणि तो खराही असावा, कारण हमदानीस ह्या खुनाबद्दल अफासियाबने काहीच शासन केले नाही.

शफीच्या खुनाची बातमी अवघ्या चाळीस तासात दिल्लीत पसरली. ती ऐकून शहाअलम बादशहा व अब्दुल अहमद यास कापे भरले. शफीच्या छावणीत रहात असलेला इंग्रज वकील मेजर ब्राऊन अफासियाबखानाशी सत जमवून ब्रिटिश मिलिटरीच्या जोरावर बादशहाचा मुलगा सुलेमान शुको यास बादशहा म्हणून जाहीर करील अशी धास्ती त्या दोघांना वाटू लागली. त्यावर उपाय म्हणून अफासियाबखानास बादशहाने मीर बक्षी पद दिल्याचे जाहीर करून त्यास लगचे दिल्लीस येण्यास तातडीचे बोलावणे पाठविले.

अफासियाबखानाने मीरबक्षी पद ऑक्टोंबर १७८३ च्या सुरवातीस स्विकारले आणि पुढील वर्षी बरोबर तेरा महिन्यांनी २ नोव्हेंबर १७८४ रोजी त्याचा खून झाला. ह्या काळात बादशाही राज्यकारभाराची स्थिती न सुधारता ती अधिक खालावली. म्हणून महादजीस शिंद्यास दिल्लीचा कारभार हाती घेणे भाग पडले.

शफीचा निकाल लागल्यावर अफासियाबखानाने शफीच्या बावरलेल्या सैन्याचा ताबा घेतला आणि त्यांना धीर दिला.[८९] हमदानीची समजूत काढून त्यांच्याशी गुप्त करार करून काही पैसे देऊन त्याला धोलपूरवारीच्या जहागिरीवर जाण्यास कबूल करविले. तसेच जयपूरकरांकडील जी खंडणी येईल तीही देऊ असे सांगितले.

बक्षी पद १८ ऑक्टोंबरला स्विकारल्यावर शफीच्या हस्तकांकडून आग्रा व त्या भोवतालचा मुलूख ताब्यात घेण्याचे काम अफासियाबखान यास करावे लागले. आग्रा ताब्यात घेतल्यावर त्याने डीगकडे आपला मोर्चा वळविला.

मिर्झा शफी मारला गेल्यावर अफासियाबखान आणि अनूपगीर गोसावी त्याच्या आईस डीग येथे भेटावयास गेले. ह्या सर्वांना धीर देऊन व अफासियाबखानास वस्त्रे देऊन हमदानीचे

परिपत्य करण्यास सांगितले. त्याचवेळी अनूपगीर गोसाव्याने पाटीलबाबास सर्व हकीगत कळवून, त्यांची मदत अफासियाबखानास मिळावी असे ठरविले. कारण शफीच्या मरणानंतर सर्व मुसलमान सरदारांनी आपणास त्याचे अधिकार मिळावे म्हणून आपसांत भांडण सुरू केले. त्यांना दहशत बसविण्याची कामगिरी एकट्या अफासियाबखानास करता येईना. त्यास पाटीलबाबांची मदत हवी झाली म्हणून तो शिंद्यांशी अधिक मैत्री जोडण्याचा प्रयत्न करू लागला.

ह्यावेळी शिंदे गोहदच्या किल्ल्यास वेढा घालून होते. आणि सर्वांशीच गोड बोलत होते. त्यांस गोहद काबीज करण्यास पाच महिने लागले. शेवटी फेब्रुवारी १७८४ त महादजीस गोहद राणा शरण गेल्यामुळे तिथे मराठ्यांचे ठाणे बसले. गोहदवर मराठ्यांचे निशाण चढले आणि यानंतर महादजीबाबांनी लागलीच दिल्लीचे राजकारण हाती घेतले.

डीग व आग्र्याचा बंदोबस्त करण्यात दोन महिने घालविल्यावर अफासियाबखान दिल्लीस दिनांक १४ डिसेंबर रोजी परत आला. अब्दुल अहद यास क्षमा करून त्यास २४ हजाराची तैनात दिली व त्याने अधिकार वाढविले.

यानंतर खंडणी वसूल करण्याच्या तंत्रावरून अफासियाबखानाचे आणि बादशहाचे मोठे भांडण झाले. त्याच सुमारास एक धुळीचे वादळ झाले. ह्या सर्व गडबडीचा फायदा घेऊन ब्राऊनने राजपुत्र जवानबख्त यास फूस लावून १४ एप्रिलच्या रात्री दिल्लीहून पळून जाण्यास फूस दिली. जवानबख्त ६ मे रोजी लखनौला पोचला. वजीर व गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांनी त्याचे समारंभपूर्वक स्वागत केले.[१०] बादशहा व अफासियाबखान यांनी या घटनेचा बोध घेऊन राजपुत्रास दिल्लीस परत येण्यासाठी पत्रे लिहिली व ती ब्राऊनबरोबर देऊन त्यास जवानबख्ताच्या भेटीस रवाना केले.

महादजी व इंग्रज

त्याने अयोध्येचा वजीर व इंग्रज याजशी बोलणे लाविले. तुम्ही दिल्लीस येऊन पातशाहीचा बंदोबस्त करावा असे तो त्यास सांगू लागला. यावेळी गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज यास वजिराच्या दरबारी असलेला इंग्रज वकील कर्नल पामर याने सल्ला दिला की बादशहा हा वृद्ध आणि अजागळ आहे. शहाजाद्याला हाती धरून आपण दिल्ली प्रांतातून मराठ्यांचे उच्चाटण करू या. ह्या प्रकारास गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जने संमति दिली नाही, कारण त्यावेळी इंग्रजांचे टिपूशी युद्ध चालू होते. मराठ्यांशी मैत्रीनच केली तर ते आपल्या विरूद्ध जातीय आणि टिपूचा पराभव न होता मराठे टिपूस मिळाले तर आपलाच पराभव होईल या भितीने वॉर हेस्टिंग्जने महादजीस दुखविले नाही. मात्र असफउद्दौलयाकडून कडा, कुरा व प्रयाग हे महाल घेवून बातशहाजादास खर्चासाठी लावून देण्याचे ठरविले आणि दिल्लीचा मनसुबा आरंभिला वॉरन हेस्टिंग्जच्या ह्या कृत्यामुळे खुद्द पाटीलबाबांची इंग्रजांच्या कावेबाजपणाबद्दल खात्री झाली. इंग्रजांचे राजकारण बातशहाशी झाल्यास चांगले नाही व पुढे पेच फार आहेत यास्तव त्यांचा (इंग्रजांचा) शिरकाव न होता आपले (मराठ्यांचे) हाताखाली दिल्ली घालावी. पाटीलबाबांनी बंदोबस्त करवा अशी नाना फडणीसांची आज्ञा. यावेळी डिबॉईन हा लष्करी अधिकारी गोहद राण्यापाशी होता. महादजीने त्यास ज्या दिवशी गोहद राहणा शरण गेला त्याच दिवशी आपल्या नोकरीत घेतले. पुढील महात म्हणजे २७ मार्चमध्ये हेस्टिंग्ज कलकत्याहून लखनौस आला त्याने मेजर ब्राऊन नावाच्या इंग्रज वकीलास दिल्लीस बादशहाच्या भेटीस पाठविले होते. ५ फेब्रुवारी १७८४ रोजी याची भेट बादशहाने घेतली. इंग्रजांच्या ताब्यात बादशहाने जावे हे अफासियाबखानास पसंत पडले नाही. त्याने विचार केला की, बादशहास काढून त्यास स्वारीवर घेऊन जावे. पण बादशहाचा स्वारीवर जाण्याचा किंवा इंग्रजांची ताबेदारी पत्करण्याचा विचार निश्चित होईना. इंग्रजांना बादशहाचा हा घोळ घालण्याचा स्वभाव माहित होता.

म्हणून त्यांनी बादशहाच्या नादास न लागता त्याचा मुलगा शहाजादा जवानवक्त यास

आपल्या ताब्यात आणण्याचा व्यूह रचला. जवानवक्तास हेस्टिंग्जची आतून फूस मिळाल्यावर त्याने निवडक १०० गुजर घोडेस्वारानिशी दिल्लीतून रात्रीच पोबारा केला व तो आग्र्यास हेस्टिंग्जपाशी येऊन राहू लागला. हेस्टिंग्जने त्यास इतमामाने ठेवून घेतले. इंग्रज वकील ब्राऊन हा बादशहाशी गोड गोड बोलून इंग्रजाची मदत घेण्यासाठी बादशहास सांगू लागला. हे महादजी बाबास समजतांच त्यांनी अपूपगीर गोसाव्याचे विद्यमाने अफरासियाबखानास धीर दिला की, हरत्रहा करून पातशहास हस्तगत करावे. (त्यास) सूत्रात ठेवावे. इंग्रज शिरू न पावत आणि तोरा (मोहरा) आपले हाती राहे ते करणे. परंतु इंग्रजांचे हातास जाऊ न द्यावे. मोगल सरदार व गोसावी मंडळी ह्यांना हे राजकारण पसंत होते. गोसावी महादजीच्या तर्फे अफसरशियाशी संगनमत करीत होता. त्यांनी बादशहाकडून इंग्रजास ताकीद देवविली की हेस्टिंग्जने दिल्लीस येऊ नये माघारी जावे. बादशहा आपले मत अहदखानाच्या नादी लागून बदलतो, आपले पुरे ऐकत नाही, हे अफरासियाबखानास कळून आल्यावर त्याने अब्दुल अहदखानास कैद करून त्याला अलिगडच्या किल्ल्यात ठेविले. त्यामुळे बादशहास अफरासियाबखानाच्या तंत्राणे चालणे भाग पडले. बादशहा दिल्लीहून आग्र्यास पाटीलबाबांच्या भेटीस येण्यास तयार झाला.'[११] जवानबक्त इंग्रजांच्या आश्रयास गेल्यामुळै तो इंग्रजांच्या मदतीने गादी बळकावील अशी भीती बादशहास वाटून इंग्रजांची मसलत हाणून पाडण्यासाठी बादशहाने पाटीलबाबांस भेटीसाठी आग्र्यास बोलविले.

बादशहास ताब्यात घेऊन दिल्लीचे राजकारण आपण करावयाचे त्यास शीख, रोहिले व रजपूत यांचा बंदोबस्त केला पाहिजे. ह्या करिता फौजेची व पैक्याची अनुकूलता हवी होती. परंतु शिंद्यांच्या फौजेचे पगार थकलेले. बारमारी पैशाची ओढगस्त. ही वस्तुस्थिती शिंद्यांनी नाना फडणविसास पत्र लिहून दृष्टोत्पत्तीस आणिली, पातशहाचे राजकारण करा म्हणोन लिहितात तर पैक्यावेगळे ते राजकारण कसे होते? आम्ही मसलतीमुळे किती पेचात आलो?

कर्ज देखील मिळेना येथवर दशा आमची बादशहास खर्चास रूपया पाहिले. सध्या फौज तिकडे जावी ती कोणती पाठवावी? स्वारी हिंदुस्थानाची! फौज आम्हाबरोबर, सरकारची पथके तरी बरोबर असावी? त्यापैकी राजेश्री शिवाजी विठ्ठल व बळवंतराव धोंड्देव पवारापैकी निम्मे मात्र आहेत. अशी दशा आमचे हिंदुस्थानचे स्वारीची तसेच मामलेदारीचे रीतीबद्दल पाटीलबाबांनी सुचविले की, परगण हमीरपूर बद्दल पैका मिळत नाही. पवाराचे जप्तीबद्दल मनस्वी खर्च लिहून सरकारचा बुंदेले रूपया देत नाहीत. घटाई करून स्वस्थ आहेत. अशा चाली यांच्या असता सरकारातूनही तगादा होत नाही.'[१२] आम्ही पाच वर्ष मेहनत केली ते पेचात येऊन कर्जभरी झालो. पुढे ताकद राहिली नाही. पैका नसल्यामुळे माघारी जावे तर इंग्रजबादशहास मिळवून घेतली अगर शहाजाद्यास तख्तनशीन करून बादशहास ज्ञानमठी बसवतील. इंग्रजांचा बंदोबस्त दिल्लीत झाला मग सारेच खुष्कीवाले पेचात येतील. यामुळे आम्ही माघत्तरे जाऊ शकत नाही. पैका नाही म्हणून लाचार सरकारातून पैशाची मदत जाली तरच आमचा पाय येथे टिकून राहिल. यावरून महादजीबाबांच्या आर्थिक परिस्थितीचा बोध होतो.

महादजीने दिल्लीचे प्रकरण हाती घेण्यासाठी केलेले उद्योग

बादशहाची व्यवस्था लावणे म्हणजे बादशाही कारभार स्वतःच्या अखत्यारात घेऊन बादशहास दरमहास खर्चास देऊन पोसणे. इतकेच नव्हे तर बादशहाचे जे मांडलिक असतील त्यांजकडून खंडणी वसूल करणे. ही कामे महादजी बाबांस करावयाची होती. शिवाय उज्जैनपासून दिल्लीपर्यंतचा सर्व मुलूख आपल्या अखत्यारात असावयास हवा हे ही पाटीलबाबा जाणत हजोते. चंबळपावेतो महादजीचा मुलूख बसलाच होता. पलिकडील भरतपूर जाट त्यांचे लगामी होते. चंबळपावेतो महादजीचा मुलूख बसलाच होता. पलिकडील भरतपूर जाट त्यांचे लगामी होते. आग्र्यास अंमल होणे इष्ट होते. पण त्या ठिकाणी त्यांच कट्टर दुष्मन महमद हमदानी किल्लेदार म्हणून बसला होता. त्यास दूर करणे अत्यावश्यक होते. आग्र्यास पुरवठा यमुनेपलिकडील

अतर्वेदीतून होई. तेंव्हा आग्रा आणि अंतर्वेदी ह्या दोन्ही ठिकाणी आपला अंमल होण्यासाठी आग्र्याचे बंदोबस्तास बाळोबा पागनीस यास व अंतर्वेदी जिंकून घेण्यास रायाजी पाटील यास फर्माविले आणि दिल्लीच्या बंदोबस्तास अंबाजी इंगळे यास रवाना केले. रायाजी पाटिलाने अंतर्वेदीतील मुख्य ठाणे जे अलिगड ते जिंकून घेतले आणि रोहिल्यांचा बंदोबस्त केला. शिखांचा सरदार मोहरसिंग ह्यास आणून त्याच्या मार्फत दिल्लीच्या उत्तरेकडील प्रातांचा बंदोबस्त चालविला. कारण शीख, राजपूत, रोहिले वगैरे सर्वांचा बंदोबस्त केल्याशिवाय बादशहाची कोणतीही व्यवस्था सुरळीत चालली नसती.

वर सांगितल्याप्रमाणे शिंद्यांनी दिल्लीचे राजकारण अंगावर घेण्याचे ठरविले आणि त्याकरिता अफरासियाबखानाशी अनुसंधान चालू ठेविले. बादशहासही शहाजादा इंग्रजांकडे लखनौस गेला हे जड वाटले. सबब इंग्रजांची मसलत हाणून पाडण्यासाठी बादशहाने शिंद्यास भेटीसाठी आग्र्यास बोलाविले. वर ठरल्याप्रमाणे बादशहा, अफरासियाबखान वगैरे आग्र्यास येण्यास निघाले. पाटीलबाबा व अफरासियाबखान यांच्या भेटी फत्तेपूर सिक्रीजवळ दिनांक २४ ऑक्टोंबर १७८४ रोजी झाल्या. बादशाही कारभारासंबंधी पुढील धोरण काय असावे याविषयी उभयतांनी खलबत केले ही बातमी शिंद्यांचा दुष्मन जो हमदानी त्यास समजल्यावर त्याने इतर मोगल सरदारांच्या सहाय्याने अफरासिबखानाचा काटा काढण्याचे ठरविले. मिर्झा शफिचा भाऊ जैनुल आबादीखान राजश्री पाटीलबाबांजवळ सहा महिने येऊन राहिला होता. मातबर आल्याचे चालविले पाहिजे म्हणून बाबा खर्चास देऊन त्याचे चालवीत असता, हमदानीचे मतात मिळाला. हमदानी, जैनुल आबदीखान व मोगल या सर्वांचा मनसबा ठरला जे आफरासियाबखान दक्षणियास मिळाला. पाटीलबाबांचे सल्लेने चालतो, बादशाही दौलत दक्षण्यांचे घरांत घालतो, त्यास जैनुल अबदीखानाने मारावा, म्हणजे पाटीलबाबा सहजच राहिले. बादशाही बंदोबस्त करण्याचा विचार तरी अमरीउलअमराई झैनुलआबदीखानास द्यावी व नावाचा धनी त्यास

करावा कारभारात मुखत्यार आपण होऊन काय चालवावे असा मनसुबा हमदानी याने केला. तो ठरल्यावर झैनुलआबदीखानाने आपल्या घरचा मोगल बारगीर बरोबर घेतला आणि दोघे अफरासियाबखानाचे डेऱ्यात दिनांक ३ नोव्हेंबर १७८४ रोजी सकाळी गेले. बारगिराने खानास एकटा पाहून झडप घातली. गळा धरून कट्यार कंधावर चालवून वरून भार घालून दाबला, तो स्तनापावेतो आला, अर्धमेला जाला, पडला. इतक्यात आसपासच्या लोकांनी येऊन बारगिरास ठार केले. या गडबडीत जैनुल आबादीखान परत शिंद्याकडे गेला आणि त्यांना सांगू लागला की, मी जवळ होतो तो बागरीरही माझाच, मजला कोणी बदनाम करतील, तुफान घेतली, यास्तव आपणाकडे सांगावयास आलो. परंतु पाटीलबाबा या लबाडीने फसले नाहीत. त्यांनी जैनुलआबदीखानास धरून कैदेत ठेविले. आपले लोक अफरासियाबखानाच्या छावणीस पाठवून खऱ्या हकीगतीचा छडा लाविला व अफरासियाबच्या लोकास धीर दिला. अफरासियाब मारला गेल्यावर त्याचे प्रेत पुरण्यासाठी न्यावयाची तयारी झाली. पण त्याच्या लष्करातील पठाण व रांगडे यांनी आपल्या पगाराची थकबाकी मिळण्यासाठी गलबला चालविला आणि प्रेत उठविण्यास मना केली."[१३] तेंव्हा शिंद्यांनी मध्ये पडून बातशहास सांगून तुमचा पगार देववीन असे सांगून खातरजमा केली व प्रसंग निभावला.

संदर्भ सूची

१) डॉ. खोबरेकर वि.गो. मराठ्यांचा इतिहास खंड-२ महाराष्ट्र सांस्कृतीक मंडळ, मुंबई १९८८, पृ. ३२४, ३२५

२) सरदेसाई गो. स. (संपा) पेशवे दप्तर, खंड ३७, लेखांक २३३, २३५

३) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड - ६ पृ. १८२, १८३

४) कित्ता पृ. १८७, १८८

५) सरदेसाई गो. स. पूना रेसीडेन्सील करसपॉन्डस रियासतकार खंड-२, पृ. २५,२६

६) कित्ता पृ. २०७, २०८

७) डॉ. खोबरेकर वि.गो. महाराष्ट्राचा इतिहास (मराठा कालखंड भाग-२) पृ. ३९०, ३९२

८) कित्ता पृ. ३९४, ३९५

९) खरे वा.वा. ऐतिहासिक-६, लेख क्रमांक १८८८-१८८९ लेख संग्रह भाग

१०) कित्ता १८८८-१८८९

११) गुन्हे व्हि. टे., बानाजी खंड दुसरा-१७७६ पृ. २५६,२५७

१२) कित्ता पृ. २५८, २५९

१३) जेम्स ऑस्टीन-अँग्लो मराठा रिलेसन्स, खंड दुसरा, पृ. ९२,९३

१४) कित्ता पृ. ९४, ९५

१५) खरे वा. वा. (संपा) ऐतिहासिक लेखसंग्रह भाग-६, लेख अंक २३७१

१६) कित्ता २३७८-८०

१७) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड-७, पृ.७०,७५,८०

१८) कित्ता पृ.८०,८२

१९) डॉडवेल-वॉरन हेस्टिंग्ज, खंड दुसरा, पृ.१७६,१७७

२०) कित्ता पृ. १७८, १७९

२१) राजवाडे वि. का. (संपा) मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १९, लेख अंक

(१४६९)

२२) कित्ता लेखांक १४७०

२३) खरे वा. वा. ऐतिहासिक लेखांक संग्रह, खंड ६, लेखांक २५१६

२४) कित्ता लेखांक २५१७

२५) कित्ता लेखांक २५१८

२६) फॉरेस्ट –एम्पोरीयल सलेक्शन भाग–३, पॉनीनं. ८८५, ८८७

२७) कित्ता पृ. ८९०, ८९४

२८) हासन खान एस ए हिस्ट्री ऑफ टिपु सुल्तान

२९) कित्ता पृ. ६६, ६७

३०) खरे वा. वा. (संपा) ऐतिहासिक लेख संग्रह खंड–८, लेखांक ३८५४, ३८५५

३१) कित्ता लेखांक ३८५६, ३८५७

३२) रघुविरसिंह –पी. आर. सी. भाग – २, लेखांक – ५, ६

३३) कित्ता लेखांक – ८,१०

३४) डॉ. खोबरेकर वि. गो. महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग – २, पृ.३९५,३९६

३५) कित्ता पृ. ३९६, ३९८

३६) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड–७ पृ.३५५, ३५७

३७) कित्ता पृ.३५८, ३५९

३८) खरे वा. वा. (संपा) ऐतिहासिक लेख संग्रह भाग –९, लेखांक ३४२२

३९) कित्ता लेखांक ३४२३, ३४२४

४०) कित्ता लेखांक ३४२५, ३४२६

४१) सरदेसाई गो. स. मराठ्यांचा इतिहास मध्यविभाग खंड– ३, पृ. १९२, १९३

४२) कित्ता पृ. १९४, १९५

४३) कित्ता पृ. १९५, १९८

४४) डॉ. मुजूमदार दि मराठा सुप्रिमसी, कलकत्ता १९५९ पृ. ४०५, ४०६

४५) कित्ता पृ. ४०७, ४०८

४६) खरे वा. वा. (संपा) ऐतिहासिक लेख संग्रह खंड –९, लेखांक ३४२४ पृ. ४५७३

४७) कित्ता पृ. लेखांक ४५७७, ४५७८

४८) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, उत्तर विभाग भाग–३, मुंबई –१९४४, पृ. ३६७,३६८

४९) कित्ता पृ. ३७०

५०) डॉ. मुजूमदार दि मराठा सुप्रिमसी, पृ. ४०८, ४०९

५१) कित्ता पृ. ४०९, ४११

५२) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठा कालखंड खंड –२, पृ. ४८०, ४८५

५३) कित्ता पृ. ४९०, ४९५

५४) फाडके शिन्देशाहीच्या इतिहासाची साधने खंड–२,ग्वाल्हेर १९२९, पृ.२७४,२७५

५५) कित्ता पृ. २७६, २७८

५६) फॉरेस्ट हिस्ट्री ऑफ बडोदा ऑफ सलेक्शन खंड–२, कलकत्ता १९३१ पृ. २१९, २२०

५७) गुन्हासे बडोदा गॅझेटियर खंड–१, पृ. ४७८, ४७९

५८) कित्ता पृ. ४८०, ४८२

५९) सरदेसाइ गो. स. मराठी रियासत खंड – ६, पृ.१९५, १९८

६०) कित्ता पृ. २०५, २०७

६१) कित्ता पृ. २०८, २०९

६२) खरे वा. वा. (संपा) ऐतिहासिक लेखसंग्रह खंड – ७, पुणे – १९३३,लेखांक २६०३६३)

६३) कित्ता लेखांक – २६०८

६४) राजवाडे वि. का. (संपा) मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड-२, पुणे १९१
पृ. ४३५, ४३६

६५) कित्ता पृ. ४३७, ४३८

६६) सरदेसाई गो. स. ऐतिहासिक टिप्पणे भाग -१, लेखांक ९,१०, पृ. ११,१२

६७) खरे वा. वा. ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग-९, लेखांक ४६४२

६८) कित्ता लेखांक ४६४३, ४६४४

६९) कित्ता लेखांक ४६४५, ४६४६

७०) सरदेसाई गो.स. खंड-६, पृ. २१०,२१५

७१) कित्ता - पृ. २७२

७२) रघुवीरसिंह (संपा) पी. आर. सी. पृ. १२३, १२५

७३) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठा कालखंड भाग - २, पृ. ४६१, ४६२

७४) कित्ता पृ. ४६३, ४६४

७५) सरदेसाई गो. स. दिल्ली येथील मराठ्यांचे राजकारण भाग - १, खंड - १, लेखांक-
९३,९४ पृ.९५,९६

७६) कित्ता लेखांक ९५,९६, पृ. ९७,९८

७७) फॉरेस्ट-वॉरन हेस्टिंग्ज, खंड-२, लखनौतील इ. स. १७८४ तील भेट पृ. १६,१८

७८) कित्ता पृ. २०, २२

७९) जदुनाथ सरकार फोक ऑफ द मोगल एम्पायर, भाग-३, पृ. १९०,१९२

८०) कित्ता पृ. १९३, १९४

८१) फाळके महादजी शिंदे यांची कागदपत्रे लेखांक २९७, २९८

८२) कित्ता लेखांक ३९३, ३९६

८३) डॉ. खरे वा. वा. अ. रा. कुलकर्णी मराठ्यांचा इतिहास, खंड-२, मुंबई - १९८५,
पृ. ५५, ५६

८४) कित्ता पृ. ५८, ६०

८५) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठा कालखंड, भाग -२, पृ. ४४०, ४४१

८६) कित्ता पृ. ४४२, ४४३

८७) खरे वा. वा. ऐतिहासिक लेख संग्रह, भाग -९, लेखांक - ३४०६, ३४१०

८८) कित्ता लेखांक ३४१५, ३४२ पृ. ४५७३

८९) सरदेसाई गो. स. न्यू हिस्ट्री ऑफ द मराठा, भाग-३, मुबई १९५० पृ. २८२

९०) कित्ता पृ. २८३

९१) डॉ.खोबरेकर वि. गो. मराठा कालखंड, भाग-२, पृ. ४५०, ४५१

९२) कित्ता पृ. ४५२, ४५३

९३) सरदेसाई गो. स. खंड ७, पृ. ३२४, ३२५

प्रकरण तिसरे

महादजी शिंदे निजाम संबंध

प्रकरण तिसरे

महादजी शिंदे निजाम संबंध

मोगल राजवटीच्या सुरूवातीच्या काळात सुरूवातीपासून अनेक मुसलामान कुटुंबे हिंदुस्थानात येऊन स्थायिक झालेली होती. निजाम उल मुल्क यांचे कुटुंबही त्यातीलच एक होते. निजामाचे वशंज आलेबा अबीदअली हे इ.स. १६१५–५६ साली मक्केच्या यात्रेनिमित्ताने समरकंद बुखारा येथून हिंदुस्थानात आले त्यांनी मोगल बादशहा 'शहाजहान' यांच्या दरबारात नोकरी पत्करली. शहाजहान आणि औरंगजेब यांच्यात सत्तेसाठी सुरू झालेल्या संघर्षात त्यांनी औरंगजेबाची बाजू घेतली होती. पुढे अबीद अली यांनी औरंगजेबाचा वजीर सादुल्लाखान यांची मुलगी आपला मुलगा शहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन फिरोज जंग यास करून घेतली. औरंगजेबाने इ. स. १६८७ साली कुतुबशाहीच्या गोळकोंड्याला वेढा दिला. येथे झालेल्या लढाईत अबीद अली मारले गेले. यानंतर त्यांचे पुत्र शहाबुद्दीन हे गुजरातचे सुभेदार झाले. इ. स. १७१० साली त्याचा मृत्यू झाला. मीर कमरूद्दीन ऊर्फ निजाम उल मूल्क हे या शहाबुद्दीनचेच पुत्र होते. त्यांचा जन्म ऑगस्ट, १६६१ मध्ये झाला. वयाच्या तेराव्या वर्षी त्याने सैन्यात अधिकारपद मिळवले. त्यानंतर पुढच्याच वर्षी त्याला 'खान' ही पदवी देण्यात आली. औरंगजेबाच्या मृत्यूच्यावेळी निजामास विजापूरची सुभेदारी होती. नंतर मात्र दिल्लीच्या राजकारणात त्यांना गौण स्थान देण्यात आले. फरूखसियर या मोगल बादशहाने मीर कमरूद्दीन यास ''निजाम उल–मुल्क–फीरोजजंग चिगं चिन किलीज खान'' हा किताब बहाल केला. निजाम या शब्दाचा अर्थ व्यवस्था किंवा बंदोबस्त असा होतो. पुढे बादशहा, महमंदशहा याने त्याला 'आसिफजाह' हा किताब दिला.

फेब्रुवारी, १७१३ बादशहा फरूखसियरने निजामाची नेमणूक दक्षिणेचा सुभेदार म्हणून केली. पण या पदावर तो अधिक काळ राहिला नाही. इ. स. १७१५ साली या पदावरून कमी केले व त्या ठिकाणी सय्यद हुसेन अलिखान याची नेमणूक झाली. यानंतर निजामाचे वास्तव्य

दिल्लीत राहिले, परंतु तेथे सय्यद बंधूपैकी एक सय्यद अब्दुल्ला यांचेशी कधीच पटले नाही. त्यामुळे बादशहा महंमदशहाने निजामाची माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक केली. यानंतर १५ मार्च १७१९ रोजी निजामाने माळव्याकडे न जाता सरळ दक्षिणेची वाट धरली. त्याला दक्षिणेचा सुभेदार मुबारीज खान याने रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु ऑक्टोंबर, १७२४ मध्ये झालेल्या सारखेड्याच्या लढाईत निजामाने त्याचा पराभव केला. यानंतर महंमदशहा बादशहाने निजामाला पुन्हा दक्षिणेची सुभेदारी दिली. याचेवेळी निजामाने मोगल बादशहाची दुर्बलता व राजकिय अस्थिरतेचा फायदा घेऊन इ. स. १७२४ मध्ये दक्षिणेत हैद्राबाद भाग्यनगर या ठिकाणी स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

इ. स. १७६२ मध्ये निजामी राज्याची राजधानी हैद्राबाद येथे स्थलांतरित केली. स्वजनासी दगाबाजी करणे हा निजामाचा खास गुण होता. तो सदैव प्रबळ शक्तीशाली सत्तेसमोर वाकत असे. बलवानाचा पक्ष घेऊन लव्हाळ्याप्रमाणे संकटकाळीही त्याने आपल्या सत्तेचे अस्तित्व टिकवून ठेवले. निजामाला निजामउलमुल्क फिरोजतंत्र चिनकिबीजखान बीज, हा किताब बादशहाने दिला होता. 'निजाम' हा शब्दाचा अर्थ व्यवस्था अगर बंदोबस्त असा होता. देशाची व्यवस्था पाहाणारा तो निजाम उलमुल्क.

हैद्राबादवर एकूण सात निजामानी राज्य केले त्यांचा कार्यकाळ पुढीलप्रमाणे आहे–

१) पहिला निजाम असफिजहाँ – इ. स. १७२४ ते १७४८

२) मीर निजाम अली – इ. स. १७६२ ते १८०३

३) तिसरा निजाम सिकंदर जहाँ – इ. स. १८०३ ते १८२८

४) निजाम नसीरूदौला – इ.स. १८२८ ते १८५७

५) निजाम अफउलादौला – इ. स. १८५७ ते १८६९

६) मीर महेबूबअली – इ. स. १८६९ ते १९११

७) मीर उस्मानअली - इ. स. १९११ ते १९४८

वरील निजाम वंशाप्रमाणे 'असिफजहाँ' हा मोगल सम्राटाने दिलेला किताब अखेर पर्यंत टिकून राहिला. पाहिला निजाम सोडून कोणत्याही निजामाने फारशा लढाया केल्या नाहीत. ज्या काही केल्या त्या मराठ्यांविरूद्ध होत्या. पुण्याचा एकच अपवाद वगळता सर्व लढायात निजाम पराभूत झाला. पण त्याचे राज्य मराठ्यांना समूळ नष्ट करता आले नाही. लढाईच्या मैदानावर जरी अपयश आले तरी तो डगमगत नसे वाटाघाटीच्या वेळी तो नेहमीच यशस्वी होत असे हे त्याचे खास वैशिष्ट होते.

छत्रपती शाहू सत्तेवर असलेल्या काळात मोगल साम्राज्यात सर्वात शक्तिशाली, धूर्त व अतिशय महत्वाकांक्षी सरदार या नात्याने मीर कामरूद्दीन उर्फ निजाम-उल्-मुल्क याचा उदय घडून आला होता. शाहू प्रमाणेच त्याचा कार्यकाळही प्रदीर्घ राहीला. मराठ्यांच्या राज्याबरोबर त्याचे सर्वाधित शत्रुत्वाचे संबंध आले. त्यामुळे मराठ्यांच्या राज्यावर त्याच्या धोरणाचा व कार्याचा परिणामही मोठ्या प्रमाणावर झाला. मराठ्यांचे राज्य नष्ट करणे हा त्याचा सर्वात प्रमुख उद्देश होता. किमान मराठ्यांच्या राज्याचे स्वरूप अतिशय दुर्बल, क्षीण बनविणे हे त्याने आपले ध्येय मानून आयुष्यभर प्रयत्न केले. कारण त्याला दक्षिणेत स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन करावयाचे होते. शेवटी इ. स. १७२३ मध्ये त्याने आपल्या स्वतंत्र राज्याची निर्मिती केली. मराठ्यांच्या राज्याशेजारी उदयाला आलेल्या या हैदराबादच्या निजामशाही राज्याचा त्यामुळे मराठ्यांच्या राज्याशी राजकिय संबंध येत गेला. या शत्रुत्वाच्या संबंधाचे परिणाम प्रदीर्घ काळ मराठ्यांना सहन करावे लागले.

निजाम घराणे

निजाम उल मूल्कचे घराणे मोठे पराक्रमी होते. इतिहासामध्ये जे अनेक प्रसिद्ध घराणी आढळतात त्यामध्ये हे एक होय. औरंगजेबाच्या तालमीत जी अनेक माणसे तयार झाली

त्यामध्ये हे एक होय. औरंगजेबाच्या तालमीत जी अनेक माणसे तयसार झाली त्यामध्ये हा एक माणूस होय. बुद्धीमत्ता, शौय, राज्यचातूर्य, दीर्घायुष्य, धूर्त डावपेचपणा इत्यादी. गुण अनुवंशिक निजामाच्या वंशात दिसून येतात. निजामाचा आजोबा ख्वाजा अबिद शेख हा इराक मधून हिंदुस्थानात आला. शहाजहानने त्याचा सत्कार करून त्याच्या खर्चाची तजवीज केली होती.

इ. स. १६५८ मध्ये ख्वाजा आबिद शेख हा मक्केचा यात्रेहून परत आला. त्यावेळी शाहजहान मोगल सम्राट असून साम्राज्य हस्तगत करण्याकरीता त्याच्या चार मुलामध्ये संघर्ष सुरू झाल्याचे त्याला समजले. ख्वाजा आबिदने औरंगजेबाचा पक्ष घेतला. या यादवी मध्ये औरंगजेब यशस्वी झाला व त्याच्या हाती मोगल बादशाहीची सत्ता आली होती. तो बादशाहा झाला नंतर ख÷वाजा आबिदला काही राज्यातील महत्वाची कामे मिळत गेली. काही काळानंतर ख्वाजा आबिदने आपला मुलगा शहाबुद्दीन यास बुखाऱ्याहून बोलावून घेतले. शाहाबुदद्दीन पराक्रमी, शौर्यवान, धाडसी होता. त्याने मोगलाच्या अनेक महत्वाच्या मोहिमात भाग घेऊन विजय मिळवला, त्यामुळे तो प्रसिद्धीस आला. त्याच्या पराक्रमामुळे त्याला वेगवेगळ्या पदव्या मिळाल्या. उदाः गाजिउद्दीन किंवा फिरोजजंग इत्यादी पुढे शहाजहानच्या सुप्रसिद्ध वजीर सादुल्लाखान याची मुलगी शहाबुद्दीनला देण्यात आली होती. ११ ऑगष्ट १६६१ रोजी [१] निजाम उल-मुल्कचा जन्म झाला.

ख्वाजा आबिद आणि त्याचा मुलगा शहाबुद्दीन हे औरंगजेबाच्या दक्षिणे मोहिमेत हजर होते. इ. स. १६८७ मध्ये औरंगजेबाने गोवळ कोंड्याला वेढा घातला त्यावेळी ख्वाजा आबिद त्याचा मुलगा शहाबुद्दीन आणि त्याचा नातू निजाम उल-मुल्क हे तिघेही हजर होते. वेढ्यात ख्वाजा आबिदला गोळी लागून तो मारला गेला. शहाबुद्दीन हा औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत दक्षिणेच्या मोहिमेत हजर होता. त्यानंतर शहाबुद्दीनला गुजरातचा सुभेदार केले. व तो इ. स. १७१० मध्ये मरण पावला. निजाम उल-मुल्क हा. इ. स. १६८२ पासून म्हणजे वयाच्या

आकराव्या वर्षापासून मोगलांच्या सैन्यात वावरत होता. औरंगजेबाच्या तालमीत तो वाढल्यामुळे आणि दक्षिणेची त्याला खडान्खडा माहिती असल्यामुळे औरंगजेबच्या मृत्यूनंतर यादवीत तो तटस्थ होता.[२] इ. स. १७१३ मध्ये तो प्रथम दक्षिणेचा सुभेदार झाला त्या जागेवर तो फक्त दोन वर्ष होता.

हैद्राबादच्या निजाम राज्याचा मूळ पुरूष, निजाम उलमुल्क होय. याचे मूळ नांव मीर कमरूद्दीन किंवा चिनकिलीचखान तो धूर्त, शूर, पराक्रमी मुत्सद्दी, डावपेची, महत्वकांक्षी, धर्माभिमानी, मतलबी व तिसरट होता. औरंगजेबाच्या काळात तो वाढत जाऊन योग्यतेस पोहोचला होता. त्याने स्वतःच्या कर्तृत्वाने अनेक मनसब, पदव्या प्राप्त केल्या त्यावर बादशहाची कृपा होती. तो वजीर होता. सुभेदार, अनेक ठिकाणी त्याने कार्य केले होते. त्याला निजाम उलमुल्क हा किताब मिळाला होता. म्हणजे उत्तम राज्यव्यवस्थापक असा या शब्दाचा अर्थ होय. तो माळवा, खानदेश, दक्षिण इत्यादी हिंदुस्थानातील प्रांताचा सुभेदार होता. त्याला आसफजहा हा किताब मिळाला होता. याचेवळी त्याच्या सुदैवाने किंवा हिन्दुच्या दुर्दैवाने म्हणा, कित्येक मराठे सरदार आपला स्वदेशाभिमान, स्वजात्याभिमान आणि स्वराज्यनिष्ठा सोडून आपले सैन्य घेऊन त्यास मिळाले होते. उदाः चंद्रसेन जाधव, निंबाळकर, सर्जेराव घाटगे, इत्यादी निजामास जाऊन मिळाले. त्यात ख्याति होत चालली. त्याची व दिलावर अली खानची बऱ्हाणपूर जवळी लढाई होऊन त्याल दिलावर अली मारला गेला होता. नंतर अलम अली खान व त्याची बाळापूरजवळ युद्ध होऊन निजामाने आलम अलीला ठार केले. दिल्लीच्या सय्यद बंधूला ठार करण्याची योजना यानेच फत्ते केली. बादशाहा जवळ त्याचे वजन होते. त्याची प्रतिष्ठा वाढत होती.[३] त्याने दिल्ली दरबारात बराचसा काळ कट कारस्थान मध्ये घातला. तो धूर्त, क्रुर, मानी, धर्माभिमानी रागीट होता.

दक्षिणेच्या सहा सुभ्याची सुभेदारी मोगल बादशहा फरूखशियरने त्यास प्रथम खान–इ–

खानान व नंतर निजाम-उल-मुल्क बहादूर फत्तेह जंग अशी पदवी दिली. इ. स. १७१३ ते १७१५ या काळात दक्षिणेचा सुभेदार असतांना त्याने मराठा विरोधी धोरणाचाच पुरस्कार केला. सम्राट फरूखशियरने सय्यद बंधूच्या सल्ल्यावरूनच इ.स. १७१५ मध्ये त्याची बदली करून त्यास कमी दर्जाचे पद देण्यात आले. त्यास दक्षिणेचा सुभेदारीहून काढून मुराबादचा फौजदार म्हणून पाठविण्यात आले होते. सय्यद बंधुपैकी लहानभाऊ सय्यद हुसेनअली हा दक्षिणेचा सुभेदार बनला. त्यानंतर पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्याबरोबर तह करून मराठ्यांना स्वराज्याचा सनदा मिळवून दिल्या होत्या.

इ.स. १७२० मध्ये सम्राट मुहम्मदशहाने सय्यद बंधुचा पाडाव घडवून आणला. सय्यद हुसेन अली सम्राटास भेटून दक्षिणेत परत जातांना सम्राटाचाच कट कारस्थानानुसार त्यास टाडा-भमी येथै विश्वासघाताने ठार करण्यात आले (८ ऑक्टोंबर १७२०) या कटाचा मुख्य सूत्रधार मुहम्मंद अमीनखान हा निजाम-उल-मुल्क याचा चुलत भाऊच होता. नंतर वडील बंधु सय्यद अब्दुल्ला अली खान यास दिल्ली येथे कैद करण्यात आले व दोन वर्षांनी ११ ऑक्टोंबर १७२२ रोजी त्यास ठार करण्यात आले.[४] सय्यद बंधुच्या पाडावाची घटना ही निजाम-उल-मुल्क याच्या उदयाच्या दृष्टीने अतिशय अनुकूल ठरली. सम्राट मुहम्मद शहाने सय्यद हुसेन अली यास ठार करणाऱ्या मुहम्मद अमीन खान यास वजीर पदावर नेमले. पण तो. इ. स. १७२२ मध्ये मृत्यू पावल्यामुळे प्रभावी बनलेल्या तुर्की व इराणी सरदारांच्या गटाचा दुसरा प्रमुख नेता या नात्याने निजाम-उल-मुल्क यास दक्षिणेतून परत बोलावून २० फेब्रुवारी १७२२ रोजी साम्राज्याच्या वजीर-ए-आझम पदावर नियुक्त करण्यात आले.

निजाम-उल-मुल्कची महत्वाकांक्षा

स्वतःच्या कर्तृत्वावर वजीरापर्यंत पोहचलेल्या निजाम-उल-मुल्क बहादुर फत्तेहजंग याची कामगिरी औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या काळातील सर्वात प्रभावी कामगिरी मानावी

लागते. सम्राट किवा राजे बनविणारे अशी प्रसिद्धी मिळविणाऱ्या सय्यद अब्दुल्ला अली खान व सय्यद हुसेन अली खान या सय्यद बंधुनी मोगल साम्राज्यात वा अगोदर आपला दरारा निर्माण केला होता. पण तो अतिशय अल्पकालीन (इ.स. १७१३-१७२०) ठरला. त्यानंतर उदयाला आलेल्या निजाम-उल-मुल्कने मात्र इ. सन १७२२ पासून आपल्या मृत्यूपर्यंत (इ.स. १७४८) मोगल साम्राज्यातील आपले अव्वल स्थान कायमच राखले होते. या काळातील शक्तिशाली ठरलेल्या मराठ्यांचा प्रमुख प्रतिस्पर्धी म्हणून त्याची गणना केली जात होती.

निजाम-उल-मुल्क यास राजकिय परिस्थितीचे परिपूर्ण ज्ञान होते. त्यामुळेच त्याने दुर्बल व ऱ्हासाला जात असलेल्या मोगल साम्राज्यात चाकरी[५] करीत राहण्याऐवजी स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची महत्वाकांक्षा बाळगली होती. राजधानी दिल्लीपासून दूरवर्ती प्रदेशात व इस्लामी आक्रमकांच्या दृष्टीने अवघड असलेल्या प्रदेशात त्याला आपले वेगळे राज्य निर्माण करावयाचे होते. त्यामुळेच त्याने दक्षिण भारतात आपले वेगळे राज्य स्थापन करण्याचे ठरविले होते. दक्षिणेत मराठे विरोध करतील त्याची त्याला पुरेपूर जाणीव होती. पण त्याच वेळी मराठ्यांच्या राज्याचे दोन स्वतंत्र राज्यात झालेले विभाजन व त्यांच्यातील परस्पर शत्रुत्व त्यास माहिती होते. कोल्हापूर व सातारा या दोन ठिकाणी असलेल्या छत्रपतीना आपसात एकमेकाविरूद्ध लढवित ठेवावयाचे व आपले उद्दिष्ट साध्य करावयाचे ही योजना त्याने निश्चित केली होती. आपल्या महत्वाकांक्षेसाठी त्यास कोणत्याही योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, खऱ्या-खोट्यांची चाड बाळगण्याची आवश्यकताच वाटत नव्हती. त्याच्या दृष्टीने साधनापेक्षा साध्यच महत्वाचे होते. त्याने स्वतंत्र राज्य स्थापन करतांना त्याने आपल्या सम्राटास देखील खोटे बोलून अंधारात ठेवल्याचे दिसून येते.

निजामाचा उपदव्याप

इ. स. १७२४ मध्ये साखर खेड्याच्या लढाईत निजामाचा विजय झाल्यानंतर औरंगाबादला

पेशवे बाजीरावाचा सत्कार केला. त्या वेळी मराठ्यांशी कायम धोरण, काय ठेवावे. याबद्दल त्याच्या मनात निश्चिती नव्हती. आपले आसन अधिक कसे दृढ होईल हीच त्याची मुख्य विवंचना होती. पुढे बादशहाने[६] दक्षिणेच्या सुभ्यावर त्याची नेमणुक कायम केली. नंतर तो १७२५ मध्ये औरंगाबादहून हैद्राबादकडे गेला. त्यावेळी त्याच्या मनात मराठ्यांना आळा घालण्याचे विचार घोळू लागले. निजामाचा पंढरपूरला मुक्काम असतांना उदाजी चव्हाणने त्याची भेट घेतली. उदाजीला त्यांनी आपल्या पदरी नोकरीस ठेवले. त्याला मनसब व जहागिरी दिली आणि या वेळी तुरूकताज खानास ताकिद दिली की, मराठ्यांना कोठेही थारा देऊ नये. त्यांच्यावर दहशत बसवावी याच काळात खानाने नाशिक प्रांतात गोंधळ घातला. प्रलय घडवून आणला. या अनेक प्रकारच्या तक्रारी पेशवा बाजीरावाकडे आल्या. त्यावरून निजामाच्या मनात काय आहे. हे पेशवा बाजीरावाला कळून चुकले. निजाम याचवेळी वरून छत्रपती शाहूला कळवित असे की, आम्ही संपूर्णपणे तुमच्याबरोबर प्रेमाने, स्नेहाने व पूर्णपणे नम्रतेने वागत आहो. परंतु तुमचे पेशवे उगीचच आमचा द्वेष करतात. तो बंद ठेवावा. पेशवा बाजीरावच हा कळलाव्या आहे अशी त्यांची समजूत होती. छत्रपती संभाजी दुसरा व छत्रपती शाहू मध्ये बेबनाव निर्माण करून छत्रपती शाहूला उखडून टाकायचे इत्यादी कारस्थाने छत्रपती शाहूला जेव्हा समजले तेव्हां त्यांचे मत निजामाविषरूी पूर्णपणे बदलले होते.

तुरूकताज खाना प्रमाणेच रंभाजी व त्याचा पुत्र जानोजी निंबाळकर यांनी भाई बंदकीची कारणे दाखवून सातारा प्रांतात बराच मुलूख मारून शाहूचा द्वेष केला. वर्चस्व नष्ट करण्यास सुरूवात केली. हे सरदार निजामाची आज्ञा पाळीत होते.[७] छत्रपती शाहूने या सरदारांना १० मार्च १७२६ ला कळविले की, आपली कार्यवाही ही चांगली नाही, आपण संपूर्ण प्रदेश उध्वस्त करीत आहात हे योग्य नाही. पण छत्रपती शाहूच्या या धमकीला हे सरदार भिणारे नव्हते.

उदाजी चव्हाणास निजामाने छत्रपती शाहू विरूद्ध भडकाविले. इ. स. १७२६ मध्ये

मराठ्यांच्या फौजा कर्नाटकमध्ये असतांना उदाजीने रहीमपूर वर हल्ला करून शाहूच्या विरुद्ध द्वेष केला होता. म्हणून शाहूने आपला सरदार रायाजी जाधव यास उदाजीवर पाठविले (ऑगस्ट १७२६) यावेळी उदाजीच्या जवळ रंभाजी निंबाळकर आला होता. यानंतर रायाजी व रंभाजी यांच्यात युद्ध होऊन रायाजी मारला गेला. फौजा दूर गेल्या असता निजामाच्या सरदारांनी रायाजीला दगा दिला. याचे शाहूला वाईट वाटले. यातूनच छत्रपती शाहूला इ. स. १७२६ च्या शेवटी निजामाच्या कपटांची जाणीव झाली. याच वेळी सुलतानजी निंबाळकर, चिमणाजी दामोदर इत्यादी छत्रपती शाहूला सोडून निजामास मिळाले. याच्या बदल्यात छत्रपती शाहूने सुद्धा निजामाच्या पक्षातील चंद्रसेनचा भाऊ शंभूसिंग, घोरपडे, धारराव निंबाळकर इत्यादी [८] छत्रपती शाहूनी आपल्या पक्षात आणले व त्यांचा वचपा काढला. ही कामगिरी व्यासरावाने केली. जो व्यासराव जाधवांचा कारभारी होता.

इ. स. १७२७ पर्यंत छत्रपती शाहूला एकूण एक प्रकरणाचा अनुभव येऊ लागला. कान्होजी भोसलेला ऐवजखानाने सैन्यानी पिटाळून लावले तेव्हा छत्रपती शाहूच्या इतर सरदारांनी त्याला सोडवून आणले. आपल्या मुलूखात छत्रपती संभाजी दुसरा चा गौरव चालू झाला. लोकांना कोल्हापूरच्या संभाजीकडून इनामाच्या सनदा मिळू लागल्या. हा सर्व प्रकार पाहून छत्रपती शाहूची तारांबळ उडाली. पेशवा बाजीरावाला छत्रपती शाहूने कर्नाटकमधून ताबडतोब बोलावून घेतले. याशिवाय उत्तरेतून उदाजी पवार, कंठाजी कदम, पिलाजी गायकवाड यांना बोलावे. त्यांना सांगितले की, पेशवा बाजीराव उत्तरेस गेला आहे आणि तिकडे मनसुब्याचा प्रसंग निर्माण झाला आहे. यावेळी कान्होजी भोसलेही फुटलेला होता.

यावेळी छत्रपती शाहूची मनःस्थिती अत्यंत उदविग्न झाली होती. निजामाने छत्रपती शाहूला अशी बातमी पोहोचती केली की, हा [९] कोकाणस्थ तरूण तुमचा पेशवा व खंडेराव दाभाडे सेनापती हे दोघेही तुम्हास दगा देणार अशी अफवा छत्रपती शाहूच्या कानावर जाईल

नंतर छत्रपती शाहूने आपल्या मनातील विचार अंबाजी पंतास कळविले. की, आपला पेशवा बाजीराव व सेनापती यांना भेटावे. त्यांना चार गोष्टी विचाराव्यात सांगाव्यात, फितूराचा शोध घ्यावा, तुम्ही कोणत्या माणसाजवळ काही बोललात का? नेमके मला काय कळत नाही. प्रधान व सेनापती काय तरी करत आहे? याचा शोध घेऊन मला कळावे जर कोणी असा विरोधक असेल तर तसे परस्पर कळवावे.

आबाजीपंत यावेळी मालव्याच्या स्वारीतून येत होता.[१०] त्यानंतर पेशवा बाजीरावाने कर्नाटकातून येऊन अंबाजीस ताबडतोब पत्र लिहिले की, आपण ताबडतोब यावे, आमचा घत्तत न करणे, पेशवा बाजीरावाची ही धांदल उडून गेली. निजामाने ही कळ लावली तिचा हा प्रभाव होता. छत्रपती शाहूला संकटातून मुक्त करणारे दोन्ही पक्ष होते. एक मुत्सदी शहाणपणाने निजामाचजी समजूत घालणारा व दुसरे लष्करी सामर्थ्याने त्यास वठणीस आणणारा. पहिल्याचे समर्थन करणारे प्रतिनिधी व दुसऱ्याचे समर्थन करणारे बाजीराव व त्यांची साथ देणारे शिपाई गडी. काहीला तडजोडी करणे तर दुसऱ्याला सामर्थ्याच्या जोरावर हा प्रश्न सोडवावा वाटत होता.

हैद्राबादच्या राजधानीत मराठे चौथाई घेतात. त्याऐवजी त्यांना दुसरे काही उत्पन्न द्यावे, किंवा त्यांना रोख रक्कमा पाठवून द्याव्यांत व हैद्राबादच्या सूभ्यांत त्यांचे येणे बंद करावे. त्यांच्या वारसांना सुद्धा आमच्या मुलूखात येण्याचे काम पडू नये असे निजामाला वाटत होते. म्हणून प्रतिनिधीच्या मार्फत शाहूला काही द्रव्य व बालाघाट्यतील काही मुलूख कबूल केला. प्रतिनिधीस जहागिरी दिली.

या योजनेने निजामावर शह बसणार नाही, तो आपल्या हातचा राहणार नाही, यामुळे पेशवा बाजीरावास खूप राग आला. छत्रपती संभाजी दुसरा व तुमचा कलम आहे, त्याचा न्याय मी मध्यस्थ होऊन सोडवणे असे म्हणून चौथाई सरदेशमुखी सुद्धा तो देणार नाही. ही लबाडी

पेशवा बाजीरावाने छत्रपती शाहूच्या लक्षत्तत आणून दिली. छत्रपती शाहूच्या आज्ञेने २७ ऑगस्ट रोजी तो निजामाच्या स्वारीवर निघाला.

निजामाने छत्रपती शाहूच्या दरबारात देशस्थ व कोकणस्थ ब्राम्हण वादाचे बीज पेरले होते. प्रतिनिधी व पेशवे यांच्यात भांडणे लावली. छत्रपती शाहूच्याही मनात निजामाने बाजीरावाबद्दल गैरसमज केला. निजामांनी आपल्या वकिलामार्फत शाहूस कळविले की, आमचा उपक्रम सर्वस्वी तुमच्या हिताचा आहे. कोकणी ब्राह्मणांनी तुम्हाला ग्रासून टाकले आहे. त्यांच्या ताब्यातून तुम्हास मुक्त करावे एवढाच आमचा हेतू आहे. तुमचे मोकासदर कमी करून आम्ही त्या जागी छत्रपती संभाजीचे कामगार नेमले आहेत. त्यात गैर काही नाही. तुमच्या मार्फतच काम करण्यास तूर्त तुम्ही छत्रपती संभाजी दुसरा यास नेमले आहे. एकदा कोकणी ब्राह्मणाचा निकाल लागला म्हणजे आपण आपल्या पसंतीचे कामगार वाटेल ते नेमावे.

निजामाचे कारस्थान किती खोल गेले होते यामध्ये संशय नाही.'[११] आपल्या मनातील उद्देश छत्रपती शाहूस कळू न देता मराठ्याकडील लष्करातील अनेक सरदार फोडून आपल्या बाजूस केले. या निजामाने चंद्रसेनामार्फत कारस्थान रचून आपले हेतू पार पाडण्याकरीता छत्रपती संभाजी दुसरा यांना मदत केली. हे सर्व प्रकरणामुळे छत्रपती शाहूचे मनात एकंदर कारस्थानाचा प्रकाश पडला आणि समेटाचा नाद सोडून आपल्या सरदारांस त्याने युद्धाचे हुकूम सोडले.

मराठ्यास माळव्यात कायमचे हाकलण्याची जबाबदारी निजामने बादशहाला दिली होती. त्याप्रमाणे ऑक्टोंबरमध्ये निजाम मोठे तीस हजार फौजा, तोफखाना, '[१२] पैसा, दारूगोळा, साहित्य, सर्वाधिकार घेऊन दिल्लीहून निघाला तो दिल्ली आग्रा यमूना दुआल्प काल्पी व नंतर बुंदेलखंडात उत्तरला निजामने दिल्लीत जाऊन काय उलाढाली केल्या याची संपूर्ण माहिती पेशव्यास ताबडतोब मिळाली होती. बादशाहाचे उमरावाचे किती सामर्थ्य आहे

हे पेशवा बाजीरावाने अजमावले होते. त्यामुळे या सर्वाचाच समाचार घेण्याची तयारी पेशवा बाजीरावाने केली होती. वसईच्या चढाईपेक्षा उत्तरेची परिस्थिती वेगळी होती.

चिमाजीने वसईची मोहिम सर केली पण उत्तरेतील नवाब वेगळेच होते. माळव्याच्या परिस्थितीचा[१३] पेशव्यांनी पूर्व अभ्यास करून पेशवा बाजीरावाने सर्वांशी बोलून विचार विनिमय केला. छत्रपती शाहूची भेट घेऊन पुढील उपक्रमाची योजना ठरविली. इ. स. १७३७ मध्ये दसऱ्यास सर्व मंडळी पुण्यास जमली. यावेळी मराठा सरदार एकत्र आले व त्या ठिकाणी सर्व राजकिय परिस्थितीवर चर्चा झाली. उदाः पवार, बांडे, मल्हारबा, रानबा, यशवंतराव, तुकोजी, जिवाजी इत्यादी अनेक मातब्बर सरदार जमले होते, ही बैठक म्हणजेच माळवा स्वारीची ही पूर्व तयारी होती. (कार्तीक शु.३ (१५ ऑक्टोंबर)

यावेळी दक्षिणेत निजाम पूत्र नसिरजंगने वेगळेच उद्योग सुरू केले होते. स. १७३७ मध्ये सय्यद जमालुद्दीन यास निजामाने खानदेशावर पाठविले. त्याचा व आवजी कवडे यांचा संघर्ष झाला. पुढे नासिरगंजाने आपल्या सैन्याची जमवाजमव केली. तेंव्हा यावेळी सुलतानजी निंबाळकर, जानोजी, धीरजी पवार इत्यादींनी आपली फौज एकत्र करून नासिरजंगाच्या पाठलागावर राहिली अशा प्रकारे नासिर जगाने बरीच फौज तापी नदीवर वरणगावाजवळ मराठ्यांची फौज आडविली होती यातून पुढे [१४]कटकारस्थानाला ऊत आल्यामुळे आपली सर्व पदे सोडून दक्षिणेकडे आला होता.

निजामाने हैद्राबादला आपले बस्तान बसविलयानंतर आपली जय्यत फौज तयारी केली. सर्व उत्तरेकडील लोक आपल्या सैन्यात भरले होते. त्यांच्या पुढे दक्षिणी सैनिक लहान दिसत. त्यांची घोडे, शस्त्रास्त्रे, बंदुका, दक्षिणेपेक्षा वेगळीच होती. तोफा होत्या, हत्ती, गोलंदाज, जंगल सरदार होते. सैनिक मोठे, धिप्पाड, तेजस्वी, पराक्रमी, शौर्यवान होते. तो स्वतः धिप्पाड, तेजस्वी पुरूष होता.[१५] त्याला विवाहित पाच स्त्रीचा व जनान खान्यात कित्येक

उपस्त्रीया होत्या. त्याचे पुत्र गाजिउद्दीन, नासिरजंग, सलाबतजंग, निजामअली, मीर मोगल, सरीफ इ. औरस मुले होती.

हैद्राबादचा निजाम सलाबतलंग व बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब संबंध (इ.स. १७५१-१७६१)

हैद्राबादचा संस्थापक[१६] निजाम-उल्-मुल्क बऱ्हापूर येथे इ. स. १७४८ मध्ये मृत्यू झाल्यानंतर त्याच्या उत्तराधिकारी नबाबात राज्यसत्तेसाठी संघर्ष सुरू झाला. ह्या संघर्षात निजाम उल मुल्कचा मुलगा मुजफ्फरजंग याचा इ. स. १७५१ मध्ये याचा अचानक मृत्यू झाल्यानंतर झालाबजाजंग हा हैद्राबादचा नबाब झाला. तो अत्यंत धूर्त व कर्तव्यहीन नबाब होता. मराठ्यांच्या झालेल्या अनेक लढ्यात इंग्रजांनी हैद्राबदच्या नबाबाला मदत न केल्यामुळे नबाब सफदरजंग याने फ्रेंचाची कवायती फौज स्विकारून मराठे व इंग्रजाविरूद्ध कटकारस्थाने सुरू केली होती.[१७] नबाब सलाबतजंगने फ्रेंच गव्हर्नर बुशी व डुप्ले या फ्रेंच गव्हर्नरांशी संगनमत करून नबाब सलाबतजंगाने पेशवा नानासाहेबाविरूद्ध अनेक कारस्थाने सुरू केली होती. सलाबतजंगाच अधिकारी सय्यद बाबरखान पेशव्या विरूद्ध कटकारस्थाने करीत होता. परंतु फ्रेंच गव्हर्नर बुशी पेशव्यांशी सलोख्याने वागण्याचा सल्ला नबाब सलाबतजंगास वारंवार देत होता. इ. स. १७५३ ५ ५४ पर्यंत नानासाहेब पेशवे व नबाबा सलाबतजंग याचे स्नेहपूर्ण मैत्रीचे संबंध होते. फ्रेंच गव्हर्नर बुशी यांचे व नबाबाचे संबंध बिघडल्यामुळे नबाब सफदरजंग हा पेशव्यांशी सलोख्याने वागत होता.

शिंदेखेडची लढाई व दमाजी, जनकोजी शिंदेची कामगिरी (डिसेंबर १७५७)

नानासाहेब पेशव्यांच्या दुर्बलतेचा[१८] फायदा घेवून मलाब सफदरजंगाकडे २५ लाखाच्या प्रदेशाची मागणी केली होती. नबाब सलाबतजंगाने ती मागणी अमान्य केल्यामुळे नानासाहेब पेशव्याने दक्षिणेतील मुस्लिम राजवट संपुष्टात आणण्याचा मुख्य हेतू होता. त्यावेळी मराठ्यांचा

पराक्रम व दहशत सर्वत्र गाजत असून हिंदुपादशाही उभारणीला हळूहळू पोषक वातावरण निर्माण झालेले होते. नानासाहेब पेशव्याने नबाब सलाबतजंगाच्या विरूद्ध डिसेंबर इ. स. १७५७ च्या शिंदखेडच्या लढाई घोषित केली.'[१९] नानासाहेबाचा मुलगा विश्वासराव याला लढाईचा अनुभव मिळावा म्हणून त्याला शिंदखेडची लढाईचा सरसेनापती म्हणून घोषित केले होते. मराठा सरदार दमाजी शिंदे, जयप्पा शिंदे जनकोजी शिंदे इत्यादींच्या फौजेने नबाब सलाबतजंगाच्या सैन्यावर एकदम हल्ला करून त्याचा पराभव केला. नबाब सलाबतजंग नामधारी बनला व सर्वसूत्र त्याचा धाकटा भाऊ निजाम अली व त्याचा मुख्य सचिव विठ्ठल सुंदर याला देण्यात आली. हैद्राबादच्या नबाबाने यावेळी फ्रेंचाची कवायती फौज आपल्या तैनातीत ठेवली होती. फ्रेंच गव्हर्नर बुशीची कवायती फ्रेंच फौज व तोफखान्यात तरबेज असलेला इब्राहिमखान गारदी, '[२०] निजामाच्या सैन्याचा, लष्करप्रमुख होता. यावेळी नबाब सलाबतजंगाने मराठ्यांचा सरदार रामचंद्र जाधवाची जहागीर जप्त केली. कारण त्याने नानासाहेबाच्या सैन्याविरूद्ध नबाबाच्या बाजूने लढला नाही. म्हणून नबाब सलाबतजंग निराश झाला होता.

पेशवा नानासाहेब व निजामअली संबंध (१७५९-१८०३)

हैद्राबादच्या निजाम अलीने अलीकडे नानासाहेब पेशव्याला खुष करून त्याच्या साह्याने सलाबतजंग व शहानवाजखान ह्या दोघांचा उठाव हाणून पाडण्यात तो यशस्वी झाला होता. शिंदखेडच्या तहाची रचना करतांना पेशव्यास खूश करण्यासाठी त्याने कबुल केले की, सलाबतजंगास पेशव्यासमोर दौलताबाद किल्ल्यात भेटीसाठी आणले जाईल. त्याचबरोबर म्हणाला की, तुमच्याशिवाय मला कोणाचाच आधार नाही याचाच अर्थ असा की, '[२१] सलाबतजंगाने फ्रेंच गव्हर्नर बुशी ह्याच्या समोर विनंती करून जी भाषा व्यक्त केली होती त्याचप्रमाणे निजामगलीने नानासाहेब पेशव्याची भेट घेऊन व्यक्त केली होती. त्याचप्रमाणे

निजामअलीने नानासाहेब पेशव्याची भेट घेऊन व्यक्त केली होती. निजामअलीने पेशव्याची भेट घेवून त्याचा सत्कार केला तसेच दौलताबादचा किल्ला अहमदनगरचा किल्ला व पंचेचाळीस लाख उत्पन्नाचा भूप्रदेश पेशव्याला देण्याचे मान्य केले.

निजामगलीचा सर्व आधार इब्राहिमखान गारदी होता.'[२२] तो फ्रेंच बुशीचा शिष्य असून हैद्राबादच्या नोकरीत आला होता. निजामअलीने पेशव्यांनी केलेल्या महत्वाच्या करारानंतर नबाब सलाबतजंगास निजाम पदावरून काढून टाकले. पेशव्यांनी मैत्रीचा करार होताच निजामअलीने सलबतजंगाने विश्वासघातीने ठार करण्याचा बेत केला. नबाब सलाबतजंगान त्याचा विश्वासून हैदरजंग ह्याच्याशी गुप्त करार करून निजामअलीचा काटा काढावा अशी तरतूद केली होती. परंतु निजाम–अलीने आपल्या दोन रक्षकांच्या साह्याने सलाबतजंगास ठार केले. हा भीषण प्रकार अल्पकाळात झाला. त्यामुळे सर्वत्र हाहाकार झाला. लोक निजामअली विरूद्ध संतापलेले होते व त्यांनी निजामगली विरूद्ध हल्ला केला होता, परंतु विठ्ठल सुंदरने मोठ्या शिताफीने तंबूच्या कमानी कापल्या व निजाम अलीस मोठ्या शिताफीने बाहेर काढले व जीव वाचवून निजाम अलीस बऱ्हापूरला निघून गेला. '[२३] शहानवाजखान जवळच दौलताबादच्या किल्ल्यात अटकेत होता. त्याला ठार करण्यात आले. अशा रितीने हैद्राबादचा निजाम व त्यांच्या झालेल्या अंतर्गत संघर्षात निजामअली हैद्राबादचा निजाम झाला. निजामअली विश्वासघातकी, चाणाक्ष, फितूर व कावेबाज इ. दुर्गुणांनीयुक्त असा निजामअली हैद्राबादचा नबाबा झाला. निजामशाहीच्या अंतर्गत कलहाची ही एक परिणती मानली जाते.

अशा रितीने हैद्राबादच्या सत्तासंघर्षात नासिरजंग, मुजफ्फरजंग गाझीउद्दीन, सलाबतजंग, हैदरजंग, रामदासपंत, सलाबतजंग अशा अनेक व्यक्तीचा निजामशाहीच्या राजवटीत एका मागून एक केवळ सत्तेच्या'[२४] हव्यासापोटी अंतर्गत खून झालेले दिसून येतात ही खेदजनक बाब मानली पाहिजे.

नबाब सलाबतजंगाचा दिवाण शहानवाजखानाने शिंदखेडच्या लढाईत मदत केली नाही म्हणून त्याच्या जागी सलाबतजंग याला नबाबाचा दिवाण म्हणून घोषित केले. त्यामुळे शाहनवाजखान अपमानित व निराश झाला व त्याने दौलताबादचा किल्ला नबाबाकडून हस्तगत करून तेथे वास्तव्यात राहू लागला. शाहनवाजखान याने पेशवा नानासाहेबाच्या मध्यस्तीने सलाबतजंगाविरूद्ध कटकारस्थाने करू लागला.[२५] निजामअलीला हैद्राबादचा नबाब जाहीर करा असा शहानवाजखानाचा मुख्य उद्देश होता. परंतु नबाब, सलाबतजंगास ही बातमी समजताच तो दौलताबाद किल्ल्यावर, शहानवाजखानाच्या भेटीस आला नाही. शेवटी कर्तव्यहीन सलाबतजंगाच्या ऐवजी इ. स. १७६१ रोजी निजामअली याला हैद्राबादचा निजाम म्हणून घोषित करण्यात आले. नबाब निजामअली याने मराठ्यांविरूद्ध युद्ध घोषित केले.

महादजी शिंदे विरूद्ध मुजफ्फरखान यांच्यातील अंतर्गत वाद व शेवट इ. स. १७५५-१७६०

मुजफ्फरखान हा निजाम सलाबतजंगाच्या नोकरी होता. पेशवा नानासाहेब मुजफ्फरखानाच्या कर्तबगारीवर इतका संतुष्ट होता की, १७५४ मध्ये त्याला १ लाख रूपये तनखा ठरवून आपल्या नोकरी ठेवले होते. इ. स. १७५५ मध्ये पेशव्याने कर्नाटकांच्या मोहिमेत मुजफ्फरखानास पाठविले होते. ह्या मोहिमेंत महादजी शिंदे, आबा पुरंदरे इ. मराठी सरदारांशी मुजफ्फरखानास बरोबर होते. परंतु ऐनवेळी बाबा पुरंदरे व मुजफ्फरखान यांच्यात सैन्य संख्येवरून वाद झाल्याने, मुजफ्फरखानाने पेशव्यांची नोकरी सोडून अर्काटच्या सावनूरच्या नबाबाकडे नोकरी धरली. मुजफ्फरखानाने अशी घमेंड जाहीर केली की, पेशवा व फ्रेंच गव्हर्नर बुशी त्यांचा तो पराभव करू शकेल. मुजफ्फरखाना हे दोघेही सावनूरच्या लढाईत पेशव्याच्या विरूद्ध लढत होते. त्यामुळे दोघांवरही पेशव्याचा राग होता.

मुजफ्फरखान केवळ कल्पक[२६] लढवय्या नव्हता तर सर्व बाजूंनी राजनितिज्ञ मुत्सद्दी,

निश्वासघातकी होता. पेशव्याने पुन्हा मुजफ्फरखानाची समजूत घालून त्याला आपल्या नोकरीत आणण्याची इच्छा होती. परंतु सदाशिवराव भाऊ यांचा मुजफ्फरखानाच्या नेमणुकीस विरोध होता. मुजफ्फरखान ह्यामुळे अतिशय संतप्त झाला. सदाशिवरावभाऊ व इतर मराठा सरदारांनी मुजफ्फरखानास पेशव्याच्या नोकरीत ठेवू नये अशी अट घातली होती. त्यामुळे मुजफ्फरखानाच्या मनात विशेषतः [२७] सदाशिवरावभाऊ विषयी द्वेष उत्पन्न झाला. पेशव्याला मुजफ्फरखानापासून मतलबाने काम करून घ्यावे अशी इच्छा होती. पेशव्याने मुजफ्फरखानास कल्याण, वसईच्या मोहिमेवर पाठविले होते. त्याचवेळी इब्राहिमखान गारदी ह्याचे व मुजफ्फरखान अंतर्गत शत्रुत्व होते. निजाम दरबारात इ. स. १७५९ रोजी बलागतंगज, हैदरजंग इत्यादींनी नबाब निजामअलीस इब्राहिमखान गारदीस सैन्याच्या प्रमुख पदावरून काढून टाकावे अशी अट घातली होती. त्यामुळे निजामअलीने इब्राहिमखान गारदीस सैनिक पदावरून काढून टाकले.

सदाशिवभाऊस ही बातमी कळताच, [२८] इब्राहिम खानांशी करार करून आपल्या फौजेत नोकरीस घेतले. इ. स. १७५९ रोजी इब्राहिमखान याने निजामअली नोकरी सोडून पेशव्याच्या नोकरीत दाखल झाला. यामुळे मुजफ्फरखान चिडून जाऊन इब्राहिम खानास नोकरीत ठेवले म्हणजे मुजफ्फरखानास टाकावे असे समजण्याचे कारण नव्हते. परंतु मुजफ्फरखानास तसे वाटत होते. यावेळी पेशव्यांचे सामर्थ्य अगदी कळसास पोहचले होते.

दौलताबाद, अहमदनगर, विजापूर ही स्थाने कागदोपत्री पेशव्यांना देण्याच्या तयारीत असला तरी विजापूरची सत्तेवर आपल्यापासून त्याने पुनः पेशव्याविरूद्ध लढायीची तयारी केलेली होती.

मुजफ्फरखान हा पेशव्याच्या नोकरीत असला तरी हा धूर्त, गद्दारी करेल याचा नेम नव्हता त्याचा कोणत्याही मराठा सरदाराचा भरवसा नसल्यामुळे सदाशिवरावभाऊ याने

इब्राहिमखान यास आपल्याकडे ठेवून घेतले. हा प्रकार मुजफ्फरखानास सहन झाला नाही. त्याने सदाशिवरावभाऊ विरूद्ध सूड उगविण्याची चिड निर्माण झाली. निजामअलीसुद्धा सदाशिवराव[२९] भाऊविरूद्ध तितक्याच द्वेषाने वागू लागला तेंव्हा बऱ्यावाईट उपामाने भाऊचा काटा काढण्याची इच्छा निजामअलीस झाली.

२८ ऑक्टोंबर (रविवार) इ. स. १७५९ रोजी सदाशिवराव भाऊ एका खाजगी डेऱ्यात दाखल झाले असतांना मुजफ्फरखानाचा जावई हैदरखान ह्याने डेऱ्यात शिरून सदाशिवराव भाऊवर हत्यार चालविले, त्यावेळी शिलेदार नागोजी गुजर ह्याने खूनी इसमाचा हात धरून सदाशिवरावभाऊचा बचाव केला, तेंव्हा मुजफ्फरखान व हैदरखानास दोषी ठरवून त्यांना पेशव्याने ठार केले व बेईमान, विश्वासघातकी मुजफ्फरखानासारख्या बेईमान सरदाराचा अखेर शेवट झाला.

थोडक्यात मराठ्यांचा जोर दक्षिण भारतात वाढून [३०] हैद्राबादच्या निजामशाहीचा दक्षिणेकडील प्रभाव कमी झाला. नानासाहेब उत्तर दक्षिण प्रदेशात सार्वभौमत्व प्रस्थापित झाले. याच कालखंडात इंग्रज, फ्रेंच यांच्यावर प्रभाव टाकून त्यांना पेशव्याच्या नियंत्रणात आणण्याचा मुख्य हेतू होता. परंतु जेरबदं वाचवण्याचीशक्ती निजामाजवळ नव्हती.

महादजी शिंदेची उत्तरेतील कामगिरी

उत्तरेत शिंदे, होळकर, अंताजी माणकेश्वर, हिंगणे इत्यादींच्या प्रयत्नांनी पेशव्यांना प्रमुखपद व सन्मान मिळत होता. परंतु उत्तरेत नजीबखान रोहिला, तसेच दक्षिणेत निजामअली हा नवीनच प्रांतस्पर्धी निर्माण झाला. सलाबतजंगाचे अंगी विशेष कर्तृत्व नव्हते. शाहनाजखान व हैदरजंग हे दोन प्रतिस्पर्धी नष्ट करून निजामगली दक्षिणेत एकदम पुढे आला. [३१] सिंदखेडच्या लढाईत त्याने पेशव्याशी पहिली टक्कर देऊन अनुभव घेतला त्यानंतर पेशव्याचे सामर्थ्य खूप वाढले होते. पेशव्याने दक्षिणेत निजामअलीस नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न

केला होता. परंतु त्याचवेळी उत्तरेत अफगाणीस्थानचा बादशहा अहमदशहा अब्दलीचे आक्रमण सुरू झाल्याने दक्षिणेत निजामअलीचा बंदोबस्त करता आला नाही. पेशव्याचा उद्देश म्हणजे दक्षिणेत हैद्राबादच्या निजामाला पूर्णपणे ओळखून होता. उत्तरेत फ्रेंचच्या फौजेचा पाडाव होऊन इंग्रजांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते.[32] इ. स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईत, बंगलाच्या नबाबाचा इंग्रज गव्हर्नर लॉर्ड क्लाईव्हने त्याचा पराभव करून भारतात आपली सत्ता प्रस्थापित केली होती.

दक्षिणेत निजामअली अतिशय धूर्त, कावेबाज होता त्याला उत्तर प्रदेशाची जहागिरी मिळालेली होती. ती जहागिरी इंग्रजांना देऊन इंग्रजांची मैत्री संपादन करावी अशी त्याची इच्छा होती. मराठ्यांच्या आश्रयांस जाण्यापेक्षा, इंग्रजाची आश्रयास जाण्याचा त्याचा मुख्य हेतू होता. याउलट संपूर्ण दक्षिण भारताचा प्रदेश आपल्या ताब्यात रहावा हा पेशवा नानासाहेबाचा उद्देश होता. परंतु इ. स. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. मराठ्यांची तरूण पिढी ह्या युद्धात मारली गेली. ह्याउलट निजामअलीने इ. स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धात तटस्थता दाखविली. होती त्यामुळे तो सुरक्षित होता. मराठ्यांचा पराभव झालेला पाहून निजामअलीने पेशवा नानासाहेबांशी व मराठ्यांशी केलेले इ. स. १७५५-१७६० पर्यंतचे सर्व करार धुडकावून लावले. तो दक्षिणेत मराठ्यांचा कट्टर शत्रू बनला व मराठेशाही बुडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

महादजी शिंदे व निजामअली संबंध (१७८४-१७९१)

मराठ्यांच्या इतिहासात [33] पानिपतचे तिसरे युद्ध अतिशय दुर्दैवी घटना मानली जाते. ह्या युद्धात मराठी सैनिकांची पूर्ण पिढीच गारद झालेली होती. ह्या संधीचा फायदा घेऊन हैद्राबादचा नबाब निजामअलीने दक्षिणेत पेशवा नानासाहेबांशी इ. स. १७५७, १७५८,१७५९ चे केलेले सर्व करार व दक्षिणे दिलेले दौलताबाद, औरंगाबाद, बऱ्हाणपूर, विजापूर इ. प्रदेशाचे

बासस्ट लक्ष उत्पन्नाचा प्रदेश पेशव्यांना दिला होता परंतु हे सर्व करार कागदावरच होत. निजाम अलीने पेशव्याशी बेईमानी करून सर्व करार रद्द करून तो ह्यावेळी दक्षिणेत झाला होता.

इ. स. १७८३ मध्ये महादजी शिंदे ह्यांनी उत्तरेतील मोगल दरबारात बादशहाचे वजीरपद मिळवून तो प्रबळ झाला होता. त्याच्या मनात आले असते तर दक्षिणेत निजामअलीला नेस्तनाबूत करता आले असते पेशवा नानासाहेबाप्रमाणेच महादजी शिंदे उदार होता. या संधीचा फायदा घेऊन निजामअलीने त्याचा वकील गोविंद करमालेकर ह्यास इ. स. १७८४ रोजी महादजी शिंदेकडे मैत्रीचे करार करण्यासाठी पाठविले होते. तो सुमारे सहा वर्ष म्हणजे १७९१ पर्यंत महादजी शिंदेकडे दिल्ली दरबारात होता.[३४] निजाम अलीची वंशपरांपरागत असलेली दिल्ली येथील जहागिरी गाजीउद्दीन यास न देता खरा वारसदार म्हणून हैद्राबादचा नबाब निजामअलीस मिळावी अशी महादजी शिंद्यास विनंती करण्यात आली होती.

तसेच उत्तरेत व दक्षिणेत नाना फडणीसाचे व निजामअलीमध्ये मोठे शत्रुत्व होते, महादजीचा नाना यांच्यातील कलम लक्षात घेऊन महादजीकडे आपला वशिला लावून मराठ्यांच्या प्रदेशांत नाना फडणीस व मराठ्यांनी आक्रमण करू नये व त्याने पेशवा नानासाहेबांशी केलेले करार रद्दबातल व्हावे असा त्याचा होता. महादजी शिंदेला बादशहाची मर्जी राखून निजाम-अलीला पूर्ण अभय देण्यात आले. ह्यांस निजामअलीची धूर्तता व विश्वासघातकी स्पष्ट होत असून महादजी शिंदे निजाम अलीच्या विश्वासघातकी वृत्तीला पूर्णपणे अभय दिलेले दिसून येते. इ. स. १७९१ पर्यंत बाबा करमाळेकर याने महादजी शिंद्यामार्फत दिल्लीतील, निजामअलीचे संपत्तीविषयीचे सर्व करार यथायोग्य करून घेतले.

इ. स. १७९३ मध्ये निजामाने बादशहाद्वारे समेट घडवून [३५] आणण्यासाठी पुण्यात आले होते. परंतु त्यांच्यामध्ये महादजीचा इ. स. १७९३ मध्ये मृत्यू झाल्याने बादशहातर्फे होणाऱ्या

वाटाघाटी थंडावल्या. परंतु निजामअलीचा वकील बाबा करमालेकर ह्यांनी मोठ्या धूर्ततेने दक्षिणेतील सर्व मराठ्यांना केलेले करार रद्द ठरवून निजामअली हा दक्षिणेत सामर्थ्यवान बनला होता.

थोडक्यात निजामअली दक्षिणेत मराठ्यांचा शत्रू असला तरी महादजी शिंदे यांनी दिल्लीतील मोगलांचा दिवाण या नात्याने केलेली कामगिरी महत्वाची मानली जाते. याउलट निजामअली कावेबाज व धूर्त असून त्याने इ. स. १७६१ नंतर झालेल्या करारानुसार सर्व अटी रद्दबातल करून दक्षिणेत महत्वाचा सत्ताधीश बनला होता. महादजी शिंद्यांनी निजामअली विषयी दाखविलेली उदारता [३६] निजामशाहीच्या कारकिर्दीत गौरवास्पद होती. हे निर्विवाद सत्य आहे.

नानासाहेब व हैद्राबादचा नबाब निजामअली संबंधचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास केल्यास इ. स. १७५७-१७६० पर्यंत मराठ्यांचे सरदार, दत्ताजी जनकोजी शिंदे, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, बाळाजी निंबाळकर, सदाशिवराव भाऊ, विश्वासराव इ. पराक्रमी सरदाराद्वारे हैद्राबादचा नबाब निजामअली विरूद्ध अनेक मोहिमा झाल्या होत्या. त्यात निजामअली शरण येण्याचे देखावे करून आणि दौलताबाद किल्ला, अहमदनगर, इ. पंचेचाळीस लाखाच्या उत्पन्नाचा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात देण्याचे कागदोपत्री कबूल करून अनेक वर्ष पेशवा नानासाहेब व अनेक पराक्रमी मराठा सरदारांत अतिशय धूर्तपणे फसविणारा हैद्राबादचा निजामअली अतिशय धूर्त व कावेबाज नबाब होता. १७५५-१७६० ह्या पाच वर्षाचा कालखंडात पेशवा नानासाहेब यांनी निजामअलीच्या सैन्याचा पराभव करून सिंदखेडचा तह, दौलताबादचा तह इत्यादी तहाद्वारे केवळ कागदोपत्री करार झाले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र हैद्राबादचा नबाब निजामअलीने सर्व करार फेटाळले होते.

नबाब धूर्त व कावेबाज होता. परिणामतः पेशवा नानासाहेब व नबाब निजाम संबंधात

मराठ्यांच्या इ. स. १७५५ ते १७६० पर्यंतचा कालखंड केवळ तथ्यहीन व अविवेकी कालखंड मानला जातो. पेशवा नानासाहेबाने आपल्या अनेक मराठा सरदार निजामअलीचा पराभव करून त्याचा हैद्राबाद, दौलताबाद, अहमदनगर, अकार्ट रावनूरचा प्रदेश हस्तगत करून निजामअलीचा पूर्णतः पाडाव करून सुद्धा त्याचा नायनाट झाला नव्हता ही बाब मराठ्यांच्या इतिहासात शोचनीय व गैरव्यवहार्य मानली जाते. निजामअली इ. स. १७५५ –१७६० च्या ह्या कालखंडात पेशवा नानासाहेब व इतर मराठे सरदारांना केवळ कागदोपत्री आश्वासने देऊन फसविणे हा केवळ पाच वर्षातील मराठेशाहीतील कर्तबगारीची केवळ शोकांतिका मानली जाते. इ. स. १७६० च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर निजामशहा मराठ्यांचा कट्टर शत्रू बनून व इ.स. १७६० पूर्वीच सर्व आश्वासने फेटाळून लावून मोठ्या धूर्ततेने आपल्या हैद्राबादच्या व जहागीराचा प्रदेश मराठ्यांचा आक्रमणातून सुरक्षित ठेवितो ही एक आश्चर्यकारक बाब असून मराठ्यांच्या कर्तबगारीला नाचक्कीची बाब मानली जाते.

परंतु महादजी शिंदे यांनी दिल्ली येथील केलेली कामगिरी नजरेआड करता येत नाही त्यामुळे निजामाला जीवदान मिळाले हे सत्य आहे. निजामअलीस विस्तारात वाव दिला नाही व दिल्लीवरून धाकात ठेवण्याचे काम महादजी शिंदे यांनी केले आहे व त्यामुळे मराठा राज्याचा विस्तार झाला व ते टिकून राहिले.

संदर्भ सूची

१) Khan Yosuf Huseen-The First Nijam Part-1 (English) Hydrabad 1936 Page 33, 35

२) इर्विन लटर मुगल्स (इंग्रजी) खंड १ (कलकता पृ.२६०-२६२) १९५३

३) शेजवळकर त्र्यं.श. निजाम मराठे संबंध- पुणे १९५४ पृ.३५-३०

४) कित्ता ३२, ३५

५) सरदेसाई गो. स. पेशवे दप्तर, खंड १२ मुंबई १९३३ पृ. ३९, ४२

६) कित्ता पृ. ४२-४५

७) शेजवाळकर त्र्यं. श. निजाम मराठे संबंध १८ वे शतक भारत इतिहास व्याख्यान माला तृतीय संमेलन पुणे १९६३ पृ. १०, १४

८) कित्ता पृ. ४२-४५

९) शेजवाळकर त्र्यं. श. निजाम मराठे संबंध १८ वे शतक भारत इतिहास व्याख्यान माला तृतीय संमेलन पुणे १९६३ पृ. १०, १४

१०) शेजवाळकर त्र्यं. श. निजाम मराठे संबंध १८ वचे शतक भारत इतिहास व्याख्यान माला तृतीय संमेलन पुणे १९६३ पृ.१०, १४

११) पुरंदरे कृ. वा. (संपा) पुरंदरे दप्तर खंड क्र. १ पुणे १९०८ लेखांक २८५-२८७ पृ.२८५

१२) कित्ता पृ. २८८, २९०

१३) जोशी श. ना. (संपा) -दाभाडे दप्तर, ऐतिहासिक लेख संग्रह साहित्य खंड-६, भारत इतिहास आणि संस्कृती पूणे १९५१ लेखांक ६, ७ पृ.८

१४) कित्ता पृ. ८, ९ व १०

१५) कित्ता पृ. ३४८, ३५०

१६) सरदेसाई गो. स. मराठ्यांचा इतिहास खंड २ मुंबई १९३१, पृ. ३५०-३५२

१७) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठा कालखंड-२, मुंबई १९८८ पृ. १७५-१८०

१८) कित्ता पृ. १८०-१८५

१९) पिसुर्लेकर मराठ्यांच्या इतिहासाची साधने (पोर्तुगीज दप्तर) मुंबई १९७४ पृ. ४०, ४२

२०) कित्ता पृ. ४४, ४६

२१) सरदेसाई गो. स. (संपा) पेशवा बाळाजी बाजीराव खंड-२, मुंबई १९५३, पृ. ९०, ९२

२२) सरदेसाई गो. स. पेशवे दप्तर खंड २८, लेखांक २३२, २३३

२३) कित्ता पृ २७७, २७९

२४) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड क्र.४ (निजामशाहीचा उपक्रम) मुंबई १९३१ पृ. २७६-२७७

२५) राजवाडे वि. का. (संपा) मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड क्र. ३, पुणे १९०१, लेखांक ४४८- ४५०

२६) कित्ता पृ. ४५१-४७०

२७) कित्ता पृ. ४३२-४३३

२८) कित्ता वाई १८९८ लेखांक १५, १८ पृ. २०

२९) सरदेसाई गो. स. पेशवे दप्तर खंड क्र. २, लेखाकं ६८४, ६८५

३०) कित्ता पेशवे दप्तर खंड ६, मुंबई १९३१, लेखांक १३०-१३४ पृ. १३१

३१) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड ४, मुंबई १९३३ पृ. ३३३-३३४

३२) कित्ता पृ. ३३४५, ३३६

३३) सरदेसाई गो.स. (संपा) पेशवे दप्तर खंड २८, लेखांक १७५-१७६ पृ. १७५

३४) कित्ता लेखांक १८५, १८६ पृ. १८५

३५) कित्ता लेखांक – २०२, २३

३६) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, खंड ७, मुंबई १९३३, पृ. २१५, २१६

प्रकरण चौथे

महादजी शिंदे - राजपूत संबंध

प्रकरण चौथे

महादजी शिंदे - राजपूत संबंध

इ. स. ६४७ मध्ये सम्राट हर्षवर्धनाचा मृत्यू झाला व एकछत्री उत्तर भारतातील राजकीय कारकिर्द संपली राजकीय एकता आणि सांस्कृतिक प्रगतीचे युग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतात पुन्हा शकले पडली, उत्तर भारतात अनेक लहान लहान राज्यात विभागल्या गेला. परकीय आक्रमणे आणि आपसातील संघर्षाचा भारताच्या राजकीय क्षितिजावर पुन्हा उदय झाला.

इ. स. ७ ते १२ व्या शतकात भारताच्या राजकीय पटावर अनेक सत्ता उदयाला आल्या. या सर्वात राजपुतांचा उदय ही घटना या काळातील महत्वाची घटना समजल्या जातात. राजपुतांच्या अनेक टोळ्या या काळात उदयाला आल्या त्यांनी भारताच्या इतिहासावर स्वतःचा ठसा खोलवर उमटविला आहे. इ. स. ७ ते १२ या शतकाचा कालखंड हा भारताच्या इतिहासात ''राजपुत कालखंड'' म्हणून ओळखतात.

राजपुत काळाचे स्वतःचे वैशिष्ट्य आहे. या काळात राजपुत राजांनी परकीय आक्रमणाच्या प्रलंयकारी लाटांना स्वतःच्या समर्थ बाहुंनी काही काळ थोपून धरले. रक्ताच्या थेंबा थेंबातून विरश्री कारंजी उडविणाऱ्या राजपुतांचा इतिहास हा रक्तांच्या शाईने सोनेरी पानावर लिहिण्याच्या योग्यतेचा आहे. या काळात कला, साहित्य क्षेत्रातही भारताने नेत्रदीपक प्रगती केली. राजपुत हे उत्तर भारतातील शेवटचे हिंदू राज्यकर्ते असल्याने या काळाला विशेष महत्व प्राप्त होते.

राजपुत कोण होते?

राजपुत कोण होते, त्याचे मूळ काय, क्षत्रियांशी त्याचा काय संबंध होता हे प्रश्न इतिहासकाराच्या दृष्टीने आजही वादग्रस्त आहेत या संदर्भात निरनिराळ्या विद्वानांनी वेगवेगळी मते मांडली आहेत ''राजपुत'' या शब्दाचा प्रथम उल्लेख १७ व्या शतकात आला असे बहुतेक सर्व इतिहासकाराचे मत आहे.

राजपूतांची उत्पत्ती

राजपूत हा शब्द प्राचीन साहित्यात आढळत नाही यावरून ते [1] परकीय असावेत. राजपुतावर अधिकार वाणीने लिहिणाऱ्या कर्नल टॉडच्या मते "Annals and Antiquitis & Rajasthan" राजपुत हे शक, कुशान हून या भारतात स्थायिक होणाऱ्या परदेशस्थ वंशाचे वंशज होते.

कालातंराने ते भारतीय जनजीवनाशी एकरूप झाले. या परकीय वंशातील युद्धप्रिय लोकांनी स्वतः चा एक स्वतंत्र वर्ग स्थापन केला व तेच राजपुत या नावांनी ओळखले जाऊ लागले. उरलेले अहिर, जाट या नावाने ओळखले जाऊ लागले.

राजपुताच्या चालीरीती, अश्व पूजा, शस्त्रपूजा, स्त्रियांचा दर्जा मद्यविषयी आसक्ती युद्ध प्रियता इ.

सी. व्हि. वैद्य, गौरीशंकर ओझा यांच्या मते राजपुत हे आर्यवंशाचे आहेत असे मानतात. –डॉ. भांडारकरांच्या मते "गुर्जर"' हे परकिय असून सिखर वंशाचे होते. ते भारतात स्थायिक झाले व कालातरांने राजपुत म्हणून ओळखले जाऊ लागले.

– स्मिथ यांच्या मते राजपुत हे शुद्ध आर्यवंशाचे किंवा विदेशी नसून मिश्र वंशाचे आहेत. शक, कुशान, हून, गुर्जर इ. परकीय भारतात स्थायिक झाल्यानंतर कालातंराने त्याचा भारतातील आर्यातील क्षत्रियांशी संकर घडून आला व त्यातून राजपुतांची उत्पत्ती झाली.

राजपुताचा मिश्रवंशाचा हा सिद्धांत बहुतेक इतिहासकारांनी मान्य केला.

- प्रतिहार – प्रतिहार ही परदेशातून भारतात येणाऱ्या गुर्जर या वंशाची शाखा समजल्या जाते म्हणून हे गुर्जर प्रतिहार नावाने ओळखले जातात. प्रतिहाराचे मूळ ठिकाण उज्जैन होय.

- नागभट्ट प्रथम इ. स. ८ व्या शतकाच्या सुरूवातीला नागभट्ट प्रथम याने या

घराण्याची स्थापना केली. ग्वाल्हेर शिलालेखावरून नागभट्ट प्रथम याने आरबाचे आक्रमण परतून लावले होते. यावरून भडोच हा प्रदेश त्याच्या राज्यात मोडत होता.

- देवराज नागभट्ट प्रथमनंतर देवराज गादीवर आला.
- वत्सराज वत्सराज हा नागभट्ट प्रथमचा नातू असून अत्यंत पराक्रमी होता त्याने कनोजवर स्वारी केली होती.
- नागभट्ट द्वितीय – नागभट्ट द्वितीय ते इ. स. ८०५ ते ८३३ या दरम्यानचे राज्य केले.
- रामचंद्र – नागभट्ट द्वितीयनंतर इ. ८३३ मध्ये रामचंद्र कनौजच्या गादीवर बसला.
- मिहिरभोज – रामचंद्राच्या नाकर्तेपणामुळे प्रतिहार घराण्याची प्रतिष्ठा धुळीला मिळाली होती.

रामचंद्रचा मुलगा मिहिर भोज याने रामचंद्राला ठार करून गादी बळकावली होती. इ. स. ८३६

- महेंद्रपाल इ. स. ८८५ मध्ये मिहिरभोज मृत्यू पावल्यावर त्याचा मुलगा महेंद्रपाल गादीवर आला.
- भोजद्वितीय नंतर महिपाल प्रथम गादीवर आला.

२) गढवाल या घराण्याच्या उत्पत्तीविषयी निश्चित माहिती मिळत नाही.

- यशोविग्रह – यशोविग्रह या घराण्याचा मूळ पुरूष आहे.
- महिचंद्र – यशोविग्रहाचा मुलगा
- चंद्रदेव – याचे राज्य उत्तर काशी कोसल इंद्रप्रस्थ या भागात पसरले होते.
- मदनपाल – चंद्रदेवनंतर मदनपाल गादीवर आला.
- गोविंदचंद्र – मदनपाल नंतर गोविंदपाल गादीवर आला.

इ. स. १११४ मध्ये याचे राज्य दिल्ली ते मोधीर हिमालयातील तराई प्रदेशापासून ते

यमुना नदीपर्यंत पसरले होते.

● विजयचंद, जयचंद्र, हरिचंद्र

३) चहामान उर्फ चौहान– गुर्जर टोळ्यांपैकी एक

इतिहासकारात एकमत नाही. चहामान किंवा चौहान हे राजपुत असून सुर्यवंशी आहेत. याविषयी वाद नाहीत.

● गोविंदराज प्रथम – हा गोवक या नवानेही ओळखला जातो याच्यानंतर घराण्यातील सिंहराज, विग्रहराज, द्वितीय, दुर्लभराज, गोविंदराज द्वितीय, विग्रहराज चतुर्थ, पृथ्वीराज द्वितीय, असे ६ राजे होऊन गेलेत.

● पृथ्वीराज तृतीय उर्फ पृथ्वीराज चौहाण (इ.स. ११७७ ते ११९२) :

पृथ्वीराज चौहान हा सोमेश्वरचा मुलगा होता व तो वयाच्या पंधराव्या वर्षी गादीवर आला होता.

४) बंगालचे पालघराणे:-

गुप्ताच्या अस्तानंतर बंगालमध्ये स्थापनः- गोपाल ७५० ते ७७० अत्यंत पराक्रमी व कार्यक्षम राजा होता त्याने बंगालमध्ये राज्यकारभार केला.

● धर्मपाल नंतर वेदपाल– देवपाल, महीपाल प्रथम इ. स. ९८८ ते १०३८

५) चंदेल – चंदेल घराण्याचे राजपुत स्वतःहाला चंद्रवशीय समजत असत. मध्य भारतातील छत्रपुर, खजुराहो, माहोबा, कलिंजर, राजगड हा प्रदेश मूळ समजल्या जातो.

● नानुक :- नानुक हा चंदेल घराण्याचा पहिला राजा होय.

● यशोवर्मन इ. स. ९२५ ते ९५०

● गंगादेव, परमारदी

६) परमार :- हर्सोल प्रशस्तीनुसार परमार हे राष्ट्रकुटांपैकी असावेत उज्जैन हे परमाचे मूळ ठिकाण होय.

- उपेंद्र :- उपेंद्र हा परमार घराण्याचा पहिला पुरूष होय.
- भोजः- इ. स. १००० ते १०५५ भोज हा केवळ परमार घराण्यातील नव्हे तर भारताच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ राजा समजला जातो.

राजपुत हे असामन्य धैर्य, [२] देशनिष्ठा, प्रामाणिकपणा, स्वाभिमान, अदरतिथ्य आणि साधेपणा हे राजपुतांचे गुण सांगता येतील. शौर्य किंवा पराक्रम हा राजपुतांचा पर्यायवाची शब्द बनला आहे या त्याच्या गुणामुळे राजपुताचा इतिहास हा अलौकिक शौर्यांचा इतिहास बनला आहे. राजपुत स्वतः शूर-वीर असल्याने त्यांनी शूरवीराची नेहमीच कदर केली. प्रत्यक्ष शत्रुच्याही शौर्यावर मुग्ध होऊन त्यांच्या शौर्यांची तारीफ करण्याचा दिलदारपणा राजपुता आढळतो. वचनाचा सच्चेपणा, शरणागताला अभय, एकाकी झुंजीचीही तयारी या स्वभाव गुणामुळे राजपुतांनी भारतीय इतिहासा पानोपानी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

जयपूरच्या गादीविषयीचे भांडण इ.स. १७४३ सप्टेंबर २१ रोजी झालेल्या जयपूरचा राजा सवाई जयसिंहाच्या मृत्यूनंतर सुरू झाले. सवाई जयसिंहाला दोन मुले होती त्यापैकी थोरला ईश्वरसिंह आणि धाकटा माधवसिंह हे दोघे सावत्र बंधू होते. सवाई जयसिंग यांच्या मृत्यूनंतर धर्मशास्त्राप्रमाणे ईश्वरसिंह गादीवर येणे योग्यच होते. त्याप्रमाणे तो रितसर गादीवर बसला. पण सवाई जयसिंहाने एक चूक केली होती. इतर राजपूत संस्थानिकाप्रमाणेच सवाई जयसिंहाची एक फार मोठी महत्वांकाक्षा होती की, आपले लग्न उदेपूरच्या शिसोदे घराण्याचतील मुलीशी व्हावे. त्याचप्रमाणे इ. स. १७०८ जून ६ (जेष्ठ २ सोमवार) या दिवशी महाराणा अमरसिंह याच्या मुलीचे म्हणजे महाराणा जगतसिंहाच्या बहिणीचे (चंद्रकुंवर बाईचे) लग्न आंबेरचा महाराजा सवाई जयसिंह याजबरोबर झाले. त्यामुळे एक करार केला गेला. त्यात

पुढील अटी होत्या (१) चंद्रकुंवर सवाई जयसिंहाच्या सर्व घराण्यामध्ये थोरली समजली जावी. (२) तिला मुलगा होईल तो सवाई जयसिंहाचा सर्वात थोरला मुलगा समजला जावा म्हणजेच त्यास जयपूरची गादी मिळावी. (३) तिला मुलगी झाल्यास तिचे लग्न मुसलमानाशी होऊ नये. दुसरी अट हिंदूधर्मशास्त्राप्रमाणे अयोग्य होती. पण सवाई जयसिंहाची उदेपूरच्या राजघराण्यातील मुलीशी आपले लग्न व्हावे अशी जबरदस्त इच्छा होती. त्यामुळे सवाई जयसिंहाने तिन्ही अटी मान्य केल्या. त्याच्या दुर्दैवाने चंद्रकुंवरला प्रथम मुलगी व नंतर मुलगा झाला. त्या मुलाचे नांव माधोसिंह असे होते. यामुळे सवाई जयसिंहापुढे पेच उभा राहिला. त्याला ईश्वरसिंह नावाचा एक मुलगा अगोदर झालेला होता. तेंव्हा जयपूरच्या राज्यावर वास्तविक हक्क ईश्वरसिंहाच होता. या अडचणीतून सोडवणूक करून घेण्यासाठी असे म्हणतात की, सवाई जयसिंहाने माधोसिंहास ठार करण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला आणि चंद्रकुंवर व माधोसिंह हे महाराणा संग्रामसिंह व नंतर महाराणा जगतसिंह यांच्या आश्रयास जाऊन राहिले. शेवटी सवाई जयसिंहाने विचार केला की, माधोसिंहाला रामपुरा परगण्याची जहागीर देऊन हे भांडण मिटवावे. यावर महाराण्यांच्या सल्लागारांनी सल्ला दिला की, '[३] माधोसिंहाला राजपूताचा परगणा देऊन भांडण मिटविणे मानहानिकारक आहे. तेंव्हा हे भांडण न मिटताच सवाई जसिंग याचा मृत्यू झाला.

नंतर महाराणा जगतसिंह हा आपला आतेभाऊ माधवसिंह यास जयपूरची गादी मिळावी म्हणून सवाई जयसिंहाचा थोरला मुलगा ईश्वरसिंह यावर चालून गेला. दोघांची युद्धभेट जामोली गावाजवळ झाली. तेथे दोघेही ४० दिवस समोरासमोर लढाईच्या इराद्याने मुक्काम करून होते, पण प्रत्यक्ष लढाई झाली नाही. शेवटी ईश्वरसिंहाने आपला धाकटा सावत्र भाऊ व महारण्याचा आतेभाऊ माधवसिंह यास राज्याचा काही भाग, म्हणजे सुमारे २४ लाख रूपये उत्पन्नाचा भाग देण्याचे मान्य केले. पण माधवसिंहास ते पसंत न पडून, त्याने ईश्वरसिंहाविरूद्ध

लढाई केली. शेवटी इ. स. १७४५ च्या एप्रिलमध्ये ईश्वरसिंह व त्याच्या साह्यास आलेले मराठे यांनी महाराण्याच्या सैन्यावर हल्ला करून त्यास उधळून लावले. परंतु आता ईश्वरसिंहाचे मन बदलून तो माधवसिंहास काहीच देण्यास तयार होईना. तेंव्हा इ. स. १७४६ ऑक्टोंबर ४ रोजी नाथद्वार येथे बुंदीचा पदच्युत राजा उम्मेदसिंह हाडा, माधवसिंह आणि महाराणा यांनी एकत्र जमून ईश्वरसिंहावर पुनः हल्ला करण्याचे ठरविले आणि दोन लाख रूपये देऊन मल्हारराव होळकरास मदतीसाठी बोलाविले.[४] जयाप्पा शिंदे व त्याचा कारभारी रामचंद्र बाबा यांस हे पसंत नव्हते, परंतु होळकरांनी आपला मुलगा खंडेराव यास एक हजार घोडेस्वारांसह या तिघांना मदत करण्यासाठी पाठविले आणि ईश्वरसिंहाकडून टोंक, तोडा, मालपुरा आणि नेवाई हे परगणे माधवसिंहास द्यावे, उमेदसिंहाला त्याचे बुंदीचे राज्य परत करावे आणि त्याबद्दल त्याने मराठ्यास त्यांचा युद्धखर्च द्यावा, तसेच कोट्याचा राजा दुर्जनसाल यास नेमावो व समिधीचा प्रदेश आणि करवर हे परगणे द्यावे अशा प्रकारच्या अटी घातल्या, पण ईश्वरसिंह आता काहीच द्यावयास तयार नसल्याने, राजमहाल येथे लढाईचा प्रसंग आला. अशा वेळीही ईश्वरसिंहाचा सेनापती नारायणदास याने ते भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला, परंतु ईश्वरसिंहास काहीच न पटून त्याने नारायणदासऐवजी हरगोविंद नाटाणी यास आपला सेनापती केले आणि लढाई करण्याचे ठरविले १ मार्च १७४७ रोजी लढाई झाली व त्यात त्रिवर्गाचा पूर्ण पराभव झाला. या लढाईमध्ये खंडेराव होळकराने भाग न घेता लूट मिळविण्याचा प्रयत्न केला असा प्रवाद आहे. यामुळे त्रिवर्गाच्या सैन्यात मोठी महागाई झाली. ईश्वरसिंहास जय मिळाला, तरी त्याचे हाल चुकले नाहीत.

हे भांडण मिटविण्याचा प्रयत्न पेशव्यांतर्फे मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे आणि त्याचा मृत्यू झाल्यावर त्याचा थोरला मुलगा जयाप्पा हे करीत होते. शिंद्याचा दिवाणी रामचंद्रबाबा याचे म्हणणे असे की,[५] आपण ईश्वरसिंहास पाठिंबा द्यावा. माधवसिंहाच्या

भांडणात काही अर्थ नाही. उलट मल्हारराव होळकर म्हणू लागला की, ईश्वरसिंहास गादी दिली जावी, तरी देखील माधवसिंहास अजिबात काही न मिळणे समर्थनीय ठरणार नाही. त्याचे म्हणणे असे की, जयपूर राज्यापैकी रामपुरा, भानपुरा, तोडा आणि नेवाई असे चार परगणे माधवसिंहाला द्यावे आणि हे भांडण मिटवावे. या बाबतीत शिंदे व होळकर यांचे एकमत काही झाले नाही. तेंव्हा हे भांडण सोडविण्यासाठी पेशव्यांकडे आले होते. भांडणाचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन त्या वेळचा मराठी राज्याचा मुख्य प्रधान बाळाजी बाजीराव हा राजस्थानात नेवाईकडे गेला त्यांनी ते भांडण त्याने नीट समजावून घेतले. त्याचा कल होळकर म्हणत होते त्याकडे गेला. मराठ्यांना असे वाटले, ईश्वरसिंह त्यांना अनुकूल होणे आवश्यक होते. तो काही केल्या अनुकूल होईना.[६] तेंव्हा हे प्रकरण निकरावर आले आणि लढाई करून हे प्रकरण मिटविण्याचा प्रसंग येऊन ठेपला. त्याप्रमाणे जयपूर संस्थानातील बागरू या गावाजवळ ईश्वरसिंह व होळकर यांच्या सैन्यात ३ ते ८ ऑगस्ट १७४८ असे ६ दिवस चाललेली लढाई झाली. त्यात ईश्वरसिंहाचा पराभव झाला. होळकरांना जय मिळाला. या लढाईत शिंदे होळकरांच्या बाजूने लढले नव्हते. होळकरांना जय मिळाला, तरी ईश्वरसिंह चार परगरण्यांची तर गोष्टच सोडा, एक परगणा किंवा एक गावही देण्याला तयार होईना. तो कोणाचेही ऐकून घेईना. तथापि आपले काही चालत नाही असे पाहून ईश्वरसिंहाने विषारी नाग चावून घेऊन ता. १४ डिसेंबर १७५० रोजी प्राण सोडला होता. यामुळे मराठे चार परगणे माधवसिंहास देऊन बाकीचे राज्य ईश्वरसिंहाकडे ठेवण्यास कबूल असतांनाही ईश्वरसिंहाच्या हट्टामुळे आणि त्या हट्टापायी त्याने मरण पत्कारल्यामुळे संपूर्ण राज्याच माधवसिंहास मिळाले.

परंतू माधवसिंहात कृतज्ञतेचा अंश मूळीच नव्हता. उलट कृतघ्नताच त्याच्या मनात नव्हती. ती दर्शविण्यासाठी त्याने दोन कृती केल्या. पैकी एक म्हणजे प्रमुख मराठे सरदारांना जेवावयास बोलावून अन्नात विष घालावयाचे व त्यांना मारून टाकावयाचे ही एक कृती. दुसरी

कृती म्हणजे सापडतील त्या मराठ्यांची कत्तल करावयाची. पैकी कुणीच मराठा प्रमुख जेवावयास न गेल्यामुळे माधवसिंहाचा मराठ्यांना विष घालून मारण्याचा प्रयत्न फसला, परंतु मराठी सैन्यातील सर्वसामान्य लोकांची कल्पना झाली की, आता माधवसिंहास सर्वच राज्य मिळणार असल्यामुळे, तो मराठ्यांना त्रास देण्यासारखे काही करणार नाही, परंतु त्यांची फसगत झाली. वरील समजूतीने हजार-दोन हजार मराठे बाजार-हाट करण्यासाठी जयपूर शहरात गेले. तेंव्हा माधवसिंहाने शहराचे दरवाजे बंद करविले आणि बाजारहाट करण्यास आलेल्या मराठ्यांपैकी सापडेल त्यास मारून टाकले. मराठ्यांचे नशीब असे की, या बाजार-हाट करण्यांमध्ये महत्वाचे लोक कोणीच गेले नव्हते. या नंतर मराठ्यांना दिल्लीस जाण्याची आवश्यकता असल्यामुळे माधवसिंहाशी कसाबसा तह करून त्यांनी राजस्थानातून काढता पाय घेतला. परंतु माधोसिंह एवढ्यावरच थांबला नाही. त्याने मराठ्यांचा त्याचा दरबारी असलेला वकील गोविंद तमाली यास विष घालून ठार मारले (इ. स. १७५५ सप्टेंबर आरंभ), एवढेच नव्हे तर अहमदशाह अब्दालीला मराठ्यांविरूद्ध लढण्यासाठी त्याने आमंत्रणही दिले होते. यावरून तत्कालीन राजपुतांमध्ये मराठ्यांविरूद्ध किती द्वेष उत्पन्न झाला होता हे स्पष्ट दिसून येते.

जोधपूरच्या अमरसिंगाद्वारे मिळाली, गायकवाडाचा खून (इ.स. १७३२)

राजस्थानात उत्पन्न झालेले दुसरे प्रकरण म्हणजे जोधपूरच्या वारसाविषयींचे. औरंगजेबकालीन दुर्गादास राठोड याने जोधपूरच्या राजघराण्यावरील निष्ठेने जी महनीय कामगिरी केली, ती सोडून दिली व आपण औरंगजेबानंतरच्या काळात आलो, म्हणजे १८ व्या शतकातील राजपुतांमधील हीन वृत्तीचे उत्तम प्रदर्शनही ज्याप्रमाणे [७] जयपूरच्या वारसाबाबत झाले, त्याप्रमाणे जोधपूरच्या वारसाबाबतही झालेले आढळते. औरंगजेबानंतरचा जोधपूरचा वारस अजितसिंह याने आपली मुलगी दिल्लीचा बादशहा फर्रूखसिअर यास दिली होती. असे

असता फर्रूखसिअर बादशहाला पदच्युत करून ठार मारण्यामध्ये त्यानेच पुढाकार घेतला होता. त्याला अभयसिंग व बखतसिंग असे दोन पुत्र होते. अभयसिंगाने गुजरातच्या सुभेदारीवर असता पिलाजी गायकवाड यांचा खून केला होता. (इ. स. १७३२ मार्च २३) अभयसिंगाचाही त्याचा भाऊ बखरतसिंग याने खून केला होता. (इ. स. १७४९ जून १९-२१) त्याचे कारण अतिशय घृणास्पद सांगितले जाते. अभयसिंगाची पापी दृष्टी आपल्या सुनेवर होती. एवढेच नव्हे, तर तिजवर त्याने जबरी संभोगही केला होता. [८] याबद्दल, त्यास विलक्षण क्रोध व साहजिक घृणा येऊन याने बखरसिंगाचा खून केला होता.

अभयसिंगानंतर हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे त्याचा मुलगा रामसिंग हा गादीवर यावयाचा. परंतु त्याचा चुलता बखतसिंग याने सक्त कारवाई करून जोधपूर संस्थानचे प्रमुखपद स्वतःला मिळविले, पण एवढ्याने भांडण मिटले नाही, संस्थानच्या दुर्दैवामुळे इ. स. १७५२ मध्ये बखतसिंग मरण पावला. (इ. स. १७५२ २१ सप्टेंबर). त्याच्या मृत्यूनंतर तरी संस्थानची गादी रामसिंगाकडे यावयास पाहिजे होती, पण ती न येता बखतसिंगाचा मुलगा विजयसिंग याने ती गादी बळकावली. यामुळे पुन्हा रामसिंग व विजयसिंग यांमधील तंटा चालू राहिला.

दरम्यान दिल्लीमध्ये मराठ्यांच्या दृष्टीने एक मोठी घटना घडून आली. इ. स. १७५१ मध्ये दिल्लीचा शिया वजीर सफदरजग यास बादशहाचे रोहिले वगैरे जे शत्रू त्यांना हाकून लावण्यस मराठ्यांनी बहुमोल मदत केली होती. त्याचा परिणाम एवढा मोठा झाला की, इ. स. १७५२ च्या साधारणतः आरंभी, दिल्लीचा बादशाह व मराठे यांमध्ये एक तह घडून आला. त्यात असे ठरले की, काही अटींवर मराठ्यांनी मोगल पादशाहीचे अंतःशत्रू व बहिःशत्रू यापासून रक्षण करावे. बादशाह .दुर्बल झाल्याचे पाहून राजस्थानातील संस्थानिक त्याला विचारीनासे झाले. तेंव्हा असे जे विरोध करणे [९] अंतःशत्रू त्यापासून बादशाहीचे रक्षण करणे मराठ्यांचे कर्तव्य ठरले.

यामुळे मराठ्यांना जोधपूर प्रकरणात लक्ष घालणे भाग पडले. तथापि दक्षिणेत काही काम पडल्यामुळे शिंदे, होळकर या वेळी दक्षिणेत गेले होते. तेथील काम आटोपल्यावर नंतर शिंदे, होळकर व रघुनाथराव पेशवे हे मोगल बादशाहीची व्यवस्था लावण्यासाठी दिल्लीकडे आले. ती व्यवस्था लावीत असता जोधपूरच्या भांडणात मराठ्यांना लक्ष घालणे आवश्यक झाले. त्या प्रकरणाचा निकाल लावण्याची कामगिरी जयाप्पा शिंदे यांनी आपल्या शिरावर घेतली त्या कामगिरीत विजयसिंगाचा पाडाव करून रामसिंगास गादी मिळवून देणे हा हेतू होता. त्याप्रमाणे जयाप्पा शिंदे [१०] राजस्थानात गेला. त्याने जोधपूर संस्थानचा काही भाग आपल्या ताब्यात घेतला व विजयसिंगास नागोर येथे वेढा घातला. तो वेढा चालू असता एक अनपेक्षित घटना घडली. विजयसिंगाच्या मनात जयाप्पा शिंद्याला ठार करावयाचे होते. तेंव्हा त्याने हे काम करण्यासाठी योग्य मनुष्ये निवडली आणि एके दिवशी जयाप्पा शिंदे आंघोळ करून आपल्या तंबूत डोक्यावर वस्त्र घेऊन ध्यानस्थ बसला असता विजयसिंगाकडील मारेकऱ्यांनी त्याजवर एकदम हल्ला करून त्याचा खून केला. (इ. स. १७५५ जूलै २५) यामुळे शिंदे अधिकच चिडले. त्यांनी नागोरचा वेढा अधिक सक्तीने चालविला. जयपूरचा राजा माधवसिंग याने विजयसिंगाच्या मदतीसाठी खंगारोत नावाचा सरदार सैन्यासह पाठविला, पण त्याचा काही उपयोग न होता शेवटी विजयसिंगासही मराठ्यांशी तह करणे भाग पडले. त्यात असे ठरले की, विजयसिंगाने जोधपूरचे निम्मे राज्य रामसिंगास द्यावे, ५० लाक्ष रूपयांचा दंड भरावा आणि अजमेर व जालोर हे दोन किल्ले मराठ्यांना द्यावे. त्याप्रमाणे अजमेर आणि जालोर किल्ले मराठ्यांकडे आले. मुलुखाचीही वाटणी झाली आणि एकदोन महिन्यात पैसेही वसूल झाले. मराठे पैशाकरीता अगदी जीव टाकत होते, असे लोक म्हणतात. त्याप्रमाणे त्यांना काही पैसे मिळत व काही बुडत होते. परंतु या प्रकरणी मराठ्यांनी रामसिंगाचा पक्ष घेतला, हे न्याय्य नव्हते का? एखादा राज्यकर्ता काहीसा दुर्बल निघाला, म्हणजे त्याचे राज्य

इतर भाऊबंदानी लुबाडावे हे न्याय्य ठरणार नाही. स्पष्ट दिसत होते की, मराठ्यांनी न्याय्य बाजू घेतली असती तर कदाचित खून झाला नसता, तर थोडे कमी पैसे घेऊनही तह होऊ शकला असता.

मराठ्यांचा [११] राजस्थानातील ज्या आणखी एका घराण्याशी संबंध आला ते घराणे म्हणजे बुन्दी आणि कोटा येथील चौहाण घरणे होय. या दोन्ही ठिकाणच्या राज्यकर्त्यांचे घराणे मूलतः एकच होते. पण आपसातील स्पर्धेमुळे त्यामध्ये भेद पडून बुंदी व कोटा अशा दोन ठिकाणी एकाच वंशाची दोन छोटी छोटी राज्ये निर्माण झाली. परंतु ती सतत आपसांत भांडत राहिली. विशेषतः बुंदीबाबत बरीच कटकट निर्माण झाली. कोटा घराण्यातील राजांना महाराव म्हणत, तर बुंदीच्या राजांना रावराजा असे नाव पडले. या घराण्यातील अधिक माहिती असलेला राजा महाराव रतन, याला गोपीनाथ व माधवसिंह असे दोन पुत्र झाले. गोपीनाथाचा वंशविस्तार फार मोठा झाला नाही. पण बुंदीबद्दल भांडण याच्याच वंशजांशी आले. माधवसिंहाचा मात्र वंश-विस्तार पुष्कळच मोठा झाला.

माधवसिंहानंतर त्याचा नातू रामसिंह हा प्रसिद्धीस आला. रामसिंहाचा मुलगा भीमसिंग. त्याला अर्जुनसिंह, शामसिहं आणि दुर्जनसाल असे तीन मुले होती. जयपूरच्या सवाई जयसिंहाने बुंदलीचा रावराजा बुद्धसिंह याच्या हातून बुंदी हिसकावून घेऊन ती दलेलसिंहाला दिली होती. परंतु सवाई जयसिंहाच्या मृत्यूनंतर तत्कालीन कोट्याला महाराव भीमसिंह याने दलेलसिंहाला हाकलून देऊन स्वतःसाठीच बुंदी हस्तगत केली. त्यानंतर सवाई जयसिंहाचा मुलगा ईश्वरसिंह याने जयाप्पा शिंदे यांची मदत घेऊन भिमसिंहाचा मुलगा दुर्जनसाल यास हाकलून दिले आणि बुंदी पुन्हा दलेलसिंहाला दिली. [१२] जयाप्पा शिंदे हा ईश्वरसिंहाच्या मदतीला गेला असता (इ. स. १७४५ जानेवरी १८) बंदुकीच्या गोळीने जयाप्पा शिंदे जखमी झाला होता. बहुधा याच लढाईमध्ये मराठ्यांना पाटणा व कापरण हे दोन परगणे आणि चार

लाख रूपये दे१न महाराव दलेलसिंह याने ही लढाई संपविली. भीमसिंहाचा मुलगा दुर्जनसाल याच्या कारकिर्दीतही घटना घडली. दुर्जनसाल इ. स. १७५६ जूलै २० रोजी मरणत पावला आणि त्यानंतर काही वर्ष मराठ्यांचा बुंदी व कोटा या संस्थानांशी संबंध आला नाही.

महादजी शिंदे यांचे राघवडच्या खिचीवर चढाई

अहिरांची [13] राजधानी सिरोंज पासून नैऋत्येस चाळीस मैलावर राघवगड नावाचे संस्थान अकबर बादशहाने खिचीच्या चौहाणाकरिता उभारले होते. पुढील शंभर वर्षात ह्या पराक्रमी घराण्याने आपल्या राज्याचा विस्तार केला. मराठे माळव्यात फिरू लागल्यावर ह्या संस्थानिकांचा संबंध मराठ्यांशी आला. मराठ्यांनी खंडणी देऊन खिचीवाल्याने आपले संरक्षण केले. तो आपणास राणा म्हणू लागला. आपल्या खंडणीच्या ऐवजा ऐवजी होळकरास त्याने छाब्रा आणि गुजर ही दोन ठाणी दिली होती. पण १७८४ मध्ये खिची राजाने ही दोन्ही ठाणी आपणास परत मिळावी. आपण त्याबद्दल खंडणीचा पैसा देण्यास तयार आहोत अशी मागणी केली. अहिल्याबाई होळकर ह्यावेळी होळकरांच्या राज्याची व्यवस्था पहात होती. त्यांनी राजास निरोप पाठविला की, मागील खंडणीची बाकी चुकती करा मगच परगणे आपल्या ताब्यात देण्याविषयी बोलणे होईल. खिची राजाने हे न ऐकता बळजबरीने वरील दोन्ही परगण्यांचा ताबा मिळविला. इतकेच नव्हे तर मार्च १७८५ त मराठ्यांच्या ताब्यातील गुगर छब्रा प्रांत आपल्या ताब्यात आणला होता. त्याजवर त्याच्या पारिपत्यास महादजीबाबांनी अंबुजी इंगळे व खंडोजी इंगळे, हमदानी, जयपुराकडील फौज मिळून एकुण चाळीस हजार फौज खिचीच्या पारिपत्यास पाठविली होती. खिच्यांच्या गढ्या, किल्ल्यास मोर्चे लावून तो प्रांत घेतला होता. (ऑगस्ट १७८५). राघवगडास मोर्चे लावले पण राघवगडवाल्याने बरेच महिने दाद दिली नाही. पण नंतर रदबदली करू लागला, [14] त्यास जीवदान देऊन धरून ग्वाल्हेर किल्ल्यास पाठविला. फेब्रुवारी १७८६ मध्ये खिची राज्य खालसा केले.

महादजी शिंदे आणि हिंमतबहाद्दर गोसावी

महादजीबाबांच्या स्नेही वर्गात यावेळी गोसावी हिंमतबहाद्दर अनूपरगीर हा मुख्य असून तोच आरंभापासून महादजीबाबांचा जम बसवित होता. महादजीबाबांनी त्यास बुंदेलखंडातील पुष्कळसे परगणे देऊन खुश ठेविले होते. याचा मोठा भाऊ उमरावगीर. हे दोघे बंधू राजेंद्रगिर जो गाजीउद्दीन व सफदरजंग याचा दिल्ली येथील लढाईत मृत्यू झाला. त्याच्या मुलांनी गोसावींनी औरंगजेबाच्या कारकिर्दीत जुलूम झाल्यामुळे क्षात्रवृत्ती स्विकारली होती. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर गोसावी मंडळींनी आपली लढाऊ पथके तयार केली व केंव्हा मोगलांशी तर कधी मराठ्यांशी लढाईत भाग घेऊ लागले. प्रथम हे दोन्ही बंधू शुजाउद्दौल्याकडे नोकरीस राहिले. शुजाउद्दौल्याने अनुपगीर यास आपला सेनापती नेमले होते. दोघेही गोसावी सरदार शुजाच्या बाजुने पानिपती मराठ्यांशी लढले. पण मराठ्यांशी त्यांचा मोठा स्नेहभाव होता. दिल्लीच्या राजकारणात या गोसावी बंधूनी मोठी कामगिरी बजावली होती म्हणून बादशहाने अमीर उमराव यास हिंमतबहाद्दल हा किताब दिला. '[१५] महादजीने दिल्लीच्या बादशहास ताब्यात घेण्याच्या वेळी अनूपगीर गोसाव्याने बादशहातर्फे महादजीशी संधान बांधून मोगलाकडील सर्व बातमी तो महादजी बाबांस सांगू लागला. महादजीबाबा दोन वर्षे त्याच्या सल्ल्याने वागत होता कारण बादशाही उमरावांच्या अनेक अंतस्थ भानगडी व द्रव्याचा संचय त्यास माहित होता. त्या माहितीचा उपयोग करून घेतल्यावर हा गोसावी आपल्याविरूद्ध फितुरी करतो असे महादजींच्या नजरेस आले. तेंव्हा हळूहळू गोसावी बंधू महादजींच्या मर्जीतून उतरले. त्यांना महादजींनी झांशी प्रांतात जहागीर दिली होती, ती जप्त करण्यासाठी महादजींनी आपला सरदार केसोपंत यास त्याच्यावर पाठविले असता उमरावगीरने दगाबाजी करून त्यास ठार मारले. तेंव्हा त्याचे पारिपत्य करण्यासाठी महादजी शिंद्यांनी देवजी गवळी या सरदारास एप्रिल १७८६ मध्ये रवाना केले. गोसावी बंधूंचा पाडाव होऊन त्यांची सर्व चिजवस्तू जप्त करण्यात

आली तेंव्हा ते पहॅन अयोध्येच्या नबाबाचे आश्रयास गेले. '[१६] कॉर्नवालिस हा ह्यावेळी गव्हर्नर जनरल होता. त्यास गोसाव्यांनी अयोध्येचा नबाबाकडे आश्रयम घेतला हे कळाल्यावर त्याने नबाबास तंबी देऊन गोसाव्यास आश्रय देऊ नका असे सांगितले होते.

महादजींनी बादशहाचे आसन सुरक्षित राखून त्याच्याकरिता खंडण्या वसूल करणे व बादशाही अंमल चालणारा मुलूख संपादन करणे ही दोन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपला तळ मथुरेस ठेवला होता. या ठिकाणी राहून त्यांनी अनेक स्वाऱ्या केल्या. माळवा-बुंदेलखंड येथे महादजीबाबांचा मुलूख होता. '[१७]त्याची सुरक्षितता राखणे हे ही कामे महादजीबाबा मथुरेस राहून पाहू लागले. आग्रा, दिल्लीच्या बादशहाचे स्थळ दिल्लीप्रमाणे ते बादशहाच्या ताब्यात राहिले पाहिजे, दुसऱ्याच्या अंमलाखाली जाता कामा नये याची काळजी महादजींनी घेतली होती.

महादजी शिंदेविरूद्ध राजपुत संस्थानिकांशी संघर्ष जयपुर, जोधपूर हमरानी एकजुट

महादजी शिंद्यांना बादशाही चालविण्याचे सर्वाधिकारी मिळाल्याने राजपुत राजांससुद्धा वैशम्य वाटले. राजपूत राजे बादशहाचे मांडलिक होते. त्याजकडून बादशहास खंडणी मिळत असे. तसेच त्यांना मराठ्यांना चौथाई वसूल द्यावी लागे. बादशहाची खंडणी व मराठ्यांची चौथाईची थकबाकी वसूल करण्यासाठी महदजी '[१८] पाटीलबाबांनी खुशालीराम बेहरा यास रवाना केले. त्याने जयपुरास जाऊन राणा प्रतापसिंगाची भेट घेतली आणि महादजींना हुंड्या व जवाहीर पाठवून ठरविलेल्या ६० लक्ष रूपयांपैकी इ. स. १७८६ च्या मे महिन्यात फक्त ५ लक्ष रूपयांचा भरणा केला. परंतु राजपुत संस्थानिकांनी कोणतेही करार करण्यास नकार दिला.

महादजी शिंदेंची कामगिरीः (लालसोटच्या लढाईत राजपुतांचा पाडाव) (इ.स. १७८७-१७८८)

रावराजा प्रतापसिंग महादजी मोठा साह्यकर्ता असून भाऊबंदकीनिमित्त जयपुरच्या मुलखावर ताव मारण्यास उद्युक्त झालेला होता. त्याने मूळी असा डाव महादजीस सुचविला की, जयपुरास प्रतापसिंग राज्य करतो त्याचा राज्यावर हक्क बिलकूल नाही. तो वर्तनानें शुद्ध नसून जातीनें स्त्रीवेष घेऊन नाचतो. [१९] कारभारी शिंपी आहे. खरा हक्कदार मयत पृथ्वीसिंगाचा मुलगा मानसिंग याचा असून तो कृष्णा परिसरातील किल्ल्यात राहात होता. त्यास आणून राज्यावर बसवावे. आपणास याबद्दल मी पन्नास लाख रूपये देतो असे त्याने सांगितले. महादजींने ही सूचना पसंत करून रावराजास ती अंमलांत आणण्यास सांगितले. महादजीबाबा सैन्यासह मथुरा वृंदावनास छावणीस परत आले व तेथे त्यांनी पाच महिने घालविले होते.

जयपूरच्या राण्यास पैशाकरिता तगादा लावण्यासाठी व कबूल केलेले ६० लक्ष रूपये खंडणी मिळविण्यासाठी रायाजी पाटील यास महादजी बाबांनी जयपुराकडे ठेविले होते. मराठ्यांचा हा तगादा जयपूर राण्यास त्रासदायक वाटणे सहाजिकच होते. त्याने मराठ्यांचा नक्षा उतरवून त्यांना उत्तर हिंदुस्थानातून घालवून देण्यासाठी मसलत केली. ह्या मसलतीत त्याने जोधपूर राणा विजेसिंग यास सामील करून घेतले. लखनौ येथे [२०] ब्रिटिशांशी संधान बांधले होते. परंतु त्यावेळच्या गव्हर्नर जनरल कॉर्नवालीस यास हिंदी संस्थानिकांच्या भांडणात पडावयाचे नसल्यामुळे त्याने आपला नकार कळविला. जयपूर–जोधपूरकरांनी उदेपूरच्या राण्यासही आपल्या बाजूस वळविले. आपल्या विरूद्ध राजपूतराजे एक झाल्याचे समजताच महादजींनी राजपुतान्यावर चालून जाण्याचे ठरविले. मदतीसाठी खंडेराव हरीस बुंदेलखंडातून व अंबाजी इंगळे यास सतलज खोऱ्यातून परत बोलाविले. बादशहाचा राज्यरोहणाचा दिवस दिनांक १० मार्च १७८७ रोजी डीग येथे साजरा केला व दिनांक १६ मार्च १७८७ रोजी डीग सोडून महादजी स्वतः जयपुरावर चालून गेले होते. हेतू हा की, राजपुतांवर मराठ्यांचा वचक कायमचा बसवावा म्हणजे इतर शत्रू देखील बळावणार नाहीत. मराठे फौजांनी जयपूर

राज्यातील गढ्या घेण्यास इ. स. १७८७ च्या जून महिन्यात सुरवात केली. तेंव्हा जयपूरच्या राजाने जोधपूरचे राठोड व सेनापती भिमसिंग यांच्या हाताखाली फौज जमा केली. तसेच सर्व कछवा जहागिरदारास इंग्रजांची मदत मराठ्यांविरूद्ध आपणास मिळते आहे असे खोटे सांगून त्यांना मराठ्याविरूद्ध उठविले. स्वतः मात्र स्वसंरक्षणार्थ किल्ल्यात जाऊन राहिला. जयपूरकरांचा दिवाण दौलतराव हळद्या याने महादजींबरोबर पहिल्याने शत्रुत्व करणारा व नंतर मैत्री संपादून महाजींच्या सेवेत मोगल सेनेसह असणाऱ्या महंमद बेग हमदानीस फितूर केले. महादजीबाबांची मोगल सेना फितुरी झाली होती. त्याप्रमाणे दिनांक ६ मे १७८७ रोजी मोगली सैन्याचे अधिकारी झुलफिकार अलीखान व मनसुर [२१] अलीखान तसेच २५ मे १७८७ रोजी मुख्य सेनापती महमदबेग हमदानी हे मराठ्यांचे पारिपात्य करण्यासाठी जयपूरच्या राण्यास मिळाले.

जयपूर, जोधपूरकरांची सैन्ये व त्यात महमदबेग हमदानीच्या सैन्याची भर मिळून एकंदर जमाव ५० हजारांचा झाला. त्यांच्याजवळ ६० हजार तोफा होत्या. मराठ्यांचे सैन्य या जमावावर चालून गेले. मराठे व राजपूत यांची लढाई दिनांक २८ जूलै १७८७ रोजी झाली. ही लढाई आग्रेयीस ३० मैलांवर लालसोट म्हणून गांव आहे तेथून १४ मैल अंतरावर तुंगा आणि विदाखा या दोन गावाच्या मध्यंतरी व तुंगाच्या आग्रेयेस दोन मैलावर असलेल्या मैदानात झाली. दोन प्रहरपर्यंत तोफांचा मारा सुरू झाला. नंतर मराठी सैन्यातील घोडेस्वार चालून गेले तेंव्हा राजपूत सैन्याचा गोल होता तो फुटून त्याचे दोन तुकडे झाले होते. मराठ्यांनी यावेळी गर्दी करून शत्रू सैन्यास दोन कोसापर्यंत रेटीत नेले. एका बाजूस पाटीलबाबांचा सरदार राणेखानभाई व जयपूरचा राणा हमदानी यांची लढाई जुंपली. मराठ्यांनी तोफांचा भडीमार केला होता. यात हमदानी तोफेचा गोळा लागून ठार झाला. मराठा फौजेने राण्याचा व हमदानीच्या फौजेचा पाडाव केला व त्यांना आपल्या गोटात घालविले. या लढाईत राठोडांचा व जयपूरकर सैनिकांचा पराभव होऊन १००० सैनिक मृत्यूमुखी पडले शिवाय २००० राजपूत

सैनिक जखमी झाले. यानंतर तिसरे दिवशी ३० जुलै १७८७ रोजी महादजीकडील मोगली सैनिकांनी दंगा केला.[२२] तेंव्हा महादजींनी सर्व मराठे सरदारास एकत्र बोलावून व्युहरचना केली. *तेव्हा शिवाजीपंत विंचूरकर पाटीलबाबास एकांती बोलले की, समय पानिपतसारखा प्राप्त झाला. आता परीसर पहावयाची बाकी नाही. चार शेराची धारण, बाहेरून रसद येत नाही. शिलेदार उपासाने मेले, घोडी मेली, वैरणीचा दुष्काळ. फौज राहिली त्यात सामर्थ्य नाही. लढाई कशाचे बळावर घ्यावी? चार दिवस येथून निघावे, पुढे पाहून घेऊ. ह्या सल्ल्याप्रमाणे महादजींनी दिनांक १ ऑगस्ट १७८७ रोजी फौजांना माघत्तरे फिरवून कूच करून डीग गावापर्यंत पोहोचले होते.*

मोगल, रोहिले व राजपूत यांचा महादजीस विरोध

मराठे डिग्गीस परत गेले हे कळतांच राजपुतांनी माळवा–मेवाडातील मराठ्यांची ठाणी बळकावून प्रातांत उपद्रव सुरू केला. मोगल बादशहाजवळ बंदोबस्तास पलटणे होते त्यांनी अंतर्गत दंगा केला. नजीबखान रोहिल्याचा [२३] नातू गुलाम कादर याने मराठ्यांचा अंमल उठविला होता. त्याने बादशहाचा कारभारी खोजा मनसूर आली नाजर यास फितवून आपल्या बाजूस वळविले. मनसूर अलीच्या बोलावण्यावरून गुलाम कादर दिल्लीस दिनांक ५ सप्टेंबर १७८७ रोजी गेला. बरोबर दोन हजार रोहिले होते. त्यांच्या मदतीने दिल्लीत प्रवेश करून दिल्ली शहरावर ताबा मिळविला. गुलाम कादरपुढे आपला टिकाव लागणे शक्य नाही हे ओळखून बादशहाचे बंदोबस्तास आलेले लाडोजी देशमुख व शहा निजामउद्दीन यांनी सन १७८७ च्या नोव्हेंबर महिन्यात दिल्लीहून पलायन केले.

शिंद्यांनी अलवारच्या रावराजाच्या मुलखात व जयपूरकरांच्या मुलखात सप्टेंबर १७८७ मध्ये फौज पाठविली. जयपूरकरांनी शिंद्यास उघड विरोध करण्याचे टाळून शिंद्यांच्या ताब्यातील आग्रा किल्ल्यावर महमद बेग हमदानीला पाठविलं. त्याप्रमाणे मानसिंगास घेऊन रावराजा

सांगानेरा येथें आला आणि त्यांने पाटीलबाबास सांगितले की, आपण यावे. त्यावरून महादजी व बादशहा कूच करून लालसोटपावेतों आले. हा व्यूह अर्थात् जयपूरकर प्रतापसिंगास अत्यंत प्रतिकरात्मक वाटला. त्याने खुशालीरामास लवकर महादजीकडे रवाना करून कळविले की, आपण रावराजांस समक्ष बोलावून सर्व तपास करा आणि नंतर काय ती आज्ञा करा. त्याप्रमाणे दि. ६ मार्च १७८६ रोजी समतस्तांच्या भेटी झाल्या त्यांत महादजींने मागील बाकी व चालू खंडणी मिळून साडेतीन कोटींची आकारणी जयपूरावर केली.'[२४] *खुशालीरामाने कळविले की, इतके दगड देखील आमचे हवेलीस नाहींत, मग पैका कोठचा?* या उत्तराने महादजीस अतिशय संताप आला. त्याने जयपुरचे वकीलांस पदभ्रष्ट करण्याची आज्ञा केली. त्यावर रावराजाने मध्यस्थी करून त्रेस्ष्ट लक्षांवर तोड ठरविली, आणि अकरा लक्ष रोख व पाटील याजबरोबर फौजा पाठवून जयपूरचा काही मुलूख जमीनदारांपासून महादजीने हस्तगत केला. सर्व गोष्टी रावराजाचे तंत्राने चालू होत्या. जप्तींत जयपुरचे बहुतेक समाप्त झाले. *सदाशिव दिनकर लिहितो, पाटीलबाबा बादशहासहित जयपूर प्रांतात आले. चहुकडून मुलखात दंगा झाला. जयपुरकर राजा प्रतापसिंग माधोसिंगाचा पुत्र स्थानापन्न झाला. त्याचे वय अठरावीस वर्षाचे. स्वतः ज्ञान नाही. कार्यकर्ते अख्यारमुखत्यार आपसांत परस्परे विरोध दाखवित होते. खुशालीरामाचा भाऊ दौलतराम व एक दर्जी राजाजवळ एकदिल कारभारी. खुशालीराम जुना कारभारी त्याजवर विश्वास नव्हता. उगाच रावराजाकडे उडवा उडवीची पत्रे पाठवित होता. परंतु पत्रात काहीच समजत नव्हते. मोगल बादशहाचा व पाटील बाबांचा मुक्काम राजपुतांच्या प्रदेशात होता. मराठ्यांनी सर्वच मुलखांत जप्त्या पाठविला होत्या. महालोमहाल कमावीसदार गेले. जागोजागं मोर्चे लावले होते. तेंव्हा मामलतीचा ठराव साठ लक्षांचा झाला. खुशालीरामाने राजाची भेट घेऊन वर्तमान सांगितले. ऐवजाचा फडशा करून दिला पाहिजे असें म्हटले. राजाने उत्तर केलें, कुलकारभाराचा अखत्यार तुम्हांवर कळेल तसा उलगडा पाडा. तेंव्हा*

दौलतराम हलद्याने आपली कुटूंबे यमुनेपार लावून देऊन दहाबारा हजार नवी फौज चाकरीस ठेविली. शहरात पट्टींचा डौल घालून सावकार धरले, कैद केले. प्रत्येकी एक रूपया एका माणसाला लावले होते यामुळे जयपुरांत आक्रांत झाला. लोक पळूं लागले. पुढे दौलतराव रात्रौ घोड्यावर बसून चरपाचशे स्वारानिशी जोधपुरकर बिजेसिंग राजास जाऊन भेटले, तेथून तो लखनौला गेला. इकडे खुशालरामाने जुने कारभारी घरी बसविले होते त्यांस कामावर घेऊन वस्त्रे दिली. नव्या कारभाऱ्यांस कैद केले. सावकार वाणी कैदेत होते त्यांस मोकळे केले. उदीम व्यवहार दिलदिलासा देऊन चालता केला. दर्जी मात्र कामावर होते त्यामुळे कारभारांत फंदफितुरी निर्माण झाली होती. ऐवजास ठिकाण नाहीं.[२५] *पृथ्वीसिंगाचा लेक मानसिंग कृष्णगंडात होता त्यास नजफकुलीने आणून पाटीलबाबांची त्याची भेट झाली.* त्यास बोलावून घेऊन पाटीलबाबा मथुरेवर छावणीवर गेले होते. बादशहा दिल्लीच्या मार्गाने निघाला होता. थोडक्यात जयपुरकर प्रतापसिंगाचे व बिजेसिंगाचे अतर्गंत पूर्णपणे मैत्री होती. परंतु प्रतापसिंग बदनियती होता व सर्व उमराव व सरदारांना त्याच्या कुटील कारस्थानाची माहिती होती. शहरामध्ये रात्रीस दरोडे घालून सावकारांना व लोकांना मारून द्रव्य व जडजवाहीर जमा करीत होते. ही कहाणी एका जयपुर शहराचीच नव्हती तर अनेक शहरात अंतर्गंत दहशत निर्माण झाली होती.

आतापर्यंत केवळ बाह्य नियंत्रण नसल्यामुळे प्रत्येक इसम आपापला स्वार्थ साधण्यास प्रवृत्त झाला होता, त्यास महादजीने दाबांत आणतांच त्याविरूद्ध आरडा ओरड सुरू झाला. विशेषतः रामगड प्रकरणांत जवाहीर हस्तगत करण्यासाठी अफरासियाबखानाच्या कुटुंबांवर झालेला जुलूम व जयपुर राज्याची विटंबना, या दोन गोष्टी महादजीला मुख्यतः जाचक झाल्या. गंगेअलीकडे हिंदूंचे राज्य जाले.[२६] मुसलमानी बुडाली, असा बोभाटा सुरू झाला. खुशालीराम, रावराजा व रायाजी पाटील असे एक होऊन आपणास बुडवितात अशी जयपुरकराची

समजूत होऊन त्यांनी खुशालीरामास विश्वासघाताने ठार मारले होते आणि जोधपुरकर विजयसिंगास मिळवून घेऊन महादजींशी विरोध सरू केला होता. रायाजी पाटील एका गढीवर चालून गेला असतां त्याचे सातशें माणसे मारले गेले, तरी गढी हाती आली नाही. तिकडे बादशहा दिल्लीस राहून काही ना काही उलाढाली करीत होता.

लालसोटच्या लढाईत राजपूत संस्थानिकांचे दुटप्पी धोरण

या लालसोटच्या लढाईत पाटीलबाबांनी तोफखाना, पलटणें व फौजेचे तजवीज फार चांगली केली होती, पण कायम निकाल न होण्याचे कारण सदाशिव दिनकर नानास सविस्तर सांगतो ते असे, '[२७] आतून रागड्यांनी बाचे फौजेत फितुर केला हे समजले नव्हते पलटणें व मोगल यांजकडे संधाने करून बाबास व भाई आदिकरून सरदारास दगा करावा, लढाईत घालवावें, हे न साधल्यास आमचे फौजेत शिरून दक्षण्यांनी लढाई मोडावी, अशी संधाने सिद्ध जाली होती. शनिवार ता. २८ जुलईचे लढाईत आमचेकडील हजारो गोळे चालले असता शत्रूंची फौज उभी आहे. हालत कां नाही, हा भाईस संदेह येऊन बातमीदार पाठविले, त्यांनी बातमी आणली की, गोळा तेथपावेतो पोचतच नाही. तेव्हा गोलंदाजास पुसलं, ते म्हणू लागले तोफा धाकट्या. तेव्हा थोरल्या दोन तोफा नेऊन लाविल्या. त्याचाच गोळा हमदानीस लागून तो ठार झाला. दुसरे दिवशी आदितवारी दोन चार तोफांचे गोळा मारिले, परंतु शत्रू बाहेर आले नाहींत. तो सोमवारी (३० जुलई) आमचे सारे पलटणांनी म्हणजे डी. बॉयनच्या पायदळांनी आठ महिन्यांनी तलब चूकवून द्या म्हणून तटाचें बोलणें घालून अडवणूक केली. सात हजार माणूस एकत्र जालें. वरकडे आपापले जागां बैदा करून बसले. बाबांनी बहुतांकडून तोडीजोडी बोलविल्या. शेवटी बाबांच्या अंगावरील बस्ता ठेवून तुम्हास तीन रोजमऱ्याचा ऐवज देऊं, वरकड हिशेब लढाई आटोपल्यावर चूकून असे बोलले. परंतु ते कोणताही जाबसाल ऐकेनात. त्यांचें निसबतीस सवाशें तोफा दारूगोळ्या सुद्धा होत्या. तलब चुकवून द्या, नाहीं तर याच

तोफांची तुमच्यावर हमला करून आपला पराभव केला जाईल असे बोलले जाते. मंगळवार दि. ३१ जुलै १७८८ रोजी सवाशें तोफा व सात हजार बंदूक गोलंदाज सुद्धा घेऊन आले होते. तेंव्हा बाबांनी किल्ला तेवढा [२८] लखबादादानें मुसलमानांस दाद न देता आपल्या ताब्यात तजविजीने ठेवला होता. इंग्रजास मात्र बादशहींतील महादजीचा उद्योग फसलेला ऐकून अल्पकाळ समाधान वाटलें. लॅर्ड कॉर्नवॉलिस याने कलकत्ता अधिकाऱ्याकडे दि. ४ नोव्हेंबर १७८८ रोजी लिहून कळविलें की, सिंद्याचे वजन बादशहीच्या प्रदेशांतून एकाएकी ओसरलें ही गोष्ट आमच्या फायद्याचीच समजली पाहिजे.

राजपुतांच्या विरूद्ध सतर्क राहण्याचा महादजीस मुघल बादशहाचा सल्ला (जानेवारी - जून १७८८)

लालसोटच्या लढाईपूर्वीच बादशहानें महादजीस कळविलें होते की, तुम्ही जयपुरासमीप जाऊ नये. मथुरा डीगचे दरम्यान राहून चोहोंकडे दाब राखावा, पर्जन्यकाल नदीनाले भरतील, रसद येऊन पावणार नाही. जरूर असल्यास आम्हीही कूच करून येऊं. यावर महादजींने बादशहास कळविलें की, आपण खुशाल दिल्लीत असावें, रमजानचे दिवस, तसदी घेऊ नये. आमची व जयपुरकर फौजेची सात कोसांची तफावत आहे. त्यांचे फौजेंत फूट आहे. आपले एकबलानें सर्व मनोदयानुरूप घडून येईल.

महादजीची परिस्थिती बिकट होत चालली होती हे कळल्यावर आणि [२९] राजपूतांचे वकील पुण्यास गेलेत्यांच्या हकीकती ऐकून खरी स्थिती समजून घेण्यासाठी पुण्याहून नानानें लक्ष्मण संभाजी नावाचा आपला इसम जयपुरास प्रतापसिंगाकडे पाठविला, त्याने कळविलेल्या हकिकतीची दोन पत्रे ता. २६ ऑगस्ट १७८७ चीं म्हणजे लालसोटनंतर एक महिन्याची उपलब्ध आहेत, त्यावरून राजपुतांचा डाव केवळ कालापहरणाचा व फसवाफसवीचा होता हें उघड दिसते. [३०] *प्रतापसिंगाने कळविले की, हिशेब पाहता आमच्या मतें काही बाकी नाही.*

बाकी निघाल्यास द्यावी हे वाजवीच. आम्ही सर्व प्रकारे पेशव्यांच्या कृपेची इच्छा करितों. राज्य सर्व प्रकारे त्यांचेच आहे. पूर्वी कै. बाजीराव व जयसिंगाजी याचा दुसरा अर्थ नव्हात. परस्परें एक घर जाणत होते. सबब आमची शाबुदी राखून आपले करून ठेवावे.

मथुरा–वृंदावनच्या सनदा व गोवध–मनाईचे महादजी शिंदेचे आदेश (इ.स. १७९०)

मथुरा शहर महादजींचे अत्यंत आवडे होते. उत्तरेतील सात वर्षाचा त्यांचा काळ बहुतेक मथुरेसच छावणीत गेला. तेथील छावणी बादशाही थाटाची व कायम स्वरूपाची होती. ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, दिल्ली व पुढे पंजाब पावेतोंच्या लष्करी महत्वाच्या हमरस्त्यावर हे ठिकाण मध्यवर्ती असल्यामुळे समस्त विरोधकांवर दृष्टि व दाब ठेवण्यास अत्यंत सोयींचे होते. शिवाय त्यास धार्मिक पावित्र्य होते, म्हणून खुद्द महाजीच्या वृत्तीस व मराठीशाहीच्या मुख्य ध्येयास ते ठिकाण विशेष अनुरूप होते. कारभाराच्या दगदगीतून, अल्प काळ का होईना, पण मन निवृत्त करून ते भगवतभक्तीकडे लावण्यास मथुरेइतके दुसरे उत्कृष्ट स्थळ तिकडे नाहींच म्हटले तरी चालेल. महादजी स्वभावतः धार्मिक वृत्तीचा व सत्समागामापासक असून, ईश्वरावर अढळ श्रद्धा ठेवल्यानेच आपले मनोरथ इतके सिद्धीस गेले अशी त्याची भावना होती. याचवेळी महादजी शिंदेने संपूर्ण हिंदुस्थानात [३१] गोवध मनाई करण्याचे फर्मान मोगल बादशहा शहाआलम दुसऱ्या कडून पारीत केले व सप्टें. १७८९ रोजी हे फर्मान महादजी शिंद्याने मीरबक्षी पदास अनुसरून जाहीर केले व हिंदुधर्मपद्धतीचे धोरण, जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रयत्नाने सुरू होते. त्याचा चांगला पायंडा, महादजी शिंद्यांनी घातला ही महत्वपूर्ण बाब मानली जाते.

अशा रीतीने उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांवर चोहो बाजूंनी संकट परंपरा कोसळली. या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शिंद्यांनी दक्षिणेतून पैसा व फौज पाठविण्यासाठी नाना फडणीसास लिहिले. नानांनी शिंद्याकडे पाच लाख रूपये रवाना केले व मदतीसाठी

तुकोजी होळकर व अलिबहाद्दर यांना दिनांक ८ सप्टेंबर १७८७ रोजी दहा–बारा हजार फौजनिशी रवाना केले. पण हे सैन्य एक वर्षाच्या विलंबाने शिंद्यास जाऊन मिळाले. दरम्यान गुलाम कादरचे पारिपत्य करण्यासाठी बादशहाने शाहजादा जवानबख्त यास दिनांक ८ डिसेंबर १७८७ रोजी दिल्ली बोलावून घेतले. पण [32] शहाजाद्याने बादशहाचे न ऐकता तो मोगल पक्षास सामील होऊन मराठ्यांचे पारिपत्य करण्यास तयार झाला. बादशहा एकाकी पडला. त्याचे अंगी दिल्ली कारभार जातीनिशी रेटण्याची कुवत नसल्यामुळे तो या फितुरास सामील झाला आणि शहाजादा जवानबख्त व गुलाम कादर यांना फौजेसुद्धा इस्माईल बेगचे मदतीकरिता आग्र्यास रवाना केले. अशा प्रकारे जयपूरचे जोधपूरचे राजपूत व मोगल, सर्व उत्तर हिंदुस्थानी मराठ्यांविरूद्ध एक झाले. जोधपूरकरांनी अफगाणच्या तैमूरशहाकडे आपला वकील पाठवून त्यास हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठी बोलाविले. इंग्रज व पंजाबचे शीख यानांही त्यांनी मराठ्यांविरूद्ध एक झाले. जोधपूरकरांनी अफगाणच्या तैमूरशहाकडे आपला वकील पाठवून त्यास हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठी बोलाविले. इंग्रज व पंजाबचे शीख यानांही त्यांनी मराठ्यांविरूद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे मराठे बिकट परिस्थितीत होते. तेंव्हा शिंद्यांनी इस्माईल बेगपासून आग्रा शहर परत मिळविण्याचे ठरविले. इस्माईल बेगची छावणी शिंकदऱ्यास होती तिकडे कूच केले. मराठ्यांची व इस्माईल बेगची लढाई होऊन त्याने मराठ्यास चंबळ पलिकडे रेटीत नेले होते.

मराठ्यांनी डिसेंबर १७८७ पासून चार महिने ग्वाल्हेर प्रांती घालविले. त्यामुळे इस्माईल बेगने आग्रा येथील मोर्चाचा बंदोबस्त करून, फौजा, तोफखाना व पलटणेसुद्धा चंबळ नदीच्या उत्तरेस येऊन दाखल झाली होती. त्यास गुलाम कादर येऊन मिळाला. तेंव्हा त्याच्या पारिपत्यासाठी महादजीनी फौज रवाना केली. मराठा फौजेच्या मदतीस भरतपुरच्या जाटाने आपल्याकडील दहा हजार फौज व दोन पलटणे पाठविली. फौज आग्र्याकडे कूच करून जात

असता गुलाम कादर व इस्माईल बेग त्यांच्यावर चालून गेले. दोन्ही सैन्यात २१-४-१७८८ रोजी किरोली येथे लढाई झाली. या लढाईत दोन्ही सैन्याची बरीच हानी झाली.

त्यानंतर मराठे व जाट भरतपुरास गेले. इस्माईल बेगने भरतपुरास वेढा दिला. दिनांक १ मे १७८८ रोजी मराठे व जाट यांची इस्माईल बेगबरेबर भरतपूरच्या ईशान्येस दोन मैलावर लढाई झाली. परंतु ही लढाई अनिर्णीत राहिली. पुढे [33] इस्माईल बेग व गुलाम कादर यांनी भरतपूर सोडून कुंभेरीस वेढा दिला. तो किल्ला आपल्या ताब्यात घेतला नंतर ते तेथून डिगेला गेले होते. परंतु डीगेच्या किल्ल्यातून त्यांच्यावर मारा झाल्यामुळे ते १८ मे १७८८ रोजी पळून गेले होते. मराठे व जाट यांनी या दोघांचा फत्तेपूर शिक्रीपर्यंत पाठलाग केला. पुढे दिनांक २५ मे १७८८ रोजी गुलाम कादर व ईस्माईल बेग यांनी आग्र्याबाहेर सैन्याचा तळ दिला. तळावरून आग्र्यास मोर्चे बसविले होते. तेंव्हा मराठा फौजेने त्यांची रसद बंद केली. इस्माईल बेगचे मथुरा-वृंदावनचे ठाणे जिंकले आणि यमुना नदीपार जाऊन गुलाम कादरचे मोटमहावन येथील ठाणे व तोफा काबीज करून, पलटणचा प्रदेश ताब्यात घेतला होता. याच वेळी गुलाम कादरचे मुलूखात शिखांनी दंगा मांडला होता. यामुळे गुलाम कादरला दोन आघाडीवर लढणे प्राप्त झाले. ह्या परिस्थितीस घाबरून गुलाम कादर दिनांक १५ जून १७८८ रोजी इस्माईल बेगला सोडून फौजेसह स्वतःचे मुलूखाचे बंदोबस्तासाठी यमुनापार गेला.

गुलाम कादरला पकडून आणण्याच्या कामगिरीवर राणेखान फौजेसह गेला होता. त्यास घाबरून त्याने मिरज किल्ल्याचा आश्रय घेतला. त्याने तिथे राहून मराठ्यांशी दोन महिने झुंज दिली. दिनांक १७ डिसेंबर १७८८ रोजी किल्ल्याचे बाहेर येऊन मराठ्यांशी लढाई केली. मराठ्यांनी कापाकापी सुरू केल्यावर गुलाम कादरने पळ काढला. त्याचा पाठलाग करून त्यास दिनांक १९ डिसेंबर १७८८ रोजी पकडले व पाटील बाबांकडे रवाना केले. महादजींनी त्यास कैदेत ठेवून दिनांक ३ मार्च १७८९ रोजी ठार मारीले व बादशहा अलम यास पुन्हा

तक्तवर बसविले. या थोर कामगिरीबद्दल शहा अलम बादशहाने खूश होऊन महादजी शिंदे यांना अलिजा बहाद्दर हा किताब दिला. [३४] मथुरा, वृंदावन ही स्थळे मराठ्यांस पुन्हा मिळाली. महादजींच्या इच्छेप्रमाणे बादशहाने आपल्या मुलूखानत गोवधबंदीचे फर्मान काढ्ले.

तुकोजी होळकराने मुनीमकशर येथील इस्माईल बेगचे ठाणे उडवून आपले ठाणे बसविले. पाटीलबाबांकडे इस्माईल बेगने याबाबतीत तक्रार केली. पाटीलबाबांचे ठाणे सोडण्याचे सांगणे तुकोजीरावानी ऐकले नाही तेंव्हा इस्माईल बेगने स्वतः होळकराचा अंमल उठविला. त्यावर आनंदून जाऊन जयपूरकर व जोधपूरकर यांनी इस्माईल बेगला पत्रे पाठवून सन्मान केला. जयपुरकरांना इस्माईल बेगच्या वर्तनाचा जाब पाटीलबाबांनी विचारला असता त्याने उद्धट उत्तद देऊन जयपूर व जोधपूर राजांशी आपला सलोखा झाल्याचे सांगितले व महादजींशी विजेसिंगाच्या मदतीने लढण्याची सिद्धात केली ही बातमी पाटीलबाबास कळताच त्यांनी इस्माईल बेगच्या पारिपत्यास फौज रवाना केली होती. इस्माईल बेग, जयपूर व जोधपूर राजे एकत्र होऊन जयपूरचे उत्तरेस ५० मैल पाटणचे मुक्कामी डोंगराचा आश्रयम धरून राहिला होता. तेथे जयपुरचे उत्तरेस वानॉल व पटणचे दरम्यान ही मोहिम झाली. मराठ्यांनी डोंगराचे आत जाऊनप दिनांक २० जून १७९० रोजी शत्रूचे फौजेवर स्वारी केली, तेंव्हा इस्माईल बेग मराठी फौजेवर चालून आला. त्याची व मराठे फौजेचे लढाई सुरू झाली. महादजीच्या बाजूने डि वॉयनने शत्रू सैन्यावर तोफांचा मारा केला होता आणि मराठे फौजेनेही एकदम चाल करून चोहोबाजूंनी शत्रूशी लढाई करून शत्रूस पराभूत केले होते. तोफखाना हस्तगत केला व शत्रू सैन्याचा धुव्वा उडवून विजयश्री मिळविली.

यानंतर पाटीलबाबांनी राजपुतांचा कायम निकाल लावण्याचे ठरविले. त्याप्रमाणे बाबांची खास स्वारी दिनांक २८ ऑगस्ट १७९० रोजी डेरेदाखल झाली. गोपाळराव रघुनाथ, जिवबा बक्षी, काशीराव होळकर वगैरेंनी जयपूरचा रोख सोडून जोधपूरच्या मुलखांत रूपनगर, पर्वतसर,

सांबर वगैरे ठाणी घेऊन अंमल कायम केला. अजमेरास कूच करून शहर घेऊन किल्यास मोर्चे लाविले. (१५ ऑगस्ट १७९०). विजयसिंगाने गावोगाव तपासणी करून १४–६० वर्ष वयाचे सर्व पुरूष लढाईसाठी जमा करून आणले होते. दिनांक ८ सप्टेंबर रोजी मराठी फौजा जुनी नदी उतरून शत्रूस हैराण करू लागल्या. डी वॉयनने तोफांची सरबत्ती सुरू केली. त्यामुळे सैन्यात गोंधळ उडाला. चार हजार राठोडांनी थेट तोफांवर चाल करून आणले होते परंतु तोफांमुळे पुढे एकही जिवंत राहिला नाही. दोन प्रहरापूर्वीच राजपुतांचा पराभव होऊन ते पळून गेले. जोधपूरकरांचा बिमोड होऊन ते पाटीलबाबांस शरण आले होते. मारवाडचा वकील बुधसिंग पाटीलबाबांकडे अजमेर येथे येऊन दिनांक ६ जानेवारी १७९१ रोजी आला व त्यावेळी तहाचा ठराव झाला तो असा.

(१) चालू साली हप्तबंदीने ४० लक्ष व पुढील [35] सालापासून दरसाल ५ लक्ष याप्रमाणे ६० लक्षाचा भरणा करावा

(२) सांबर निम्मे, गोधा व आणखी एक असे तीन महाल कायम द्यावे.

(३) अजमेरचा किल्ला पुर्वीचे सरंजामासह व हल्ली राजाने नवीन गांव लावून दिले त्या सुद्धा हवाली करावा.

अजमेरबरोबर पुष्कर तीर्थसुद्धा महादजीबाबांच्या ताब्यात आले. तेथे त्यांनी लाखो यपये धर्म करून मोठे देवालय बांधिले. जिंकलेल्या मुलखाचा कारभार लखबादादाकडे सोपविला.

जोधपूरप्रमाणे जयपूरचा मामलाही सन १७९० अखेर समाप्त केला. प्रतापसिंगाने पूर्वीच्या मागणीप्रमाणे खंडणी कबूल करून आपला बचाव केला. विजयसिंगाने पुढे महादजीबाबांविरूद्ध हालचाल केली नाही. अलवारचा प्रतापसिग माचेडीकर दिनांक २५ नोंव्हेबर १७९० रोजी मरण पावला. हा बाबांचा दोस्त होता. म्हणून त्याचा मुलगा बख्तावरसिंगास बाबांनी समाधानाची पत्रे व सरफराजीची वस्त्रे पाठविली. अलवारचा प्रांत व खिरा जयपूरकरांचा

प्रांत. तो पुन्हा जयपुरकरांनी हस्तगत करू नये अशी तजवीज महादजीबाबांनी करून ठेवली होती. अलवार, धोलपूर व थोडे बहुत भरतपूर ही राज्ये महादजीबाबांच्या कर्तृत्वाने ताब्यात आली होती. हे इतिहासास विसरता येणार नाही.

लखबा दादाचा कारकून बॅकाजीपंत किल्ल्यात कामावर होता, त्याने डीभाईकडील पहारेकऱ्यास दूर करून आपलेकडील मातबर लोक तैनात केले. त्यावरून डिभाईसाहेब आग्र्यास जाणार होता. अशी हकीकत आढळते. गुलाम कादिर व इस्माईल बेग यांचे निकाल लागले, तेंव्हाच महादजींचे चित्त स्वस्थ व उत्तरेंतील कारभार निर्वेध झाला.

चित्तोड काबीज, राजपूत युद्धाचा शेवट (इ.स. १७९१)

उदेपूर प्रांतात बहुताशः होळकरांनी अंमल बसविला होता. उदेपुरकर राणा भीमसिंगाने पाटीलबाबांचे व होळकरांचे महालांत उपद्रव करून त्यांचा तमाम अंमल उठविला आणि आपली ठाणी बसविली. तेंव्हा अहिल्याबाईंनी फौज व पेंढार पाठवून राणाचे लोकांसी लढाई घेऊन दस्तुरप्रमाणें अंमल बसविला. त्यावेळी कोटेवाला जालमसिंगाचे मार्फतीने राणाजीचा व बाईचे फौजेचा सलूख ठरला की, बाईचे दोन हजार स्वार राण्याजवळ चाकरीस ठेवावे, त्यांनी राण्याचे शत्रूंचे पारिपत्य करावे. परंतु लालसोटच्या लढाईनंतर महादजीच्या विरूद्ध राजपूत राजे उठले त्यात मारवाडच्या बिजेसिंगाने उदेपुरच्या राण्यासही चिथवून त्याजकडून मराठ्यांची ठाणी उठवून दिलीं. त्यावरूनच तुकोजीस तरी दक्षिणेंतून येतांना मथुरेचा रोख सोडून उदेपुराकडे जाण्याचे प्रयोजन पडले. '[३६] पुढे मारवाडचा बंदोबस्त झाल्यावर भीमसिंगास विचार पडला. सरदार लोक त्याचे हुकूमांत नाहीत. जवळ पैका नाहीं. रावत भीमसिंगासारखा माणूस हातचा जाऊन चित्तोडगड बळकावून बसला जेणेकरून नवीनच खूळ उत्पन्न झाले.

जयपूर, जेधपूर, राजपूत संस्था चालकाविरूद्ध लढलेली लालसोटची लढाई ही मराठ्यांच्या इतिहासातील दुटप्पी धोरणाची लढाई मानली जाते. महादजी शिंदेने मोगल बादशहा,

शहाआजमखान दुसऱ्या विरूद्ध मोगलांचा मिरबक्षी व मोगलांचा दिवाण या नात्याने राजपूतांविरूद्ध लढलेल्या लढाईत राजपूतांचा सर्वत्र पराभव झाला असला तरी त्यांनी महादजी शिंदेला कोणताही करार न करता व केवळ तोंडी आश्वासने दिली. त्यामुळे लालसोटची लढाई ही, महादजी शिंदेच्या दृष्टीने कर्जबाजारी व हजारो सैनिकांचा बळी पडूनसुद्धा अव्यवहार्य नाठाई मानली जाते. लालसोटची लढाई ही इ. स. १७६१ च्या पानिपतच्या युद्धासारखी समजली जाते. इ. स. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धास्फुर्ति व आव्हाने होती. ह्या युद्धातील प्रसंगात महाराष्ट्रातील लहान मोठ्या प्रत्येक व्यक्तीने तन मन धनाने आपली तळमळ दाखविली होती. पेशव्यांच्याद्वारे पुण्यात कारभर करणारा नाना फडणीस याने महादजी शिंदेस पांच लाख रूपये आणि अलीबहाद्दर व तुकोजी होळकर यांना मदतीस पाठविले होते. दक्षिणेतील मराठ्यांची फौज महिना, दिड महिन्यानंतर दाखल झाली.

अशा अवस्थेत महादजी शिंदे यांनी मोठ्या हिंमतीने राजपूतांवियद्ध लढा दिला होता. आणि चार सहा महिने मथुरेत दाखल झाला ह्यानंतर [३७] मात्र महादजीस मदत येण्याची आशा राहिली नाही. इ. स. १७८८ च्या दरम्यान म्हणजे वर्ष सव्वा वर्षानंतर अलीबहाद्दर हा स्वतः महादजीच्या मदतीस आला होता. उत्तर हिंदुस्थानातील ह्या दोनखांबी सत्तेचा, एक खांब महादजी शिंदे हा सक्रीय असतांना दुसरा खांब होळकर शाहीचा तुकोजी होळकर हे महादजी विषयी दुटप्पी धोरण अवलंबीत होता, हे सर्व पाहिल्यावर मराठेशाहीचा आदर सर्वत्र मावळत असल्यास आश्चर्य वाटण्यासारखे कोणतेही कारण नव्हते.

राजपूत संस्थानिकावर मराठ्यांची खंडणी, पेशवा बाजीराव पहिल्या वेळेपासून बसलेली असून त्यंनी मोगल बादशहांस घ्यावयाची दुसरी एक ठरलेली खंडणी होती. ह्या दोन्ही खंडण्या वसूल करण्याचा हक्क महादजी शिंदे ह्यास बादशहाचा मीरबक्षी व बादशहाचा द्विाण म्हणून अधिकार प्राप्त झाला होता. तो अधिकार बजावून दाखविल्याशिवाय राजपूतांवर वर्चस्व प्राप्त

झाले नसते. याचवेळी जोधपूरचा राजपुत राजा विजयसिंगाने पूर्वी विश्वासघाताने जयाप्पा शिंद्यांचा वध केलेला होता. त्या संबंधाने थोडीफार सूडाची भावना महादजी शिंद्याकडे होती. महादजी शिंदेचा सरदार यशवंतराव बावळे यांस जयपूरच्या राजपूत राजांनी, त्याच्या सहा मुलांना विश्वासघाताने ठार केले होते. त्याबद्दल महादजी शिंदेचा राजपूत राजावर राग होता. तसेच महादजी शिंदे हा मोगलांचा दिवाण असल्यामुळे जयपूरच्या राजांकडून मोगलांची २० लाख रूपये खंडणी येणे बाकी होती. याउलट मोगल बादशाहीने महादजींचे वर्चस्व असावे अशी राजपूत संस्थत्तचालकांची बिल्कूल इच्छा नव्हती त्यामुळे राजपूत राजांचा अनेक युद्धात पराभव करूनही महादजी शिंदे राजपूत राजांकडून खंडण्या त्यांनी केलेले तह व त्यानुसार विश्वास मिळणारी रक्कम न मिळाल्यामुळे महादजी शिंदे आर्थिक अडचणीत सापडला.

महादजीस उखडून काढण्याची जरी राजपूत व मुसलमान यांची कितीही इच्छा असली, तरी नुसत्या इच्छेने क्रिया घडत नसल्यामुळे, बारभाईंच्या खेतीप्रमाणें त्याचा प्रकार झाला. त्यातून मुख्य बादशहाने स्वतः पुढाकार घेतला तर काही तरी जम बसला असता. एकाची हुकमत सर्वावर असल्याशिवाय कोणतेही बिकट कृत्य सिद्धीस जात नाहीं. अशी हुकूमत चालविणारा इभ्रतीचा इसम या मंडळींत एकही नव्हता. हाच फायदा महादजीला असल्यामुळे त्याने हळू हळू आपला अंमल बसविला होता.

महादजीची परिस्थिती अत्यंत बिकट झालेली होती, आपाजीराम म्हणतो, खाशांस देखील उपास पडले. पाटीलबाबा थोर सरदार, हिंमत जबरदस्त, यामुळे आजपर्यंत दम धरून राहिले. त्यातून नानांची पत्रे येत गेली की, '[३८] अलीबहादरांची रवानगी करतो, सत्वरच फौज येऊन पोहोचेल. आता चैत्र आला, अद्यापि फौजेचे येण्याचा मार्ग दिसत नाही. आता फौज येऊन तरी उपयोग काय! यांचे सरकारचे वाकडे आहे असा जाहीरनामा हिंदुस्थानच्या दृष्टीस पडला होता.

संपूर्ण हिंदुस्थानांत दोन गट निर्माण झाले होते त्यात राजपुतांचा एक गट आणि गुलाम कादीर व इस्लामबेग यांचा एक गट असे परस्पर विरोधी गट निर्माण झाले होते. याचवेळी मोगल बादशहा व जनफकुलीची लढाई जाहली. त्यांत नजफकुलीनें हजरतास दाबिलें. तेंव्हा जनफकुलीशीं सलोखा करून ते दिल्लीस गेले. त्यांचे मनांत आता सहसा दिल्लीबाहेर निघावयाचे नाही. या गुलामाचे तोंड पाहू नये. अंतस्थ लक्ष एकनिष्ठ पाटीलबाबांकडे होते. अनूपगीर गोसावी जवळ राहतात. फौजेची मुखत्यारी त्यास देणार. पाटीलबाबांची पत्रे यास गेली की, गुलाम कादीर व इस्माईल बेग यांचे खुळांत तुम्ही न यावे. फत्ते झाल्यानंतर तुम्हांशी दुसरा अथृ होार नाही. या हिंमतबहादरांशी महादजीने इतक्या नरमाईचे व अत्यंत उदार वर्तन केले असतानांही तो आपली फितुरी सोडीना, तेव्हांच पुढें त्यास तंबी देण्याचा महादजीवर प्रसंग आला होता.

महादजीने मोगल बादशहा शहाआलम दुसऱ्या बरोबर सर्व प्रांत डोळ्यांनी पाहिला होता. आपल्या जवळ पैसा नाही, आपण कर्जात बुडालेलो आहोत आपल्या हातून बादशाही कारभार उरकणार नाही. पैसा व फौजा पुण्याहून पाठवाल तर आम्ही हा उद्योग हाती घेऊ असे स्वतः महादजीने अनेकदा नाना फडणीसांस पत्राने कळविले होते. यावरून महादजी शिंदे अत्यंत आर्थिक संकटात सापडला होता. पुण्यांत नानांस मात्र शंका होती की, मोगल बादशाहीची सत्ता हाती असल्याने महादजीच्या घरात सोन्याचा पूर वाहू लागेल. याच समजूतीवर महादजीच्या मागणीकडे मुळापासून नाना, महादजीच्या आर्थिक मागणीकडे दुर्लक्ष करीत होता. याच भ्रमाने पुढे पुण्याच्या मुककाम महादजीकडे कोट्यावधी रूपयांचे घेणे काढले. परंतु खरे पाहता महादजी शिंदे शेवटपर्यंत निष्कारनच राहील. पैसा भरपूर मिळाला पंरतु तो पैसा अहिल्याबाईनं होळकर यांच्याकडे हवाली केला होता.

मनांत आणले असते तर अहिल्याबाई होळकर महादजी शिंद्यास एक कोटी रूपये सहज

देऊ शकली असती परंतु महादजी शिंद्याने रक्कमेची मागणी केली असता, अहिल्याबाई होळकराने ही मागणी केलेली रक्कम तर दिलीच नाही उलट तुकोजी होळकर, महादजी तर्फे मदत मागणीसाठी आला असता त्यावेळी त्यांस साह्य केले नाही.

नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्यातील मतभेदाविषयी वारंवार उल्लेख सापडतात. परंतु संकटसमयी एकमेकांस मदत करणे आवश्यक समजत होते. त्यासंबंधाने एकमेकांवर विश्वासही होता. हे अनेक पत्रावरून दिसून येते. जानेवारी इ. स. १७९२ पर्यंत महादजी शिंद्याने राजपूतान्यावरील अनेक हल्ल्यात विजय मिळवून सुद्धा कर्जबाजारी झाला. अतिशय निराशेत प्रतापगडावरून उज्ञैनला त्यावेळी आपली सर्व संपत्ती गहाण ठेवून परदेशी घोडे देण्यासाठी त्याचा सरदार गोपाळरावांस ४० हजार रूपये दिले. उज्ञैन येथै दोन आठवडे राहून उत्तरेतील कारभारासाठभ निघून गेला. ३५ धरसोडीचे बेईमानी आलेले अपयश हे इतिहासातील दोन उत्कृष्ट उदाहरणे आहेत. एक मोगलबादशहा शहाआलम व दुसरा मराठेशाही बुडविणारा पेशवा बाजीराव दुसरा ह्या दोघांच्याही अंगी मनुष्य स्वभावाचे ज्ञान, बुद्धी व विवेक हे गुण होते परंतु एका घटकेस केलेला करार, पुढच्या घटकेस टिकेलच अशी शाश्वती त्यांच्याबद्दल कोणीही देत नव्हता. ते केंव्हा फिरतील व कोणते कारस्थान करतील याचा नेम नव्हता. महादजी सर्व मंडळीस ओळखून होता. त्याने दुसऱ्या कोणावरही भरवसा न दाखविता स्वतःचे हिंमतीवर आपले कार्य सिद्धीस नेले. आपण कर्जबाजारी झालो याची जाणीव ठेऊन उज्जैन ह्या आपल्या जहागिरीत करकून पाठवून घरच्या हवेलीतील सात लक्ष रूपये निघाले. मोगल बादशहाच्या कारभारास कंटाळून महादजी उत्तरेकडून चंबलमार्गे ग्वाल्हेर या आपल्या राजधानीत इ.स. १७९२ मध्ये दाखल झाला.

संदर्भग्रंथ सूची

१) Karnal Tod Annals and Antiquities & Rajasthan

२) डॉ. के. सी. जैन राजपुतों का इतिहास

३) डॉ. खोबरेकर वि.गो. महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड-भाग २,मुंबई १९८८ पृ. ४९९-५००

४) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम मुंबई १९७७ पृ. ३४२-३४५

५) कित्ता पृ. ३४६-३४८

६) जदुनाथ सरकार फॉल ऑफ दी मुगल एम्पायर (इंग्रजी) कलकत्ता, १९५८, पृ. ३५१-३५२

७) कित्ता पृ. ३५३-३५५

८) सरदेसाई गो. स. (संपा) -पेशवे दप्तर खंड-१, मुंबई १९९, लेखक - २०, २५ व पृ. २४

९) कित्ता पृ. २५,२६

१०) फाळके महादजी शिंदे कालीन कागदपत्रे, खंड २, लेखांक - ४२५, २२७, ४२८ (ग्वालियर) ग्वालेर १९७७

११) कित्ता लेखांक ५००-५०२ पृ. ५००

१२) यदुनाथ सरकार पुर्वोक्त कलकत्ता १९५८ पृ. ३६७-३६८

१३) कित्ता पृ. ३६९-३७०

१४) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड-७ मुंबई -१९४४ पृ. ११४-११५

१५) कित्ता पृ. ११६-११८

१६) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठ्यांचा इतिहास कालखंड खंड २, पृ. ४३१-४३६ (मुंबई १९८८)

१७) कित्ता पृ. ४३७, ४३८

१८) फाळके महादजी शिंदे कालीन कागदपत्रे, ग्वालीयर

१९७७ खंड-२, लेखांक - २९१,२९२

१९) कित्ता ३९३, ३९४, पृ. ३९२

२०) सरदेसाई गो. स. ऐतिहासिक स्फुट, लेख खंड-२, नवीन आवृत्ती, मुंबई १९९१ पृ. १०१, १०२

२१) कित्ता पृ. १०३, १०५

२२) सरदेसाई गो. स. (संपा) ऐतिहासिक टिपणे खंड-३, मुंबई नवीन आवृत्ती १९९३(जूनी आवृत्ती १९३५) पृ. २५, २६

२३) कित्ता पृ. २७, ३०

२४) सरदेसाई गो. स. मराठी रियासत भाग-७, मुंबई - १९४४ पृ. १२८, १३०

२५) कित्ता. पृ. १३०-१३२

२६) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठ्यांचा इतिहास खंड-२, मुंबई १९८८, पृ. ४४४-४४५

२७) कित्ता पृ. ४४६-४४८

२८) खरे वा. वा. (संपा) इतिहास लेख संग्रह खंड ७, लेखांक २३४०-२३४५ (पुणे १९२३) नवीन आवृत्ती १९९३ पृ. २३४१

२९) कित्ता लेखांक २३४५, २३४६ पृ. २३४२

३०) राजाध्यक्ष शिंदे शाहीचा खरा इतिहास मुंबई १९०७ लेखांक - ५०२, ५०३, पृ. ५११, ५१२

३१) कित्ता लेखांक ५०३, ५०४, पृ. ५१३

३२) फाळके महादजी शिंदे कालीन कागदपत्रे, ग्वालीयर (ग्वालेर) १९४८ लेखांक -

४१२-४१४

३३) कित्ता लेखांक ५३०, ५३२, पृ. ५२७

३४) किन - महादजी शिंदे चरित्र (इंग्रजी) कलकत्ता १९०१, पृ. १५८, १६०

३५) कित्ता पृ. १२६, १३०

३६) खरे ग. ह. डॉ. अ. रा. कुलकर्णी (संपा) मराठ्यांचा इतिहास खंड-३, मुंबई १९८८, पृ. ४९५, ५००

३७) कित्ता खंड-२, मुंबई १९८८, पृ. ४६३, ४६४

३८) कित्ता पृ. ४६५, ४६६

प्रकरण पाचवे

महादजी शिंदे- इंग्रंज संबंध

प्रकरण पाचवे

महादजी शिंदे- इंग्रंज संबंध

पंधराव्या शतकापासून युरोत घडून आलेले राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील बदल पश्चिमी राष्ट्रे आशियाकडे वळण्यास कारणीभूत ठरले. सोळाव्या व सतराव्या शतकात भारत संपन्नतेच्या व वैभवाच्या शिखरावर असला तरी ती संपन्नताच भारतीयांच्या पुढील प्रगतीला विघातक ठरली. एक प्रकारची आत्मसंतुष्टता त्यामुळे भारतीयांच्या मनात भरली. त्यामुळे चौकस बुद्धीची, बदलाची, प्रगतीची द्वारेच जणून बंद झाली. बाहेरच्या जगात काय चालले आहे. याची दखल घेण्याची गरजच त्यांना जाणवली नाही. युरोपात मात्र पंधराव्या शतकात स्वतंत्र प्रज्ञेचे, बुद्धिवादाचे साहसी वृत्तीचे वारे वाहू लागले. युरोपात उफाळून आलेल्या प्रबोधनाच्या लाटेमुळे तेथील लोकांच्या बुद्धीला जखडणाऱ्या शृंखला गळून पडल्या. धार्मिक सुधारणावादी चळवळीमुळे चर्चच्या जाचक बंधनातून माणसांची मने मुक्त झाली. राजकीय बदलांमुळे नवीन महत्वाकांक्षी राष्ट्रवादी राज्ये उदयाला आली.

भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना

इ. स. १६०१ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने पहिला प्रवास केला तो इंडोनेशियाच्या मसाल्यांच्या बेटावर इ. स. १६०८ मध्ये त्यांनी भारतात आपले पहिले व्यापारी ठाणे स्थापन केले ते भारताच्या पश्मिच किनाऱ्यावर सुरत येथे. तेथून कॅप्टन हॉकिन्स याला त्यांनी मुघल बादशहाकडून काही सवलती मिळवून घ्यावयाच्या असतील तर प्रथम तेथील पोर्तुगीजांना शह दिला पाहिजे हे इंग्रजांनी हेरले. इ. स. १६१२ व इ. स. १६१४ मध्ये सुरतनजीक स्वाली येथे इंग्रजांनी पोर्तुगीज नौदलाचा पराभव केला. त्याबरोबर. पोर्तुगीजांचा सागरावरील प्रभाव खच्ची करण्याकरिता इंग्रजांचा उपयोग करून घेता येईल आणि भारतीय माल खरेदी करण्यात परकियांत स्पर्धा निर्माण झाली तर त्याचा फायदा भारतीय व्यापाऱ्यांना मिळेल असे वाटून मुघल बादशहाने एका शाही फर्मानाद्वारा पश्चिम किनाऱ्यावर बऱ्याच ठिकाणी वखारी घालण्याची

परवानगी ईस्ट इंडिया कंपनीला दिली.

एवढ्याचे समाधान न होऊन इ. स. १६१५ मध्ये कंपनीने सर टॉमस रो याला मुघल दरबारी रवाना केले. नम. विनंत्या करून संपूर्ण मुघल साम्राज्यात व्यापाराची व वखारी घालण्याची परवानगी रो याने मुघल बादशहाकडून मिळविली. पोर्तुगीजांशी त्यामुळे संघर्ष उद्‌भवला खरा. परंतु त्यात पोर्तुगीज इंग्लंडपुढे टिकले नाहीत. इ. स. १६६२ मध्ये इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् याने पोर्तुगीज राजकन्येशी विवाह केला तेव्हा पोर्तुगालच्या राजाने मुंबई बेट त्याला आंदण म्हणून दिले. भत्तरतात शेवटी पोर्तुगालजवळ गोवा, दीव व दमण याशिवाय काही उरले नाही. इंडोनेशियाच्या मसाल्याच्या बेटांकरिता डचांशी असलेल्या स्पर्धेत इंग्रज टिकले नाहीत. डचांनी त्यांना तेथून जवळ जवळ हाकून लावले. '[1] त्यानंतर इंग्रजांनी आपले सर्व लक्ष भारतावर केंद्रित केले आणि इ. स. १७९५ पर्यंत भारतातून डचांचे पूर्णपणे उच्चाटन केले

पोर्तुगालने ब्रिटिशाच्या राजाला दिलेले मुंबई बेट त्या राजाकडून कंपनीने इ.स. १६६८ मध्ये मिळविले. व सुरक्षिततेकरिता तेथील वखारीभोवती लागलीच मजबूत तटबंदी उभारली. मुंबई बेट चांगले मोठे व संरक्षणास सुलभ होते. थोड्याच काळात ते पश्चिम किनाऱ्यावरील त्यांचे प्रमुख केंद्र बनले. पूर्व भारतात इ. स. १६५१ मध्ये बंगालमधील हुगळी येथे त्यांनी व्यापाराची परवानगी मिळविली व लवकरच पाटणा, कासीमबझार, बलसोर, ढाका इत्यादी ठिकाणी त्यांनी वखारी घातल्या. मद्रास व मुंबई येथे स्वतंत्र संरक्षिणत वसाहती स्थापण्यास सहजपणे यश मिळाल्याने व मुघल बादशहा मराठ्यांविरूद्धच्या युद्धात गुंतून पडलेला असल्याने त्यांची हिंमत वाढली.'[2] इ. स. १६८६ मध्ये हुगळीवर त्यांनी हल्ला केला. पण त्यांचा अंदाज चुकला. औरंगजेबाचे मुघल साम्राज्य त्यांना वाटले तेवढे अजून क्षीण झालेले नव्हते. मुघलांनी त्यांना चांगलेच जेरीस आणले. बंगालमधील त्यांच्या व्यापारी ठाण्यांतून मुघलांनी त्यांना हाकलून

लावले. सुरत, मछलीपट्टम, विजयापट्टम येथील त्यांच्या वखारी ताब्यात घेतल्या व मुंबईच्या वखारीला वेढा घातला. कंपनीच्या अधिकाऱ्यांना आपली चूक कळून चुकली, व ते पुन्हा दयेची भीक मागणारे नम्र व्यापारी बनले. हे व्यापारी पुढे एक दिवस भारताला धोकादायक ठरतील याचा अंदाज त्या काळी येणे शक्यच नव्हते. परकीय व्यापाऱ्यांमुळे भारताच्या कारागिरांना व व्यापाराला फायदा होत असल्याने, व सरकारी तिजोरीतही त्यामुळे चांगली भर पडत असल्याने त्यांच्याकडून दंडादाखल दीड लक्ष रूपये वसूल करून औरंगजेब बादशहाने त्यांना सोडून दिले. इ. स. १६९१ मध्ये वर्षाला तीन हजार रूपये सरकारमध्ये भरण्याच्या मोबदल्यात कंपनीला बंगालमध्ये जकात माफी देण्यात आली.

इ. स. १६९८ मध्ये सुतानती, कालिकत्ता व गोविंदपूर या तीन खेड्यांची जमीनदारी कंपनीने मिळविली. या तीन खेड्यांचा विकास एका शहरात होऊन त्याचे कलकत्ता हे नाव रूढ झाले. तेथील वखारीला संरक्षक तटबंदी म्हणून कंपनीने मोठा किल्ला उभारला. त्याला फोर्ट विलीयम असे नाव दिले.

इ. स. १६९१ मध्ये बंगालपुरती दिलेली जकातमाफीची सवलत इ. स. १७१७ मध्ये कंपनीने बादशहा [3] फरूख्सियारकडून गुजरात व दक्षिण या प्रदेशकरिताही लागू करवून घेतली. मात्र अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात मुर्शीदकुलीखान व अलीवर्दीखान हे बंगालचे नबाब कडक व प्रबळ होते. त्यांनी कंपनीच्या व्यापाऱ्यांना कडक नियंत्रणात ठेवले. दिलेल्या विशेषाधिकारांचा गैरवापर त्यांनी कंपनीला करू दिला नाही. कलकत्याला वखारीभोवती उभारलेली तटबंदी मजबूत करू दिली नाही. आणि स्वतंत्रपणे कलकत्याचे शासन चालविण्याची परवानगीही दिली नाही.

कंपनीची राजकीय महत्वाकांक्षा फलद्रुप झाली नसली तरी त्यांचा व्यापार मात्र कल्पनातील भरभराटला होता. इंग्लंडमधील सुती व रेशमी कापडाच्या धंद्याला संरक्षण म्हणून व इंग्लंडमधून

चांदी भारतात जाऊ नये म्हणून भारताच्या सुती व रेशमी कापडाच्या वापराला इंग्लंडमध्ये बंदी घातली असूनही. भारतातून इंग्लंडला इ. स. १७०८ मध्ये होणारी ५ लक्ष पौंड किंमतीच्या मालाची निर्यात इ. स. १७४० मध्ये १७ लक्ष ९५ हजार पौंडापर्यंत वाढली होती. भारतात मुक्त व्यापाराचा पुरस्कार करीत असलेले इंग्लंड, इंग्लंडमध्ये मात्र संरक्षक जकातींचे धोरण अवलंबित होते. आणि त्यामुळे भारताच्या पक्क्या मालाला इंग्लंडच्या बाजारपेठेत स्थान मिळत नव्हते.

कंपनीच्या [४] मद्रास, मुंबई व कलकत्ता ही केंद्रे झपाट्याने भरभराटीला आली. मुघल साम्राज्याच्या विघटनामुळे बोकाळलेले अराजक, व त्यान तीन शहरात व्यापाराला अनुकूल असलेली परिस्थिती यामुळे फार मोठ्या संख्येने भारतीय व्यापारी, पेढीवाले व इतर धनिक तेथे स्थायिक झाले. अठराव्या शतकाच्या मध्यकाळात मद्रासची लोकसंख्या तीन लक्ष, कलकत्याची दोन लक्ष तर मुंबईची ७०,००० झाली होती.

कंपनीचे सामर्थ्य जसजसे वृद्धिंगत झाले तसा कंपनीच्या वसाहतींच्या संयोजनाचाही विकास झाला. कंपनीची वखार म्हणजे कंपनीची गोदामे, कार्यालये, कर्मचाऱ्यांची घरे असलेले एक मोठे क्षेत्र होते. कंपनीच्या कर्मचाऱ्यांत लिपिक, प्रशासकीय अधिकारी वर्ग व व्यापारी अशा तीन गटांचा अंतर्भाव होत होता. त्यांचे खाणेपिणे, राहणे, कंपनीच्या खर्चाने चाले. लिपिकाला वर्षाला दहा पौंड (१०० रूपये) प्रशासकिय अधिकाऱ्यांना २० ते ४० पौंड (२०० ते ४०० रूपये) तर व्यापाऱ्याला ४० पौंड (४०० रूपये) किंवा त्यापेक्षा थोडे अधिक वेतन असे. इतक्या कमी वेतनावरही कंपनीत नोकरी मिळविण्याकरिता इंग्रज मंडळी धडपडत. कारण भारत व युरोप यातील व्यापार केवळ कंपनीच्या हाती असला तरी त्यांना खाजगी व्यापाराला मुभा दिलेली होती. यातून त्यांना भरपूर नफा मिळत होता. तेच त्यांचे खरे उत्पन्न होते.

नवाब सिराजउद्दौला व ईस्ट इंडिया कंपनी यातील शत्रुत्वाला वाचा इ. स. १७५६ मध्ये फुटली. जून १७५६ मध्ये सिराजउद्दौल्याने कंपनीची कासीमबाजार येथील वखार काबीज

केली. प्रमुख युद्धकैदी म्हणू वॅटस् याला पकडून नेले. आणि पन्नास हजाराची फौज घेवून तो कलकत्यावर चालून गेला. कंपनीचा प्रतिकार लुळा पडला. तिसरे दिवशी, हॉलवेलच्या हाती वखारीची सूत्रे सोपवून गव्हर्नर ड्रेक बायकामुलांसह कलकत्याहून फुल्टा येथे पळून गेला हॉलवेल लवकरच नबाबाला शरण आला.[५] २० जून १७५६ रोजी नबाबाने फोर्ट विलियम किल्ला ताब्यात घेतला.

सहजपणे मिळालेल्या या विजयाने नबाब बेसावध राहिला. इंग्रजांच्या सामर्थ्याचा बरोबर अंदाज त्याला आला नाही. इकडे समुद्रकिनाऱ्यावर फुल्टा येथै इंग्रज अधिकारी इंग्रजांच्या श्रेष्ठ नाविक सामर्थ्यामुळे सुरक्षित होते. मद्रासहून कुमक येण्याची वाट पाहात नवाबाविरूद्ध विश्वासघाताचे जाळे विणण्यास त्यांनी सुरूवात केली. इंग्रजांच्या लाचलुचपतीने भ्रष्ट झालेल्यात प्रमुख होते ते स्वामीद्रोही, मीर जाफर, मीर बक्षी, नवाबाचा कलकत्ता येथील एक अधिकारी माणिकचंद, धनाढ्य व्यापारी उमीचंद, बंगालचा सर्वात मोठा पेढीवाला जगतसेठ व नबाबाचा एक बडा लष्करी अधिकारी खादिमखान.

कलकत्ता पडल्याची बातमी मद्रासच्या इंग्रजांना कळताच सर्व सामर्थ्यानिशी हे ठाणे परत मिळविण्यास मद्रासकर इंग्रज सिद्ध झाले. त्याकरिता ॲडमिरल वॉटसन व क्लाईव्ह यांना नौदल व लष्कर यासह समुद्रमार्गे त्यांनी रवाना केले. जानेवारी इ. स. १७५७ मध्ये क्लाईव्हने सिराजउद्दौला याचा तेथील अधिकारी माणिकचंद याला लाच देऊन कलकत्ता परत मिळविले. पण आता तेवढ्याने ते गप्प बसायला तयार नव्हते. त्यांच्या हातातील बाहुले बनून राहील अशा एखाद्या व्यक्तीला नबाबाच्या गादीवर बसविण्याचे त्यांनी ठरविले. त्याकरिता त्यांनी नबाबाच्या शत्रूंशी संगनमत केलेले होतेच. सिराजविरूद्धचे कारस्थान पूर्णत्वाला जाताच इंग्रज त्यांच्याविरूद्ध युद्धाकरिता अधीर झाले. सिराजउद्दौल्याने इंग्रजांशी झालेल्या कराराचा भंग केला आहे असा खोटाच आरोप त्याच्यावर करून, त्याकडून उत्तराची वाटही न पाहता क्लाईव्ह ८०० युरोपीय

सैनिक असलेल्या तीन हजाराच्या फौजेसह सिराजवर चालून गेला. सिराज ५०,००० च्या फौजेसह इंग्रजांना तोंड देण्यास सज्ञ झाला. दोन्ही पक्ष प्लासीनजीक एकमेकांसमोर उभे ठाकले. नबाबाचे विशाल सैन्य पाहून तर इंग्रजांच्या उरात धडकीच भरली. क्लाईव्हही त्यावेळी, युद्धाला सामोर न जाता परत फिरावे काय असा अशा मनस्थितीत होता. कारण सिराजविरूद्ध पराभव झाला तर बंगालमधून इंग्रजांचे पार उच्चाटन झाले असते हे स्पष्टच होते. एवढेच नव्हे तर त्याचा परिणाम दक्षिणेतही इंग्रजावर झाला असता, कारण तेथे फ्रेंचांनी इंग्रजांविरूद्धच्या अखेरच्या युद्धाकरिता सर्व सामर्थ्यानिशी सिद्धता चालविली असल्याने क्लाईव्ह जाणून होता. क्लाईव्ह युद्धाबाबत दोलायमान मनःस्थितीत असताच स्वामिद्रोही मीर जाफरकडून त्याला एक पत्र मिळाले. नवाबाच्या फौजेच फार मोठा हिस्सा त्याच्या नेतृत्वाखली असून युद्धात तो निष्क्रिय राहील असे आश्वासन मीर जाफरने क्लाईव्हला त्या पत्रात दिले होते. दुसऱ्या एका पत्रात नबाबाच्या लष्करी हालचालींची माहिती त्याने क्लाईव्हला पुरविली.

त्याबरोबर क्लाईव्हने लढाईला सामोर जाण्याचे ठरविले. प्लासीच्या त्या रणमैदानावर सिराजउद्दौलयाच्या तोफांच्या धडाक्याने लढाईला सुरूवात झाली. थोडाच वेळ तोफा चालतात न चालतात तोच मीर जाफर व रामदुर्लभ हे विश्वासघात करीत आहेत हे सिराजच्या लक्षात आले. नबाबाचे बहुतांश सैन्य त्या दोघांच्य नेतृत्वाखाली होते. त्यांनी लढाईत भाग घेतलाच नाही. सिराज हा त्यावेळी जेमतेम २१ वर्षाचा कोवळा अननुभवी तरूण होता. लष्कराचा द्रोह पाहून त्याचा धीर खचला. पळून जाऊन जीव वाचवावा अशी सूचना रायदुर्लभ याने करताच त्याने रणक्षेत्र सोडले. फारसे लढावे न लागता क्लाईव्ह विजयी झाला.

प्लासीची लढाई इंग्रजांनी जिंकली ती त्यांचे शौर्य किंवा क्लाईव्हचे कुशल सेनापतीत्व यामुळे नव्हे तर मीर जाफरने केलेल्या विश्वासघाताने. इंग्रजांकडील जेमतेम २९ तर नबाबाकडील ५०० माणसे मेली. नबाबाप्रती निष्ठा बाळगून असलेल्या थोड्या सैनिकांनीच तेवढा थोडाफार

प्रतिकार केला. सिराजउद्दौला पळून जात असता मीर जाफरचा मुलगा मिराज याने पाठलाग करून त्याला ठार मारले.

प्लासीची लढाई लुटूपुटू झाली असली तरी ती भारताचे भवितव्य घडविणारी ठरली. बंगालच्या स्वामित्वाबरोबर, थोड्यात वर्षात संपूर्ण भारताचे सार्वभौमत्व इंग्रजांकडे गेले. एका व्यापारी कंपनीचे रूपांतर त्या लढाईमुळे एका राजकीय सत्तेत झाले. बंगालची समृद्धीच हाती आल्याने, प्रबळ लष्कर उभारणे व त्या बळावर इंग्रज-फ्रेंच स्पर्धेतील अखेरच्या लढाईत भारताच्या राजकीय क्षेत्रातून फ्रेंचाचे उच्चाटन करणे इंग्रजांना शक्य झाले. असहाय्य बंगाली जनतेला नागवून कधी पाहिलेही नव्हते इतके अमाप द्रव्य कंपनीने इंग्लंडला नेले. कंपनीच्या सेवकांनीही निरनिराळ्या मार्गांनी इतका पैसा इंग्लंडला जाताना आपल्या बरोबर नेला की त्या बळावर ते तेथे राजकीय सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करू लागले.

स्वामिद्रोह करून, इंग्रजांच्या खांद्यावर बसून नबाब बनलेल्या मीर जाफर बद्दल दरबारी मंडळीत तुच्छताच होती. त्यामुळे नवाब व त्याचे सहकारी यात कटकटी सुरू झाल्या. त्यांना वठणीवर आणण्याकरिता ५०० ची फौज क्लाईव्हने(नबाबाच्या मदतीकरिता पाठविली. व त्या मोबदल्यात दारूगोळा तयार करण्याकरिता अनिवार्य असलेल्या सोरा याचा बिहारमध्ये एकाधिकार नबाबकडून जबरीने मिळवून घेतला.

अवधला जाताच मीर कासीमने तेथील नबाब शुजाउद्दौला याला इंग्रजांच्या महत्वांकाक्षेची व कारवयांची माहिती दिली व इंग्रजांच्या रूपाने उभ्या ठाकलेल्या धोक्याचे निराकरण करायचे तर त्यांनी एकत्र येऊन इंग्रजांना परास्त करणे आवश्यक असल्याची निकड लावली. दिल्ली दरबारातील अराजकामुळे परागंदा झालेला मुघल बादशहा शहा आलम हा त्यावेळी अवध येथेच आश्रयाला आला होता. तो शुजाउद्दौला व मीर कासीम असे तिघेही इंग्रजांविरूद्ध एकत्र आले. व त्यांचे सैन्य बिहारच्या दिशेने चालून गेले. त्यांची व इंग्रजांची गाठ २२ ऑक्टोंबर

१७६४ रोजी बक्सारच्या रणक्षेत्रावर पडली. लढाई जेमतेम तीन तास चालली. त्यात मेजर हेक्टर मन्रो याच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी पैशाने भ्रष्ट झालेले होते. व खुद्द बादशहा शहा आलम यानेही त्याला दिल्लीच्या गादीवर नेऊन बसविण्याच्या इंग्रजांच्या भुलथापांमुळे फसून इंग्रजांशी संगनमत केले होते.

बक्सारची लढाई ही भारताच्या इतिहासाला निराळे वळण देणारी ठरली. या विजयामुळे प्लासीपेक्षाही भरवी लाभ इंग्रजांच्या पदरात पडले. बक्सार येथील पराभव एकट्या मीर कासीमचा नव्हे तर बादशहा शहा आलम व अवधचा नबाब वजीर शुजा उद्दौला यांचाही होता. अवध आता त्यांच्या कृपेवर जगणारे राज्य बनले, भारताचा नामधारी का होईना मुघल बादशहा त्यांच्या ताब्यात गेला, तर बंगाल, बिहार, ओरिसाचे ते निश्चितपणे स्वामी बनले, एवढेच नव्हे तर संपुर्ण भारतातील एक बलशाली राजकिय सत्ता बनले. त्यांचा प्रभाव बंगालपुरता मर्यादित न राहता दिल्लीपर्यंत पसरला. प्लासीने इंग्रजांच्या पदरात पडलेल्या लाभांचे द्दढीकरण बक्सारने केले. बक्सारशिवाय प्लासीचा विजय अपूर्ण राहिला असता.

बक्सार येथील पराभवानंतर मीर कासीम तेथून पळाला. आश्रयाकरिता वणवण हिंडत अत्यंत दयनीय अवस्थेत, इ. स. १७७७ मध्ये कालवश झाला. प्लासीप्रमाणेच भारतीय अधिकाऱ्यांचा स्वामिद्रोह व भ्रष्टाचार हे बक्सारच्या लढाईतील भारतीयांच्या अपयशाचे एक प्रमुख कारण होते. भारतातील या महत्वपूर्ण घटनांमुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांचे लक्ष कंपनीच्या भारतातील व्यवहारांकडे वेधले गेले. हाती आलेल्या प्रदेशाच्या शासनाची व्यवस्था कंपनीच्या हिताला पोषक ठरेल अशी लावून देणे आवश्यक होते. त्याकरिता त्यांनी इ. स. १७६५ मध्ये क्लाईव्हला पुन्हा भारतात पाठविले. बंगालचा गव्हर्नर व सिलेक्ट कमिटीचा अध्यक्ष म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. बक्सार येथे मिळालेल्या विजयाचा फायदा घेऊन बंगालची संपूर्ण सत्ता नबाबाकडून कंपनीच्या हाती येईल अशी व्यवस्था करण्यास

क्लाईव्ह पुढे सरसावला. इ. स. १७६५ पासून ईस्ट इंडिया कंपनी बंगालची खरी सत्ताधीश बनली. प्रांताचे सर्व लष्करी सामर्थ्य कंपनीच्या हाती होते आणि त्या प्रांताची सर्व राजकीय सत्ताही कंपनीच्या हाती होती. पण प्रशासनाची जबाबदारी प्रत्यक्षपणे पार पाडण्याकरिता लागणारी शासकिय यंत्रणा कंपनीजवळ नव्हती व त्याकरिता आवश्यक तो अनुभवही नव्हता. अशा स्थितीत कंपनीला अत्यंत सोयीस्कर व लाभदायक ठरेल असे द्विदल शासन क्लाईव्हने बंगालमध्ये प्रस्थापित केले. दिवाण म्हणून त्या प्रांताचा सर्व महसूल कंपनी गोळा करी तर प्रांताच्या प्रशसनाची जबाबदारी मात्र नबाबाकडे होती. परंतु प्रांताचा नायब सुभेदार नेमण्याचा अधिकार कंपनीला मिळाल्यामुळे व त्याच्या सल्ल्यानेच नबाबाने शासन चालवावे असे बंधन नबाबावर असल्याने, त्या नायब सुभेदाराद्वारा निजामत म्हणजेच, पोलिस न्यायदान, प्रशसन यावरही कंपनीचेच नियंत्रण असे. कंपनीतर्फे नायब दिवाण म्हणून ज्या व्यक्तीची नेमणूक होई तीच व्यक्ती नबाबाचा नायब सुभेदार म्हणूनही काम करी. यावरून पुर्णतः इंग्रजांच्या नियंत्रणाखाली असलेल्या नायब सुभेदाराद्वारा सरकारच्या त्या दोन्ही शाखांच्या सत्तेचे एकीकरण कंपनीच्या हाती कसे झाले होते संपूर्ण सरकारच इंग्रजांच्या कसे मुठीत आले होते ते स्पष्ट होते.

क्लाईव्हने प्रस्थापित केलेली ही प्रशासकीय व्यवस्था बंगालमधील द्विदल शासन या नावाने ओळखली जाते. कंपनीला ती व्यवस्था अत्यंत उपकारक ठरली कारण त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीशिवाय प्रांताची सर्व सत्ता त्यांच्या हाती केंद्रित झाली. प्रांताचे सर्व उत्पन्न अलगदपणे त्याच्या हाती येत होते, लष्करावरही केवळ त्यांचेच नियंत्रण होते, तर नायब सुभेदाराद्वारा शासनही त्यांच्याच ताब्यात आले. नबाब व त्याचे अधिकारी यांच्यावर प्रशासनाची तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी होती. पण ती पार पाडण्याकरिता लागणारी सत्ता किंवा सामर्थ्य किंवा पैसा त्यांच्या हाती उरला नव्हता. लोकांना नबाब गादीवर दिसत होता. त्यामुळे सरकारचे दोष किंवा उणिवा किंवा दुबळेपणा याकरिता जनता सरकार

प्रमुख म्हणून नबाबाला जबाबदार धरीत होती. तर शासनाचे सर्व लाभ मात्र अलगदपणे कंपनीच्या झोळीत पडत होते. कोणत्याही स्वरूपाच्या जबाबदारी शिवाय सत्ता कंपनीच्या हाती, तर सत्तेशिवाय शासनाची पूर्ण जबाबदारी मात्र नबाबावर अशी परिस्थिती होती. ती कंपनीला साहजिकच अत्यंत उपकारक ठरली. भावी ब्रिटिश साम्राज्याचा पाया भारतात घालून देऊन इ. स. १७६७ मध्ये क्लाईव्ह इंग्लंडला परत गेला. त्यावेळी तेथे त्याच्यावर स्तुतिसुमनांचा जणू वर्षाव झाला. काही काळानंतर, भ्रष्टाचारी, सत्तेचा गैरवापर करणारा, मायदेशाच्या धवल कीर्तीला कलंक लावणारा अशी टिका इंग्लंडमध्ये एका गटाकडून त्यावर झाली व त्यामुळे त्याच्या जीवनाची अखेरची वर्षे काळवंडली हे खरे. परंतु भारतातील ब्रिटिश सत्तेचा संस्थापक म्हणून त्याचा उल्लेख केला जातो तो अगदी सार्थ आहे. त्याने अर्काटला घातलेल्या वेढ्यामुळे, कर्नाटकात डुप्लेने कंपनीविरूद्ध विणलेल्या कारस्थानांच्या जाळ्यातून कंपनी बचावली. व फ्रेंच नामोहरम झाले. मीर जाफरचा त्याने करून घेतलेला उपयोग व प्लासीची लढाई यामुळे बंगालचे स्वामित्व कंपनीच्या हाती आले. परागंद अवस्थेत असलेल्या शहा आलमकडून व अल्पवयीन नबाबाकडून दिवाणीचे व निजामतचे अधिकार त्याने मिळवून घेतल्यामुळे बंगालवरील कंपनीच्या प्रभुत्वावर कायदेशीरपणाचे शिक्कामोर्तब झाले. शाह आलमला ताब्यात घेऊन त्याच्याकडून कंपनीच्या गरजेनुसार कोणतेही फर्मान काढून घेता येईल अशी व्यवस्था त्याने केली. व द्विदल शासनपद्धती बंगालमध्ये सुरु करून कोणत्याही शासकीय दोषांची जबाबदारी कंपनीवर येणार नाही पण सत्ता मात्र कंपनीच्या हाती राहील याची खात्री त्याने करून घेतली. त्यांच्यामुळेच भारतात फ्रेंचाविरूद्धच्या स्पर्धेत कंपनी यशस्वी ठरली व केवळ व्यापारी कंपनी असलेली ईस्ट इंडिया कंपनी भारतातील सर्वात समृद्ध अशा बंगालची सत्ताधीश बनली व भारतातील ब्रिटिश साम्राज्याचा श्रीगणेशा झाला.

छत्रपती पदाच्या लालसेने राघोबा दादा सुरतेच्या तहात इंग्रजांनी आश्रय देऊन मराठ्यांच्या

त्या वेळच्या अडचणीत आणखी भर टाकली. राघोबादादा इ. स. १७७५ च्या सुरूवातीला इंग्रजांकडे गेले होते. त्यानंतर मॅस्टिन, गॅबियर वगैरे ब्रिटिश अधिकाऱ्यांशी त्याच्या वाटाघाटी होऊन, ६ मार्च १७७५ रोजी त्याच्या इंग्रजांशी तह झाला. या तहास सुरतेचा तह असे म्हणतात. हा तर करतांना, राघोबा हा पेशवेपदाचा खरा वारसदार आहे, पुण्याचे कारभारी कोणत्या तरी नकली मुलाच्या नावाने सत्ता बळकावून बसले आहेत, अशी राजनैतिक भूमिका इंग्रजांनी घेतली. राघोबादादाला पेशवेपदावर बसविण्यासाठी अडीच हजार सैन्य, पुरेसा दारूगोळा व तोफखाना यांची मदत पुरविण्याचे सुरतेच्या तहाने इंग्रजांनी मान्य केले. त्याबद्दल राघोबादादाने सैन्याच्या खर्चासाठी दीड लाख रूपये दरमहा आगाऊ दिले पाहिजेत. तसेच सहा लाख रूपये रोख रक्कमेसह किंवा जवाहिराच्या रूपाने अनामत म्हणून ठेवले पाहिजेत, अशा अटी इंग्रजांनी घातल्या. त्या मान्य करून राघोबादादाने सहा लाखाचे जवाहिर इंग्रजांच्या स्वाधीन केले, इतकेच नव्हे, तर इंग्रजांच्या मागणीप्रमाणे त्यांना ठाणे, वसई, साष्टी वगैरे प्रदेश कायमचा तोडून दिला. यापैकी वसई सोडून इतर प्रदेश इंग्रजांनी आधीच लबाडीने जिंकून घेतला होता. त्याला त्यांच्या मते पेशवा असलेल्या राघोबादादाकडून मान्यता मिळवून त्यांनी कायदेशीर स्वरूप दिले.

मुंबईकर इंग्रजांनी राघोबादादाजी बाजू उचलली होती. ती राघोबादादावर अन्याय झाला होता म्हणून नव्हे, तसे करण्यात त्यांना काही लभ्यांश साधावयाचा होता. मुंबई येथे वखार स्थापण्यामागे ईस्ट इंडिया कंपनीचा हेतू व्यापार करण्याचा होता. हे बंदर सुरक्षित राखण्यासाठी त्यांनी मुंबई बेट संपादून त्याची तटबंदी केली परंतु मुंबई बंदरात येणारा कंपनीचा व्यापारी माल खुष्कीच्या बाजूने देशावर रवाना होण्यास, ठाणे-साष्टी हाच मुख्य मार्ग होता. त्यापुढे डोंगर आणि घाट लागतात व तेथून मराठ्यांचा मुलूख लागतो. म्हणून इंग्रजांनी अॅक्टप्रमाणे कलकत्याच्या गव्हर्नर जनरलला मुंबई व मद्रासच्या गव्हर्नरांवर अधिकार गाजविण्याचा हक्क

मिळाला होता. लॉर्ड हेस्टिंग्जने मराठ्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करून दंडेलीचे राजकारण चालविल्याबद्दल मुंबई कौन्सिलचा निषेध केला होता. त्यांच्या या धोरणामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थांनातील सत्तेला, व्यापाराला व प्रतिष्ठेला धक्का पोहोचण्याचा संभव आहे असे त्याने मुंबईकरांना बजावले [६] आणि आपल्या फौजा गुजराथेतून मागे घेण्याचा त्यांना आदेश दिला. हा आदेश धुडकावून मुंबईकरांनी युद्ध पुढे चालूच ठवेले. लॉर्ड हेस्टिंग्जने आपण मुंबईकरांना समज दिल्याचे व तहाच्या वाटाघाटींसाठी स्वतःचा वकील पुण्याला पाठवित असल्याचे पुणे दरबाराला कळविले.

इ. स. १७७५ च्या पुरंदरच्या तहानुसार ठाणे व साष्टी इंग्रजाच्या ताब्यात राहू देण्यास पुणे दरबारने मान्यता दिली. राघोबादादापायी इंग्रजांना आलेल्या खर्चाबद्दल बारा लाख रूपये मुंबईकरांना देण्यासह कारभाऱ्यानी संमती दिली. राघोबाने कारभारातून बाजूला होऊन वर्षाला तीन लक्ष पंधरा हजार रूपयांची नेमणूक घेऊन स्वस्थ बसावे ही व्यवस्था बारभाई मंडळाने कबुल केली. गुजराथेत मराठ्यांचा जो मुलूख इंग्रजांनी जिंकून घेतला होता मराठ्यांस परत करण्यात बारभाई मंडळाने अनुमती दिली.

सुरतेचा तह झाल्यावर मुंबईकरांनी कर्नल किटींग यास राघोबादादाच्या मदतीस जाण्याचा हुकूम केला. किटींग आणि राघोबादादा यांची सुरतेत फेब्रुवारीच्या अखेरीस गाठ पडली. लवकरच खबायतपासून १९ मैलांवर राघोबादादाचे व इंग्रजांचे सैन्य सुमारे पन्नास हजारापर्यंत जमले होते. त्याच वेळी हरिपंत फडके यांच्या हाताखालील पुणे दरबारची फौज, शिंदे व होळकर माळव्यात परत गेल्यामुळे बरीच कमी झाली आणि बरेच दिवस पगार न मिळाल्यामुळे अंतर्गत बंडाळी झाली. अशा स्थितीत आडास या गावाजवळ उभय सैन्यांची गाठ पडून लढाई झाली. तीत दोन्ही बाजूचे नुकसान होऊन विजय कोणासच मिळाला नाही. मराठ्यांवर सहजपणे विजय मिळवू असे म्हणणाऱ्या किटींगला मराठ्यांच्या गनिमी काव्याचा अनुभव

प्रथमच येऊन त्यांच्या लष्करी सामर्थ्याबद्दल त्यांचा भ्रमनिरास झाला. यानंतर लवकरच पावसाळा आला. त्यामुळे गनिमी काव्याने लढणाऱ्या हरिपंताच्या फौजेच्या मागे न लागता किटींग यास डभई येथे पावसाळी छावणीत राहावे लागले.

कर्नल अप्टन पुण्याकडे व पुरंदरचा तह (इ. स. १७७३)

महाराष्ट्र–गुजराथेत या घडामोडी चालूच होत्या, कलकत्याचा गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज वेगळाच विचार करीत होता. मराठ्यांच्या दृष्टीने पुरंदरचा तह समाधानकारक नव्हता. त्यांना आपला सहा लक्षांचा मुलूख गमवावा लागला. रणांगणावर याद राहील असा तडाखा ते इंग्रजांना देऊ शकले नव्हते. शिंदे–होळकर निमूटपणे सर्व खेळ पाहत होते. एकट्या हरिपंतावरच युद्धाचा सर्व भार पडला होता. फौजेला वेळच्या वेळी पगार पोहचत नव्हता, युद्ध–साहित्य कमी पडत होते. त्यात तोतयाचे त्रासदायक प्रकरण उद्भवले. तेंव्हा प्राप्त परिस्थितीत इंग्रजांशी तात्पुरती तडजोड करण्याखेरीज नाना फडणीसांसमोर दुसरा पर्याय नव्हता.

त्यांनी राघोबादादास पुणे दरबारच्या स्वाधीन न करता त्यास दरमहा दहा हजार रूपये पेन्शन देऊन मुंबईत ठेवून घेतले व आपली फौजही युद्धाच्या तयारीने गुजराथेत ठेवली. शिवाय त्यांनी कलकत्तेकरांविरूद्ध इंग्लंडच्या खुद्द राजाकडे दाद मागण्याचा सनदशीर चळवळीचा मार्ग राघोबादादास सुचविला.[७] राघोबादादाने त्यानुसार इंग्लंडच्या राजास एक पत्र लिहून, कलकत्तेकरांनी आपल्यावर चालविलेल्या अन्यायाविरूद्ध दार मागितली. पण या पत्राचा म्हणावा तसा परिणाम घडून आला नाही.

पुरंदरचा तह मोडून मुंबईकरांनी राघत्तेबादादास पुन्हा आश्रय दिल्याचे पाहून पुणे दरबाराने राघोबासंबंधीची मुख्य अट प्रत्यक्षात अंमलात येईपर्यंत आपण पुरंदर तहाच्या इतर अटी अंमलात आणणार नाही, असे कलकत्तेकर इंग्रजांना कळविले. तेंव्हा धड युद्ध नाही, धड तहही नाही अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. पुरंदरच्या तहाची कलमेअंमलात यावीत म्हणून

नाना फडणीस झटत होता तर दुसरीकडे राघोबादादाही मुंबईकरांनी सुरतेच्या तहाची कलमे अंमलात आणावीत याबद्दल तितक्याच जोराने धडपड करीत होते. हे पाहून इ. स. १७७८ च्या प्रारंभी वॉरन हेस्टिंग्जचे पुणे दरबाराविषयीचे मत बदलले. [८] फ्रेंचाचा शिरकाव या दरबारात होऊन इंग्रजांच्या हितसंबंधास धोका येणार या समजुतीने तो रागावला होता.

मराठ्यांच्या अंतर्गत भांडणात पडण्याची जी गोष्ट पूर्वी त्याला अयोग्य व अन्याय्य वाटत होती, तीच आता त्याला कंपनीच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटू लागली. पुरंदरच्या तहावर सही करणाऱ्या एका प्रमुख कारभाऱ्याने, म्हणजे सखारामबापूने ज्याअर्थी त्या तहाच्या अटी मोडण्याची सूचना आपण होऊन केली त्याअर्थी राघोबाला पुण्याला येऊन जाणे जरूर आहे. अशी मखलाशी त्याने मुंबईच्या गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रात केली.

इंग्रजांच्या लष्करातून निरनिराळे लोक तहाच्या वाटाघाटींसाठी मराठ्यांच्या छावणीत येऊ लागले. सखारामबापू इंग्रज व मराठे या दोघांत मध्यस्थ होऊ पाहत होता. राघोबाने तुकोजी होळकरांतर्फे बोलणी सुरू केली होती. परत महादजी शिंद्याने या सर्व अटी धुडकावून लावल्या होत्या.

वडगांवच्या तहाच्या अटी इंग्रजांना पाळणे भाग पाडावयाचे असेल तर त्यांचे सर्व सैन्य ओलीस ठेवून घ्यावे असे नाना म्हणत होता ते योग्य होते. कारण त्या परिस्थितीत इंग्रजांनी तह पाळला नसता तर मराठे मोठ्या सैन्यासह, गॉडर्ड मुंबईला येऊन पोहोचण्यापूर्वी मुंबईवर हल्ला करून मुंबईकराच्या सैन्यात दहशत निर्माण करू शकले असते. मुंबईकरांचे बहुतेक सैन्य मराठ्यांच्या हातात अडकून पडल्यामुळे, उरलेल्या थोड्या सैनिकांशी मराठ्यांच्या मोठ्या सैन्याचा जमिनीवर प्रतिकार करणे [९] मुंबई कौन्सिलला जड गेले असते. महादजीच्या चुकीचा फायदा पुढे हेस्टिंग्ज व मुंबई सरकार या दोघांनीही घेतला होता.

तळेगांव-वडगांवच्या तहान्वये रघुनाथराव दादा महादजीच्या ताब्यात घेण्यात

आले (इ.स. १७७९)

राघोबास महादजीच्या स्वाधीन करण्यात आले. त्याने आपले गुन्हे कबूल केले. पेशवाईतील हक्क सोडून झाशीस बारा लाखांची जहागीर घेऊन स्वस्थ बसण्याचेही त्याने मान्य केले. याच वेळी नारायणरावाच्या खुनाच्या कटातील खरकसिंग गारद्यास मृत्यूदंड देण्यात आला चिंतो विठ्ठल रायरीकर वगैरे राघोबाच्या पक्षातील कित्येकांस कैदे करण्यात आले. मात्र या वेळी सखाराम बापूची मराठ्यांविरूद्ध केलेली अनेक कारस्थाने उघडकीस आली. तेंव्हा महादजी व नाना यांनी निर्णय घेऊन फेब्रुवारी १७९० मध्ये त्याला सिंहगडावर कैदेत ठेवले. यानंतर नाना व महादजी हे दोघेच मराठेशाहीचे प्रमुख म्हणून कार्य करू लागले.

वडगांवचा अपमानास्पद तह [१०] मुंबई सरकारला मुळीच पसंत पडला नाही. ज्या लोकांना तह करण्याचा कोणताही अधिकार मुंबई कौन्सिलने दिला नव्हता, त्यांनी अडचणीच्या परिस्थितीत केलेला तह बेकायदेशीर आहे, अशी सबब सांगून मुंबईकरांनी वडगांवचा तह धुडकावून लावला. महादजीने इंग्रजांची फौज वडगावाहून मुंबईला सुरक्षितपणे जाऊ दिल्यानेच मुंबईकर हे धाडस करू शकले. वॉरन हेस्टिंग्जने मुंबई सरकारच्या भूमिकेला पाठिंबा देऊन कर्नल गॉडर्ड यास फौजेसह पुण्यावर चालून जाण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणे कर्नल गॉडर्ड बुंदेलखंडातून इ. स. १७८० च्या आरंभी सुरतेस येऊन पोहोचला. त्यानंतर एप्रिल १७७९ मध्ये राघोबा झाशीच्या मार्गावर असतांना महादजीचा अधिकारी हरी बाबाजी याच्या नजरकैदेतून निसटला व सुरतेस गॉडर्डच्या आश्रयास गेले होते. गॉडर्डने वडगांवच्या तहाविरूद्ध त्याला आश्रय दिल्याने सर्व राजकारणाला एकदम वेगळीच कलाटणी मिळाली.

इंग्रजाविरूद्ध चतुःसंघाची घोषणा (इ.स. १७७९)

नानाने सुरतेला आपला वकील लक्ष्मणराव चिटणीस याला पाठवून गॉडर्डकडे राघोबाची मागणी केली व वडगांवचा तह पाळण्याची त्यास जाणीव दिली. गॉडर्डने या मागणीकडे लक्ष तर

दिले नाहीच, उलट बडोद्याच्या फत्तेसिंगास आपल्या बापूस घेऊन खुद्द पेशव्याच्या ताब्यातील अहमदाबाद शहरावर हल्ला करण्याची तयारी केली. अशा रितीने इंग्रजांचे प्रकरण मराठ्यांच्या दृष्टीने गंभीर स्वरूप धारण करू लागले. इंग्रजांनी या वेळी मराठ्यांनाच नव्हे तर निजाम व हैदर यानांही दुखविले होते. निजामगलीचा भाऊ बसालतजंग यांच्याशी परस्पर तह करून मद्रासकर इंग्रजांनी त्याचा गुंटूर प्रांत बळकावल्याने तो इंग्रजांवर नाराज झाला. तशातच हैदरला शस्त्रे व इतर साहित्याचा पुरवठा करणारे त्याचे मित्र फ्रेंच यांची पाँडिचेरी व माहे ही दोन ठाणी इंग्रजांनी जिंकून घेतली. तेथून होणारा शस्त्रपुरवठा बंद पडल्याने व कर्नल हार्पर याने हैदरच्या प्रदेशातून अडोनीवर चाल केल्याने हैदर इंग्रजांवर जळफळू लागला. '[११] उत्तर हिंदुस्थानातील अनेक छोटे राजेरजवाडे या ना त्या कारणांमुळे इंग्रजांचा द्वेष करू लागले होते. त्यामुळे इंग्रजांविरूद्ध एत्तद्देशीय सत्तांनी एकत्र येऊन त्यांना धडा शिकविण्यास योग्य असे वातावरण हळूहळू हिंदुस्थानात निर्माण होऊ लागले होते.

हैद्राबादचा नवाब निजामअलीची योजना अशी होती की, पेशवे, नागपुरकर, भोसले, निजमा स्वतः व हैदर यांनी एकजूट करून एकाच वेळी मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथील इंग्रजांविरूद्ध उठाव करून त्यांचा पाडाव करावयाचा. त्यासाठी नानाने स्वतः फौज घेऊन मुंबईवर हल्ला करावयाचा, महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांनी आपल्या फौजांसह गुजरातमध्ये शिरून कर्नल गॉर्डलच पराभव करावा, मुधोजी भोसल्याने मोठी फौज घेऊन बंगालवर स्वारी करावयाची, स्वतः निजामाने शिकाकोल प्रांतावर मोहिम काढावयाची आणि हैदरने कर्नाटकातून चेनापट्टणच्या (मद्रासच्या) मुलूखावर तुटून पडून निजामाच्या या योजनेवर पुण्यात ऑगस्ट १७७९ च्या मध्यापासून त्या वर्षाच्या ऑक्टोंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत चर्चा झाली. नाना, महादजी, नानाचा निजामाकडील वकील कृष्णराव काळे, हरिपंत फडके व हैदरचा वकील नरसिंगराव यांनी चर्चेत भाग घेतला. शेवटी निजामाची योजना सर्वांनी पसंत केली

आणि ऑक्टोंबर १७७९ च्या अखेरीस चौकडीचा संघ अस्तित्वा आला.

इंग्रजांविरूद्ध चौकडीचा संघ अस्तित्वात आला खरा पण तो पुरता वर्षभरही टिकू शकला नाही. याचे कारण म्हणजे इंग्रजांना हिंदुस्थानातून घालवून देईपर्यंत तरी चौकडी संघाच्या सभासदांनी आपल्या स्वार्थाला मुरड घालावयास हवी होती, ती गोष्ट घडून येऊ शकली नाही, या संघाचा मूळ प्रवर्तक जो [१२] निजामअली, तो सर्वात जास्त स्वार्थी होता. चौकडीचा संघ उभारण्यामागे त्या संघाचा इंग्रजावर दबाव आणून आपल्याला इंग्रजांकडून हवे ते साध्य करणे एवढाच त्याचा संकुचित उद्देश होता. इंग्रजांना हिंदुस्थानातून घालवून देण्यासाठी प्रमुख हिंदी सत्तांनी एकत्र आले पाहिजे हा त्याने मांडलेला विचार म्हणजे निव्वळ ढोंग होते. त्यामुळे वॉरन हेस्टिंग्जने निजामाला त्याचा गुंतूर प्रांत परत करताच तो चौकडीतून फुटला व कसलीही हालचाल न करता हैद्राबादेस स्वस्थ बसून राहिला.

चौकडीच्या संघातील दुसरा सभासद म्हणजे नागपूरचा भोसले. याला बंगालवर स्वारी करण्यास सांगण्यात नानाने मोठी चूक केली. निजामाच्या इंग्रजांविरूद्ध संघ उभारण्याच्या यसोजनेवर पुण्यात जेंव्हा चर्चा चालू होती.

पेशव्यांच्या बाजूने पाहिल्यास पुणे दरबारची लढाईची तयारी आखणीबद्ध होत होती असे म्हणता येत नाही. शिंदे-होळकरांचे या वेळचे वर्तनही चमत्कारिक होते. राघोबा कैदेतून पळाल्यावर, महादजीने वडगांवच्या तहाने ओलीस ठेवून घेतलेले दोन इंग्रज कैदी-फार्मर व स्टुअर्ट यांना अचानक सोडून देऊन पुणे दरबाराच्या मनात गोंधळाचे व संशयाचे वातावरण निर्माण केले. महादजी याच वेळी राघोबादादास आपल्या स्वाधीन करा म्हणजे लढाई थांबवितो असे इंग्रजास कळवित राहिला. इंग्रज-मराठ्यांच्या दरम्यान फेब्रुवारी व मार्च १७८० मध्ये तहाच्या काही निष्फळ वाटाघाटी झाल्या. एप्रिलमध्ये बडोद्याच्या आसपास मराठ्यांनी गनिमी पद्धतीने लढाया चालू ठेवल्या होत्या. इंग्रज सेनापती गॉडर्ड याने काही विजय मिळविले पण ते

निर्णायक नव्हते.

ज्यावेळी निजाम स्वस्थ बसला होता, मुधोजी लाच खाऊन फितूर झाला होता आणि पुणे दरबार व महादजी शुल्लक वादात वेळ घालवित होते त्या वेळी हैदरअलीच्या वाट्याला आलेली इंग्रजाविरूद्धची कामगिरी त्याने सर्वात चोखपणे बजावली. साठ हजार फौजेनिशी त्याने मद्रासपर्यंत धुमाकूळ घातला, शे-पाऊणशे तरी ब्रिटिश अधिकारी ठार केले, इग्रजांची कित्येक ठाणी सर केली व शेवटी तर [१३] मद्रास सोडून तेथील इंग्रजांना दुसरीकडे पळून जावे लागते. चौकडीच्या संघातील इतरांनी हैदरप्रमाणे आपापली कामगिरी बजावली असती तर इंग्रजांचे उच्चाटन हिंदुस्थानातून होऊन हिंदुस्थानच्या इतिहासाचे चित्र बदलले असते. परंतु तसे घडून आणण्याचा मिळालेली एकमेव संधी एतउद्देशीय सत्तांनी व्यर्थ घालविली व हिंदुस्थानच्या इतिहासाला पुढे वैभवाची बदलली गेली.

पेशव्यांच्या बाजूने कोकणात लढाई बऱ्यापैकी चालली होत. इ. स. १७८० च्या ऑगस्टमध्ये कॅप्टन ॲबिग्टन याने कल्याणापासून १० मैलांवर असलेल्या मलंगडास वेढा घेतला. पण किल्ल्याचा अधिकारी पांडुरंग संभाजी केतकर याने इंग्रजांचे तीन हल्ले मारून काढून, किल्ला नोव्हेंबरपर्यंत झुंजविला. अखेर इंग्रजांना वेढा उठवून निघून जावे लागले. पण डिसेंबरात गॉडर्ड याने मराठ्यांचा वसईचा किल्ला जिंकून घेऊन त्यांना एक धक्का दिला. नंतर त्याच दमाने इंग्रज सैनिक पुण्यावर चालून जाण्याकरिता तो इ. स. १८७१ च्या फेब्रुवारी महिन्यात बोरघाटात जाऊन पोहोचला. परंतु त्यानंतर घाट उतरून पुण्याकडे जाणे धोक्याचे आहे असे त्याला आढळून आले. तशातच मुंबईकरांनी त्याला कल्याणास परत येऊन पावसाळ्यात सैन्याची छावणी खुद्द मुम्बईस करण्याचा आग्रह केला म्हणून त्याने सैन्याचे तोंड फिरवून कल्याणची वाट धरली. पण वाटेत मराठ्यांच्या फौजेने आणि त्यांच्याबरोबर असलेल्या [१४] पेंढाऱ्यांनी गनिमी छापे घालून गॉडर्डचे खूप नुकसान केले. या कामगिरीत परशुरामभाऊ पटवर्धन व हरिपन्त

फडके यांनी विशेष मर्दुमकी गाजविली. गॉडर्ड पनवेलला परतत असतांना, १६, २६ व २९ मार्च रोजी व फिरून २० व २३ एप्रिल १७८१ रोजी उभयपक्षी मोठ्या चकमकी झडल्या त्यात इंग्रज फौजेची खूप नासाडी झाली. तथापि ती सोसूनही [१५] गॉडर्डने अखेर पनवेल गाठले.

गॉडर्डने माघार घेतल्यावर कोकण आघाडीवरील इंग्रज–मराठ्यांचा संघर्ष संपुष्टात आला. ही आजपर्यंत असलेली समजूत चुकीची आहे. गॉडर्डच्या माघारी नंतर थोड्याच दिवसात नाना फडणीसाने बाळाजी विश्वनाथ फाटक याच्या हाताखाली सैन्य देऊन इंग्रजांच्या ठाणे, साष्टी वगैरे प्रदेशाच्या जवळपासच्या भागात एक छोटीशी आक्रमक स्वरूपाची चढाई केली. ही चढाई मे १७८१ पासून १७८२ च्या मध्यापर्यंत चालू होती. या काळात बाळी विश्वनाथ फाटकने इंग्रजांचा मराठ्यांच्या कोहज किल्ल्याला बसलेला वेढा उठविला. त्यानंतर त्याने सूर्या व वैतरणी नदी या नद्यांच्या काठावर झालेल्या चकमकींमध्ये इंग्रज सैन्यांच्या छोट्या तुकड्यांचा पराभव केला पुढे माहिम येथील बाजारपेठेत शिरून ती त्याने जाळली. याच सुमारास मराठ्यांनी टकमक, तांदुळवाडी, काळदुर्ग हे किल्ले जिंकून घेतले. मराठ्यांना या कामी गव्हारच्या कोळी राजाची खूप मदत झाली.

उत्तर हिंदुस्थानात महादजी शिंदेची इंग्रजाविरूद्ध मोहिम (इ.स. १७८०)

कोकण आघाडीवर या चकमक चालू असता उत्तर हिंदुस्थानातही मराठे इंग्रज यांत हर्षामर्षाचे प्रसंगत घडत होते. ऑगस्ट १७८० मध्ये इंग्रज सेनापती पोफॅम याने गोहदच्या राण्याच्या मदतीने, जिंकण्यास कठीण समजला जाणारा ग्वाल्हेरचा किल्ला एका रात्रीत आपल्या ताब्यात आणला. महादजीच्या प्रतिष्ठेला बसलेला हा फार मोठा धक्का होता. मार्च १७८१ मध्ये ब्रिटिश सेनानी कॅमॅक यसानेही माळव्यात महादजीचा सणसणीत पराभव केला. परंतु त्यानंतर मात्र महादजी सावरलेला दिसतो. जुलै १७८१ पर्यंत त्याच्या मदतीला पेशव्यांच्या व होळकरांच्या फौजा आल्या. महादजीने म्यूर या इंग्रज सेनानीचा क्षिप्री येथे पराभव केला.

त्याच सुमारास सिरोंज येथे [१६] पोमँकच्या सैन्यावर तुटून पडून त्याला पराभूत केले.

इंग्रज जिद्दीने लढत होते खरे, परंतु मराठ्यांविरूद्ध निर्णायक विजय मिळविणे त्यांना वाटले तेवढे सोपे जात नव्हते. निजाम व नागपूरकर भोसले यांना गप्प बसविणे त्यांना समजले तरी पेशवे, शिंदे–होळकर, हैदर या सर्वांविरूद्ध एकाच वेळी निरनिराळ्या आघाड्यांवर लढणे त्यांना एकंदरीत जडच जात होते. त्यांची मुख्य अडचण घोडदळाची होती. त्यांच्या कवयाती, पायदळी पलटणी व तोफखाना उत्कृष्ट असला तरी त्या दोहोंच्या मदतीला घोडदळ नसल्याने मराठ्यांविरूद्ध ते निर्णायक विजय मिळवू शकत नव्हते. मराठे घोडेस्वार त्यांच्या बंदुकांच्या व तोफांच्या माऱ्याच्या पलीकडे वेगाने जाऊ शकत. मद्रासकर इंग्रजांना हैदरने जो दणका दिला त्यामुळे इंग्रज–मराठ्यांच्या युद्धात वेगळीच कलाटणी मिळाली.

इंग्रज–मराठा पहिल्या युद्धात महादजी शिंदेची भूमिका (इ.स. १७८१)

राघोबादादा पक्ष सोडावा लागला तरी चालेल, परंतु हैदरअलीला शिरजोर होऊ देता कामा नये, असा विचार करून कलकत्तेतकर, मद्रासकर व मुंबईकर अशा त्रिवर्गांनी आपापल्या परीने पुण्यास कारभाऱ्यांकडे निकडीची तहाची बोलणी सुरू केली होती. नागपूरकर भोसलेही इंग्रजांशी सलोखा करून त्यांच्या बाजूने मध्यस्थी करू लागला होता. परंतु महादजीइतका दुसरा वजनदार सरदार नाही, हे ओळखून धूर्त हेस्टिंग्जने इ. स. १७८१ मध्ये खुद्द महादजीलाच म्यूरतर्फे तहाची बोलणी केली. महादजीने तात्पुरती युद्धबंदी मान्य केली आणि पुणेकरांस साष्ट मिळाली व स्वतःस उत्तर हिंदुस्थानात व पादशाही राजकारणात मुक्त हस्त मिळाला तर तह होईल असे हेस्टिंग्जला कळविले. हेस्टिंग्जने ते मान्यही केले, नानाने ब्रिटिशांच्या अडचणी ओळखल्या होत्या आणि त्यांचा फायदा जितका जमेल तितका त्याला घ्यायचा होता. नानाने महादजीस कळविले की या लढाईत हैदर व आम्ही एक आहोत आणि त्याला वगळून परस्पर आम्हाला तर करता येत नाही. [१७] हैदरने इंग्रजांविरूद्ध मोठे विजय मिळविलेले असल्याने,

त्याची तह करण्यास बिलकूल तयारी नव्हती व तह न करण्याबद्दल तो नाना व महादजी यांना निक्षून सांगत होता. या मुद्यावर नाना व महादजी यांची पत्रापत्री कित्येक दिवस चालली होती. अखेर डिसेंबर १७८१ त हेस्टिंग्जचा खास प्रतिनिपधी अॅन्डरसन हा महादजीपाशी ठाण मांडून बसला. तेंव्हा महादजी नानाला तह लवकरच उरकून घ्यावा म्हणून तगादा करू लागला. यात थोडासा प्रकार असाही होता की, नानाला तहाची सूत्रे स्वतःच्या हातात हवी होती व महादजीचाही तोच डाव होता. शेवटी नानाला महादजीपुढे नमते घ्यावे लागले.

नाना व महादजी असेपर्यंत मराठे स्वतःच्या राज्याचे रक्षण करण्याइतपत सामर्थ्यवान आहेत हे इंग्रजांना कळून चुकले. पण त्याबरोबर मराठेशाहीतील दोषही त्यांना उमगले. मराठ्यांमध्ये शिस्त, एकजूट नाही, त्यांच्याजवळ पुरेसे अन्नधान्य व साहित्य नाही, बंदुका व तोफखाना या बाबतीत ते '[१८] दुर्बळ आहेत इत्यादी गोष्टी इंग्रजांनी हेरून ठेवल्या. यापुढे काही काळ मराठ्यांशी न भांडता त्यांच्याशी दोस्ती साधून टिपूसारख्या आपल्या इतर शत्रूचा नाश करावयाचा आणि मराठे जेंव्हा दुर्बल होतील तेंव्हा योग्य वेळी त्यांच्यावर आघात करावयाचा असे नवे धोरण इंग्रज मुत्सद्यांनी ठरविले.

मराठ्यांनाही पहिल्या इंग्रज-मराठे युद्धापासून काही धडे शिकावयास मिळाले होते. इंग्रज हे त्यांचे हिंदुस्थानावर वर्चस्व गाजविण्याच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचे शत्रू असल्याचे त्या युद्धाने स्वच्छ दाखविले होते. निजाम हा विश्वास घातकी असून जवळ करण्याच्या लायकीचा नाही. हे सदर युद्धाने दाखवून दिले होते. तेंव्हा यापुढे टिपू व इतर इंग्रजाविरोधी सत्तांशी मैत्री साधून, योग्य वेळी इंग्रजांना खडे चारण्याचे धोरण पुणे दरबाराने अवलंबावयास पाहिजे होते. तसेच हैदरच्या धर्तीवर घोडदळ व पाश्चात्य धर्तीचे पायदळ तोफखाना यांचा समन्वय करण्याची योजना मराठ्यांनी आखावयास पाहिजे होती. '[१९] निजामाच्या निकाल लावण्याचा विचारही त्यांनी करावयास हवा होता. प्रत्यक्षात मात्र असे झाले की इंग्रजांनी

पहिल्या इंग्रज-मराठे युद्धाचे धडे आत्मसात करून आपल्या धोरणात योग्य त्या सुधारणा केल्या. पुणे दरबाराने मात्र धडे मिळूनही त्यानुसार उपाययोजना करण्यात उदासीनता दाखविली.

सालबाईच्या तहाने, हैदरने इंग्रजांचा जो मुलूख जिंकला होता, तो सोडवून इंजास परत करण्याची जबाबदारी मराठ्यांवर आली होती.[२०] हैदर जिवंत असतानांच इ.स. १७८२ च्या अखेरीस, महादजीने त्यास इंग्रजांचा मुलूख, कैदी वगैरे त्यांना परत करावे, नाहीतर इंग्रज-मराठे दोघेही मिळून तुझा नायनाट करतील, असा दम भरला होता. यात महादजीच्या मुत्सद्देगिरला कमीपणा आहे. हैदर मोठा प्रामाणिक होता व त्याला दिलेला शब्द पाळणे नैतिकदृष्ट्या आवश्यक होते असे मुळीच नाही परंतु इंग्रज व हैदर या शत्रूंत अधिक धोकादायक शत्रू कोण, कोणाचा नाश आधी करावयाचा व कोणाचा नंतर, तसेच एकाचा करतांना दुसऱ्याची मदत घेणे योग्य की अयोग्य इत्यादी गोष्टींचा साधकबाधक विचार महादजीने आणि पुढे नानानेही केलेला दिसत नाही.

सालबाईच्या तहात पुढील कलमे होती

भडोच, साष्टी आणि ठाणे ही इंग्रजांकडे राहावीतः वसई व आसपासचा मुलूख मराठ्यांस परत मिळावाः गुजरातमध्ये इंग्रजांनी जिंकलेला मुलूख पेशवे किंवा गायकवाड यापैकी पूर्वी ज्याचा असेल त्याला तो परत मिळावाः इंग्रजांनी राघोबादादास आश्रय देऊ नये, राघोबाने दरमहा पुणे दरबाराकडून पंचवीस हजार रूपये खर्चास घेऊन स्वस्थ रहावे.

इंग्रजांनी फत्तेसिंग गायकवाडास असलेला आपला पाठींबा काढून घ्यावाः पेशव्याने हैदरास त्याने घेतलेला इंग्रजांचा मुलूख परत देण्यास भाग पाडावे इंग्रज व मराठे यांनी एकमेकांच्या दोस्तांस त्रास देऊ नये मराठी मुलूखात [२१] इंग्रजांस व्यापारी सवलती मिळत रहाव्यात, मराठ्यांनी फ्रेंच वगैरे इतर युरोपियन सत्तांशी संधाने साधू नयेतः या तहास महादजीने मध्यथ राहून इंग्रज किंवा पेशवा यापैकी कोणतीही तहाच्या शर्ती मोडल्या, तर

त्याचे पारिपत्य करण्याची हमी घ्यावी.

सालबाई तह गुणदोष चर्चा

या तहातील गुणदोष, त्यातील कलमे पहाता सहज लक्षात येण्याजोगे आहेत. [२२] सालबाईच्या तहाने, इंग्रजांनी जिंकून घेतलेला बराच मुलूख परत मिळावा व तात्पुरता समझोता होऊन थोडी उसंत मिळावी एवढाच मराठ्यांच्या दृष्टीने लाभदायक भाग दिसतो. मात्र साष्टी, ठाणे, भडोच वगैरे मुलूख त्यांना गमवावा लागला. राघोबा हाती आला हीही त्यांच्या दृष्टीने एक चांगली गोष्ट होती. परंतु हैदरला बरोबर घेऊन इंग्रजाविरूद्ध लढाई करावयाची आणि मध्येच त्याला सोडून इंग्रजांशी तह करावयाचा, ही गोष्ट मराठ्यांना शोभणारी नव्हती. नानाची या बाबतीतील भूमिका बरोबर होती, तिच्याकडे महादजीने दुर्लक्ष केले ही त्याची फार मोठी चूक होती. पुढे टिपूने मराठ्यांवर विरोध करून त्यांना अडचणीत आणले होते, याचे बीज महादजीच्या या चुकीत आहे. मुधोजी भोसल्याने आपले काम केले नव्हते. परंतु त्याला बरोबर घ्यावे आणि भोसल्यांच्या बंगालमध्ये इंग्रजांनी ज उपद्व्याप मांडले. त्याबद्दल व बंगालच्या चौथाईबद्दल त्यांना जाब विचारवा हे नानाचे म्हणणे मराठी राज्याच्या हिताच्या दृष्टीने विचार करण्याजोगे होते. परंतु भोसल्यांनी हरामखोरी केली. मग त्यांना वाटाघाटीत घेण्याचे कारण काय? असे विचारून महादजीने नानची सूचना धुडकावून लावली. महादजीला पेशव्यांच्या हितसंबंधाचा प्रश्न अर्धामुर्धा महत्वाचा वाटला होता. बंगालच्या प्रश्नात त्याला काडीमात्र रस वाटला नाही.

नाना फडणीस व महादजी शिंदे संबंध

नाना फडणीसांनी पेशव्यांच्या नावो दिलेल्या हुकूमान्वये महादजी शिंदे उत्तर हिंदुस्थानात गेले. बादशहाकडून सर्वाधिकारी स्विकारून आपल्या तंत्राने रजकारण बांधू लागले. महादजींचा लौकीक होऊ लागला. ते नाना फडणीसास न [२३] खपून महादजीबाबांच्या कामात कशी खीळ पडेल हे नाना फडणीस पाहू लागले. वास्तविक मराठेशाहीचे सर्वाधिकारी नानालाच होते.

नानांचा व महादजींचा स्नेह होता. दक्षिणेत येण्यासाठी महादजी नानांची परवानगी मागत होते. अशा रितीने नानास वडिलकीचा मान महादजी देत होते. त्यांच्या मदतीस पाठविलेले तुकोजी व अलिबहाद्दर यांना अंतस्थ रितीने महादजीचे हुकूम मानू नका, माझेकडे लिहून पाठविल्यावर पुण्याहून तुम्हास जे लिहून येईल त्याप्रमाणे वागा असे दोघा सरदारास सांगावयास नको होते. त्यांच्या ह्या वागण्यात क्षुद्र वृत्ती दिसते. हे राष्टपुरूषाचे वागणे नव्हे. म्हणून लेखणी बहाद्दरांनी नानास केवढेही मोठे केले तरी नानात छत्रपती शिवाजी, पेशवा बाजीराव किंबहुना नानासाहेब पेशवे यांच्या राष्ट्रीय विचारसरणीचा लवलेशही दिसत नाही. इ. स. १७८९–९० च्या मानाने महादजीबाबांनी वकील–ई–मुतालिक ह्या नात्याने इंग्रजांकडे बंगालच्या दिवाणीचे पैसे मागितले. इंग्रजांनी ही मागणी धुडकावून लावली. महादजीबाबास इंग्रजांचा एवढा राग [२४] आला की, त्यांनी इंग्रजांविरूद्ध सार्वत्रिक उठाव करण्याचे राजकारण बांधले. नानानी जर उत्तरेत त्यांच्या मदतीस दोन सरदार त्यांचे ऐकणारे पाठविले असते तर उत्तरेतील कामगिरी राजपुतांना काबूत आणणे व इस्माईल बेगचा बंदोबस्त करणे ह्या गोष्टी त्यांनी २–४ वर्षात उरकल्या असत्या. पण नानांना इतिहास माहिती असूनही त्यावर त्यांच्या स्वार्थाने कुरघोडी केली. खरा शत्रू इंग्रज आहे, टिपू नव्हे हे टिपूने स्पष्टपणे सांगूनही नानांनी इंग्रजांचा पाडाव करण्यासाठी काहीच हालचाल केली नव्हती. ते राष्ट्रपुरूष असते तर त्यांनी राष्ट्राचा विचार केला असता. मराठ्यांची सत्ता म्हणजे एतद्देशीयांची, आपल्या राष्ट्राची सत्ता. ती अबाधित राखण्यासाठी शत्रूस शिरजोर होऊ न देणे, हे राष्ट्रपुरूषाचे काम नानांनी केले नाही. महादजी पराक्रमी होते. उत्तरेत पेशव्यांच्या नावेच ते मराठी सत्तेचा विस्तार करीत होते. नानांच्या क्षुद्र राजकारणास कंटाळून उत्तरेतील कामगिरी अलिबहाद्दरवर सोपवून आपणास दक्षिणेत पेशव्यांचे चरणापाशी येण्याचे हुकूम द्यावे असे महादजी सन १७९० पासून नानांना विनवित होते. पण उत्तरेतून महादजीबाबा दक्षिणेत पुण्यास आल्यास ह्या पराक्रमी व मुत्सद्दी वीरांचे पेशवे ऐकतील आणि आपले कारभारी

पद महादजींना मिळेल ह्या स्वार्थी धास्तीने नाना फडणीसांनी महादजींना उत्तरेत दोन न ऐकणारे सरदार पाठवून गुंतवून ठेविले. महादजीबाबांच्या हे लक्षात आले. तरी त्यांनी आपले राष्ट्रासंबंधीचे कर्तव्य केले. [२५] मराठी सत्ता दृढ करण्यासाठी त्यांनी अफगाण बादशहा व शीख यांजशी समझोता करून सतलज नदी ही आपल्या राज्याची महादजीनी सरहद्द ठरविली.

महादजीबाबांनी हिंदुस्थानच्या राजकारणाचा विचार करतांना अफगाणच्या हद्दीपर्यंत ते बंगालच्या टोकापर्यंतच्या सर्व भूभागांचा विचार केलेला होता असे दिसते. त्यांनी अफगाण, शीख व मराठे या त्रिवर्गाचा एक समझोता घडवून आणला होता. सतलजपर्यंत मराठ्यांची सत्ता चालावी, सतलजपासून लाहोरपर्यंत शिखांचा अधिकार मान्य करावा आणि लाहोपासून अटकेपर्यंत अफगाणांची हुकूमत चालावी,असे अफगाण बादशहा तिमूरशहा यांनी महादजीबाबापाशी मान्य केले होते. अफगाण व मराठे यांनी एकमेकांस संकटकाळी मदत करावी. अफगाण बादशहांनी महादजीबाबांस त्यांच्या गरजेच्या वेळी दहा हजार घोडेस्वार पाठवून मदत करावी. ह्या अटी प्रत्यक्षात आणण्याची पाळी आली नाही.

नानाने पुण्याच्या परिसरात चोख व्यवस्था ठेली होती आणि पेशव्याच्या विकासाकडेही आवश्यक ते लक्ष पुरविले होते. परकियांना त्यामुळे या राज्यात हस्तक्षेप करणे मुश्कील झाले होत. या राज्यात नाना आहेत [२६] तोपावेतो या राज्याची गोष्ट बोलू नये असे इंग्रजांनी आपल्या बुकात साहेबाने लिहून ठेवले होते असे बखरकार म्हणतो.

महादजीचे दिल्ली व उत्तर हिंदुस्थानातील वर्चस्व कमी करण्याचा इंग्रजांचा दृष्ट हेतू

नाना फडणीस मराठी राज्याचा कारभार पुण्यास सवाई माधवराव पेशव्यातर्फे पहात होते. महादजी शिंदे हे मुत्सद्दी असून तलवार बहाद्दर होते. महादजींनी नाना फडणीसांच्या संमतीने उत्तर हिंदुस्थानात जाऊन मोगल अमीरांना पराभूत करून बादशाहीचा ताबा घेतला. सालबाईचा पुणे दरबार व इंग्रजांमधील तह महादजी शिंद्यांच्या मध्यस्तीने झाला त्या वेळेपासून

डेविड अन्डरसन हा इंग्रज वकील महादजी शिंद्यांच्या छावणीत राहू लागला. इंग्रजांची मराठ्यांच्या दरबारातील कामे ह्या वकीलामार्फत म्हणजे महादजीमार्फत म्हणजे महादजीमार्फत होऊ लागली. नाना फडणीसांना स्वतः मराठी राज्याचा कारभारी असूनही ह्यामुळे दुय्यम स्थान वास्तवात प्राप्त झाले. ते शल्य नानांना बोचू लागले. बादशाही कारभार महादजी दिल्लीस राहून पाहू लागताच इंग्रजांनाही महादजीच्या वाढत्या सत्तेचा धाक वाटू लागला. हिंदुस्थानातील निरनिराळ्या सत्ताधिशांकडे असलेले इंग्रज वकील महादजींच्या दिल्ली दरबारी वाढलेल्या प्रस्थाचा धसका घेऊन त्यापासून वाढत्या इंग्रजी सत्तेस धोका असल्याचे बोलू लागले. महादजींचा नक्षा उतरावा असे त्यानांही वाटू लागले. नानांना महादजींच्या छावणीतील इंग्रज वकीलातर्फे पुणे दरबारने इंग्रजांशी पत्रव्यवहार करणे न आवडून पुण्यास स्वतंत्र [२७] इंग्रज वकील असावा अशी मागणी मुंबईच्या गव्हर्नरकडे केली. इंग्रज गव्हर्नरने व कलकत्याचा त्यावेळचा गव्हर्नर जनरल मॅक अरसन ह्याने ही मागणी ताबडतोब उचलून धरली. त्यामुळे महादजीच्या वाढत्या सत्तेस आळा बसणार होता. इंग्रज वकील म्हणून चार्लस मॅलेटची नेमणूक पुण्यास झाल्याचे इ. स. १७८४ च्या अखेरीस जाहीर झाले. चार्लस मॅलेटला इंग्रज-मरत्तठे संबंधाचे सूक्ष्म ज्ञान होते. १७५२ मध्ये जन्मलेला हा इंग्रज मुंबईस इ. स. १७७० मध्ये कंपनीच्या नोकरीत रायटर म्हणून आला होता.

महादजी शिंदे वॉरन हेस्टिंग्ज संबंध (इ. स. १७८१)

वॉरन हेस्टिंग्जने सिंद्याचे मार्फत पुणे दरबाराशी तह ठरविण्याचा निश्चय करून त्यासाठी डेव्हिड अंडरर्सन यास संपूर्ण अधिकार देऊन सिंद्याकडे जाण्याचा हुकूम केला. ता. ४ नोव्हेंबर १७८१ रोजी हेस्टिंग्जने अंडरसनास तहाची लेखी समजूत दिली, त्यांत त्याने असे कळविले की, इटाव येथे कॅटर यांस भेटून तुम्ही पुढे जावे. [२८] म्यूर यास महादजीच्या धोरणाची चांगली माहिती आहे, ती तुमच्या उपयोगी पडेल. महादजीला आम्ही स्वतःच भेटून सर्व गोष्टी ठरवाव्या

अशी आमची इच्छा आहे. त्यासाठी अलाहबाद किंवा कानपुरपावेतो आम्ही येऊ. महादजींची मर्जी असल्यास त्यांनी तेथे आमचे भेटीस यावे. फार तर इटाव्यापर्यंत आम्ही यमुनेवर येऊन यावरून समक्ष भेटीत आपले फायद्याचा तह महादजीकडून करून घेण्याचा हेस्टिंग्जचा उद्देश व्यक्त होतो. हेस्टिंग्सने ता. ४-११-१७८१ च्या पत्राने मुंबईच्या गव्हर्नरास व गाडर्डास लिहून कळविले की, मराठ्यांशी कोणत्याही ठिकाणी युद्ध चालवूं नये, चाललेले युद्ध बंद करावे. एक वकील इंद्रसेन या मातब्बर अधिकारी वॉरन हेस्टिग्जने इटाव्यात रवाना केले. पौषण कृष्ण १३ स (१४-१२-१७९१) राजे चेतसिंग महादजीजवळ गेले. सिंद्यांनी आपला दिवाणी ३ कोस, पुढे पाठवून बहुत सन्मानें करून चेतसिंगाची भेट घेतली, लष्कराजवळ सन्मान केला. बडेसाहेबांनी हे ऐकून इंद्रसेनास [२९] ॲडरसन लिहिले की, तुम्ही शिंदे यासी भेटावे. त्यावरून ३० डिसेंबर रोजी खबर आली की, इंद्रसेन इटाव्याहून कूच करून २३ डिसेंबर रोजी शिंद्यास भेटले. इकडे वॉरन हेस्टिंग्जने वेणीरामपंत व विश्वभंरपंतास एक लक्ष रूपये इनाम व पंचवीस हजारांची जहागीर देऊन नागपूरास भोसल्याजवळ रवाना केले, की आपण श्रीमंतांशी सल्ला करून द्यावा. विश्वंभरपंताबरोबर कर्नल चापमन नागपुरास पाठविले आहेत. वेणीरामपंताने चेतसिंगाचे बंडांत हेस्टिग्सचा जीव वाचविला. परंतु पुढे चेतसिंग पळून महादजीकडे गेला, तेंव्हा हेस्टिग्जचे धाबे अतिशय दणाणले होते. तह झाला नाही तर सर्व बंगाल प्रांत हातचा जाण्याचा योग होता. सदाशिव दिनक नानास लिहितो, काशीच्या राजाची तोड निघेल तशी काढून लिहावें म्हणोन लिहिले, त्यास इंद्रसेन प्रथम आला ते समयीच त्याने बोलणे चालवले होते, की राजास तुम्ही लष्करांतून काढून द्या, म्हणजे आम्ही भेटीस येऊ, त्यावरोन बाबांनी इंद्रसेनास सांगून पाठविले की, तुम्हांस येणे तरी यावे, नाही तरी न यावे. परंतु जो कोणी आम्हापाशी आला, त्यास आम्ही काढून कसा देऊ, आणि अशी कोठे रीत नाही. त्यावर [३०] इंद्रसेन येऊन भेटल्यानंतर पहिले बोलणी त्याच दिवशी झाली, की तुमची आमची दोस्तीच झाली तर मग

दोस्तीच्या पोटी तुमच्या आमच्या विचारांशी जसे घडले तसें करता येईल. थोडक्यात कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादी सर्व ठिकाणांच्या इंग्रजांकडून तहाचे संदर्भ पुण्यास आले. नाना, हैदर, महादजी या तिघांनी आणखी जरा चढाई केली असती तर मराठे सांगतील त्या अटींवर तह करून इंग्रजास आपला निभाव करून घ्यावा लागला असता. महादजीने एकट्यानेच स्वतंत्र तह केल्याने इंग्रजांची बाजू पुष्कळच बचावली.

महादजीने नानास सांगितले की, इंग्रजांची फौज यमुनापार गेली. [३१] काशीचा राजा येऊन भेटला. आम्ही सांगितले की, राणोदहून कूच करून दतियानजीक आलो. इंग्रज पलटणांचे मार्ग आमच्या फौज घाबरून येतात असे दृष्टीस पडताच, त्याने सारी पलटणे कानपुरी जमा केली, आणि सलोख्याचे बोलणे करून इंद्रसेनास मुख्य नेमून रवाना केले होते. तो ता. २३ डिसेंबर रोजी येऊन भेटला. तीन चार बैठकी होऊन बोलणी जाली. इंद्रसेन आल्यावर दतियाकडून कुच केले. गोहदकराचे मुलूखांतून इटाव्याच्या प्रदेशात जाण्याचा विचार करून इकडे गोहदजवळ अठरा कोसावर आलो. सरकारचे महाल खराब होतील म्हणून काल्पीकडे आलो नाही. शिवाय काल्पीकडे यमुना नदीस उतार न झाल्यामुळे गोहदकराने ग्वाल्हेकडील मुलूख ताब्यात घेऊन इंग्रजांस सामील झाला, त्याचे पारिपत्य जातांना करावे म्हणून चार पांच गढ्या घेतल्या. बंदोबस्त करून पुढे जात आहोत.

हेस्टिंग्ज ही व्यक्ती मोठी गुंड असून, मोठमोठ्या मी मी म्हणणारांस कोणत्या ना कोणत्या युक्तिने कसे वळवून घ्यावे व एखाद्यास आपल्या जाळ्यात कसे ओढून आणावे हे तो चांगले समजे थोडा बहुत महादजी त्यास वश झाला. अंडरसनास त्याने तीन चार महिने वाटाघाटीत खूष केले होते. [३२] हेस्टिंग्ज जूलई १७८१ पासून जानेवारी १७८२ पर्यंत बनारसचे बाजूस होता. अंडरर्सन येतांच त्याजपासून इंग्रजांच्या तहाच्या अटी घेऊन त्या रामजी पाटील व सदाशिव दिनकर यांजबरोबर महादजीने पुण्यास नानाकडे आरंभी मंडळी परत महादजीकडे

आली. ता. १५-४-१७८२ रोजी नाना रामजी पाटलास विचारतो, तुम्ही निघोन लष्करात गेल्यावर इंग्रजांचे तह प्रकरणी बोलणे होऊन पत्रे यावी, ती न आली म्हणून आश्चर्य वाटले. राघोबादादांस येथे आणून सरकारचे स्वाधीन करावें ही खातरजमा आहेच. '[33] नारो शिरदेव यास परत पाठवावयाविशी पाटीलबाबास लिहिले आहे, त्याप्रमाणे करावे.

चार प्रतिष्ठित इंग्रज अधिकाऱ्यांनी मद्रासेहून स्वतः पत्रे तह करण्याविषयी लिहिल्याबरोबर इंग्रजांची तहाची उत्कंठा अतिशय वाढली. त्यातही चेतसिंग व उत्तर हिंदुस्थानातील रजवाडे इंग्रजावर उठल्याने हेस्टिंग्ज अतिशय घाबरला होता. शिवाय फ्रेंच लोकांची मदत हैदरास आल्याने त्यांनीही जास्त जोराने इंग्रजावर वचक बसवला होता. अशा स्थितीत मराठ्यांचे प्रकरण मिटविण्याची इंग्रजास सर्वत्रच उतावीळ प्राप्त झाली. गॉडर्डने कॅप्टिन वॉदर्स्टन यास आपल्या तर्फेने पुण्यास तहाची वाटाघाट करण्यास पाठविले. म्हणजे जानेवारी इ. स. १७८२ मध्ये अंडरसन ग्वालेरजवळ महादजींशी वाटाघाट करीत असतानांच कॅप्टन वॉटरसन पुण्यास तेच काम करीत होता. हा वॉटरसन मुंबईस फारसी भाषाभिज्ञ असून पुण्याची फारसी मराठी पत्रे तोच मुंबईस समजून सांगत होता. परंतु दोन ठिकाणी एकच वाटाघाट श्रेयस्कर नसल्यामुळे, हेस्टिंग्जकडून अंडरसन सिंद्याकडे गेल्याचे कळताच मुंबईकरांनी वॉदर्स्टनला परत बोलाविले, पण नानाने त्यास लगचे परत जाऊ दिले नाही, महादजीकडून अंडरसनच्या वाटाघाटीची बोलणी काय होतात ते पाहून मग तुम्ही परत जावे असे त्यास नानाने १५-२-१७८२ रोजी सांगितले. यावेळी हेस्टिंग्जकडून मिस्टर चॅपमन हा आणखी एक गृहस्थ नागपुरकर '[34] भोसल्यांकडे असाच तह ठरविण्यास आला होता. त्यावरून महादजी व अंडरसन या दोघांसही पुण्यास वाटाघाटीसाठी बोलवावें असा नानाचा प्रथम विचार होता. हैदरकडून नानास वारंवार सूचना येत होती की, इंग्रजांशी परभारें तह करू नये, फ्रेंचाची मदत येत आहे. इंग्रजांचा कायमच पाडाव करू. हैदर निजाम वगैरे सर्वास पुण्यास आणून त्यांच्या मार्फत पक्का तह

इंग्रजांशी असा करावा की पुनः कोणत्याही प्रश्नासंबंधाने भानगड राहू नये. इतक्यात महादजी व अंडर्सन पुण्यास येणार असा बेत होता, म्हणून [३५] बॉदर्स्टननें पुण्यासच रहावे, असा हेस्टिंग्जने हुकूम पाठविला. परंतु तो पोहचण्यापूर्वीच बॉदर्स्टन पुण्याहून निघून गेला होता.

इंग्रज–महादजी शिंदे मैत्री संबंधीचा तळेगांवचा तह (इ. स. १७८२)

ता. १६–४–१७८२ रोजी नानाने महादजीस लिहिले की, वेदरसन (Watherston) आला होता. त्यास इंद्रसेन आपल्याकडे आला आहे म्हणून सांगितले आहे, त्याचे योग्यतेस गॉर्डर देखील पोंचत नाही. त्यास इंद्रसेनाची योग्यता आपण बोलतां त्यापक्षीं सरकारचे मुद्देमाफक हैदरखानासुद्धा तह करून घ्यावा. पुनः ता. ३–५– रोजी नाना नारो शिवदेवास लिहितो. वसई, कोकण, गुजराथ वगैरें प्रांतीचा मुलूख देऊ, मात्र अमदाबादेविशी फत्तेसिंगास आमचे वचन गेले आहे तेवढे स्थळ त्यांजकडे ठेवावे, याप्रमाणे इंद्रसेन बोलतो पण पाटीलबाबा म्हणतात की, ही गोष्ट घडवयाची नाही, म्हणोन लिहिले, त्यास फत्तेसिंगाची वागणूक पाटीलबाबांचे ध्यानांत आहेच. अंतमदाबादेविशी उत्तर केले, सरकारचा सर्व मुलूख इंग्रजांपासून माघारा घ्यावा, अमदाबादची ओढ त्यांनी धरू नये. सरकारचा सर्व मुलूख इंग्रजांपासून माघारा घ्यावा, अंमदाबादची ओढ त्यानी धरू नये. परंतु हैदरखान सुद्धा तोड पडून तह करणे कठीण दिसते. आपले मसलतीस हैदर सोबत झाला, तेव्हा त्यास सोडून सल्ला करणे ठिक नाही. पाटीलबाबांकडून इंद्रसेनाशी भवति न भवति होऊन कमलबंदीची याद आली, त्याची उत्तरें पाठविली आहेत. साष्टी खेरीज करून अप्टनाचे तहाप्रमाणे तह इंग्रज करणार, त्यास अप्टनाचे तहापेंक्षा तळेगांवावरील तह चांगला, [३६] मुद्देमाफक हैदरखानासह पाटीलबाबांनी तह करून घ्यावा.

वॉरन हेस्टिंग्जने अंडर्सनला तहाच्या समजुती लिहून दिल्या त्यांत खालील मुद्दे होते

१. मराठे व इंग्रज यांचा हैदराचे विरूद्ध बचावाचा व चढावाचा करार महादर्जीने जुळवून द्यावा असा करार शक्य नसल्यास निदान पुणे दरबारांशी कायम दोस्ती व्हावी, त्यांत

अंहमदाबाद व गुजरातेंत फत्तेसिंगास दिलेले मुलूख शिवाय करून बाकी सर्व जिंकलेले प्रदेश इंग्रजांनी पेशव्यास परत द्यावे.

२. रघुनाथरावास पुरेशी नेमणूक करून द्यावी.

३. निजाम, भोसले, फत्तेसिंग, गॉडर्ड वगैरे ज्यांच्याशी आमचे करार मदार झाले असतील त्यांस या तहाने बाध येऊन नये. मात्र गोहदचा राणा आमच्याशी इमानाने लढाई होऊन दोघांचेही पुष्कळ नुकसान झाले. आणि कर्नल ह्यूज हा बचावासाठी सिलोनच्या पूर्व किनाऱ्यावर ट्रिंकोमालीच्या बंदरात गेला. त्याचा पाठलाग करण्याचे फ्रेंच अधिकारी [३७] मुसा फ्रांसिस्कोच्या मनात फार होते. परंतु हाताखालच्या अंमलदारांनी त्याचे हुकूम बिलकूल मानले नाहींत. फ्रेंच लोक वरिष्ठांचे हुकूम पाळण्यात हलगर्जी केली होती, हे दुसरे मोठे वैगुण्य पूर्वी काऊंट लालीच्या वेळेप्रमाणेच या वेळीही फ्रेंच अधिकारी मुसार सॅफ्रेंसिस्को याच्या लक्षात आले होते. अशी कुचराई हाताखालील लोकांनी केली नसती तर हैदरअलीच्या साह्याने सफ्रांने इंग्रजांचा या वेळी साफ उठाव दक्षिण हिंदुस्थानातून केला असता, असा मॅलेसनचा अभिप्राय आहे, सफ्रांचे धाडस व कौशल्य पाहून हैदराने सुद्धा असे उद्‌गार काढिले की, अखेरीस या इंग्रजास नरम करणारा वस्ताद भेअला. याच्या मदतीने मी आता इंग्रजांचा नायनाट करून दाखवितो. दोनच वर्षाचा अवधि पाहिजे, म्हणजे मी या हिंदभूमीवर इंग्रजांचे चिटपाखरू देखील राहूं देत नाही. पुढे सफ्रांस भेटून युद्धाची व्यवस्था ठरविण्यासाठी हैदर मुद्दाम पूर्व किनाऱ्यावर गुडलूर येथे गेला. सफ्रांने जहाजांतून बंदरावर उतरून ता. २६-७-१७८२ रोजी हैदरची भेट घेतली. हैदरने या प्रसंगी या सफ्रांचा जो बहुमान केला, तसा पूर्वी त्याने कधी कोणाचा केला नव्हता.

फ्रेंचाच्या दक्षिणेतील केलेल्या कामगिरीची महादजी समोर गुप्त ठेवण्याचा इंग्रजांचा प्रयत्न (इ. स. १७८२-१७८४)

पहिल्याच दिवशी दोघांचे तीन तास गुप्त खलबत झाले होते. पुढे आणखी दोन दिवस एकत्र राहून त्यांनी पुढील बेत नक्की ठरविला होता. हे खलबत चालू असतानांच फ्रेंच फौज बुसीच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानात दाखल झाली होती. ती येऊन पोहचल्याचे वर्तमान लक्षात येताच त्यांचा आनंद द्विगुणित झाला. प्रथम त्रिकोमाली बंदर हस्तगत करण्याचे ठरवून हैदरअलीने लवकरच फ्रेंच अधिकारी मुसा सॅनफ्रॅसिस्को याला लवकरच आरमार देऊन ता. ३१-८-१७८२ रोजी ते बंदर हस्तगत केले. ते परत घेण्याच्या इराद्याने इंग्रज नौकापति ह्युइज सफ्रांवर चालून गेला. आरमारांची निकराची लढाई ता. १३-९-१७८२ रोजी होऊन इंग्रजांस माघार घेऊन मद्रासेस परत यावे लागले.

बुसीने ता. २७-६-१७८२ रोजी नानास लिहिले, आम्ही ७ हजार फौजेसह गुडलुरास आलो. इकडील इंग्रजास तमाम पराभव करून मुंबईकडे समुद्र मार्गाने मुसा सॅनफ्रॅसिस्को जलमार्गाने येत असतांना फ्रेंच व इंग्रज यांच्यात लढाई झाली. त्यात इंग्रज फौज घाबरून जाऊन ते पळून जाण्याचा प्रयत्न करीत होते.

हे आरमारी युद्ध चालू असतानांच इ. स. १७८२ च्या मे महिन्यात महादजीने घाई करून सालबाईचा तह पुरा केला हे येथै ध्यानात ठेविले पाहिजे. मुसा सॅनफ्रॅसिस्को याने आरमार घेऊन हैदरअलीच्या फौजेत सामील झाला. त्याच सुमारास इंग्रज मराठ्यांचा सल्ला होऊन इंग्रजांच्या पाठीमागची एक भिती नष्ट झाली. ही गोष्ट पाहून हैदरला मराठ्यांचा केवढा संताप आला असेल याची कल्पना करणे कठीण आहे. उत्तरेकडचा शह मिटल्याने बंगालची इंग्रज फौज हैदरवर येऊ शकली. पुढील डिसेंबरात हैदरही मृत्यू पावला. त्यामुळे सर्वच राजकारण बदलले हेस्टिंग्जचा हस्तक इंद्रसेन महादजीजवळ होता, त्याने महादजीस विचारिले की, आमच्याशीं दोस्ती झाली असतात पुण्याची फौज टिपूचे मदतीस गेली हे काय? तुम्ही तहाची हमी घेतली असल्याने मराठ्यांनी इंग्रजांचीच कुमक केली पाहिजे. महादजीच्या सालबाईच्या

तहाने असा हा चहूंकडे घोटाळा उत्पन्न झाला. २७

इंग्रज-महादजीच्या तहाबाबत हैदरअलीचा विरोध (इ.स. १७८१)

इ. स. १७८१ च्या पावसाळ्यांत महादजीची व इंग्रजांची तहाची वाटाघाट सुरू झाली, ती बातमी हैदरास लवकरात लवकर कळाली होती. त्याने नानास निकडीची पत्रे पुण्यास लिहून करार मोडल्याबद्दल तक्रार केली. त्यासाठी हैदराने नानाचा वकील कृष्णाजी नारायण यास पुण्याहून पुनः त्वरित आपल्याकडे बोलावून घेतले. इ. स. १७८१ च्या पावसाळ्यात तो पुण्याहून शिवकाची येथे पोहोचला होता. पुढें नानानेंही कृष्णरावाचा हैदराकडून पैसे मागितले. बंगालच्या फौजेची रवानगी होण्याऐवजी ७० हजार फौजेची तजवीज करून नना फडणीसाने इंग्रज वकील [३८] वॉटरमन यास आपल्याकडे आमंत्रित केले. ऐवजाची रवानगीच करावी. छत्तिसांची तर्तूद न होय तर निदान तिसांचा जाबसाल उरकून पाठवावा. असे नानाचे लिहून गेल्यावर कृष्णाराव जबाब कळवितो, सांप्रत मुंबईहून इंग्रज वकील (उद्दिष्टिन) पुण्यास आल्यामुळे नाना फडणीसास येऊन मिळाला होता.

शिंद्यांच्या आगमनामुळे आपसात लढाई करता येईल हा इंग्रजांचा हेतू होता. ही बातमी समजताच इंग्रज गव्हर्नर जनरल कॉर्न वॉलिस याला मराठ्यांच्या आक्रमणाची भिती वाटत होती.

महादजी व इंग्रज वकील मॅलेटन संबंध (इ.स. १७८५)

मॅलेटने महादजी शिंद्यांकडे जाण्यासाठी दिनांक २७ जानेवारी १७८५ रोजी पुणे सोडले. उज्जैन, ग्वाल्हेर, आग्रा करीत तो मथुरेत महादजींच्या छावणीत मेमहात उतरला. छावणीतील इंग्रज वकील जेम्स अन्डरसन याने त्याला महादजींसमोर २० मे रोजी नेले. ओळख झाली. महादजीबाबांनी मॅलेटला त्याच्या नवीन नेमणुकीबाबत एका शब्दानेही विचारले नाही. तो महादजीबाबांच्या छावणीत त्यानंतर एक महिना होता. त्या मुदतीत त्याची कसली चौकशीसुद्धा

केली नाही किंवा त्यास रहा-जा असेही म्हणाले नाहीत. मॅलेटने आपल्या ह्या मुक्कामात बादशहाची भेट घेतली आणि महादजीची औपचारिक आज्ञान न मिळविता मॅलेटने छावणी सोडली. मॅलेटची नेमणूक पुणे दरबारी होत आहे हे समजताच महादजीबाबांनी नानलास या धोक्याच्या स्थितीची कल्पना दिली. इंग्रज सत्तेशी व्हावयाचे मराठ्यांचे कोणतेही व्यवहार पहाण्यास व हाताळण्यास आपण समर्थ असता पुण्यास स्वतंत्र रेसिडेन्ट काय कामाचा? त्यामुळे आपल्या एकत्रितपणास तडा जाईल असे लिहिले होते. महादजीबाबांचा आपल्या नेमणुकीस विरोध असण्याच्या कारणाबद्दल मॅलेटेने २३ मे रोजी गव्हर्नर जनरल मॅकफरसनला मथुरेहून लिहिले होते. त्यात त्याने महादजीची वाढती महत्वाकांक्षा इंग्रज हितास बाधक व धोक्याची आहे, त्याचा नक्षा उतरवलाच पाहिजे, तसे नसल्यास इंग्रजांचे दोस्त अवधचे वझीर व कर्नाटकचे नवाब यांच्या सुरक्षिततेस धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे. सध्या महादजी पैशाच्या विवंचनेत आहे. बादशहाचा वजीर म्हणून तो आपली सत्ता वाढविण्यास कमी करणार नाही, तसेच झाल्यास हिंदुस्थानातील इंग्रज हितसंबंधास बाधा येईल. वरील प्रमाणे इतर इंग्रज रेसिडेंटाचे त्यावेळच्या परिस्थितीसंबंधी मत होते. इंग्रज लोक किती घातकी आहेत हे महादजीबाबांनी नानांच्या लक्षात आणून देण्याकरीता लिहिले होते की, *मी बादशाही कारभार हाती घेऊन दिल्लीची मजल साधली. बादशहा काबूत येऊन मला वजीर मरातब हा मोठा हुद्दा दिल्ली दरबारी मिळाला, हे पाहून इंग्रजास वाईट वाटले. यामुळे इंग्रजांचा बंदोबस्त दिल्लीत होणे असंभवनीय झाले. त्यांचा नक्षा उतरला. ब्रिटिश वकील ब्राऊन नंतर दिल्लीतील लहान मोठ्या अमीर उमरावास लाच देऊन मला दिल्लीतून काढून लावण्यासाठी प्रयत्नशील आहे असे हे इंग्रज दुष्ट, कावेबाज आहत हे लक्षात असू द्यावे.''*

अर्थात आपमतलबी नानांचे या घटनेने मत बदलले नव्हते. त्यांनी मराठी राज्याच्या नफा-नुकसानीचा विचार न करता स्वतःच्या प्रभुत्वाचा विचार केला होता व आपले प्रभुत्व

अबाधित रहावे, महादजीबाबांनी वरचढ होऊ नये म्हणून त्यांनी मॅलेटची नेमणूक रेसिडेंट म्हणून करून घेतली. अशा प्रकारे मराठी राज्यात एकाच वेळी दोन वकील-एक पुण्यास व दुसरा महादजींच्या छावणीत असा देखावा निर्माण झाला. महादजीबाबांच्या छावणीतील वकिलास महादजीबाबांचे लढाईचे आराखडे, धोरणे व गुप्त खलबते यासंबंधीची माहिती मिळत नसे. याउलट पुण्यातील मॅलेटला नानाच्या कारभारी मंडळीपैकी कोणासही इथंभूत माहिती समजत नव्हती.

जून १७८५ मध्ये मॅलेटने महादजीबाबांची छावणी सोडली आणि तो आग्रा, कानपूर, बनारस या मार्गे कलकत्यास १८ ऑक्टोंबर १७८५ ला पोहचला. त्याने गव्हर्नर जनरल मॅकफरसनकडून आपल्या नेमणूकीचे पत्र ७ नोव्हेंबरला स्विकारले. १३ नोव्हेंबरला त्याने कलकत्ता सोडून समुद्रमार्गे प्रवास करून तो मुंबईस १७ जानेवारी १७८६ रोजी आला होता. पुण्यास त्याने आपल्या कार्यालयात दिनांक ३ मार्च रोजी प्रवेश केला. तो रेसिडेन्ट म्हणून पुण्यास ११ वर्ष राहिला. दिनांक २२ फेब्रुवारी १७९७ रोजी त्याने पुणे सोडले. त्या अगोदर एक वर्ष त्याने दुसरा बाजीराव पेशवा झाल्याचे पाहिले होते. मॅलेटच्या अगोदर तीन वर्ष मॉटगने नावाचा फ्रेंचाचा वकील पुण्याचा होता. त्यास काढून टाकण्याची खटपट मॅलेटने केली होती.

मॅलेटजवळ फार्सी पंडीत नुरूद्दीन हुसेनखान होता. त्यास त्याने आपला सहाय्यक नेमले. पेशव्यांकडील रेसिडेंटमधील कारभार समजण्यास पेशव्यांचा माणूस म्हणून बहिरो रघुनाथ मेहेंदळे यांची नेमणूक झाली. मॅलेटने शाही इतमामाने राहात होता. इंग्रजी राज्यास शोभेल व भूषणावह होईल अशा डामडौलात राहात होता.

गव्हर्नर जनरल वॉर हेस्टिंग्ज याने १ मार्च १७८५ रोजी कारभार सोडला. त्यावेळी महादजीबाबांकडे इंग्रज वकील जेम्स अन्डरसन होता. तो ऑक्टोंबर १७८७ मध्ये जाऊन त्या जागी कर्कपॅट्रीकची नेमणूक केली होती. कॉर्नवॉलिसने टिपूशी लढाई करण्यासाठी महादजीबाबांची

मदत रेसिडेन्टतर्फे विचारली, त्यावेळी महादजीबाबांकडे इंग्रज वकील कर्कपॅट्रीक होता. त्यास गव्हर्नर जनरलचे महादजीबाबांशी चाललेले मैत्रीचे धोरण न आवडून त्याचा रागा आला व त्याने रेसिडेंट पदाचा राजीनामा स्वीकारला. त्यानंतर कॉर्नवॉलिसने त्याचे जागेवर मेजर विल्यम पामर याची रेसिडेंट म्हणून नेमणूक केली. दिनांक २० ऑक्टोंबर १७८७ रोजी पामरने रेसिडेटनच्या कारभारास सुरवात केली. तो महादजींच्या मृत्यूपर्यंत (१७९४) त्या जागी होता.

महादजी शिंदे सर्वांना ओळखून होता. दुसऱ्या कोणावरही भरोसा न धरता स्वतःच्या हिंमतीवर आपले कार्य सिद्धीस नेले वास्तविक मराठा कारभारी मंडळाने एकत्र येऊन पुढील शासन व्यवस्था लष्करात अमूलाग्र सुधारणा करून त्याचे पुनर्घटन करण्याची वेळ आलेली होती. एक परकीय इंग्रज कंपनी हिंदुस्थानांत येऊन वखारी उघडणे, वखारीच्या संरक्षणार्थ उभे केले छोटेसे सैन्य ऐतद्देशीय राजेराजवाड्यांच्या भांडणात भाग घेणे, बंगालचा सुभेदाराचा पाडाव करणे (इ.स. १७५७) व बंगाल, बिहार, ओरिसाचा प्रदेश ताब्यात घेणे ही एक महत्वाची बाब होती. मराठी राज्याचे वकील दिल्ली, जयपुर, जोधपूर, पाटणा, कलकत्ता, नागपूर, हैद्राबाद, मद्रास, पाँडेचेरी, गोवा मुंबई येथे असून शेजारच्या राज्यातील घडामोडीचा तपशील देत असत हे सर्व कारकूनी वकील असून आपल्या राज्यकर्त्यांना न सुचलेल्या प्रश्नांची चर्चा करीत असत इ. स. १७५५ -८२ च्या काळातील बारभाई मंडळातील त्र्यंबकराव पेठे, हरीपंत फडके, नागपूरकर भोसले, बडोद्याचे गायकवाड इत्यादी आपल्या कौटुंबिक भानगडीत मग्न होते. महादजी शिंदे आपल्या माळवा, बुंदेलखंड, भोपाळ, दतिया, चंदेरी, नरवार, खेरची इत्यादी बडखोर राज्यांच्या बंदोबस्तात गुंतले होते. मराठे सरदारांनी आपल्या हुकमतीत चालावे ही नानाची सुप्त इच्छा, एकत्र बसून राज्याच्या हिताच्या प्रश्नांची सांगोपांग चर्चा करून ते निकालात काढण्याचा प्रघात मराठेशाहीत नव्हता.

इंग्रजांशी झालेल्या युद्धात महादजी शिंदेच्या सैनिकांनी चांगली कामगिरी बजावली परंतु

त्यामुळे महादजी शिंदेचा द्रव्यसंचय संपला होता. मोगल बादशाही कुटुंबाचा निर्वाह भागवावयाचा, मोगल सैन्याचा खर्च भागवावयाचा इत्यादी अडचणीमुळे महादजी शिंदे आर्थिक संकटात सापडले होते. शिंद्यांनी इंग्रजांना नामोहरण करण्याचे राजकारण आपल्या अंगावर घेतले परंतु पुरेशी आर्थिक साधन सामुग्री त्यांच्याजवळ नव्हती इंग्रज गव्हर्नर ब्राऊन लिहितो की, महादजी शिंदे यांच्या हातात राज्यकारभार आला ते सुदैवाने घटना जवळून आल्यामळे स्वतः शिंदे यांनी त्याकरीता विशेष मेहनत घेतली नाही. मुसलमान–उमरावांची सत्ता हिरावून घेतली आणि त्यांच्यात एकजूट नव्हती त्यांना योग्य नेता मिळताच त्यांनी महादजी शिंदेच्या धोरणास विरोध केला होता.

महादजी शिंदे, मराठे हिंदूचा त्यांच्या बादशाहीवर वरचष्मा राहावा यांचे मुसलमान सरदारांना मोठे वैषम्य वाटत होते. जयपूर, जोधपूर, उदेपूर, इत्यादी राजपूत घराणे मराठ्यांच्या चौथाई, सरदेशमुखीच्या मागण्यांनी त्रासून गेली होती. मराठ्यांबद्दल त्यांना तिरस्कार वाटत होता. इंग्रज दरमहा तनखा नियमितपणे देत नाही आणि दिल्लीच्या संरक्षणार्थ, दिल्लीत येत नाही म्हणून मोगल नामधारी बादशहा महंमदशहा दुसरा इंग्रजांशी भांडला होता आणि मराठ्यांकडे आश्रयास गेला होता. नाना फडणीस अडीअडचणीच्या वेळी आर्थिक वेळी महादजीस मदत करीत होता, परंतु त्याच्या अंतःकरणांत महादजीबद्दल मत्सराची, हेव्यादाव्याची भावना होती. महादजी शिंदे जिवंत असेपर्यंत इंग्रजांना उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत आक्रमण करण्याची हिंमत झाली नाही. परंतु महादजी शिंदेचा ११ फेब्रुवारी १७९४ रोजी मृत्यू होताच इंग्रजांनी उत्तरेकडील आग्रा, भडोच, खानदेशातील प्रदेश इंग्रजांकडे देऊन दौलतराव शिंदे यांनी इ. स. १८०४ रोजी एक कोटी पंचवीस लक्षाचा भूप्रदेश दौलतराव शिंद्यांनी गमावला व इंग्रजांची सहा हजार इंग्रजांची तैनाती फौज घेऊन दौलतराव शिंदे इंग्रजांचे मांडलिक बनले.

फौज कुमकेस देशीहून यावी असे यांचे मानस आहे.' खुद महादजीस इंग्रजांच्या

कावेबाजपणाची खात्री झाली होती. ''मसलतीच्या वाटेने पाहता इंग्रजांची चाल खोटी अशा प्रसंगी नानांनी पुण्याहून टिपूशी अंतस्थ सलूखा राखावा हे चांगले.'' अशा प्रकारे महादजीने इंग्रजांस ओळखले होते. हे वरील त्यांच्या उद्‌गारावरून सिद्ध होते. अतिशय महत प्रयत्नाने महादजी शिंदे यांनी मिळविलेले हिंदुस्थानचे अधिराज्य दहा वर्षात त्यांच्या नातलगांनी गमावले ही दुर्दैवी बाब मराठ्यांच्या इतिहासात नमूद केली जाते.

तारीख १६ मे १७८४ रोजी महादजीचा हस्तक आपाजीराम पुण्यास लिहितो, *'खासा इष्टिन दिल्लीची राजकारणे करावयाकरिता कलकत्याहून लखनौस आला. पूर्वी त्याचे बोलण्यात वरवर येई की, बाबांचे इतल्याशिवाय इंग्रज कोणतीही गोष्ट करणार नाही परंतु आता उघड दिसते की, केवळ मतलबापुरता सालाबाईचा तह करविला आणि आता परमारें टिपूशी सलूख केल्यावर दिल्लीचे राजकारण हाताखाली घालतात हे उघड आहे. पातशहाने पाटीलबाबाशी संधान केले, ते उलटविण्याचा विचार करतात. गोहदेमुळे लगोलग बाबांस दिल्लीस पातशहांकडे जाता आले नाही. तरी अनुपगिर गोसावी यांचे मार्फत बाबांनी सुत्रे केली आहेत की, पातशहाने इंग्रजास वश परिच्छिन्न होऊं नये. इकडून सदाशिव मल्हार यास लखनौस इष्टिनकडे पाठवित आहोत.*

संदर्भ सुची

१) हिंदुस्थानातील ब्रिटीश कोल्हापूर १९१४ पृ. क्र. ३०-३५ साम्राज्याचा उदय

२) सरदेसाई गो. स. ब्रिटीश रियासत खंड-१ (पूर्वार्ध ईस्ट इंडिया कंपनी) मुंबई १९०३ पृ. क्र. ३००

३) ठाकुर केशव कुमार भारत मे अंग्रेजीराज नागपुर १९७८ पृ. क्र. ३५

४) सर अल्फ्रेड लॉयल हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा उदय व वाढ मुंबई १९३९ पृ. क्र. ४८-५०

५) -History of Brithsi India पृ. क्र. ४०-४२

६) डॉ. खोबरेकर वि. गो. मराठ्यांचा इतिहास खंड २, मुंबई १९८७ पृ. १३६,१३७

७) कित्ता पृ. १३८, १३९

८) सरदेसाई गो. स. (संपा) पेशवे दप्तर खंड ३६, मुंबई १९३४ पृ. ३७४, ३७५

९) कित्ता पृ. ३७६, ३७७

१०) जोशी शं.ना. (संपा) - इंग्रज मराठा संबंध ऐतिहासिक मराठी साधने खंड-१, मुंबई १९३३, पृ. २७३, २७४

११) कित्ता पृ. २७५, २७६

१२) खरे वा. वा. (संपा) ऐतिहासिक लेख संग्रह-खंड ९, पुणे १९३३ लेखांक ४६२२, ४६४३

१३) कित्ता लेखांक ४६४४, ४६४५,

१४) सरदेसाई गो. स. (संपा) शिंदे शाहीची राजघराणे, मुंबई १९४४ (इ.स. १७७४-१७९३)

१५) कित्ता पृ. २१०, २३०

१६) मॅलेसन हिस्ट्री पेपर्स रिलेटेड टू ईस्ट इंडिया कंपनी (इंग्रजी/कलकत्ता १९२९)

१७) कित्ता पृ. १५५, १६०

१८) सरदेसाई गो. स. पेशवे दप्तर खंड २०, मुंबई १९३३, लेखांक १९४, १९६

१९) कित्ता पृ. २०२, २०६

२०) सेतू माधवराव पगडी मराठे निजाम संबंध, पुणे १९४० पृ. ८७, ८८

२१) कित्ता पृ. ८९,९०

२२) डॉ. मुजूमदार दि मराठा सुप्रमशी मुंबई १९३३, पृ. ४०३, ४०४

२३) कित्ता पृ. ४०५, ४०६

२४) सरदसोई गो. स. पुना रेसिडेन्शीय फरमॉडन्सन, मुंबई १९५० लेखांक १५०,१५५,
पृ. १४८

२५) खरे वा. वा. (संपा) पुर्वोक्त खंड ९, पुणे १९३३, लेखांक ३४५५,३४५६, पृ. ३४५२

२६) पारसनीस बायनाबाईचे चरित्र ग्वालियर १९३६, पृ. १२, १३,१५

२७) कित्ता पृ. १५, १६, १७

२८) आनंद फाळके शिंदेशाहीचा इतिहास खंड-१, ग्वाल्हेर १९२९ पृ. २१५, २१६

२९) कित्ता पृ. २१८, २२०

३०) फॉरेस्ट महादजी शिंदीया (चरित्र) इंग्रजी कलकत्ता १९०१ पृ. २८०, २८२

३१) कित्ता पृ. २८८, २९०

३२) राजवाडे वि. का. (संपा) मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १०, कोल्हापूर १९०१
पृ. २५५, २५६

३३) सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड ६, नवीन आवृत्ती १९९४ पृ. २५५, २५६

३४) कित्ता पृ २६०, २६५

३५) सरदेसाई गो. स. (संपा) पुर्वोक्त खंड २०, मुंबई १९३४, पृ. १९४, १९५

३६) कित्ता पृ. १९८, २००

३७) सरदेसाई गो. स. (संपा) करवीर घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड-३, मुंबई १९४४, पृ. ५०, ५२

३८) कित्ता पृ. ५५, ५८

प्रकरण सहावे

उपसंहार

प्रकरण सहावे

उपसंहार

इसवीसनाच्या सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाई यांनी शत्रुपासून या स्वराज्याचे संरक्षण केले. पेशवेकाळात स्वराज्याचा विस्तार झाला. हेच स्वराज्य मराठ्यांचे राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. इ. स. १६३० ते इ.स. १८१८ हा मराठा राज्यांचा कालखंड आहे. मराठा राज्यांचे शिवकाळ आणि पेशवेकाळ अशा दोन कालखंडात विभाजन करण्यात येते. इ. स. १६३० ते इ. स. १७०७ हा शिवकाल आणि इ. स. १७१३ ते इ. स. १८१८ हा पेशवेकाळ आहे. पेशवे काळात अनेक मराठा सरदार पेशव्यांच्या सेवेत होते. त्या मराठा सरदारांपैकी एक महादजी शिंदे हे होय.

शिंदे घराणे हे मूळ सातारा जिल्ह्यातील कन्हेरखेड येथील होते. पुढे ते ग्वाल्हेर येथे स्थलांतरित झाले. राणोजी शिंदे हे या घराण्याचे मूळ पुरुष ठरतात. इ. स. १७२५ ते इ.स. १७४५ हा त्यांचा काळ आहे. राणोजी शिंदे यांना जयाप्पा, जोत्याजी, दत्ताजी, तुकोजी आणि महादजी असे पाच पुत्र होते. *''महादजी शिंदे हे दासीपुत्र होते. राणोजी शिंदे यांचे जेव्हा दतियाच्या राज्यात आक्रमण केले त्या दतिया राज्याच्या सैन्याचे चिमाबाई सैनिकी पोशाख धारण करून राणोजी शिंद्यांच्या सैन्यासोबत धैर्याने तोंड देऊन लढली. परंतु तिचा निभाव लागला नाही. दतियांचे सैन्यांचा राणोजी शिंद्याच्या सैन्यापुढे टिकाव लागला नाही. सैनिक सर्व पळून गेले त्यामुळे राणोजी शिंदे यांचा पराक्रम पाहून चिमाबाई यांनी राणोजी शिंदे यास माळ घातली. मात्र हिंदू परंपरेनुसार रणागंणावर या विवाहास मान्यता नाही म्हणून महादजी शिंदे हे दासीपुत्र समजले जाते परंतु ऐतिहासिक दृष्ट्या महादजी शिंदे हे राजपुत वंशाचे असून तो क्षत्रिय होता ही बाब अभिमानास्पद आहे''* . जयाप्पा, जोत्याजी, दत्ताजी व तुकोजी हे

तिसऱ्या पाणिपतच्या युद्धापूर्वीच मरण पावले. महादजी शिंदे हे एकटेच जिवंत राहिले. पानिपतच्या युद्धानंतर महादजी शिंदे आणि तुकोजी शिंदे यांची तीन मुले केदारजी शिंदे, खलोजी शिंदे व आनंदराव शिंदे यांनी पेशव्यांचे अर्थात मराठा सरदार म्हणून महत्वाची कामगिरी केली. शिंदे घराण्यात महादजी शिंदे यांचीच कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरते.

पानिपतच्या युद्धातील पराभवामुळे मराठे कर्तबगार नाहीत असे स्पष्ट झालेले होते. महादजी शिंदे यांनी मराठे कर्तबगार आहेत हे आपल्या कामगिरीने दाखवून दिले. एवढेच नव्हे तर त्यांनी मराठा राज्याला सावरून धरले आणि मराठा राज्याचा विस्तार केला. आपल्या कारकीर्दीत महादजी शिंदे यांचे पुण्याचे पेशवे, हैद्राबादचे निजाम, राजपूत व इंग्रज या सत्ताधीशांशी विविध माध्यमातून सबंध आले. त्याच सबंधांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात आला आहे. या अभ्यासातून मी पुढील निष्कर्ष काढला आहे.

छत्रपती शाहू महाराज हे इ. स. १७०८ मध्ये मराठा राज्याचे छत्रपती झाले. छत्रपती पदावर विराजमान होण्यासाठी त्यांना बाळाजी विश्वनाथ भट यांची मदत महत्वाची ठरली. त्यामुळे शाहू महाराजांनी इ. स. १७१३ मध्ये त्यांना पेशवे म्हणून नियुक्ती केली पुढे पेशवेपद वंशपरंपरागत पद्धतीने चालले पुढे छत्रपती शाहू महाराज नामधारी बनून मराठा राज्याची सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती केंद्रित झाली. बाळाजी विश्वनाथ भट हे पहिले पेशवे ठरतात त्याच्यांनंतर पहिले बाजीराव, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब त्यानंतर थोरले बाजीराव, थोरले माधवराव, नारायणराव, रघुनाथराव, सवाई माधवराव आणि दुसरे बाजीराव हे पेशवे होऊन गेले. त्यापैकी थोरले माधवराव, नारायणराव, रघुनाथराव, सवाई माधवराव यांच्या महादजी शिंदे यांचे संबंध आहे. इ. स. १७६१ मध्ये तिसऱ्या पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. एवढेच नव्हे तर या युद्धात मराठ्यांची एक पिढी ठार झाली. या युद्धातील पराभवामुळे मराठा

राज्यावर शोककळा पसरली. महादजी शिंदे यांनी स्वतः पेशव्यांच्या बाजूने तिसऱ्या पानिपतच्या युद्धात सहभाग घेतला होता. ते युद्धात जखमी होऊन परतले होते. पानिपतच्या युद्धातील पराभवाच्या धक्क्याने मराठा राज्यांची पेशवे नानासाहेब मृत्यू पावले होते आणि त्यांच्या ठिकाणी त्यांचे पुत्र थोरले माधवराव हे पेशवे पदावर विराजमान झाले होते. या पेशव्यांच्या सर्वतोपरी सहकार्य करण्याचे कार्य महादजी शिंदे यांनी केले. पानिपतच्या युद्धातील पराभवामुळे मराठ्यांच्या कर्तबगारीला पूर्णविराम मिळाला होता. हा पूर्णविराम उठविण्याचे कार्य महादजी शिंदे यांनी केले. त्यांनी पानिपतच्या युद्धातील मराठ्यांच्या पराभवाचा वचपा काढला. पानिपतच्या युद्धातील पराभवामुळे मराठा राज्य शोकसागरात बुडाले. याचा फायदा घेऊन मराठ्यांच्या शत्रूंनी मराठा राज्यातील प्रदेशावर हल्ले सुरू केले. यावेळी नेमके काय करावे हा प्रश्न पेशवे थोरले माधवराव यांच्यापुढे निर्माण झाला. याचवेळी महादजी शिंदे हे त्यांच्या मदतीस धावले.

हैदराबादचे निजाम हे मराठा राज्यांचे परंपरागत शत्रू होते. निजामाचे राज्य व मराठ्यांचे राज्य एकमेकाशेजारी होते. पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे निजामाने मराठ्याची राजधानी पुणे शहरावर हल्ला करून मराठा राज्यातील प्रदेशावर हक्क करून त्यांची लुटालूट व जाळपोळ सुरू केली. यावेळी जानोजी भोसले व महादजी शिंदे हे पेशवे थोरले माधवराव यांच्या मदतीस आले. त्यांनी निजामाचा पराभव करून मराठा राज्यांचे रक्षण केले. निजाम धूर्त व राजकारणी होता. त्यांच्याकडे मराठ्यांची चौथाईची बरीच रक्कम थकलेली होती. परंतु तो ती रक्कम देण्यास टाळाटाळ करीत असे त्यामुळे पेशवे थोरले माधवराव यांनी निजामाचा बंदोबस्त करावा यासंदर्भात महादजी शिंदे यांच्याशी चर्चा केली. शेवटी निजामाचा कायमचा बंदोबस्त करावा असा महादजी यांनी पेशव्यास सल्ला दिला. त्यानुसार पेशवे माधवराव यांनी हैदराबादचे निजाम अली खान आसफ जहाँ उल-मुल्क यांचा बंदोबस्त

करण्याचे ठरविले. जून १७६४ मध्ये पेशवे थोरले माधवराव आणि निजाम अली खान आसफ जहाँ निजाम उल–मुल्क यांच्यात मराठवाड्यातील माजलगांव तालुक्यातील राक्षसभुवन येथे लढाई झाली. या लढाईत पेशवे माधवराव यांनी महादजी शिंदे यांच्या मदतीने निजामाचा पराभव केला व त्यांचा कायमचा बंदोबस्त केला. या लढाईत निजामाचे दिवाण विठ्ठल सुंदर मारल्या गेले. महादजी शिंदे यांची कामगिरी राक्षसभुवनाच्या लढाईत अत्यंत महत्वाची ठरली. महादजी शिंदे यांच्यामुळेच पेशव्यांना विजय मिळाला व पेशव्यांचा दक्षिणेत व उत्तर भारतात प्रभाव निर्माण झाला.

हैदर अली हे म्हैसूरचे नबाब होते हैदर अलीच्या राज्याच्या सीमा कृष्णा नदीपर्यंत भिडल्या होत्या. त्यामुळे हैदर अलीचा पाडाव करणे पेशवे माधवरावांना महत्वाचे वाटत होते. पेशवे माधवराव व हैदरअली यांच्यात सावनुर मोतीतलाव आणि श्रीरंगपट्टणम येथे लढाया झाल्या या सर्व लढायात पेशव्यांना विजय मिळाला यामध्ये महादजी शिंदे यांचे कौशल्य व कर्तबगारी महत्वाची ठरते. पेशवा नारायणराव आणि पेशवा सवाई माधवराव यांनी महादजी शिंदे मराठ्यांचे राज्य सांभाळण्यासाठी सहकार्य केले. महादजी शिंदे यांनी शेवटपर्यंत पेशव्यांच्या स्वामीनिष्ठ सेवक म्हणून कार्य केले. पेशव्यांच्या वकील म्हणून महादजी शिंदे यांनी दिल्ली दरबारात महत्वाची कामगिरी केली. इ. स. १७७० मध्ये महादजीने दिल्लीचा बादशहा महंमदशहा दुसरा यास पराभूत करून शहा आलम दुसरा यास दिल्लीच्या गादीवर बसविले. यावेळी बादशहाने २४ डिसेंबर १७७० रोजी मीरबक्षी व दिवाण ही दोन्ही पदे महादजीकडे सोपविली. परंतु महादजीने मीर बक्षी पद स्वतःकडे न ठेवता हे नारायणरावास बहाल केले. व स्वतःकडे दिवाण पद ठेवले. यावरून महादजी शिंदे यांची स्वामीनिष्ठा व पेशवा माधवरावबद्दलची आस्था लक्षात येते. थोडक्यात महादजी शिंदे हे पेशव्यांचे खंबीर समर्थक व प्रमुख आधारस्तंभ होते.

त्यांच्यामुळे पेशव्यांना आपले राज्य स्थिर ठेवून त्याचा विस्तार करता आला.

दिल्लीची सत्ता काबीज करणे छत्रपती शिवाजी महाराजांचे उद्दिष्ट होते. हेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पेशव्यांनी प्रयत्न केले. महादजी शिंदे यांनी पेशव्यांचे प्रतिनिधी म्हणून दिल्ली दरबारात स्थान मिळविले. त्यांनीच दिल्लीच्या गादीवर शहा आलम दुसरा यास बसविले. या बादशहाने महादजी शिंदे यांच्या तंत्राने राज्यकारभार केला. परंतु संधी मिळूनही महादजी शिंदे यांनी दिल्लीची सत्ता काबीज केली नाही. कारण यावेळी दिल्लीच्या मोगल साम्राज्याच्या अंतर्गत स्वराज्य ही कल्पना रूढ झालेली नव्हती. त्यामुळे महादजी शिंदे यांनी दिल्लीची सत्ता संधी मिळूनही काबीज केली नाही.

ब्रिटिशकालीन भारतात ५६३ देशी संस्थाने होती. या संस्थानाचा राज्यकारभार देशी संस्थानिक पाहत असत. दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैदराबाद ही संस्थाने होती. ही देशी संस्थाने म्हणजे स्वतंत्र राज्यच होती. हैदराबाद या राज्याची स्थापना मोगलांचा दक्षिणेतील सुभेदार मीर कमरूद्दीन उर्फ निजाम उल–मुल्क यांनी ३१ जुलै १७२४ रोजी केली. या राज्याची राजधानी हैदराबाद असल्यामुळे हे राज्य हैदराबादचे निजाम राज्य म्हणून प्रसिद्धीस आले. हे राज्य १७ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय संघराज्यात विलीन झाले. हैदराबाद राज्यात एकूण दहा सत्ताधीश होऊन गेले. त्यांना निजाम आणि आसफजहाँ या नावाने ओळखले जात असे. निजाम आणि आसफजहाँ या पदव्या मोगल सम्राट फरूखसियर यांनी पहिल्या निजामास दिल्या होत्या. हैदराबाद राज्यात एकुण दहा सत्ताधिश अर्थात निजाम होऊन गेले असले तरी मोगल सम्राटांनी यापैकी केवळ सात निजामास मान्यता दिली होती. मीर निजाम अलीखान निजाम उल मुल्क (इ.स. १७६२ ते इ. स. १८०३) हे हैदराबादचे दुसरे निजाम असून हे महादजी शिंदे यांच्या समकालीन होते.

त्यामुळे महादजी शिंदे आणि मीर निजाम अली खान निजाम उल मुल्क यांचे केवळ सबंध आले.

इ. स. १७०८ मध्ये छत्रपती शाहू महाराज मराठा राज्याचे छत्रपती झाले. हैदराबादचे पहिले निजाम निजाम उल मुल्क यांच्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांची कारकीर्दी प्रदिर्घकाळ राहिली. हैदराबादचे निजाम राज्य आणि मराठा राज्य यांच्यात कायम शत्रुत्वाचे सबंध राहिले अगदी प्रारंभीपासूनच निजामाने मराठा राज्यास उपद्रव देण्याचे कार्य केले. ते मराठ्यांच्या प्रदेशात सतत लुटमार करून धुमाकूळ घालत असत. त्यामुळे मराठा राज्यास निजामाचा त्रास प्रदीर्घ काळ सहन करावा लागला. हैदराबादचे निजाम धूर्त राज्यकारणी होते. प्रसंगानुसार ते आपली वाटचाल करीत होते. प्रसंगानुसार ते मराठ्यापुढे नमते धोरण घेणे व परिस्थिती बदल होताच ते आपले धोरण बदलत असत व मराठ्यांना विरोध करीत होते. निजाम महत्वकांक्षी होते त्यामुळेच ते परिस्थिती पाहून मराठ्यांशी राजकारण करीत होते. निजामांचे हे सर्व राजकारण मराठा सरदार महादजी शिंदे यांना ज्ञात होते. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर महादजी शिंदे यांचा मराठा सरदार म्हणून खऱ्या अर्थाने उदय झाला.

पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला व युद्धात मराठ्यांची एक पिढी मारल्या गेली. त्यामुळे मराठा राज्यावर शोककळा पसरली याचा फायदा घेवून हैदराबादचा निजाम अली खान, निजाम उल मुल्क याने पेशव्यांची राजधानी पुणे शहरावर हल्ला करून मराठा प्रदेशाची लुटालूट, जाळपोळ व नासधुस केली. याचवेळी रघुनाथराव आणि काही असंतुष्ट मराठा सरदार निजामाला मदत करीत होते त्यामुळे मराठा राज्य धोक्यात आले होते. अशा वेळी महादजी शिंदे यांनी मराठ्यांच्या राज्याच्या संरक्षणासाठी धूर्त व राजकारणी असलेल्या निजामास विरोध करून वठणीवर आणले. निजामाकडे मराठ्यांची असलेली

चौथाईची रक्कम देण्यास निजाम नेहमीच टाळाटाळ करीत असे. त्यामुळे निजामाकडे चौथाईची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढत गेली. यासंदर्भांत महादजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका महत्वाची ठरते. त्यांनी निजाम अलिखान, निजाम उल मुल्क यांच्याशी चर्चा विनिमय करून त्यांना मराठ्यांची चौथाईची रक्कम देणे अपरिहार्य असल्याची जाणीव करून दिली. प्रसंगी त्यांनी निजामाला धमकीही दिली. निजाम अलीखान निजाम उल मुल्क हे महादजी शिंदे यांच्यपुढे नमते धोरण घेत होते. महादजी शिंदे यांच्या कर्तबगारीमुळे निजाम मराठ्यांच्या राज्यावर हल्ला करण्याचे धाडस करू शकत नव्हता. महादजी शिंदे जिवंत असेपर्यंत हैदराबादचे निजाम मराठ्यांना वचकून होते. पेशवे आणि निजाम यांच्यात नेहमीच शिष्टाई करण्याचा प्रयत्न महादजी शिंदे यांनी केलेला दिसतो. ते जिवंत असेपर्यंत निजामाने मराठ्यांविरूद्ध डोके वर काढले नाही. ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

वर्धन साम्राज्याच्या अस्तानंतर उत्तर भारतात अनेक लहान-लहान राज्ये उदयास आली. यामध्ये राजपूतांचा उदय ही घटना भारताच्या राजकिय इतिहासात महत्वाची ठरते. इ. सनाच्या सातव्या शतकापासून ते इ.सनाच्या बाराव्या शतकापर्यंतचा कालखंड हा भारताच्या इतिहासात राजपूत कालखंड म्हणून ओळखला जातो. विविध राजपूत राजघराणे उत्तर भारतात उदयास आली. मध्ययुगातही विविध राजपूत राज्ये उत्तर भारतात अस्तित्वात होती. या राजपुत राज्या-राज्यातही अंतर्गत संघर्ष होत होते. मराठा राज्यास उत्तर भारतात साम्राज्य विस्तार करावयाचा असल्यामुळे पेशव्यांनी दक्षिण भारतात फारसे लक्ष दिले नाही. दक्षिण भारतात हैदराबादचे निजाम आणि म्हैसूरचा हैदर अली यांची राज्य होती. या राज्याशी मराठ्यांचा संघर्ष होत होताच पेशवे काळात मात्र मराठ्यांनी दक्षिण भारतात राज्य विस्तार करण्याऐवजी उत्तर भारतात साम्राज्यविस्तार करण्यावरच अधिक लक्ष केंद्रित केले. त्यामधुनच

मराठ्यांचे अनेक सत्तांशी संघर्ष झाले व वितुष्ट आले. पुढे इ. स. १७५२ मध्ये मराठा आणि मोगल यांच्यात एक करार झाला. या करारानुसार मराठ्यांनी मोगल बादशहांचे संरक्षण करण्याचे आणि त्या मोबदल्यात मोगल बादशहाने खंडणी देण्याचे मान्य केले. या करारामुळे इतिहासाला वेगळेच वळण मिळाले. अफगाणिस्तानचा राजा अहमद शहा अब्दाली यांनी मोगल राज्यावर इ. स. १७६१ मध्ये आक्रमण केले. त्यामुळे मोगलांच्या संरक्षणासाठी मराठे पुढे सरसावले. यातून मराठे व अहमद शहा अब्दाली यांच्यात १४ जानेवारी १७६१ रोजी तिसरे पानिपतचे युद्ध झाले. या युद्धात महादजी शिंदे यांचाही सहभाग होता. या युद्धात मराठ्यांचा दणदणीत पराभव झाला व मराठा लष्कराची एक पिढी गारद झाली. या युद्धातील पराभवाने मराठ्यांचा फार मोठा अपमान झाला. मराठ्यांच्या पराभवासाठी अनेक कारणे कारणीभूत होती. राजपूत राज्यांनी मराठ्यांना केलेले असहकार्य हे त्यातीलच एक महत्वाचे कारण आहे. पानिपतच्या युद्धातील पराभवाच्या धक्क्याने पेशवा नानासाहेब उर्फ बाळाजी बाजीराव यांचा मृत्यू झाला. त्यामुळे पेशवे पहिले माधवराव यांना पेशवेपदाची वस्त्रे देण्यात आली. पेशवे माधवराव यांनी महादजी शिंदे यांच्या सल्ल्याने अडचणीवर मात करण्यासाठी अनेक डावपेच आखले. माधवरावांनी उत्तर भारतात राज्यविस्तार करण्याची जबाबदारी महादजी शिंदे यांच्यावर टाकली. ही जबाबदारी महादजी शिंदे यांनी इ. स. १७९४ पर्यंत साभांळली. पाणिपतच्या युद्धात राजपूतांचे सहकार्य मिळाले असते तर मराठ्यांचा पराभव झाला नसता. याची जाणीव महादजी शिंदे यांना झाली. त्यामुळे त्यांनी उत्तर भारतातील राजपूत राजांना प्रथम आपलेसे करून घेतले व नंतर त्यांना मराठ्यांच्या सेवेत आणण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी महादजी शिंदे यांनी मुत्सद्दीपणाचा डावपेचाचा आणि प्रसंगी दंडुकेशाहीचा उपयोग केला.

महादजी शिंदे यांना मोगल बादशहा शहा आलम दुसरा यांनी त्यांचे दिवाण केले. परंतु

ही गोष्ट राजपूत राजांना आवडली नाही. ते महादजींचा द्वेष करू लागले. राजपूत राजे हे मोगल बादशहांचे मांडलिक होते. ते त्यांना खंडणी देत असत. याशिवाय राजपुत राजे मराठ्यांना चौथाईची रक्कमही देत असत. परंतु राजपुत राजांनी मोगल बादशहाची खंडणी व मराठ्यांची चौथाईची थकबाकीची रक्कम देण्याचे टाळले. त्यामुळे महादजी शिंदे यांनी १७८७ ते १७८८ च्या लालसोटच्या लढाईत राजपुत राजांचा पराभव केला. यासाठी महादजी शिंदे यांना फुटीर राजपुतांचे सहकार्य मिळाले. महादजी शिंदे यांनी राजपुतांना तलवारीच्या धाकावर आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा सतत प्रयत्न केला. तसेच राजपुतांनी मराठे व मोगल बादशहांना सहकार्य करावे यासाठीही प्रयत्न केले. महादजी शिंदे यांनी राजपुतांना वर्चस्वाखाली ठेऊन त्यांच्यावर मराठा व मोगलांचे नेतृत्व लादण्याचा प्रयत्न केला. परंतु या कार्यात त्यांना पूर्ण यश आले असे म्हणता येणार नाही. कारण राजपुत राजांनी महादजी शिंदे यांना सतत विरोध केल्याचे दिसते.

इ. स. १६०० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. पुर्वेकडील देशांशी व्यापार करणे हा एकमेव उद्देश या कंपनीचा होता. परंतु पुढे या कंपनीने हळूहळू येथील राजकारणात सहभाग घेतला. भारतात या काळात विविध लहान-लहान राज्ये होती. या राज्यात अंतर्गत संघर्ष होत होते. याचाच फायदा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने घेतला आणि भारतातील सर्वच राज्ये हळू-हळू जिंकून घेवून या ठिकाणी आपली सत्ता स्थापन केली. परंतु सत्ता स्थापनेसाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस बरीच वर्षे भारतातील राज्यांशी संघर्ष करावे लागले. मराठा राज्य जिंकून घेतल्यानंतरच ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सार्वभौम सत्ता स्थापन झाली. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे इंग्रजांना प्रखर विरोध करणारी सत्ता राहिली नाही. त्यामुळे इंग्रज वरचढ झाले होते. नेमके याचवेळी महादजी

शिंदे यांचा उदय झाला होता. मराठा राज्यात सत्तेसाठी अंतर्गत यादवी निर्माण झाली होती. रघुनाथराव हे पेशवे पदासाठी आतुर झाले होते व त्यासाठी त्यांनी इंग्रजांची मदत घेतली होती. याचमुळे मराठे व इंग्रज संबंध आले. इंग्रजांनी पेशवे पदावर रघुनाथराव दादा यांना बसविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा महादजी शिंदे यांनी पेशवे पदाचे खरे वारसदार थोरले माधवराव यांची बाजू सावरून धरली. महादजी शिंदे यांनी इंग्रजांना केलेला हा पहिलाच विरोध होता. पुढे इ. स. १७७९ च्या तळेगांव–वडगांवच्या तहानुसार रघुनाथराव दादा महादजींच्या ताब्यात आले होते. हैदराबादचे नबाब निजाम अली यांनी एक चतु:संघ स्थापन केला होता. या संघात पेशवे, हैदराबादचे निजाम, म्हैसूरचे हैदर अली व नागपूरचे भोसले होते. या संघर्षाने मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील इंग्रजांविरूद्ध एकाच वेळी उठाव करण्याचे ठरविले होते. त्यानुसार महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांनी गुजरातमध्ये घसरून कर्नल गॉर्डसचा पराभव करण्याचे ठरविले होते. परंतु हा संघ वर्षभरही टिकला नाही. या संघाचा प्रवर्तक निजाम अली हाच फुटीर निघाला. इंग्रजांनी त्यास गुटुंरचा प्रदेश परत करून संघातुन फोडले. संघ यशस्वी झाला नसला तरी महादजी शिंदे स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी इंग्रजांच्या विरोधात लढाई सुरूच ठेवली. रघुनाथराव दादा हे महादजीच्या कैदेतून निसटले होते. त्यांना आपल्या स्वाधीन द्या तेव्हा लढाई थांबवितो असे त्यांनी इंग्रजांना कळविले होते.

पेशव्याने महादजी शिंदे यांना उत्तरेतील कामगिरीवर पाठविले होते. तेव्हा इ. स. १७८० मध्ये महादजी शिंदे यांनी उत्तर भारतात इंग्रजांविरूद्ध मोहिम हाती घेतली. त्यांनी म्यूर या इंग्रज सेनापतीचा शिप्री येथे तसेच सिरोज येथे पोमॅकचा पराभव केला. त्यामुळे इंग्रज हादरून गेले. परंतु इंग्रजांनी जिद्द सोडली नाही. पुढे इ. स. १७८१ मध्ये पहिले मराठा–इंग्रज युद्ध सुरू झाले. या युद्धात इंग्रजांनी महादजी शिंदे यांच्यासमोर शरणागती पत्करली. याचवेळी इंग्रजांना

जाणीव झाली की, जोपर्यंत महादजी शिंदे व नाना फडणीस जिवंत आहेत तोपर्यंत मराठे स्वतःच्या राज्याचे रक्षण करण्याइतपत सामर्थ्यवान आहेत. पहिल्या मराठा–इंग्रज युद्धापासून मराठ्यांना समजून चुकले की, इंग्रज हे आपले भारतावर वर्चस्व गाजविण्याच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचे शत्रू आहेत. पुढे इंग्रजांनी महादजी शिंदे यांची दिल्ली कडून उत्तर भारतातील वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु यामध्ये इंग्रजांना फारसे यश मिळाले नाही. महादजी शिंदे यांचा इंग्रजांवर वचक होता. इंग्रजही त्यांना भित होते. त्यामुळे मराठा सरदारात एकी राहणार नाही याची काळजी इंग्रजांनी घेतली. त्यांनी मराठा सरदारात फुट पाडली आणि त्यांचाच फायदा राज्य स्थापनेसाठी करून घेतला.

महादजी शिंदे यांनी मराठा राज्याच्या रक्षणासाठी एकट्याने इंग्रजांशी लढा देऊन त्यांना सळो की पळो करून सोडले. परंतु याबाबतीत त्यांना इतर मराठा सरदारांची मदत मिळाली नाही. त्यामुळे महादजी शिंदे इंग्रजांना कायमचे पराभूत करू शकले नाहीत. इतर सरदारांनी त्यांना इंग्रजांच्या विरोधात मदत केली असती तर महादजी शिंदे यसांनी इंग्रजांचा निर्णायक पराभव केला असता. परिणामी मराठ्यांचे राज्य संपुष्टात आले नसते आणि भारतावर इंग्रजांची सत्ताही स्थापन झाली नसती. परिणामी भारत राजकीय पारतंत्र्यांत गेला नसता.


परिशिष्ट्ये



महादजी शिंदे
(मराठवाडा विद्यापीठ संग्रहालय)



महादजी शिंदे



The Peshwa Madhav Rao I.




पेशवा माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव
(राजा केळकर म्यूझियम)



निजाम उल-मुल्क I (इ.स. १६७१ ते १७४८)



Nizam Ali Khan - Asaf Jah II (1762-1803)



जयाजीअप्पा शिंदे



नाना फडणीस
(प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम)



रघुनाथराव पेशवे ऊर्फ राघोबादादा (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम)




मल्हारराव होळकर
(शिंदेशाही इतिहासाची साधने)



३ आबाजी रघुनाथ चिटणीस १ बाळाराव गोविंद दिवाण
२ मिर्जा अब्दुल रहीमबेग

श्री महादजी शिंदे
खानगी दरबार [१७८०]

१ कलंदरखान गवई ३ पखवाजी
२ मकन गवई




छत्री साळुबाई शिंदे. छत्री केदारजी शिंदे.


[औंध समीप, पुणें.]




श्री जोतिबा शिंदे यांची छत्री, कस्बे बरवासागर, परगणे व जिल्हे झांशी.




श्री राणोजी शिंदे यांची छत्री, श्रीक्षेत्र अवंतिका रामघाट, क्षिप्रातीर.
(लेखांक १५६)




श्री जयाजी आपा शिंदे यांची छत्री, श्रीक्षेत्र पुष्कर.



श्री जयाजी आपा शिंदे यांची छत्री, मौजे तावसर समीप नागोर (मारवाड).



सवाई माधवरावाचा दरबार, इ. स. १७९०
(ब्रिटिश म्यूझियममधील या चित्राच्या पारदर्शिकेवरून)



शनिवारवाडा – दिल्लीदरवाजा, पुणे.
पेशव्यांची राजधानी




लालाजी बल्लाळ गुलगुले,
कोटा येथील शिंदे सरकारचे (दुसरे) वकील.

भोसले घराण्याची वंशावळ

- मालोजी
  - शहाजी (१५९४ ते १६६४)
    - संभाजी
    - छत्रपती शिवाजी शककर्ता (१६३० ते १६८०)
      - छत्रपती संभाजी (१६५७ ते १६८९)
        - छत्रपती शाहू (१६८२ ते १७४९)
          - छत्रपती रामराजा (द.) (दत्तविधान १७५० ते १७७७)
            - छत्रपती धाकटे शाहू राजे (द.) (राज्याभिषेक ११ डिसेंबर १७७७ –)
      - छत्रपती राजाराम (१६७० ते १७००)
        - छ. शिवाजी (ताराबाईपुत्र)
          - रामराजा (सातारा गादीकडे दत्तक) (जन्म १७२६)
        - छ. संभाजी (राजसबाईपुत्र)
    - एकोजी किंवा व्यंकोजी

शिंदे (ग्वाल्हेरचे), मूळ ठिकाण कण्हेरखेड– जि. सातारा



सत्ताधारी आणि सत्ताकाळ –

राणोजी इ. स. १७२५ ते इ. स. १७४५.

जयाप्पा इ. स. १७४५ ते इ. स. १७५५.

जनकोजी इ. स. १७५५ ते इ. स. १७६१.

केदारजी इ. स. १७६१ ते इ. स. १७७७

महादजी इ. स. १७६१, (क़ारभारी) १७७७ ते इ. स. १७९४

दौलतराव इ. स. १७९४ ते इ. स. १८२७

केदारजी आणि मानाजी हे दूरच्या नात्यातले. ह्याना काही काळ राघोबाने सत्ता दिली होती.

पेशव्यांची वंशावळ

- (१) बाळाजी विश्वनाथ भट (श्रीवर्धन) (इ. १६६०-१७२०) पत्नी : राधाबाई
  - (२) बाजीराव (प्रमथ) (१७००-१७४०) पत्नी : काशीबाई
    - बाळाजी (नानासाहेब) (१७४०-१७६१) पत्नी : गोपिकाबाई
      - माधवराव (१७४५-१७७२) पत्नी : रमाबाई
      - (५) नारायणराव (१७५५-१७७३) पत्नी : गंगाबाई
        - (६) माधवराव (सवाई) (१७७४-१७९५) पत्नी : १) रमाबाई २) यशोदाबाइ
    - रामचंद्र
    - रघुनाथराव (राघोबा) १७३४ ते १७८३ (१७७३ ऑक्टोंबर अल्पकाल पेशवा) पत्नी : आनंदीबाई
      - (७) बाजीराव (दुसरा) (१७७५-१८५१) ११ स्त्रिया
        - नानासाहेब (धोंडोपंत) (दत्तक) मृत्यू १८५७
      - चिमाजी
      - अमृतराव (दत्तक) (१८०२ मध्ये अल्पकाल पेशवा)
    - जनार्दन
  - चिमाजी अप्पा (१७०३-१७४०) पत्नी: १) रखमाबाई २) अन्नपूर्णाबाई
    - सदाशिवराव भाऊ (पुत्र)
    - बयाबाई (कन्या)
  - अनुबाई (कन्या) इचलकरंजीकर घोरपड्यांकडे लग्न
  - भिऊबाई बारामती जोशीकडे लग्न

पेशवे घराण्याची कारकिर्द

बाळाजी विश्वनाथ

पेशवेपद १७ नोव्हेंबर १७१४, मृत्यू २ एप्रिल १७२०

बाजीराव (थोरले)

पेशवेपद १७ एप्रिल १७२०, मृत्यू २८ एप्रिल १७४०

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब

पेशवेपद २५ जून १७४०, मृत्यू १३ जून १७६१

माधवराव (थोरले)

पेशवेपद २० जुलै १७३१, मृत्यू १८ नोव्हेंबर १७७२

नारायणराव (१७७२–७३)

(१७७३–१७९५) सवाई माधवराव बाजीराव द्वि. (१७९५–१८१८)

(सम्राट औरंगजेबानंतरची मोगल वंशावळ)

अबुल 'मुजफ्फर मुहिउद्दीन मोहम्मद औरंगजेब बहादूर आलमगिर पातशहागाजी'
अर्थात
सम्राट औरंगजेब आलमगिर
(मृत्यू २० फेब्रुवारी १७०७)

- सुलताना मोहम्मद — वध १६७६
- मोहम्मद आझम — मृत्यू – १७०७
  - मुआझम ऊर्फ शहाआलम उर्फ बहादूर शहा (१) — राज्यारोहण– १४ मार्च १७०७, मृत्यू २७ फेब्रुवारी १७१२
    - जहौदशहा(२) — राज्यारोहण –२९ मार्च १७१२, वध ११ फेब्रुवारी १७१३
      - आलमगीर दुसरा (१०) — राज्यारोहण–१७५४, वध १७५९
        - शहाजहान तिसरा (११) — राज्यारोहन व वध १७५९
          - शहा आलम दुसरा (१२) — राज्यारोहण १७५९, मृत्यू १८०६
            - सम्राट अकबर दुसरा (१३) — राज्यारोहन १८०६, मृत्यू १८३७
              - सम्राट बहादूर शहा दुसरा (१४) — राज्यारोहन १८३७: पदच्युत १८५७: मृत्यू १८६२ रंगुन येथील जेलमध्ये
    - अझिम–उम्–शान
      - सम्राट फरूखशियर (३) — राज्यारोहण–११ जानेवारी १७१३, फाशी– २७ एप्रिल १७१९
    - रफी–उस्–शान
      - रफी–उद्–दरजात (४) — राज्यारोहण २८ फेब्रुवारी १७१९, पदच्युत ४ जून १७७९
      - रफी–उद–दौला (५) — राज्यारोहण ६ जून १७१९, मृत्यू १७ सप्टेंबर १७१९
      - मुहम्मद इब्राहिम ऊर्फ (७) शहाजहान दुसरा राज्यारोहन व मृत्यू १७१९
    - जहान शहा
      - मुहम्मदशहा (८) राज्यारोहण २३ नोव्हेंबर १७२०, मृत्यू: २५ एप्रिल १७४८
        - अहमदशहा (९)–१७४८, पदच्युत १७५४
- मोहम्मद अकबर — मृत्यू–१७०४
  - नेकुशियर (६) — राज्यरोहण व मृत्यू १७१९
- मुहम्मद खानाबक्ष — मृत्यू १७०९

हैद्राबादवर एकूण सात निजामानी राज्य केले त्यांचा कार्यकाळ पुढीलप्रमाणे आहे-

१) पहिला निजाम असफिजहाँ - इ. स. १७२४ ते १७४८

२) मीर निजाम अली - इ. स. १७६२ ते १८०३


३) तिसरा निजाम सिकंदर जहाँ - इ. स. १८०३ ते १८२८

४) निजाम नसीरूदौला - इ.स. १८२८ ते १८५७


५) निजाम अफउलादौला - इ. स. १८५७ ते १८६९

६) मीर महेबूबअली - इ. स. १८६९ ते १९११

७) मीर उस्मानअली - इ. स. १९११ ते १९४८




पेशवा सवाई माधवराव यांचे हस्ताक्षर
(महादजी शिंदे यांस लिहिलेले पत्र – ता. ३० डिसेंबर १७८४)




नाना फडणीस यांचे हस्ताक्षर


(बातमी देणारे पत्र – ता. २६ जानेवारी १७६०)




महादजी शिंदे यांचे हस्ताक्षर


(नाना फडणीस यांस लिहिलेले पत्र – ता. २७ सप्टेंबर १७७४)



मराठा साम्राज्य
(इ.स. १७५८)
काबूल
पेशावर
अफगाण साम्राज्य
लाहोर
सतलज नदी
मुलतान
बहावलपूर
सिंधु नदी
पानिपत
दिल्ली
निकानेर
रजपुत
जयपूर
जेसलमेर
जोधपूर
बुंदी
चितोडगड
उदयपूर
ग्वाल्हेर
शिंदे
आलाहाबाद
लखनौ
औंध
गंगा नदी
बनारस
पाटणा
होळकर
इंदूर
गायकवाड
बडोदा
नर्मदा नदी
कलकत्ता
भोसले
महानदी
तापी नदी
नागपूर
कटक
पैनगंगा नदी
गोदावरी नदी
पुणे
भीमा नदी
निझाम
हैद्राबाद
सातारा
कोल्हापूर
कृष्णा नदी
मच्छलीपट्टम
तुंगभद्रा नदी
श्रीरंगपट्टम
मद्रास
कावेरी नदी


मराठा साम्राज्य
(इ.स. १७९५)
काबूल
पेशावर
लाहोर
सतलज नदी
मुलतान
सिंधु नदी
बहावलपूर
पानिपत
बिकानेर
दिल्ली
मथुरा
रजपुत
जयपूर
आग्रा
जेसलमेर
अजमेर
ग्वाल्हेर
जोधपूर
चितोडगढ
शिंदे
अलाहाबाद
उदयपूर
होळकर
इंदूर
नर्मदा नदी
गायकवाड
बडोदा
लखनौ
घोग्रा नदी
बनारस
पाटणा
कलकत्ता
भोसले
तापी नदी
नागपूर
महानदी
कटक
गोदावरी नदी
पेणगंगा नदी
पुणे
भिमा नदी
निझाम
सातारा
हैद्राबाद
कोल्हापूर
कृष्णा नदी
मच्छलीपट्टम
तुंगभद्रा नदी
श्रीरंगपट्टम
मद्रास
कावेरी नदी



उ
काबूल
कंदहार
काश्मीर
लाहोर
मुलतान
दिल्ली
भावलपूर
बिकानेर
जेसलमेर
जोधपूर
जयपूर
आग्रा
अजमेर
औंध
सिंध
अलाहाबाद १३
बिहार ११
माळवा १४
गुजरात १५
गोंडवना
बंगाल १२
खानदेश
वऱ्हाड १७
औरंगाबाद
बिदर
ओरिसा २०
हैद्राबाद २१
विजापूर
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
सिंहलद्वीप
मराठ्यांनी पायाखाली घातलेला प्रदेश
मुघलांचे २२ सुभे
भारत १८वे शतक


पानिपतावरील
मराठे - अफगाण छावण्या
१ डिसेंबर ते ३० डिसेंबर १७६०
उ
जमुना नदी
अफगाण
छावणी
पानिपत
(मराठ्यांची छावणी)
रणभूमी
रणभूमी
जुना दिल्ली रस्ता
जुना दिल्ली रस्ता


पानिपतावरील
मराठे-अफगाण छावण्या
(३१ डिसेंबर ते १४ जानेवारी १७६१)
जुना मुघल रस्ता
पानिपत
अब्दालीचा घेराव
(अंदाजे)
मराठ्यांची छावणी
अब्दालाची छावणी
शहानहर अथवा जमुना कालवा
जमुना नदी

अप्रकाशित गुलगुले–दफ्तर

गुलगुले-दफ्तर

खण्ड ६.

महादजी सिन्धिया:

२७८५-१७९३ ई०

खण्ड ६.
महादजी सिन्धिया:
२७८५-१७९३ ई०

१९४४-१९४५
सीतामऊ (मालवा)

लेखांक. १२. श्री गंगाजमुनाजी क्र... ता:६:३:१७८८ ईस

श्री
ज्योतिरूपसपद
रघुतनय राणो
जी सुत माहादजी
शिंदे निरंतर.

ा

राजश्री कालजी आलगढ ......गोसा द

वीस.. त

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे राम राम सुा सीत ार

स्मानीन मयां व अलफ. मुनसी राय भिमलाल नामा राजाजी येथे आले होते याची रवा

नगी खेडुन केली आहे तुम्हास खेडुन सांगोन रवानगी केली आहे त्यास प्राते परत्यार जाये हो

उन यावे सोबत मवारनिल्हेसही सांगितले आहे यांजबरे ७ ५ जमातदाराकडे ... जाणिजे ... १२२

पे हे विनंती... मोर्तब

सुद.

मा ७ १८ माहे जमातदाराकडे मुजा स्त्रेतार ... निन.

निमुते.ता:१७:२:४४:२२२

क्र.१३.   श्री रेणुका मातांबिका.   ता:१४:३:१७८६ ईसा

श्री
जोतिस्वरुपच
रणी तत्पर राणो
जी सुत माहादजी
सिंदे निरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ .....गोसावी यांस

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो। माहादजी सिंदे राम राम सुहासीतसमा नीन भ्या व आलफ तालेवरखान यांस हजरतानी घोडी वगैरे खरीदी करावयास पा। चांद खेडी येथे पाठविले आहेत हे घोडी व उंट व बैल व किराणा जिन्नस खरीदीकरुन लस्करात आणितील यास कोणे विसी मुजाहिम न होता समामने स्वारपयादे देउन आपली हाद पार करुन्नदेणे जाणिजे छ ११ जमादिलाखर बहुतकायलिहिणे हे विनंती ... मोर्तब सुद.

पा। छ२२ जमादिलाखर फालगुणवद्य भृगुवार.

विमुते.ता:२८:३:४४ :३३३

लेखांक १४.　　　　श्रीगजानन्प्र०　　　　ता:१८:२:१७८६ ईा

श्री
जोतिस्वरूपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
शिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ .....गोसावीयांस.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ना॥ माहादजी सिंदे राम राम सुासीत समानीन मयां व आलफ राजश्री दानापा सिकेनीस यांस किले माधवगड येथील हिशेब घेउन हुजुर बोलाविले आहे मशारनिले हुजुरयेतील त्यास तुम्ही संस्थानमजकुरी हुन स्वारपयादे समागमे देउन लस्करास पोहचाउन देणे 'जाणिजे छ १७ जमादिलावल बहुतकाय लिहिणे हेविनंती...

पा॥ छ ७ साबान.　　　　मोर्तब सुद.

हेपत्र १ व आपलेपत्र येकुन दोनी पाठवावी रा.नानास्दोनिदेउं.

विमुते,ता:२८:३:४४:४४

क.१७. श्रीजगदंबप्र० ता:१७:४:१७८६ इ.

श्री
जोतिस्वरूपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ कमाविसदार सांा

कोटे..............गोसावी...यांसि.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ माहादजी सींदे राम राम सुासीत समानैन मया व आलफ दौलतराम हाल्या जैपुरात होता तेथुन पळोनगेला आहे त्यास तिकडे आल्यास त्याची बातमी ठेउन हाल्यासधरुन हुजुरपाठवणे बुंदी कोटे वगैरे जागा आसपास चे कमाविसदारास लेहुन बातमी पुर्तेपणे ठेउन हाल्या हास्तगत होयते करणे येविसी राजश्रीराज जालमसिंग यांस लिहीआहे त्यास सांगुन बातमी ठेउन हाल्या पुढे कोणीकडे जाउनपावे ते करणे जाणिजे छ १७ जमादिलाखर बहुतकाय लिहीणे हे विनंती...मोर्तब सुद.

विमुते.ता:२८:३:४४:७७७

आंक.१८.　　　　श्रीजगदंबाप्र०　　　　ता:३०:४:१७८६ ईा

श्री
जोतिस्वरुपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ कमाविसदार सीा

राघोगड................गोसावी यांसि.

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य स्नो॥ माहादजी सिंदे राम राम सुासीतसमानीन मया व आलफ.संस्थानराघोगड मजकुर प्रांत खेचीवाडा येथील मामलत तालुकेसुध्दां मलोजी ईंगळे याजकडुन दुरकरुन पेस्तरसाल सनसबा समानीनचे आवलसालापासोन तुम्हाकडे कमाविसीने सांगितली आसे तरी माहली कुलबाब कुलकानुचा वाजबी आमल तालुकेनिहाय सुध्दाकरुन ऐवज आकारेल तो सरकार पोता जमाकरीत जाणे माहली गांवगना वार लावणी संवणी उतम प्रकारे करुन आबादी राखुन सरकारसेवा येकनिष्टपणे करुन किफायत करुन दाखवणे माजी मामलेदाराची बाकी माहली राहिली आसेल ती जमीदाराचे रुजुवातीने रुजु करुन हिशेबी जमाकरणे जाणिजे छ १ माहे रजब बहुतकाय लिहिणे हे विनंती..

मोर्तब
सुद.

विभुते.ता:२८:३:४४:ႠႠ

लेखांक. १९. श्रीदुर्गामाताप्र० ता:२:५:१७८६ रोजी

श्री
जोतिस्वरूपच
रणीतत्परराणो
जीसूतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री राज जालम सिंगजी.....गोसावी

यांसि..

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे राम राम विनंती उपरि ये थील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीतजावे विशेष. संस्थान उदेपुर प्रांत मेवाड येथील रा ज्याची दुरुस्ताई होउन सरकार कामाचे मतलब आहेत त्याचा बंदोबस्त होउन्यावा या अ र्थी पेशजी तुम्हास पत्रे लेहुन देउन राजश्री लालाजी बल्लाळ याजसमागमे फौजदेउन रवानगी केली त्यास येक्वर्षा होतआले दरम्यान तुमची व लालाजीबल्लाळयांची पत्रे आलीकीं सरकार आज्ञे प्रो लौकरच बंदोबस्त होउन येईल असे आस्ता आद्यापी दुरुस्ताई जाल्याचे पत्र आले नाही हेकाय तुम्ही तो बंदोबस्त केलाच आसेल तरी येविसीचे उत्तर सत्वर पाठवावे वरकड कितेक मजकुर लालाजी बल्लाळ यास लिहीआहे ते सांगतील त्यावरून कळेल राछ ३ रजब सु मा सीत समानीन मया व आलफ.बहुतकाय लिहिणे हे विनंती....मोर्तब सुद.

विमुते.ता:२८:३:४४:९९९

लेखांक.१९. श्रीदुर्गामाताप्र० ता:२:५:१७८६ इ०

श्री
जोतिस्वरुपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री राज जालम सिंगजी .....गोसावी

यांसि..

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे राम राम विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीतजावे विशेष. संस्थान उदेपुर प्रांत मेवाड येथील राज्याची दुरस्ताई होउन सरकार कामाचे मतलब आहेत त्याचा बंदोबस्त होउन्यावा या आर्थी पेशजी तुम्हास पत्रे वहुन देउन राजश्री लालाजी बल्लाळ याजसमागमे फौजदेउन रवानगी केली त्यास येकवर्ष होतआले दरम्यान तुमची व लालाजीबल्लाळयांची पत्रे आलीकीं सरकार आज्ञे प्रो लौकरच बंदोबस्त होउन येईल असे आसतां आद्यापी दुरस्ताई जाल्याचे पत्र आले नाही हेकाय तुम्ही तो बंदोबस्त केलाच आसेल तरी येविसीचे उत्तर सत्वर पाठवावे वरकड कितेक मजकुर लालाजी बल्लाळ यास लिहीआहे ते सांगतील त्यावरुन कळेल राछ २ रजब सुमा सीत समानीन मया व आलफ.बहुतकाय लिहिणे हे विनंती....मोर्तब सुद.

विभुते.ता:२८:३:४४:९९९

लेखांक.२०. श्रीअंबाभवानीप्र० ता:२:५:१७८६ ईा

श्री
जोतिस्वरुपच
रणीतत्परराणा
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ ....गोसावी

यांसि..

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे राम राम सुा सीत समानीन मया व आलफ संस्थान उदेपुर प्रांतमेवाड येथील राज्याची दुरुस्ताई करुन सरकार मामलतीचे वगैरे कितेक बंदोबस्त करुनघ्यावे येविसी राज जालमसिंगजी यास पत्रे लेहुन तुम्हास फौज सरंजाम देउन रवानगीकेली त्यास नवमाहिने जाहले दरम्यान तुमची पत्रे येतगेली कीं लौकरच सरकार आज्ञे प्रो बंदोबस्त करुन घेतो त्यास आद्यापी करारा प्रो आम्मलांत येउन बंदोबस्त जाल्याची पत्रे येत नाहीत यास काय म्हणावे ज्या आर्थी राज या कामीत आहेत त्या आर्थी गोष्ट आम्मलांत आणलीच आसेलक्दाचित राव तजीचे मनांत दुरुस्ताई करुन न्यावी लौकणीखाली घालोन दिवस काढावे असे आसल्या स तसेच लेहुन पाठवावे त्यासारिखा येथुन फौज पाठउन बंदोबस्त केला जाईल जाणिजे. छ २ रजब बहुत काय लिहिणे हे विनंती...मोर्तब सुद.

विभुते.ता:२८:३:४४:१०

लेखांक.२१.   श्रीअंबामाताकी जय.   ता:६:५:१७८६ ईरा

श्री
जोतिस्वरूपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ .....गोसावी

यांसि..

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य स्नो। माहादजी सिंदे राम राम सुासीत स मानीन मया व आल्फन तुम्ही छ २६ जमादिलाखरचे पत्र पाठविले ते पावले लिाभजकुर कळ ला राजश्रीराज जालमसिंगजी पुढे मेवाड प्रांती गेले राजा मोहकमसिंगजी सकावत व श्रीरा णाजी व रावत भीमसिंगजी वगैरे सरदार भींडरेस येउन भेटीजाहल्या नंतर त्याची पत्रे आ न्हांस येण्याविसी आली त्यावरून कुचकरून दरमजल आलो हुताशनीसमीपआली यामुळे रा णाजी वगैरे उदेपुरास गेले मोहकमसिंगजी याची भेटीजाहली राणाजीकडील भलेमाणुस त्याज बरावर होते त्यासी कितेक सरकार मतलबाचे बोलणे जाहले सांप्रत रावतजीचा करार जे चौ दिवसात उदेपुराहुन बोलण्याचा मुत्त्यार येक करून तुम्हाकडे पाठवितो त्यासी बोलणे ते बोलोन निश्चयात आणावे म्हणोन त्यास चौदिवसा मुत्त्यारयेउन त्यासी जाबसाल बोलण्या त येतील त्या प्रा। शेवेसि लिहोन सरकार मतल्बा प्रा। जाबसाल ठरोन फडशाकेल्यास उत म न केल्यास कुचकरून मैदानात राहुन सरकार कामास ईच्छीतनाहीत त्याचे पारिपत्याची विचारणाकेली जाईल म्हणोन वगैरे लि। ते सविस्तर विदीतजाहले ऐसियास राजश्री राजजा लमसिंगजी यासी मेवाडात जाउन नउमाहिने जाहले मागाहुन तुम्ही गेला त्यासही सहासात माहिने जाहले त्यास सरकार कामाची सूरत येकही दिसोनआलीनाही राजानी जाउन येक भीं रवाले याचामात्र राणाजीसी सलुख करूनदिला यातच सरकार कामाची योजनाकरून सरका र किफायतीची गोष्ट ठराविली आसेल रावतभीमसिंगजी व राघोदासजी वगैरे येकत्रजाहले

लेखन सीमा

लेखांक [४]　　　　श्री　　　　* संवत् १८१३ मार्गशीर्ष शुद्ध ५

[२६ नवंबर १७५६]

Payment of Price for [illegible] Camels

श्री
बलाळ चर
णी तत्पर सम
शेर बहादर
नीरंतर

राजश्री बाळाजीपंत व चिमणाजीपंत

कादार पा। पाटण गोसावी यांसि.

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्ने॥　　समशेर बहादर[४] सलाम. सुमा सबा खमसेन मया अलफ. राजश्री महादाजी अबाजी [पुरंदरे ?] याजकडील उटे खरिदी करावयासि धनजी चौधरी रवाना केला. त्याजपासोन दस्तक सरकारचे असता जकाती[५] बा। रुपये ५१ यकावन घेतले म्हणोन हुजूर विदित जाले. [तरी] ही गोष्ट कार्याची नाही. देखत पत्र सदरहू यकावन रुपये घेतले ते माघारे देणे. फिरोन बोभाट येउ न देणे. जाणिजे छ * ३ माहे राऴौवल.

मोर्तब
सुद

पैवस्ता छ २३ राबल

[१६ दिसंबर १७५६]

क्र. ३७. श्री सदगुरुदत्तप्र० ता:१९:६:१७८६ ईसा

श्री
जोतिस्वरुपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
शिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ....गोसावी

यांसि..

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो। माहादजी शिंदे राम राम सुा सबा समानेनमया व आल्फ तुम्ही पत्र पाठविले ते पावले उदेपुराहुन भलेमाणुस उदेसागरचे मुक्कामी आम्हाकडे येतहोते त्याच्या बोलण्यात घरनाही नंतर रावत आर्जुनसिंगजी यास घेऊन आले ते आम्हास म्हणालेकीं तफावतीने राहिल्यावर जाबसाल होतनाही फौजेचा मुक्काम येथेराखोन राज व तुम्ही सहे उदेपुरासचलावे राणाजीची भेटीघ्यावी समक्ष बोलोन जाबसाल निश्चयात आणोन देऊ त्यावरुन फौजेचा मुक्काम उदेसागरावर राखुन राज व आम्ही सहे उदेपुरासगेलो राणाजीचीभेट घेतली सरकार मतलबाची बोलण्याची कलमे येणे प्रा। बोलतो............

१ श्रीमंत पंतप्रधान स्वामी याची खंडणी दरसाल दीडलक्षरुपयाआहे त्यास सदरहुची जागाबक्क वसुली करुनद्यावी ....कलम १

१ प्रांत मेवाड येथील चौथाई सरकारात यावी हाकारआहे त्यास दरोबस्त राज्याचे चौथा ईचा आजमास करुन त्यापा। सरकारात मुलुक आलाअसेल तो वजा देऊन बाकीची दुरुस्ता ई करुन द्यावी ....कलम १

१ पनवात बाकी सनसबैनचे साली खासास्वारी उदेपुरच्या मुकामी येऊन खंडणी जाहली त्याचा बाकीचा व श्रीमंताकडील खंडणीचा हिशेब करुन त्यापा। गोविंदकृष्ण याचे विद्यमाने आदा जाहलाअसेल त्याची कबजे दाखऊन बाकीऐवजदेणे त्याचा निर्गम करुनद्यावा........कलम१

१ हाली सरकार नजराणा दरबारखर्च व फौजखर्च जाला असेलतो द्यावा..........कलम१

४६.　　　　　　　　श्री.　　　　　　　　ता.

१४६९

श्री
ज्योतिस्वरूपच
रणांतत्पर राणोजी
सुत माहादजी
शिंदे निरंतर.

राजश्री राज जालमसिंगजी गोसावी

यासि....

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो। महादजी सिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लीहीत जावे विशेष प्रांत मेवाड येथील बंदोबस्ता विसी काम काज राजश्री ल लालाजी बलाळ याजकडे सांगून फौज सुध्दा रवाना केले आहे व संस्थान उदेपूर चे वकालतीचे काम काज रा। गणपतराव कृष्ण याजकडे होते ते त्याजकडील दूर करून मार निले कडे सांगितले आहे त्यास तुम्ही व लालाजी बलाळ येक विचारे राहून प्रांत मजकुरचा बंदोबस्त येथास्थित राखून सरकार चाकरी करून दाखवावी वरकड कित्येक मजकूर मार निलेस सांगितला आहे ते तुम्हासी बोलती ल त्या वरून कळेल सरकार ठायी तुमचे लक्ष तुम्ही शहाणे येसा भरवंसा जाणोन तुम्हास लिहिले आहे तरी सरकार लक्ष राखून करणे ते करावे रा। छ२२ रमजान सुमा सित समानेन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद

विमुते.ता.५:४:४४: ४४,

२१. ॥श्री रामजी॥ ता: ८:४:१७८७

श्री.

श्रीतस्वरूप पञ
रंगोवृत्य राणो
मंहदमाहादजी
सिंदे नरेंद्र

कलमबंदी संस्थान उदेपूर बाजे मुभा श्री माहाराजाधिराज माहाराणा आर्ळ जाह बहादार श्री माधोरावजी सींदे विक्रमान माहराजा मोहकमसिंघजी सवतावत वा राज जालमसिंगजी ताहरा की कलमबंदी ताकीदी वार..............................कलमा.

दोताहाराव आल्लाखरूपिया. ८०००००

ताकीविगत.

०००० नजराणा सिरकारकादोयलाखरू०

०००० मुतसदीयांलावा दरबारखरचकारू०

०००० राजजालमसिंगजी वा पंडतलालाजी वकालतफैजिलेकरफतैजसम्हेत उदेपूर आयाजिसकाफतैवरचबावतताहरा.

००००

ाकी कीसतबंदी कीबीगत.

०००० संम्त१८४४सनसमानसमानीनकेसालमध्येरू०

२००००० मीतीभादवासुदी१५.......

२००००० मीतीआशाडसुदी१५......

४०००००

००००० संम्त१८४५सनतीसासमानीन तीनलाखरू०

१००००० कातकसुदी१५...........

श्री मंतराजश्री पंतप्रधान पेसवाके व्रफका पंटाकी जायेगा कामुलुक देडलाखरूपया संमत१८४४ सनसमानीनके सालमें मुदामत कीं पटारू० १५०००० देडलाख रूपयाकोहे जी सनाफक सालदरसाल की जायगावसुली दी जलाखरूपयाकील गांयदेना..................कलम.१

संस्थानके तरफ पाछलीबाकी सनबादकी तथाखंडणी की बाकी श्रीमंतराजश्री पेसवा कीं वा दोयजणासिरदार सिंदे तथाहोलकरकी आवणेकी है जीमध्ये कुलमुलुक बाल मातथा पटाईतसुधां बौधानकी जायबाल गांयदेणेकाकरार तीमध्येओमुलुकलगायदी यांहैसो वजाइकरओरबाकी राहारू०जीके

लेखांक. ७८.　　　　श्रीसांबसदाशिव.　　　　ता:२९:७:१७८७ ईा

श्री
जोतिस्वरूपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
शिंदे निरंतर.

Battle of
Tunga.

राजश्री लालाजी बल्लाळ ....गोसावी

यांसि..

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य स्नो॥ माहादजी शिंदे राम राम सुासमान समानीन मया व आलफ संस्थानिकाकडे भरण्याचे घोडे येणे त्याजविसी संस्थानिकास येकदोन पत्रे लिहिलीआसता अद्यापी घोडे पावोनाहीत त्यावरून हली राज जालमसिंगजीसही लिहिलेआहे व हे पत्र तुम्हास सादरकेले असे तरी तुम्ही राजाकडुन घोडेरास तीनशे भरण्यापैकी घेउन जलद हुजुर पावादेणे यानंतर इकडील वर्तमान तरी कालआधिक शुध्दत्रयोदशी शनवारीप्रहर दिवस चढल्यावर रांगडयाकडील फौजेची व इकडील फौजेची लढाई शुरूजाहली प्रथमतो फखाना दुतर्फाचालुलागला नंतर तिसरे प्रहरी राठोड वाढुनआले त्याची व आपले फौजेची तरवार चालली राठोडमारीत मारीत त्याचे गोटा जवळ घालविले राठोडा कडीलसात शेस्वार ठार जाले त्यात मातबर पटाइत दहावीस व सोभाचंद भंडारी मातबर ठारजाले. सिवाय जखमी पांचशे पर्यंत जाले फते श्रीकृपेने इकडील जाहली संध्याकाली हमदानीसही आपले कडील तोफेचागोळा लागुन ठारजाला नंतर च्यारघटका रात्री रांगडे माघारी गेले सरकारचीफौजही गोटासआली कालराठोडाचे तोंडबरेच ठेचलेगेले व नीमकहरामीही ठारजाहला श्रीकृपेने रांगडयाचे पारिपत्य फारकरून जाले राहिले त्याचे ही पारिपत्य सत्वरचहोईल. भरण्याचे घोडयाविसी राजास दोन्तीनवेळा लिो परंतु घोडयास दिवसगत लागली पेशजीगोहद ग्वालेरचे मसलतीस घोडे राजाकडुनआले आणि हलीनआले याचे कारणकाय असो सदरहु इकडील वर्तमान राजास ऐकउन घोडे रासतीनशे घेउन जलदपाठवणे सम्यलढाइचा यास्तव मुजरद

लेखांक. ८५.　　　　श्री अंबामाताकी जय.　　　　ता: २:११:१७८७ ईा

श्री
जोतिस्वरुपव
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर

Bundi Ruler joins The Opposition.

राजश्री लालाजीबल्लाळ कमाविसदार माा

हाय ....गोसावी यांसि.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नाो माहादजी शिंदे राम राम सुाासमान समानैन
मया व आलफ तुम्ही छ २ मोहरमचे पत्र पाो ते पावले बुंदीकरानी हरामखोरी करुन जय
पुर वाल्याकडील जमीयत आणोन सरकारचे माहलांत हंगामा करुन करवर समेधीस मोर्चेलावि
ले त्यास आम्ही ठाण्याचा बंदोबस्त सिबंदी वगैरे चांगलाकेला होता परंतु बुंदीवाल्याने चहुं
कडे रस्ते बंदकरुन रसद आथवा चिठीपत्री जाण्यायेण्यास आटकाव जाहला मोहनादीडमहिना
गढी लढली आणी मुलकात मेणे घालुन पाटण वगैरे माहलात दंगामांडला आणी आम्हाकडे

जाबसाल लाविलाकीं ठाणी कछवे याणी मोर्चे लाउन घेतल्यास पुढे ठाणी तुमचे हातास चढ
णारनाही याकरितां ठाणी आमचे जिमेकरावी त्यावरुन त्यास आम्ही वसुलराखलेहोते परंतु
बुंदीकरानी पुर्वीच बदमामली करुन माहलात बखेडा केला त्यावरुन राज जालमसिंगजी यांज
कडुन भलेमाणुस बुंदीसपाठउन त्यांजकडील भलामाणुस बोलाउन आणुन समजोन सांगितले तीगोष्ट
त्यांचे ध्यानात नये तेव्हां ठाण्याचे जाबसालाचा दारमदार गांवसुध्दा ठराउन त्यांचालिखतं
ग करुन घेउन प्रसंग विलगपाहुन ठाणी त्यांचे जिमेकेले लिखतंगाची नक्कल शेवेसी पााआहे.
त्यावरुन विदीत होईल म्हणोन लिाहेते सविस्तर विदीतजाहले ऐसियास बुंदीकरानी हराम
खोरीकरुन जयपुरवाल्याकडील जमीयत आणोन सरकारचे माहलात बखेडा केला आणि करवरसमे
धीस मोर्चे लाविले त्यावरुन तुम्ही व राज जालमसिंगजी याणी त्यास समजोनसांगितले असतां
त्यांचे ध्यानात नये ता पुर्वीचबदमामलीचा गोष्ट दिसोनआली त्यावरुन तुम्ही त्यांजकडील
राज जालमसिंगजीचे विद्यमाने भलेमाणुस बोलाउन आणोन दारमदार करुन प्रसंगपाहुन त्याचेलि
खतंगकरुन घेउन ठाणी बुंदी वाल्याचे जिमेस केली उतम केले रांगड्यानी तुरादेसी नकरितां
हावेवर दृष्टीठेउन हरामखोरीकेली त्यासयेविसी चिंतानाही देशीहुन फौज आणावलीतेही लौ
करच येईल आल्यानंतर हराखोराचे पारपत्यहोउन सर्व बंदोबस्तहोउनयेईल लिखतंगाची नक्कल पा:

TT सिधश्री सर्वे उपमा जोग्य विराजमान राजेश्री पंडितजी श्री नानासाहेबजी जोग्ययेते लि

खंतं राधोगडसे शुभचिंतक मैं. रघुनाथदासके निश्री जी बंचोजी आपके कुसमाचार सदाभले

चाहिजेजी तो हमको परम आनंद होइजी इंहाके समाचार आपकी मेहरबानगीसो भलाहेजी .

आप्र हमारो हाल हवालहै ते आप जानोहोजी और चाकरीभी आपजानोहो तासे दसमाहन

चाकरी करतेभये तामे उडना कपरा वास्न सब बेचखाये ओर अब नीत फाका पडतेहे सोहे

कहेकहां सुदामदको सिरस्ता भेट जमीबंदीपटे पटयावन रहहीतो बंधकरनेहो यामे दरबारको

छुभी जसगतथो पर वाहेर पेटेल देतेथे तेने दिवायो और राधोगडकी बंडी उगाही तापे सुदा

मत सेटका धरलगतथो तेमे हमको दमडी नदीवी हमारेपइसा उगाहेके सिरकारमे जमाकरे वेभी न

दिये दोमहिनासिरस्ताभेट जमाबंधीसे काटते सो हमारो बस कहां हमतो आपकोहीजाने हा

मारो तो योका कुथोसो चाकरी करवतावे आरे धनीको चितमे मिटाकेके आइतो हमारा

कहोवसो हमने तो जनमको आपको आसरोलियोहै येइहमारोभागनहीतो यै अबभाईबंध सब न

नरवरको जाइगे हम आपके पास बेटे रहेंगेजी मि.अगहनवदी६ संवत१८४४.......इ.स.१७८७

-------०००००------

TT शुभोदय मिच्छता राम कृष्णेन कृताशिषा: प्रणत परचोल संतु....चिरंजवजालानंदाकसो १११

की भलामपोहचे मैभी आपने हजुर आउंगा.इंहा मे कीनक्यासआउजी.................

किम्ते.~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~ooooo~~~~~~~~~~~~~~~~.~~~~~~~~~~~~~~

लेखांक. १०३.   श्रीमहाकद्रप्रसन्न.   ता:१४:१:१७८८ ईा

श्री
जोतिस्वरुपच
रणीतत्परराणो
जीसुतमाहादजी
सिंदेनिरंतर.

राजश्री लालाजी बल्लाळ कमाविसदारमौ

हाय...............गोसावी यांसि.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे राम राम सुा समानसमानीन मया व आलफ तुम्ही छ २२ राावलचे पत्र पाो ते पावले शेरसिंग गिराशा याने जमीयत ठेउन खेचीवाडयात दंगा करुन बखेडाकेला त्यावरुन स्वारसिंवदी राधोगडात ठेउनत्यास बसूनराखिले होते परंतु सांप्रत इकडील झाडून रांगडयानीं नजराफिरउन आपआपले जमीय तीनिसी गिराशास सामीलजाले त्यावरुन गिराशा मजकुर याने आणखी जमाव करुन न चावडयाचे गढीस मोर्चे लाविले आहेत त्याचे पारिपत्या करितां राजश्री नारोगोपाल्या समागमे नवी जमीयत ठेउन व राज जालमसिंगाकडील कांहीजमीयत देउन राधोगडास पाो आहे मागाहुन वरचेवर दारुगोळ्याची वगैरे पैरवी जाहलीपाहिजे याकरितां आम्हीयेथेच राहिलो आहो त्यास थोडकेजमीयतीने गिराशाचे पारिपत्य होते असे नाही झाडूनरांगडे हावभरीजाहले याकरिता सरकारातुन फौजयेउन उपरव्हावा म्हणजे राधोगडचा वगैरे बंदोबस्तराहील म्हणोन वगैरे मजकुर लिहिलातो सविस्तर समजला ऐसियासि शेरसिंग गिराशाने जमाव करुन दुंदीकेली त्याचे पारपत्यास राजश्री नारोगोपाल यासमागमे जमीयत नवी ठेउन जालमसिंगाकडील रवाना करुन तुम्ही त्याची पुरवणी मागाहुन वरचेवर करावी या जकरिता संस्थानी राहीला उतमकेले जागाजतन करावी याजकरितां आजपावेतों तुम्ही पुरवणीकेली व करीत आहा हे ध्यानांत आहे सांप्रत नारोगोपाल गेलेच आहेत गिराशास उधळुन देतील झाडून रांगडयाच्या नजरा फिरल्या आहेत तेव्हां थोडके जमीयतीने त्याचेपारपत्य होउन बंदोबस्त होणारनाही हे ठीकचआहे देशीहुन फौज आणविलीहोती ती माळव्यांत आलीआहे व मागाहुन आली बाहदर-सरकारची फौज सुध्दायेत आहेत तेही सत्वरच येतील त्यास मेवाडात जावद जीरण रतनगड सिंगोली इकडे मेवाडवाले वगैरे यानीं हंगामा केलाआहे त्याचे पारपत्याकरिता फौज उज्जनीस येताच समागमे घेउन जावदेकडे जाणे. म्हणोन राजश्री सदाशिवबापुजी फडणीस यास लिाआहे मशारनिल्हे फौजघेउन जाउन तिकडील रांगडयास उधळुन देउन बंदोबस्त करतील आलीबाहदर यास परभारे इकडेयेण्याविसी

लेखांक.५,४० नक्कल. श्री. ता:८:११:१७८८

यादी मोजदाद कोठार येक कीले चाचुर्डा सा राघोगड वी।। लालाजीबल्लाळ जीन्नसदास्तानी ता।। शंकर बाबुराव म।। नागोधोन्डदेव सु।। तीसा समानीन मयाव आलफ माहे सफर उर्फ कार्तिकमास जीनस कीरकोळी जुनीगलीत निकाम.............................

किता...............किता...........किता..............किता.........

१२ बंदुखी.............२ बरशा.........५ तरवारी..........७ ढालारोहडी...

१५ कमाना...........२ तारकस........५ नगाऱ्याचेपडदेबनाती...२ देवाचेचांदवे....

२ देवाचेचांदप्याचेखोळी..१० धागरछीटी.....१ कलंदऱ्यावोढणी.....१८ झागेहलकेपुराने..

१ टोपीताफत्याची....१ फुटक्याकाचाचीमणी२ताफताजीलेबी.....४ नारेलसाधीनंबरी.

१ गाळोडे टुकड्याचेगलीत१.दुर्बीन...........१ गाठोडेटुकडेगलीत...१ जाम्नीवजना५

१ गादीलाहानजुनी....१ आंगरखाहरणकातडया.२ पालखी चेपडदे......२ रुमाल.......

१ गादीहमरु.......३ रेसमीरसे.......... १ चिंध्याचेगाठोडे....१ गजगाघोडयाचेगलती

१४ पालखीचेहलाकेपुराने.१मोमजामा.........................येकुण १२२.....

२६ हस्तीदातटुकडे....२ मोरछलजुने...........२ नेचे.......... १ पालखीकी.......

१७ तकीये.... ....१ दीवटेलोखंडी.........७ खारव्याचेटुकडे....१ पालनिकाम......

१२ तक्याच्याखोल्या..३ गालीचेजीर्ण...-....१० वीजनखादीचे....८ गाद्याजीर्ण.......

२ आंरखे सुरकीजीर्ण.२ गलथाटुकडेजुने.......३२ देवाचीवस्त्रेजरीताप्ता८१ सेजबंदगोड...

१ पालखीचेसोडगेमध्युचे.१ पालखीचाआभ्रा......१ चांदनीगलीत......१ पालमशालचेउपयोगे

..........येकुण २२१ ....

संदर्भ ग्रंथ

अप्रकाशित साधने

अप्रकाशित गुलगुले दप्तर महादजी सिन्धीया खण्ड १, २, ३, ४, ५, ६

शिंदेशाहीच्या इतिहासाची साधने संपादक आनंदरावभाऊ फाळके खण्ड १,२,३,४,५,६

मुद्रांक य. ता. माणगांवकर, आलीजाह दरबार प्रेस, लष्कर, ग्वाल्हेर १९३०

प्राथमिक साधने

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, पुणे १९३१, भा. इ. सं. मंडळ, पुणे

ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १ ते १९, पुणे १९३२, भा.इ.सं. मंडळ, पुणे

ऐतिहासिक पारशी साहित्य, खंड १ ते १७, पुणे १९३२, भा.इ.सं. मंडळ, पुणे

ओतुरकर रा. वि. (संपा.), पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहर, पुणे, भा.इ.सं. मंडळ, १९३१.

आपटे द. वि. मुधोळ, संस्थानाच्या घोरपडे घराण्याचा इतिहास, मुंबई- १९३४.

आवळसकर शा. वी., सर्व हिंदुस्थानातील गोखले व गोखले -रास्ते घराण्यातील इतिहास, पुणे १९२२.

केळकर य. न., वसईची मोहिम (१७३४-१७३९), पुणे १९३६.

काळे या. मा., म्हाडचा इतिहास, खंड १, यवतमाळ १९०५.

काळे या. मा., म्हाडचा इतिहास, खंड २, पुणे १९२४

खरे वा. वा., ऐतिहासिक लेख संग्रह, खंड १ ते १४, पुणे १९२३.

खरे ग. ह. (संपा.), हिंगणे दप्तर, भाग १ ते २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९४०.

खोबरेकर वि. गों. व शिंदे (संपा), कोकणच्या इतिहासाची साधने, मुंबई १९०१.

गुजर मा. वि. (संपा.), करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड १ ते ८ पुणे, १९३२.

गाडगीळ ह. र., विंचुरकर घराण्याचा इतिहास, पुणे १८८३.

गोरे रा. म., श्रीमंत पंत अमात्य संस्थान, बावडा यांचे वंशवृत्त, कोल्हापूर १९५५.

चांदोरकर गो. का. (संपा.), छत्रपतींशी दिल्लीपतींचा पत्रव्यवहार, दिल्ली बादशहाकडून छत्रपतींक आलेल्या फारशी फर्मानांचे सातारा दप्तरातील जुने मराठी तर्जुमे तसेच दिल्लीकर मोगल व शा छत्रपती यातील पत्रव्यवहार, पुणे १९३४.

चिटणीस गोविंद ख. (संपा.), श्री शाहु महाराज यांच्या बखर भारतवर्ष, इतिहास संशोध मंडळ, पुणे १९३५.

का. ना. साने व टिपणीस म. रा. (संपा.), प्रकाशक, थोरले शाहु महाराज चरित्र, पुण १८८२.

जोशी चि. वी. (संपा.), बदोडे राज्य दरबारातील वेचे खंड १ ते ७, भारत इतिहास संशोध मंडळ, पुणे १९३१.

जोशी वा. ना., राजा श्रीमंत रघुनाथराव पंडित पंतसचिव राजे साहेब संस्थान, भोर यां चरित्र, पुणे १९३९.

टेंम्बे भा. म. (संपा.), हिंदुस्थानचा सागर विक्रम, बडोदे १९४८.

देव आत्माराम (संपा), श्री रामदासांची ऐतिहासिक कागदपत्रे, खंड ४ व ९, धुळे शके १८५

नाईक ग. गो. (संपा.), साष्टीची बखर, पुणे १९३५, काव्येइतिहास संग्रह ७, (१८८२), पुण १८८२.

नेरूरकर अ. शी., मुजाफरदौल, जिवाजी बल्हाळ उर्फ जिवबा दादा केरक बहाद्दर फत्तेजं यांचे चरित्र, मुंबई १९०७.

नाईक नि. पा. वाठाळकर, लिंबाळकर यांचे घराण्याचा इतिहास, पुणे १९२८.

पारसनीस संपादित, इतिहास संग्रह भाग १ ते ७ (१९०१ ते १९१६), पेशवे दप्तराती

माहिती, ऐतिहासिक गोष्टी, चरित्रे, टिपणे, लेख वगैरे, पुणे १९१६.

पुरंदरे द. बा. (संपा.), पुरंदरे दप्तर, खंड-१, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथालय क्रं. ३२, पुणे १९२१.

पुरंदरे कृ. वि. (संपा.), पुरंदरे दप्तर, खंड-१, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथालय क्रं. ३२, पुणे १९२१.

पुरंदरे कृ. वि. (संपा.), पुरंदरे दप्तर, खंड १ ते ३, पुणे १९२९.

पारसनीस द. ब., मराठ्यांचे पराक्रम, बदेलखंड प्रकरण, मुंबई १८९५.

पिंगुळकर वि. पु., सावंतवाडी संस्थाचा इतिहास, सावंतवाडी १९११.

पारसनीस द. ब. (संपा.), धावडशी येथील ब्रह्मोद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे पिसुर्लेकर, पोर्तुगीज मराठा संबंध, मुंबई १९८०

फाळके आनंदराव, शिंदेशाही इतिहासाची साधने खंड-पहिला ग्वाल्हेर १९२९.

राणोजी, जयाप्पा, जनकोजी, साबाजी व महादजी शिंदे व निंबाबाई यांची इ. स. १७३३ ते १७६७ या कालखंडातील संक्षिप्त पत्रे.

फाळके आनंदराव, शिंदेशाही इतिहासाची साधने खंड- दुसरा, ग्वाल्हेर १९३०.

फाळके आनंदराव, शिंदेशाही इतिहासाची साधने खंड- तिसरा व चौथा, ग्वाल्हेर १९३१.

फाळके आनंदराव, शिंदेशाही इतिहासाची साधने खंड- पाचवा व सहावा, ग्वाल्हेर १९३२.

बंद्रे वा. सी. (संपा.), महाराष्ट्र इतिहासाची साधने, खंड १ ते ३, पुणे १९३४.

भागवत अ. ना., सातार्‍याचा प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, भाग १ व २, औद्ध १८४६, १८५१.

भिडे वि. गो., सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास, भोर १८६६.

मावजी व पारसनीस (संपा.), फौज दप्तरखान्याविषयी माहिती, मुंबई १९१७.

मावजी पु. वि. व पारसनीस द. बा. (संपा.), दक्षिणेतील सरदारांच्या कैफती यादी वगैरे, पुणे १९०८.

राजोपाध्ये गो. रा., राजोपाध्यांचा इतिहास, पुणे १९५०.

राजवाडे वि. (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, भारत इतिहास संशोधक मंडळ, ग्रंथमाला खंड १,३,६,८,१०,१२,१३,१४,२१, २४,२६,२७ वाई १८९८, कोल्हापूर १९०१.

राजाध्यक्ष, शिंदेशाहीचा खरा इतिहास, ग्वाल्हेर १९३३.

लिमये वि. म., लिमये कूलवृत्तांत, पुणे १९३९.

लेले मु. ह., लेले कुलवृत्तांत, मुंबई १९४९.

वाड रा. ब. ग. चि. (संपा.), पेशवे दप्तरातून निवडलेले सातारकर महाराज व पेशवे रोजनिशी यातील निवडक उतारे खंड १ ते ११, सातारा १९३१.

वैद्य श. ल. (संपा.), वैद्य दप्तरातून निवडलेले कागदपत्रे, खंड १ ते ७, पुणे १९३५.

शेजवलरक त्रि. श. (संपा.), नागपूर अफेअर्स खंड १ ते २, डेक्कन कॉलेज, पुणे १९३४.

शिरोडकर प्र. प्रा. (संपा.), कोल्हापूर- पोर्तुगीज संबंध, १९३१, वसई १९३१.

सरदेसाई गो. स., कृ. पा. कुलकर्णी व या. मा. काळे (संपा.), ऐतिहासिक पत्र व्यवहार, पुणे १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.),उद्गीरची लढाई, खंड १, मुंबई सरकार, मुंबई १९३०.

सरदेसाई गो. स. (संपा.), पाणिपत प्रकरण (१७४७ ते १७६१), खंड २, मुंबई सरकार, मुंबई १९३०.

सरदेसाई गो. स. (संपा.), जंजिऱ्यांच्या शिद्दीवर शाहुची मोहिम, खंड ३, मुंबई सरकार, मुंबई १९३०.

सरदेसाई गो. स. (संपा.), छत्रपती राजाराम प्रकरण, खंड ६, मुंबई सरकार, मुंबई १९३०.

सरदेसाई गो. स. (संपा.), शाहु व बाळाजी विश्वनाथ, खंड ७, मुंबई सरकार, मुंबई १९३१.

सरदेसाई गो. स. (संपा.), शाहु (खाजगी), खंड ८, मुंबई सरकार, मुंबई १९३१.

सरदेसाई गो. स. (संपा.), बाजीराव (कौटुंबिक), खंड ९, मुंबई सरकार, मुंबई १९३१.

सरदेसाई गो. स. (संपा.), शाहु आणि संभाजी (परस्पर संबंध), खंड ११, मुंबई सरकार, मुंबई १९३१.

सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवे आणि दाभाडे, खंड १२, मुंबई सरकार, मुंबई १९३१.

सरदेसाई गो. स. (संपा.), मराठ्यांचा माळव्यात प्रवेश खंड-१३, मुंबई सरकार, मुंबई १९३१.

सरदेसाई गो. स. (संपा.), मराठ्यांचे उत्तरेतील पराक्रम, खंड १४, मुंबई सरकार, मुंबई १९३१

सरदेसाई गो. स. (संपा.), बाजीरावांची दिल्लीवर स्वारी, खंड १४, मुंबई सरकार, मुंबई १९३१

सरदेसाई गो. स. (संपा.), वसई मोहिम, खंड १६, मुंबई सरकार, मुंबई १९३१

सरदेसाई गो. स. (संपा.), शाहु आणि बाजीराव, खंड १७, मुंबई सरकार, मुंबई १९३१

सरदेसाई गो. स. (संपा.), छत्रपती शाहु आणि पेशवे खाजगी व्यवहार, खंड २०, मुंबई सरकार, मुंबई १९३१

सरदेसाई गो. स. (संपा.), नागपुरकर भोसल्यांची कामगिरी (१७४७ ते १७७४)खंड २०, मुंबई सरकार, मुंबई १९३२

सरदेसाई गो. स. (संपा.), मराठी रियासत, अपेशी नारायणराव - दुराग्रह रघुनाथराव मुंबई सरकार, मुंबई १९४४

सरदेसाई गो. स. (संपा.), मराठ्यांचे रियासत, उत्तर विभाग, खंड १ ते ३, मुंबई सरकार, मुंबई १९३२.

सरदेसाई गो. स. (संपा.), बाळाजी बाजीराव उत्तर हिंद, खंड २१, मुंबई सरकार, मुंबई १९३२.

सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवांच्या रोजनिशीतील उतारे, खंड २२, मुंबई सरकार, मुंबई १९३२.

सरदेसाई गो. स. (संपा.), बाळाजी बाजीराव राज्यकारभार, खंड २३, मुंबई सरकार, मुंबई १९३२.

सरदेसाई गो. स. (संपा.), पश्चिम किनाऱ्यांवरील पेशव्यांच्या हालचाली, खंड २४, मुंबई सरकार, मुंबई १९३२.

सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवे बाळाजी बाजीराव व निजाम, खंड २५, मुंबई सरकार, मुंबई १९३२.

सरदेसाई गो. स. (संपा.), ताराबाई आणि संभाजी, खंड २६, मुंबई सरकार, मुंबई १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.), बाळाजी आणि संभाजी उत्तर हिंद पुरवणी, खंड २७, (१७४२ ते १७६१), मुंबई सरकार, मुंबई १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.), शाहु व पहिले दोन पेशवे संकीर्ण (१७०० ते १७४०), खंड ३०, मुंबई सरकार, मुंबई १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.), जमाव विभागातील कागद, खंड ३१, मुंबई सरकार, मुंबई १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.), जंजिऱ्याची मोहिम पुरवणी, खंड ३३, मुंबई सरकार, मुंबई १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.), ऐतिहासिक घराणे, खंड ४५, मुंबई सरकार, मुंबई १९३३.

सरदेसाई गो. स. (संपा.), मराठेशाही कारभार, खंड ४५, मुंबई सरकार, मुंबई १९३४.

सरदेसाई गो. स. (संपा.), पुण्यश्लोक शाहु (बाळाजी विश्वनाथ), श्री समर्थ सदन, खंड ४५, मुंबई सरकार, मुंबई १९४४.

सरदेसाई गो. स. (संपा.), मराठी रियासत, छत्रपती राजाराम-निग्राहक माधवराव, मुंबई सरकार, मुंबई १९४४.

सरदेसाई गो. स., गो. स. वाकसरकर व वि. स. काळे (संपा.), काव्येइतिहास संग्रहास प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे लेख, खंड २, पुणे १९३२.

साने का. ना. (संपा.), भाऊसाहेबांची बखर, काव्ये इतिहास संग्रह १४, पुणे १८८५.

साने का. ना. (संपा.), पेशव्यांची बखर सोहोनीकृत, विज्ञान विस्तार मंडळ, पुणे १८९०.

सोमण वि. भा. (संपा.), सोमण (नरवणे) घराण्याचा इतिहास, पुणे १९४१.

English Books

Aitchison, C.D., Treaties, Engagements and Sanads. Bhargava, K.D., Browne Correspondence (1960).

Broughton T.D., Letters written in a Maharatta camp in the year 1809 (1992).

Choksey R.D., Malwan Residency (Sawantwadi Affairs), Pune 1956.

Dodwell H.H., Calendar of Madras Despatches.

Elliot, Sir H.M., The History of India as sold by its own Historians (1877), Vols. VIi and VIII.

Dowson J., Elphinstone's Writings.

Forrest, GW., Elphinstone's Writings.

Forrest, GW., Bengal and Madras Paper (1688-1757).

Forrest, GW., Home Series, Vol. II.

Forrest, GW., Maratha Series (1885)

Forrest, GW., Selections from the State Paper as the Governor General

Warren Hastings, 2 Vols. (1910).
Foster Willian, The English Factories, Vols. I to X.
Gense H.H. and Banaji D.R., The Third English Embassy to Poona (1934)
Gense H.H. and Banaji D.R., Gaikwads of Baroda, Vols. I to X (Baombay Government Redords)
Gleig, The Rev. GR., Memoies of Warren Hastings Vols. I and II.
Gurwood, Wellington Despatches.
Hastings Lord, Private Journal (2 Vols.) 1858.
Imperial Record Deptt., Calendar of Persoian Correspondence, Vols. V and VI.
Madrass Record Office, Redords of Fort 81. George Despatches from England.
Madrass Record Office, Letters fo Fort 81. George.
Madrass Record Office, Diary and Consultantion Book Vols.
Madrass Record Office, Diary and Consultation Book (Public Department) Madrass Record Office, Military Consultations. Public Department, Sunday Book 1758-59, Tellichery Consultation 1740-60.
Martin R. Montgomery, Despatches, Minutes and Correspondaence of the Marques of Wellesley 5 Vols.
Owen Sidney J., A Selection from the Despatches of Duke of Wellington (1880)
Owen Sidney 1., Papers re : Pindary and Maratha war. Paranjape B.G., English Record of Shivaji.
Ross Willamson, The Correspondence of Lord Cornwallis (London,1859)
Sardesai G.S. and Sarkar ladunath, Poona Residency Correspondence Serie, 14, Vols.

Sarkar ladunath, Persian Records of Maratha History Vols. I and II.
Shrivastavya B.K., The Angreys of Kolaba (Extracts from Bombay Govt. records.)
H.N. Sinha, Selection from the Nagpur Residency Records 4 Vols. R.M. Sinha, Bhonslas of Nagpur, The Last Phase.

SECONDARY WORKS

Ananda ranga Pillai, Diary, 12 Vols. (Ed. by Dodwell and Price) Athar Ali, The Mughul Nobility under Aurangzib.
Auber Peter, rise and Progress of the British Power in India (1837).
Aziz Ahmad, Treasure of the Mughals.
Aziz Ahmad, Studies in Islamic Culture in the Indian Environment.
Banerjee A.C., Peshwa Madhav Rao 1.
Barve, Life of Malhar Rao Holkar.
Basu B.D., Story of Satara, Calcutta, 1922.
Bhargava U.S., Mewar and the Mughul Emperors.
Bhatnagar O.P., Studies in Social History.
Bidulph John, Malbar Pirates.
Blacker V., History of the Bengal Army (1850).
Broome A., Journey from Madrass to Mysore, Canara and Malabar, Vol. 1.
Broome A., Patna and Bihar.
Buckland C.E., Dictionary of Indian Biography (1906).
Busawanlal, Memoirs of Ammer Khan, tr. by H.T. Prinsep, 1832.
Cambridge R.O., War on the Coast of Cor oman del.
Cambridge R.O., (1761), Combridge History of India Vols. IV V and VI. Caraccioli Charles, War on the Coast of Coromandel (1761),

Combridge History of India, Vols. IV, V and VI.
Caraccioli Charles, Life of Robert Clive.
Carey, The Good Old Days of the Hon'ble Join Company, Vol. 1.
Chaplin William, report of the Fiscal and Judicial system of Adminstration etc. in the Deccan, 1824.
Chatterji N.L., Mir Qasim (1935).
Chopra and Garrat, Events at the courts ofRanjit Singh.
Colebrooke, Sir, T.E., Life of Mounts turd Eliphinstone (London, 1884)
Commissariat M.S., A History of Gujarat, Vols. I and II (1957).
Conningham J.D., History of the Sikhs (2nd Edn.1853) Cultural Heriitage of India, Vol. IV.
Danvers, History of the Portuguese in India.
Dasgupta A.P., Studies in the History of Brithsh India.
Dasgupta A.P., The Central Authority in British India (1774-84).
Datt K.K., Ali Vardi and his Times (1939).
Davies C.C., Warren Hastings and Oudh.
De Guyon, Abbe, A new History of the East Indies Vol. 1.
Dighe V.G., Peshwa Bali Rao I and Maratha Expansion (1944).
Diron Major, A Narrative of the Campaign in India which terminated the war with Tipu Sultan in 1792 (1794).
Dodwell H.H., Dupleix and Clive.
Dow, History of Hindustan, Vol. III.
Downing Clement, A History of the Indian War (Foster's Introduction).
Dubois Abbe, lA., Hindu Manners, Customs and Ceremonies, Letters on the State of Christianity (1943 Ed.)
Duff James Grant, A History of the Maharattas (1921 Edn.) 2 Vols.
Elliot F.A.H., The Rulers of Baroda (1934).

Elphinstone Mountstuart, Report on territories Conquered from the Peshwa (1822).

Forbes James, Oriental Memoirs (1813), 4 Vols.

Francklin William, Shah Aulum (1798).

Furber Holden, John Company at Work (1921)

Gangaram, Maharashtra Purana, Ed. by Gupta and Dimock. Zazetteers - Bombay, Poona, Thana, Lolaba, Ratnagiri (Old), Ratnagiri (New), Bharatpur and Sialkot District.

Gleig, The Rev. G.R., The Life of Sir Thomas Munro (1854).

Grahma D.G., Statistical Report of the Principality ofKolhapur (1854).

Gupta P.C., Baji Rao II and the East India Company (1939).

Hatalkar V.G., The Marathas and the French.

Irfan Habib, The Agrarian System ofMughul India.

Irvine William, Later Mughals, Vols. I and II.

Jenkins Richard, Report on the Territories of the Raja of Nag pur (1827).

Kashiraj, Pandit, Battle of Panipat, Ed. By rawlinson (1926, Edn.)

Kaye John Willian, Life of Sir John Malcolm, Vols, I and II.

Kaye John Willian, Life and Correspondence of Sir Charles Metcalfe.

Keith Arthur Berriedale, Speeches and Documents on India Policy, Vol.I.

Keith Feilling, Warren Hastings (1954).

Khobrekar V.G., Maharashtra State Archive Bulletin Nos. 1 to 8.

Kulkarni A.R., Maharashtra in the Age of Shivaji.

Lockhart L., Nadir Shah (1938).

Low C.R., History of the India Navy, Vol. I.

Lyall, Sir Alfred, The Rise and Expanstion of the British Dominion in India (1905), 3rd Edn.

Macauliffe M.A., The Rise and Expansion of the British Dominion in India (1905), 3rd Edn.

Macdonald A., Memoir of Nan a Farnavis (1851), 1927 End.

Malcolm, Sir John., Life of Clive:

Malcolm, Sir John., Memoir of Central India, 2 Vols (1880) Edn.

Malcolm, Sir John., Political History of India, 2 Vols, (1970) Edn.

Malcolm, Sir, John, Sketch of the Sikhs.

Malgoankar M., Kanhoji Angrey.

Malleson G.B., The Decisive Battles of India.

Manucci N. Storia Do Mogor, Tr-by William Irvine (Four Vols.)

Mehta M.S., Lord Hastings and the Indian States (1930)

Mill James, Miscellaneous Tracts.

Mohibul Husain Khan, Warren Hastings in Bengal (1 772-74) (1947).

Moon, Penderel, Warren Hastings and British India (1947)

Muir ramsay, The Making of British India.

Nijjar Bakshi Singh, Punjab under the Great Mughuls.

O'Malley, History of Bengal, Bihar and Orissa.

Orme, Robert, Historical Fragment of the Mughal Empire.

Orme, Robert, History of Military Transactions in Hindostan, Vols. I and II.

Pawar A.G., Maratha History Seminar (Kolhapur, 1971).

Pearse Col. Hugh, Memoir of the Life and Military Services of Viscount Lake (Blackwood 1908).

Philips C.H., History of the Political and Military Transactions in India during the Administration of the Marquess of Hastings (1813-23) (London, 1925).

Qanungo K.R., History of the Jats.

Qanungo S.N., Jaswant Rao Holkar.

Raghubir Singh, Malwa in Transition.

Ramsbothan, Studies in the Land revenue History of Bengal (1769 - 1787).

Ranade M.G., Miscellaneous writting (1925).

Ranande M.G., Rise of the Maratha Power (1900).

Ranade R.D., Pathway to God in Marathi Literature.

Raynal Abbe, History of the Settlements and Trade of Europeans in the East, etc.

Robert P.E., History of the Settlements and Trade of Europeans in the East, Etc.

Sardesai G.S., History of British India (1958)

Sarkar Jadunath, Main Currents ofMaratha History (1933)

Sarkar Jadunath , New History of the Marathas (1950) 3 Vols.

Satish Chandra, Parties and Political at the Maghul Court, 1707 -39.

Scafton, reflections on the Governments of Indostan.

Sen S.P., The French in India (1947)

Sen Surendranath, Administrative System of the Maratha (1925)

Sen Surendranath, Early Career of Kanhoji Angria and other paper.

Sen Surendranath, Military System of the Maratha (1928)

Shejwalkar T.S., Panipat 1761.

Sinha N.K., Rise of the Sikh Power.

Sinha N.K., Economic History of Bengal (2 vols)

Sinha N.K., Haidar Ali (1941)

Sinha N.K., N.S., Indo-British Economy of Handred Year Ago.

Smith Vincent A., The Oxford History of India (Revised Edition, 1958)

Smith, Life of Henry Martin.

Srinivasan C.K., Peshwa Baji Rao 1.

Srinivasachari C.S., Ananda Ranga Pillai : The Pepys of French India

Srivastava A.L., Shuja - ud - daulah (2 Vols.)

Srivastava, First Two Nawabs of Oudh (1933).

Strachey Sir J., Hastings and the rohilla War (1892)

Sutherland Lucy, East India Company in 18th Century Politics.

Temple Sir, Richard, Oriental Experiences.

Terry Edward, A Voyage to East India (London 1 777)

Thompson, Edward, The life of Sir Charles Metcalfe.

Thompson E. and, rise and Fulfilment of British rule in India (1934)

Garrat G.T., Memoir of the War in India, 1803, 1806.

Thorn, Major William, Sardesai Commemoration Volume (1938)

Tikekar S.R., Islam in Indian and Pakistan (1959)

Tod James, Some Institutions of the Maratha people. (Asiatic Annual Register 1799)

Tone, William Henry, Historical Sketches of Sourth India, 3 vols.

Wilks Lt. Col. Marks., History of Mysor, Vol. II (1932).

Wilks, Lt. Col. Marks, The men who ruled India, Vols. I and II.

Woodruff, P., Life of Sir Eyre Coote (1922).

YusufHusain Khan, Nizam-ul-Mulk Asaf Jah. (1963) Edn.

मार्गदर्शक
डॉ. अनिल कठारे
एम. ए. (सुवर्णपदक), एम. फिल., पीएच.डी.
प्राध्यापक व संचालक,
पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र,
श्री शिवाजी कॉलेज, ता. कंधार,
जि. नांदेड

संशोधक
प्राचार्य सुरेंद्र वामनराव खाडे
(एम. ए. इतिहास, बी. एड.)
नॅशनल कला व विज्ञान महाविद्यालय,
जालना